म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं. ४२५



REFBK-0006488

# देशभक्तीची कसोटी

## राजकीय टीका-लेख संग्रह

लेखक

**शं. वा. देशपांडे**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0006488

लो क - सा हि त्य
८७ शिवाजी पार्क, मुंबई २८
१९४४

ऑक्टोबर १९४४

['लोकयुद्ध' साप्ताहिकांत 'लाल दुर्बिणींतून' या सदराखालीं नियमितपणें प्रसिद्ध होत असलेल्या टीकालेखांपैकीं निवडक लेख या संग्रहांत घेतलेले असून ते पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यास परवानगी दिल्याबद्दल प्रकाशक 'लोकयुद्ध'चालकांचे आभारी आहेत.]

Printed by S. V. Lole at the PRAJNA PRESS, Wai and
published for Lok-Sahitya by Shakuntala Modak
87 Shivaji Park, Bombay 28.

# लेख–सूचि


| क्रमांक | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | चीनच्या जंगलांत हिंदुस्थानचा राष्ट्रध्वज | १ |
| २ | नव्या दुनियेंतील नवीं माणसें | ७ |
| ३ | सोविएत-निंदकांच्या कोल्हेकुईचें इंगित | ११ |
| ४ | पुणेरी सनातन्यांच्या बावळट थापा | १५ |
| ५ | राष्ट्रभक्तीची कॉंग्रेस–सोशालिस्ट व्याख्या | १९ |
| ६ | हाडांच्या सांपळ्यांविरुद्ध सावरकरांचें युद्ध | २३ |
| ७ | मृत्यूच्या तांडवनृत्यापुढें अच्युत पटवर्धनांना हर्षवायु | २७ |
| ८ | रोमां रोलां व मराठी साहित्यिक | ३१ |
| ९ | प्रच्छन्न हिंदुसभावाल्यांपासून सावध रहा ! | ३६ |
| १० | समाजसत्तावादाच्या शत्रूंचा गुरु | ४१ |
| ११ | कॉंग्रेस-कम्युनिस्ट सहकार्याचे सुपरिणाम | ४५ |
| १२ | ‘ चित्रा ’च्या ‘ राष्ट्रवादा ’ वर नवा प्रकाश | ४८ |
| १३ | लोटवाला शेटजी हिटलरचे स्तुतिपाठक | ५२ |
| १४ | सोविएत यूनियनचें नवें राष्ट्रगीत | ५६ |
| १५ | अनंत काणेकरांच्या बाष्कळ बढाया | ६० |
| १६ | पंजाबचा शेतकरी व सोविएत ताजिकिस्तान | ६५ |
| १७ | पाहुण्याचा उमेटपणा व घरधन्यांचें भांडण | ६९ |
| १८ | नागपूरच्या ‘ कान्होबा ’चें आचरट तर्कशास्त्र | ७२ |

| | | |
|---|---|---|
| १९ | ‘ जगत्क्रांतीची अग्रेसर आघाडी ’ | ७६ |
| २० | मुंबईचे मेयर व टाटाचे नोकर | ७९ |
| २१ | रुक्मिणी–स्वयंवरांत ‘ नवा काळ ’ला न दिसलेला कृष्ण | ८२ |
| २२ | डॉ. जयकर व सोव्हिएत रशिया | ८६ |
| २३ | बंगालचा दुष्काळ व मराठी साहित्य | ८९ |
| २४ | मिनू मसानींचा ‘ फेरविचार ’ | ९३ |
| २५ | सावरकरांना घरचा अहेर | ९६ |
| २६ | ‘ कम्युनिस्ट ’ रामशास्त्री | १०१ |
| २७ | गरिबांचे मारेकरी कोण ? | १०४ |
| २८ | टॉटनहॅमची पोपटपंची | १०७ |
| २९ | शत्रु कोणते, व मित्र कोणते ? | ११० |
| ३० | ‘ ऑगस्ट बंड ’ व गांधीजी | ११४ |
| ३१ | पाकिस्तान–विरोधाची केरसुणी. | ११७ |
| ३२ | विद्यार्थ्यांना फसविण्याचा प्रयत्न | १२२ |

१०५९२
६९८

— १ —

# चीनच्या जंगलांत हिंदुस्थानचा राष्ट्रध्वज

हिंदुस्थानपासून हजारों मैलांच्या अंतरावर उत्तर चीनमधील एका अरुंद खोऱ्यांत हिंदी राष्ट्रीय काँग्रेसचा तिरंगी झेंडा अभिमानानें फडकत आहे.

भोंवतालीं दाट जंगल पसरलें आहे. त्याच्या पलिकडे चारी बाजूला जपानी सैन्य आहे. ईशान्य दिशेला थोड्याच अंतरावर चीनची पुरातन राजधानी पेपिंग आहे. गेलीं साडेसहा वर्षें हें शहर जपान्यांच्या ताब्यांत आहे.

चीनच्या भयाण रानांत तळपणारा तो हिंदुस्थानचा राष्ट्रध्वज जपानी फॅसिस्टांच्या डोळयांत खड्याप्रमाणें सलत आहे. केव्हां तो पायदळीं तुडवूं असें त्यांना झालें आहे.

पण जपान्यांच्या हातीं हिंदुस्थानचें तें लाडकें निशाण कधींहि जाणार नाहीं. हिंदुस्थानच्या अब्रूचे धिडवडे काढण्याची जपान्यांची सैतानी लालसा कधींहि तृप्त होणार नाहीं. त्या झेंड्याजवळ आणि भोंवतालच्या जंगलांत चिनी जनता रात्रंदिवस जागता पहारा करीत आहे.

कां ?

कारण जिवंतपणींच मरून गेलेल्या देशद्रोही सुभाष बोसच्या हातानें भ्रष्ट झालेला तो झेंडा नव्हे. मरून अमर झालेल्या डॉ. द्वारकानाथ कोटणीसांच्या समाधीवर डौलानें डुलणारा तो झेंडा आहे.

* * *

एक वर्षापूर्वी–ता. ९ डिसेंबर रोजीं–चिन त्सा ची येथील 'इंटरनॅशनल पीस हॉस्पिटल'मध्यें डॉ. कोटणीसांचें देहावसान झालें. 'शान्सी–चहार–होपे सरहद्द प्रांत' असें नांव देण्यांत आलेल्या टापूंत हें गांव आहे. हा सर्व टापू जपानी सैन्याच्या पिछाडीला आहे. १९३७ सालीं चीनविरुद्ध युद्ध सुरू केल्यानंतर थोड्याच अवधींत जपानी फौजा शेकडों मैल आंत घुसल्या, परंतु या पादाक्रांत केलेल्या टापूंत स्वतःचा अंमल जारी करणें मात्र त्यांना शक्य झालें नाहीं, चीनच्या उत्तर भागांत जपानचा प्रतिकार करणाऱ्या कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील सुप्रसिद्ध आठव्या फौजेच्या कैक तुकड्या जपानी फळी फोडून पिछाडीला गेल्या व त्यांनीं स्थानिक जनतेची संघटना करून बहुतेक सारा मुलुख पुनः चिनी अंमलाखालीं आणला. या टापूंतील रेल्वेलगतचा भागच जपान्यांच्या ताब्यांत आहे, बाकीच्या कोणत्याहि भागांत जपानची सत्ता चालत नाहीं. चीनच्या नकाशांत जपानी सैन्याच्या आघाडीची रेषा पाहून जपानच्या 'यशा'ची खरी कल्पना येणार नाहीं. या रेषेच्या पिछाडीचा मुंबई इलाख्याहूनहि जास्त मोठा असणारा प्रदेश चिनी जनतेच्या ताब्यांत आहे.

चीनमधील जनता युद्धाला कंटाळली आहे, चीनमध्यें जपानची सरशी होत चालली आहे, असा प्रचार करणारीं अच्युत पटवर्धनांच्या 'नाइन्थ ऑगस्ट' व 'क्रांतिकारी' सारखीं पत्रें, व त्याला कावेबाजपणानें साथ देणारे 'चित्रा' वगैरे पत्रांचे लेखक चीनमधील युद्धपरिस्थितींतील वरील महत्त्वाची गोष्ट मुद्दाम लपवून ठेवीत असतात. कारण काय ? कोणत्याही देशभक्ताला तें सहज कळण्यासारखें आहे !

या पिछाडीवरच्या टापूंत काम करण्याची धोक्याची व अभिमानाची कामगिरी डॉ. कोटणीस यांनीं आनंदानें पत्करली.

* * *

कॉंग्रेसनें चीनला पाठविलेल्या पांच डॉक्टरांपैकीं डॉ. कोटणीस हे सर्वांत तरुण होते. कामगारांच्या लाल सोलापुरांत ता. ९ आक्टोबर १९१० रोजीं त्यांचा जन्म झाला. महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांतील शिवाजीच्या गनिमी सैनिकांच्या परंपरेचे ते वारसदार होते. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या देशाभिमानी मुशींत त्यांच्या तरुण मनाची घडण झाली होती. विद्यार्थ्यांच्या चळवळींत त्यांना लढाऊ संघटनेचा अनुभव मिळाला होता. (ऑगस्ट १९३२ मध्यें गोवर्धनदास सुंदरदास मेडिकल कॉलेजच्या संपांत भाग घेतल्याबद्दल व कॉलेज अधिकाऱ्यांवर सडेतोड टीका केल्याबद्दल त्यांच्यावर डीनची इतराजी होऊन त्यांना तें कॉलेज सोडावें लागलें होतें.) येनान येथें चिनी कम्युनिस्टांच्या सहवासांत त्यांच्या उदात्त ध्येयनिष्ठतेला शास्त्रशुद्ध राजकीय तत्त्वज्ञानाची जोड मिळाली होती.

चीनला हिंदी डॉक्टरांचें पथक पाठविण्याचा काँग्रेसचा ठराव कानी पडतांच डॉ. कोटणीस या पथकांत सामील होण्यास तावडतोब पुढें आले. १९३६ सालीं ग्रँट मेडिकल कॉलेजमधून एम्. बी. बी. एस्. ची परीक्षा पास झाल्यानंतर त्यांनीं एक विचार मनांत ठरवून टाकला होता– 'उत्तम सर्जन व्हायचें!' ही महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याची व त्याचवेळीं आपली देशाभिमानाची व मानवी सहृदयतेची तळमळ तृप्त करण्याची इतकी उत्कृष्ट संधि आली असतां ती त्यांनीं वायां दवडली असती तरच तें आश्चर्य ठरलें असतें.

*　　　*　　　*

ता. ९ सप्टेंबर १९३८ रोजीं त्यांनीं मुंबईचा किनारा सोडला. स्पेनच्या रणभूमीवर काँग्रेसचें शुश्रूषा-पथक घेऊन जाणारे डॉ. अतल हेच चीनमध्यें जाणाऱ्या या पथकाचे पुढारी होते. त्यांच्याबरोबर डॉ. बसू, डॉ. चोळकर व. डॉ. मुकर्जी हे होते.

आपल्या चिनी बांधवांना जपानी दैत्यांनी केलेल्या जखमा लाक्षणिक अर्थाप्रमाणेंच वाच्यार्थानेंहि बऱ्या करण्यासाठीं, चिनी जनतेला जपानच्या मृत्युपाशांतून अक्षरशः सोडविण्यासाठीं, हिंदुस्थाननें आपले हे पंचप्राण चीनच्या स्वाधीन केले होते. त्यांना निरोप देतांना **श्री. सरोजिनी नायडू** म्हणाल्याः—

"तुम्हीं पत्करलेली कामगिरी फार धोक्याची आहे. चीनच्या स्वातंत्र्यासाठीं तुम्हांला चिनी वीरांबरोबर स्वतःचेहि प्राण कदाचित् अर्पण करावे लागतील. जर तुम्हांला मृत्यु आला, तर मी तुम्हांला काव्याची तिलांजलि देईन, आणि तें काव्य विजयी वीरांचा पोवाडा असेल."

तळहातावर शीर घेऊन हे पांच वीर हिंदी जनतेच्या जाज्वल्य स्वातंत्र्यप्रेमाची, विश्वबंधुत्वाची व फॅसिझमविरोधाची दिव्य पताका फडकवीत चीनच्या किनाऱ्यावर उतरले. जवाहरलाल नेहरूंच्या सल्ल्यावरून ते सरळ उत्तर चीनमधील येनान शहरीं कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील आठव्या फौजेंत काम करण्यासाठीं गेले. जपानी सैन्याच्या पिछाडीवरील टापूंत काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोंपवून चीननें हिंदुस्थानच्या बहादुरीचा गौरव केला, हिंदी जनतेवरील आपला अढळ विश्वास जाहीर केला.

अत्यंत कष्टमय परिस्थितींत अत्यंत महत्त्वाची कामगिरी पार पाडून व चीनचे सप्रेम धन्यवाद घेऊन या पांचजणांपैकीं चौघे स्वदेशीं परत आले. त्यांपैकीं शेवटचे डॉ. बसू यांनीं येतांना डॉ. कोटणिसांची पुण्यस्मृतिहि बरोबर आणली. चीनच्या भूमिशीं एकजीव झालेला डॉ. कोटणिसांचा देह चीनच्या हृदयांत हिंदुस्थानला मिळालेल्या अढळ स्थानाचें प्रतीक बनला.

*　　　*　　　*

डॉ. कोटणीस यांना **चिन्-त्सा-ची** येथील इंटरनॅशनल पीस हॉस्पिटलचे मुख्याधिकारी नेमण्यांत आलें होतें. जपानच्या पिछाडीवरील टापूंतील हें मुख्य हॉस्पिटल आहे. या हॉस्पिटलची व्यवस्था पाहणें, तेथील डॉक्टरांना सर्जरीचें शिक्षण देणें, व त्याचवेळीं स्वतः शस्त्रक्रिया करणें, एवढीं कामें त्यांना करावीं लागत असत. शस्त्रक्रियेवर एक ग्रंथ लिहिण्याचें काम त्यांच्याकडे सोपविण्यांत आलें होतें. हा ग्रंथ ते इंग्लिशमध्यें लिहीत होते व भाषांतरकाराला शेजारीं बसवून त्याचें चिनी भाषांतर करून घेत होते. (मुंबईला बोटींत बसल्यादिवसापासूनच त्यांनीं चिनी भाषेचा अभ्यास सुरू केला होता.) हा ग्रंथ पुरा होण्यापूर्वींच त्यांना मृत्यु आला.

हें सर्व काम अतिशय मेहनतीचें तर होतेंच, पण त्याखेरीज तें अत्यंत बिकट परिस्थितींत पार पाडावयाचें होतें. एक तर साधनसामुग्रीचा फारच तुटवडा. त्यांत पुनः जपान्यांच्या हल्ल्याचें सतत भय. वर्षांतून दोनदां जपानीं सैन्य 'मॉपिंग अप' साठीं येई. पिछाडीवरील टापूंतील विरोधकांची कत्तल करावयाची व तेथें आपला दरारा बसवून सुरळित राज्यकारभाराचा पाया घालावयाचा, हा या '**मॉपिंग अप**' चा अर्थ होता. चिनी भाषेंत त्याला '**सॉ-दांग**' असें म्हणतात. वीस हजार जपानी सैनिकांची टोळधाड मॉपिंग अप साठीं येई, व दीड दोन महिने प्रत्येक खेड्यांत धुमाकूळ घालून परत जाई. अशा वेळीं सर्व गनिमी सैनिक डोंगराच्या व जंगलाच्या आश्रयानें दबा धरून राहात. हॉस्पिटलसुद्धां हालवावें लागे. चिनी सैनिक हीं कामें फार शिताफीनें करीत.

*                    *                    *

डॉ. कोटणीसांनीं डॉ. बसूंना लिहिलेल्या पत्रांत या मॉपिंग अपच्या बाबतींत पुढीलप्रमाणें उल्लेख केला आहे:—

"तुम्ही इथून गेल्यानंतर एक महिन्याचाच अवधि. शत्रूची अपेक्षित '**सॉ-दांग**' आली. यावेळीं शत्रूची तयारी जबरदस्त होती. उत्तर चीनमधील सर्वांत मोठा लष्करी प्रमुख वीस हजार सैनिकांची ही मोहीम स्वतः जातीनें चालवीत होता. जवळ जवळ महिनाभर आम्ही पायपीट करीत राहिलों. कित्येक वेळां शत्रूपासून एका हांकेच्या टप्प्यांत राहून आम्ही त्याला गुंगारा दिला ... ... आमच्या विद्यार्थ्यांनीं टेहळणी, पाहरा, इत्यादि कामें केलीं. आमचे पांचएक विद्यार्थी शत्रूच्या हातीं सांपडले."

इशारा मिळाल्यानंतर दोनतीन तासांच्या आंत सबंध हॉस्पिटल हालवितां यावें, अशी जय्यत तयारी ठेवण्यांत आली होती.

या सर्व कार्यांत डॉ. कोटणीस यांना त्यांची चिनी पत्नी कॉ. **कुओ-चिंग-लान** हिचें बहुमोल साहाय्य झालें. हॉस्पिटलला जोडलेल्या **बेथ्यून** मेडिकल स्कूलमध्यें

ती नर्सिंगची अध्यापिका होती. चिनी मुली परकीयांशीं लग्न करण्यास बहुधा तयार नसतात, परंतु डॉ. कोटणीसांचे गुण व चीनसाठीं आत्मीयतेनें ते करीत असलेलें काम यांनीं या मुलीला आकर्षून घेतलें.

चीन-हिंदुस्थानच्या परस्पर प्रेमाचें जिवंत प्रतीक असलेला त्यांचा मुलगा सध्या **येनान** येथें आईबरोबर आहे. बापाच्या मरणाच्या वेळीं तो पांच महिन्यांचा होता. तो बापासारखाच सांवळया वर्णाचा असल्यामुळें सारेजण त्याला '**इ पान खे, इ पान पे**' ( अर्धा काळा, अर्धा गोरा ) म्हणतात.

* * *

चीनमधील कार्यांत डॉ. कोटनीस तन्मय होऊन गेले होते तरी त्यांना आपल्या मातृभूमीचा विसर मुळींच पडला नव्हता. डॉ. अतल यांनीं हिंदुस्थानांत परत जाण्याचा आग्रह सुरू केला तेव्हां डॉ. बसू व कोटणीस या दोघांनीं विरोध केला खरा, पण त्याचें कारण त्यांना स्वतःचें शिक्षण—विशेषतः स्वतःच्या मनोभूमिकेंत बदल घडवून आणण्याचें कार्य—पूर्ण करावयाचें होतें व तें चीनमध्येंच साध्य होईल असें त्यांना वाटत होतें.

या बाबतींत डॉ. कोटणीस लिहितातः—

" माझी गेल्या वर्षांतील मोठी कर्तबगारी म्हणजे माझ्या स्वतःच्या वृत्तींतच घडून आलेला ठळक फरक हीच होय. येनानला पोंचायच्या आधीं मी राजकीय विचारांच्या बाबतींत किती मागासलेला होतो हें तुम्हांला फार चांगलें ठाऊक आहेच. माझ्या डोक्यांत भांडवलदारी कल्पनांचें भरताड भरून राहिलेलें होतें. आणि माझी राष्ट्रीयत्वाची भावना जरी भरपूर प्रखर असली तरी क्रांतिकारक कार्यपद्धतींबद्दल मात्र माझ्या डोक्यांतल्या कल्पना अगदींच अंधुक होत्या.

आतां इथें एक वर्षाहून अधिक काळ मी राहिलों. आठव्या फौजेतल्या सैनिकाची राहणी पत्करली. सभांमध्यें व खाजगी व्यक्तिगत संभाषणांतून कॉम्रेड्स कडून मला एकसारखी टीका ऐकायला मिळाली. या सगळ्या गोष्टींमुळें माझ्या स्वभावांत, माझ्या विचारांत, फार मोठें परिवर्तन होत असल्याचा अनुभव माझा मलाच येऊं लागला आहे. म्हणूनच माझ्या मतें १९४१ साल हें माझ्या आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाच्या वर्षांपैकीं एक आहे...

" आपण कांहीं काळ चीनमध्यें राहिलें पाहिजे. हिंदुस्थान व चीन हे दोन देश फॅसिझम-विरोधाच्या समान आघाडीवर एकजुटीनें लढत आहेत हें तर खरेंच, पण बदलत्या राजकीय परिस्थितींचें स्पष्ट पृथक्करण इथें जसें आपल्याला करून मिळतें तसें हिंदुस्थानांत मिळायचें नाहीं. म्हणून हिंदुस्थानकडे परत जायला मी तितकासा उतावीळ झालेलों नाहीं. "

परंतु हिंदुस्थानवर जपानची स्वारी होण्याचा धोका दिसूं लागल्यावर मात्र डॉ. कोटणीस व डॉ. बसू दोघेहि परत स्वदेशीं जाण्यास उतावीळ झाले. या बाबतींत डॉ. कोटणीस म्हणतातः—

"अलीकडे हिंदुस्थानवर जपानी स्वारीचा जो धोका उद्भवला आहे त्याचा विचार केला म्हणजे आपण हिंदुस्थानालाच परत गेलेलें बरें असें अनेकवार मनांत येतें." (ता. १०-४-४२ चें पत्र).

"हिंदुस्थानांतील सध्यांची परिस्थिति लक्ष्यांत घेतां आपल्याला अधिक काळ चीनमध्यें राहतां येणार नाहीं असें वाटतें. **हिंदी आघाडीवर कामगिरी करण्यासाठीं आपल्याला जावें लागणार.** तुम्हांला नाहीं असं वाटत? आपल्या कामगिरी बद्दल तुम्ही नेहरूंना जरूर लिहून कळवा. त्याचबरोबर इथल्या फॅसिझमविरोधी प्रचाराबद्दलहि कळवा. **आम्हीं हिंदीं लोक फॅसिझमचा प्रतिकार करूं अशी इकडच्या लोकांना केवढी उमेद वाटते हेंहि नेहरूंना कळवा.**" (ता. ९-६-४२ चें पत्र.)

ता. ८ ऑगस्ट नंतरच्या घडामोडींचा या शूर हिंदी देशभक्तावर काय परिणाम झाला हें प्रत्येकानें पाहण्यासारखें आहे. ता. १८ सप्टेंबर १९४२ च्या पत्रांत डॉ. कोटणीस लिहितातः—

"गांधीजींनीं कॉंग्रेस वर्किंग कमिटीला केलेली सूचना आम्हांला नापसंत आहे ही बातमी हिंदुस्थानांत तारा पाठवून प्रसिद्ध करा, अशी विनंति करणारी तार मी तुम्हांला धाडली होती ती मिळाली कां? दरम्यान ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें गांधीजींचा ठराव पास देखील केला, आणि या मंडळींनीं पुनः आपली अनत्याचारी असहकारितेची मोहीम चालू केली आहे. ठीक. **हिंदी राजकीय परिस्थितीचा हा असा सगळा घोंटाळा होऊन राहिला** आहे... ...बोसबाबूंची हालहवाल काय आहे? ते आतां पगडी फिरवून फॅसिस्टांना सामील झाले आहेत म्हणे. खरें आहे का हें? या सगळ्या गोंधळांतून एक चांगली गोष्ट मात्र निष्पन्न झाली आणि ती म्हणजे **हिंदी कम्युनिस्ट पार्टीवरील बंदी उठली** हीं होय."

(५।१२।४३).

---

— २ —

# नव्या दुनियेंतील नवीं माणसें

" आम्हीं आकाशांतील ताऱ्यांप्रमाणें आहोंत. – कुणालाहि आमची संख्या मोजतां येणार नाहीं, कुणाच्याहि हातीं आम्ही सांपडणार नाहीं."

—एका सोविएत गनिमी सैनिकाचे उद्गार.

ता. ३ जुलै १९४१. जर्मन रणगाड्यांची तुकडी भरधांव पुढें घुसत होती. वरून फॅसिस्ट गिधाडें तिला साथ देत होतीं. सोविएत तोफांचा भडिमार चालू होता.

जर्मन विमानांचा फडशा पाडण्यासाठीं लाल ससाणे आकाशांत चढले. **कॅप्टन निकोलाय गास्तेलो** याच्या विमानांतील पेट्रोल-टँकमध्यें शत्रूचा गोळा घुसला. आगीच्या लोळांत विमान खालीं येऊं लागलें.

आग विझविण्याचा लाल वैमानिकाचा प्रयत्न फुकट गेला. आतां काय करावयाचें? पॅरॅशूट घेऊन उडी मारावयाची? जीव वांचवून नात्सींच्या हातीं पडावयाचें?

तो स्तालिनचा बच्चा होता. त्यानें खालीं नजर टाकली. जर्मन रणगाडे पेट्रोलच्या टांकीभोंवतीं जमा होऊन तेल भरून घेत होते. काय करावयाचें या प्रश्नाचें उत्तर मिळालें.

**कॅप्टन गास्तेलोनें आपल्या जळत्या विमानासह खालच्या पेट्रोल-टँकवर झेप टाकली.** दहा जर्मन रणगाडे आभाळांत उडाले आणि चेंदामेंदा होऊन खालीं आले.

**गास्तेलो** हा **मॉस्को** येथील एका एंजिनिअरिंग कारखान्यांतील कामगार होता. त्याचा बापसुद्धां तेथेंच कामावर होता.

* * *

**आन्तोन इवानोविच गोलुबेव** हासुद्धां मॉस्कोच्या कारखान्यांत काम करीत असे. नात्सी दरवडेखोरांना पिटाळून लावण्यासाठीं तो आघाडीवर गेला. आतां

त्याला नवी सोबतीण मिळाली—खांद्यावरची बंदूक! तिच्या साहाय्यानें त्यानें कित्येक फॅसिस्ट मवाल्यांना यमसदनांस पाठविलें! आणि विश्रांतीच्या वेळीं तो तिला किती जपून ठेवी! घासून पुसून अगदीं लखलखीत करी!

पण म्हणून कांहीं जुन्या सोबत्याचा विसर थोडाच पडणार होता? कारखान्यांतील लेथवर त्यानें चार वर्षें काम केलें होतें. बंदुकीला कुरवाळीत **गोलुबेव** जमिनीवर पडून पूर्वेकडे नजर वळवी, आणि मग एकच विचार त्याला भंडावून सोडे—'माझ्या लेथचें काय झालें असेल? दुसऱ्या कामगाराच्या हातीं गेल्यामुळें त्याची आबाळ तर होत नसेल ना?'

**गोलुबेव**ला चैन पडेना. त्यानें आपल्या कारखान्यांतील दोस्तांना पत्र लिहिलें.

**गोलुबेव**च्या कारखान्यांत त्याच्याच लेथभोंवतीं त्याच्या खात्यांतील कामगार जमा झाले. वरिष्ठ इंजिनिअरसुद्धां आले होते. कारखान्याचा मुख्य डायरेक्टरहि हजर होता.

त्यांनीं सर्वांनीं मिळून **गोलुबेव**ला पुढील उत्तर लिहिलें:—

" प्रिय **अंतोशा**,

तुझ्या लेथविषयीं काळजी करण्याचें कांही कारण नाहीं. तुझी आई **अरिना स्तेपानोव्हा गोलुबोवा** सध्यां तुझ्या लेथवर काम करीत असते. ती या कारखान्यांतील एक उत्कृष्ट **स्तखानोविस्ट** कामगार बनली आहे. गेल्या दहा महिन्यांत तिनें किती छान काम केलें आहे!

तुला बरें वाटो अगर वाईट वाटो, पण खरी गोष्ट आम्ही तुला सांगून टाकतोच! तूं या लेथवर ठराविक प्रमाणाच्या शेंकडा १६९ इतकें काम करीत होतास, नाहीं का? आणि तुला त्याबद्दल केवढा अभिमान वाटत होता! आतां तुझी आई काय करते तें ऐक. ती सध्यां शेंकडा २६० इतकें काम करते! आणि या महिनाअखेरपर्यंत शेंकडा ३०० पर्यंत चढवणार आहे!

तूं हें लेथ अगदीं आरशासारखें चकचकीत ठेवीत होता ना? खरें, पण तुझ्या आईच्या हातांत तें कसें सूर्यासारखें तळपत आहे पहा!"

*   *   *

गेल्या सालअखेर लाल सेनेनें सुरू केलेल्या हिंवाळी चढाईतील एक प्रसंग, **रझेव** शहरानजिक एका नदीच्या कांठापर्यंत लाल फौज येऊन थडकली. नदी ओलांडण्यासाठीं पूल बांधणें जरूर होतें.

पैलतीरावर टेकडीचा उंच कडा होता. वर जर्मन लांडगे दबा धरून बसले होते. नदीच्या पृष्ठभागावर बर्फाचा पातळ थर सांचला होता. लाल फौज ज्या कांठावर होती तो सपाट आणि उघडा होता.

समोरच्या फॅसिस्टांच्या डोळ्यांदेखत पूल कसा बांधावयाचा!

सोसनोवकिन हा लाल इंजिनिअर होता. बोल्शेविकांना असाध्य कांहींच नसतें, ही स्तालिनची शिकवण त्याला ठाऊक होती.

अडचणींचे डोंगर समोर दिसले तर बोल्शेविक काय करतो? उत्तर सरळ आहे. ओलांडून जातो!

त्यानें दोन गोष्टी करावयाचें ठरविलें:—

(१) पूल पाण्याच्या वर न बांधतां दीड फूट पृष्ठभागाखालीं बांधावयाचा!

(२) पुलाची सुरवात ऐलतीरावरून न करतां पलिकडच्या तीरावरून—म्हणजे जर्मनांच्या ताब्यांतील टेंकडीच्या पायथ्याकडून—करावयाची!

रात्रींच्या वेळीं आभाळांत ढग जमले आहेत असें पाहून लाल सैनिकांची एक तुकडी पोहत पोहत पैलतीराला गेली. कॉंक्रीटचे खांब अगोदरच तयार केले होते ते तराफ्यावर घालून त्यांनीं आपल्याबरोबर फरफटत नेले. गळ्याइतक्या पाण्यांत उभे राहून त्यांनीं पुलाचा पाया घातला. वर आडव्या कॉंक्रीटच्या तुळया ठोकल्या.

बर्फाचे अणकुचीदार तुकडे प्रवाहाच्या वेगाबरोबर वाहत येऊन या लाल सैनिकांचें अंग कापीत होते, पण रक्तबंबाळ स्थितींतहि त्यांनीं आपलें काम थांबविलें नाहीं. त्यांना फक्त एकाच गोष्टीची भीति वाटत होती—कदाचित् बर्फ फुटेल आणि त्याच्या आवाजानें टेंकडीवरचे जर्मन सावध होतील!

एकदां तर जर्मनांना खालीं कांहींतरी गडबड चालली असावी असा खरोखरीच संशय आला. त्यांनीं काळोखांत आवाजाच्या रोखानें फैर झाडली. कांहीं लाल सैनिक जखमी झाले. पण जर्मनांना त्याचा पत्ता लागला नाहीं. खालची सामसूम पाहून त्यांना आपला संशय खोटा असल्याची खात्री पटली. सोविएत लष्करी इंजिनिअरांचें काम निर्वेधपणें चालू राहिलें.

पांचसहा रात्रींच्या अवधींत सारा पूल बांधून तयार झाला. जर्मनांना दिवसांसुद्धां त्याचा मागमूस दिसला नाहीं, कारण पुलावर दीड फूट बर्फाच्छादित पाणी होतें.

शेवटच्या दिवशीं सोविएत तोफखान्यानें समोर धुराचा पडदा केला, पुलाचा ऐलतीरावरचा भाग पुरा करण्यांत आला, नदींत बर्फामध्यें पुलाच्या वरच्या बाजूला काठ्या रोवण्यांत आल्या, आणि मग जंगलांत दडून राहिलेले सोविएत रणगाडे तुफानी वेगानें पुढें घुसून नदी ओलांडून गेले. काय झालें हें मठ्ठ नात्सी गुंडांच्या लक्ष्यांत येण्यापूर्वींच पैलतीरावरील टेंकडीवर लाल निशाण फडकूं लागलें.

रझेव टापूंतील हिवाळी चढाईची सुरवात अशाप्रकारें झाली.

*　　　*　　　*

अशीं असामान्य नररत्नें सोविएत देशांत पैदा होतात याचें रहस्य काय ?

दादर येथें वनमाळी हॉलमध्यें सध्यां चालू असलेल्या सोविएत प्रदर्शनांत या प्रश्नाचें उत्तर मिळतें.

हीं असामान्य माणसें नाहींत. ही सामान्य माणसेंच आहेत. मात्र हीं **समाजसत्तावादी** दुनियेंतील माणसें आहेत.

सव्वीस वर्षांपूर्वी या देशांतील जनतेनें झारशाहीचें व भांडवलदार वर्गाचें जोखड झुगारून दिलें. सव्वीस वर्षांच्या काळांत हा प्रबळ समाजसत्तावादी देश बनला.

१९१७ ची नोव्हेंबर-क्रांति यशस्वी करण्याचा मार्ग या जनतेला कुणी दाखविला ? समाजसत्तावादाच्या पायावर उद्योगधंद्यांची व शेतीची पुनर्घटना करण्याचा मार्ग या जनतेला कुणी दाखविला ?

**लेनिन-स्तालिनच्या** कम्युनिस्ट पार्टीनेंच !

क्रांतिपूर्व काळांत पंधरा वर्षेपर्यंत अविश्रांतपणें **लेनिन** व **स्तालिन** यांनीं कम्युनिस्ट पार्टीची स्थापना व जोपासना केली.

ता. १६ एप्रिल १९१७ रोजी निर्वासनांतून रशियाला परत येतांच **लेनिननें** 'समाजसत्तावादी क्रांति चिरायु होवो ! ' अशी घोषणा पुकारली.

ता. २९ ऑक्टोबर १९१७ रोजीं **स्तालिनच्या** पुढारीपणाखालीं 'पार्टीचें मध्यवर्ती केन्द्र' ७ नोव्हेंबरच्या उठावाचें मार्गदर्शन करण्यासाठीं निवडण्यांत आलें.

सोविएत राज्य स्थापन झाल्यानंतरच्या काळांत स्वकीय व परकीय शत्रूंचा धुव्वा उडवून समाजसत्तावादी समाजरचनेचा पाया रचण्याच्या कामीं **लेनिन** व **स्तालिन** यांनीं सोविएत जनतेचें मार्गदर्शन केलें.

**लेनिनच्या** मृत्यूमुळें सोविएत जनता पोरकी झाली नाहीं. सोविएत रशियांत समाजसत्तावादी समाजरचना स्थापन करणें अशक्य आहे असें सांगणाऱ्या, व तें अशक्य करण्यासाठीं नानाप्रकारच्या देशद्रोही कारवाया करणाऱ्या, सर्व कामगार-शत्रूंचा निःपात करून सोविएत जनतेनें समाजसत्तावादाच्या रचनेचें कार्य **स्तालिनच्या** पुढारीपणाखालीं तडीस नेलें.

* * *

सोविएत जनतेच्या वतीनें कॉ. **मोलोतोव** यांनीं पुढील उद्गार काढले आहेत:—

**"एक नांव आम्हांला समाजसत्तावादाच्या विजयाचें प्रतीकच वाटतें. हेंच नांव सोविएत जनतेच्या नैतिक व राजकीय एकजुटीचेंहि प्रतीक बनलें आहे. हें नांव कोणतें तें तुम्हांला सांगावयास नको–हें नांव म्हणजे कॉ. स्तालिन!"**

( ७–११–४३ ).

१०५९

## — ३ —

# सोविएत-निंदकांच्या कोल्हेकुईचें इंगित

सोविएत रशिया म्हटला कीं आज हिंदुस्थानांतील प्रत्येक माणसाच्या डोळ्या-समोर स्तालिनग्रादचा वैभवशाली संग्राम, लाल सेनेचें अतुल शौर्य, सोविएत गनिमी सैनिकांची अपूर्व धडाडी, सोविएत सरकारला एकजुटीनें पाठिंबा देणारी निष्ठावंत जनता, स्तालिनचें चतुर नेतृत्व, यांचें चित्र उभें राहतें. कुशल सेनानायक तिमोशेंकोपासून वीरबालिका झोयापर्यंत अगणित नररत्नांचीं उदाहरणें त्याला स्फुरण देतात.

पण वसंत लाडोबांच्या चार पानी भविष्याला दोन कॉलम संपादकीय बाष्कळ-पणाची पुस्ती जोडणें म्हणजेच ‘ ऑगस्ट क्रांती ’तील अत्यंत महत्वाची कामगिरी पार पाडणें, असें समजणारें ‘ धनुर्धारी ’ पत्र घ्या; किंवा कोणत्याहि पुरोगामी राज-कारणाशीं उभ्या जन्मांत कधींहि संबंध आला नाहीं तरीसुद्धां आजकाल ‘ राष्ट्रवादी ’ विद्यार्थ्यांचें ‘ हीरो ’ बनविलेल्या डॉ. चिटणीसाचें ‘ चित्रा ’ पत्र पहा; या दोघांच्या शेपटाला धरून फरफटत जाण्यांत धन्यता मानणारे नागपूरचे पु. य. देशपांडे यांचें ‘ भवितव्य ’ उघडा:—यांना मात्र सोविएत रशियाचें नांव घेतांच वरील गोष्टींची आठवण होण्याऐवजीं डोक्यांत तिडिक उठल्याप्रमाणेंच होतें!

* * *

सोविएत विरुद्ध जर्मनीनें युद्ध सुरू केल्यानंतर आरंभी कांहीं महिने लाल फौज माघार घेत होती, तेव्हां चिटणीस-पाध्ये कंपू हिटलरचीच पोपटपंची करून ‘ सोवि-एत रशिया खलास झाला ’ अशी आरोळी ठोकीत आनंदानें उड्या मारूं लागला, व ‘ स्तालिननें साऱ्या कुशल सेनाधिकाऱ्यांची कत्तल करून टाकल्यामुळें लाल फौज कुचकामाची झाली आहे ’ अशी डोकेबाज कारणमीमांसा या प्रतिभासंपन्न राज-कारणधुरंधरांनीं मांडली! १९४१ अखेर मॉस्कोच्या वेशीशीं नात्सी गुंडांना खावा लागलेला मार, १९४२ अखेरचा स्तालिनग्रादचा संग्राम, सध्यांची लाल फौजेची उन्हाळी चढाई, यामुळें या कंपूची भयंकर निराशा होत गेली. हिटलरच्या रणगाड्यांना आपल्या पिचक्या लेखणीची साथ देऊन सोविएतचा धुव्वा उडवूं असें मनोराज्य

या कंपूनें रचलें होतें, पण तें सारें धुळीस मिळालें. सोविएतची नालस्ती करण्याच्या नव्या क्लृप्त्या शोधून काढणें त्याला भाग पडलें.

* * *

सोविएत यूनियनमधील ख्रिस्ती धर्मगुरूंची मध्यवर्ती संस्था अस्तित्वांत आणण्यास स्तालिननें संमति दिली आहे, या मॉस्को रेडियोनें नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या बातमीमुळें या कंपूला 'नामी संधि मिळाली' असें वाटत आहे व त्यांच्या पत्रांचे रकानेच्या रकाने (अर्थात् भविष्य व नॅशनल वॉर फ्रंटच्या जाहिराती यांच्या जागांवर मुळींच अतिक्रमण न करतां) या बातमीच्या आधारें सोविएतविरुद्ध निंदेचा 'ब्लिट्झक्रीग' चढविण्यांत खर्च होत आहेत. सोविएत रशियांत आतां स्तालिननें 'धर्माचें पुनरुज्जीवन' केलें आहे, सोविएत रशिया 'प्रगतीकडे पाठ फिरवून पुनः १९व्या शतकाकडे चालला आहे,' असा या बातमींतून या कंपूनें निष्कर्ष काढला आहे. सोविएत जनतेच्या भवितव्याविषयीं जणूं काय आपणांला फार काळजी लागली आहे असा आव आणून या कंपूनें आतां तेथें चर्चच्या 'महामहोपाध्यायांची कारकीर्द सुरू होणार' व तसें झाल्यावर 'झारशाहीचें पुनरुज्जीवन होण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं' अशी 'भीति' व्यक्त केली आहे. पण आपण आतांपर्यंत स्तालिनलाच 'लाल झार' म्हणत होतों याची एकदम आठवण होऊन 'ही झारशाही अगोदरच प्रस्थापित झाली असेल' असेंहि त्यानें त्याचवेळीं ठोकून दिलें आहे! ('चित्रा' १२-९-४३).

* * *

वस्तुस्थिति काय आहे? १९३६ सालीं—म्हणजे सात वर्षांपूर्वी–मंजूर झालेल्या सोविएत यूनियनच्या राज्यघटनेंत सर्व नागरीकांना धार्मिक आचारांचें संपूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे (कलम १२४), एवढेंच नव्हे तर सोविएतच्या निवडणुकींत इतर नागरीकांच्या बरोबरीनें धर्मगुरूंनाहि मताधिकार देण्यांत आला आहे (कलम १३५). सुप्रसिद्ध विद्वान् समाजसंशोधक वेब–पतिपत्नी यांनीं आपल्या ग्रंथांत १९३४ सालीं मॉस्को शहरांत ४० ख्रिस्ती चर्च असल्याचें व अनेक शहरांत निरनिराळ्या धर्मांचीं कैक मंदिरें, मशिदी, वगैरे असल्याचें नमूद केलें आहे; या देवस्थानांच्या इमारती सोविएत सरकारनें बिनभाड्यानें दिलेल्या आहेत. ('सोविएत कम्युनिझम,' पान १०१०). त्यावेळीं सोविएत यूनियनच्या सर्व टापूंत एकूण ३८ हजार चर्च (म्हणजे झारशाहीच्या काळांतील संख्येच्या शेंकडा ७० इतकीं) अस्तित्वांत होतीं असें डब्ल्यू. एच्. चेंबार्लिन नांवाच्या सोविएतविरोधी लेखकाच्या साक्षीच्या आधारें वेब–पतिपत्नींनीं लिहिलें आहे.

* * *

सन १९१७ची ऑक्टोबर-क्रांति ही भांडवलशाही-विरोधी क्रांति होती. धर्मसंस्थां-विरुद्ध केवळ धर्मसंस्था म्हणून शस्त्र उपसण्याचें तिला कांहीं कारण नव्हतें. समाज-सत्तावादाची जसजशी प्रगति होईल व लोकांचें अज्ञान जसजसें नाहींसें होईल, तसतसा त्यांच्या मनावरील धर्माचा पगडा नाहींसा होण्याला अनुकूल परिस्थिति निर्माण होईल ही गोष्ट बोल्शेविकांना ठाऊक होती. अंधश्रद्धेवर आधारलेल्या धार्मिक समजुतींविरुद्ध प्रचार करण्याचें कार्य अर्थातच बोल्शेविकांनीं सारखें चालू ठेविलें. परंतु सक्तीनें या समजुती नाहींशा करतां येणार नाहींत व तसें करण्याची कांहीं गरज नाहीं, असेंच सोविएत सरकारचें धोरण होतें. त्यामुळें सोविएत कायद्यानें धर्म हा गुन्हा न ठरवतां जनतेला धार्मिक स्वातंत्र्य दिलें. मात्र झारशाहींत राज्यसत्ता व धर्मसंस्था यांची जी सांगड घालण्यांत आली होती ती सोविएत क्रांतीनें नाहींशी केली व धर्म ही वैयक्तिक बाब ठरविली. त्यामुळें चर्च, धर्मगुरू, वगैरे कायम राहिले, मात्र त्यांच्या अनुयायांची संख्या दिवसेंदिवस कमी होत गेली. सोविएत सत्तेविरुद्ध कट करणाऱ्या व प्रतिक्रांतिकारकांना सक्रिय मदत करणाऱ्या धर्मगुरूंना मात्र योग्य तें शासन करण्यांत आलें, पण तें धर्मगुरू म्हणून नव्हे तर प्रतिक्रांतिकारक व जनतेचे दुष्मन् म्हणून.

* * *

आज सोविएत यूनियनच्या वीस कोटी लोकसंख्येमध्यें धर्मगुरूंची व त्यांच्या अनुयायांची संख्या ‘ दर्यामें खसखस ’ एवढीच आहे, आणि जे मूठभर धर्मगुरू उरले आहेत ते सारे सोविएत मातृभूमीविषयीं जाज्वल्य देशाभिमान बाळगणारे व सोविएत राज्यसत्तेला निष्ठेनें पाठिंबा देणारे असेच आहेत. जर्मन फॅसिस्टांविरुद्ध सोविएत जनतेनें चालविलेल्या युद्धाला ते उत्साहानें पाठिंबा देत आहेत.

त्यांनीं सोविएत सरकारला असा पाठिंबा देऊं नये, व दिल्यास सोविएत सर-कारनें तो स्वीकारूं नये, व अशा रीतीनें सोविएत जनतेच्या युद्धप्रयत्नांत अत्यंत अल्पांशानें कां होईना व्यत्यय यावा, अशी कुणाची इच्छा असणार ? अर्थात् हिट-लरच्या कैवाऱ्यांची ! पण हिंदुस्थानांतील जनतेला हिटलरशाहीविषयीं अत्यंत किळस वाटतो ही गोष्ट हिटलरच्या येथील छुप्या दोस्तांना ठाऊक आहे, म्हणून हिटलरशाहीचा उघड पुरस्कार करण्याचें धैर्य त्यांना होत नाहीं. परंतु हेंच कार्य सोविएत विरुद्ध खोटानाटा प्रचार करून साधतां येईल अशी भाबडी आशा त्यांनीं अद्यापि उराशीं बाळगली आहे.

* * *

हिटलरशाहीच्या कैवाराच्या आरोपाला अतिशयोक्ति म्हणून नाकें मुरडणाऱ्यांनीं **‘ भवितव्य ’** पत्राच्या ता. १० सप्टेंबरच्या अंकांतील अग्रलेख वाचावा. महायुद्धा-

च्या गेल्या चार वर्षांचें सिंहावलोकन करण्यासाठीं लिहिलेल्या या लेखांत प्रस्तुत युद्धाच्या स्वरूपाची एक 'मौलिक' व्याख्या देण्यांत आली आहे (ही व्याख्या पु. य. देशपांडे यांची 'स्वतंत्र कृति' आहे, ट्रॉट्स्कीवादाशीं तिचें कांहींच नातें नाहीं, असाच ते दावा करतील यांत शंका नाहीं.) सध्यांचें युद्ध दोन साम्राज्यवादी गटांतील युद्ध आहे, कीं एकीकडे फॅसिझम व दुसरीकडे जागतिक जनता यांमधील युद्ध आहे, या प्रश्नावर आपल्या देशांत बराच मतभेद आहे. परंतु पु. य. ना हीं दोन्ही मतें मान्य नाहींत! त्यांचा तृतीयपंथच आहे.

*　　　　*　　　　*

त्यांच्या मतें या युद्धांतील दोन परस्पराविरोधी पक्ष अगदींच निराळे आहेत. ते म्हणतात:—

"वैचारिक दृष्ट्या **सो. रशिया व फासी–नात्सी** राष्ट्रें यांचा विसाव्या शतकांत घडून आलेल्या स्थित्यंतराशीं सुसंगत असा एक गट बनतो व एकोणिसाव्या शतकांतील विचारप्रणालीला अद्याप चिकटून राहणाऱ्या अँग्लो-अमेरिकनांचा दुसरा गट बनतो. वैचारिकदृष्ट्या, चालू महायुद्ध हें स्थूल मानानें या दोन विचारप्रणालींतील संग्राम होय, असें म्हणतां येतें."

म्हणजे हें युद्ध एकीकडे सोविएत रशिया व फॅसिस्ट राष्ट्रें व दुसरीकडे इंग्लंड व अमेरिका यांमधील युद्ध आहे! हें युद्ध एकीकडे विसावें शतक व दुसरीकडे एकोणिसावें शतक यांमधील युद्ध आहे! मग अर्थातच असा प्रश्न उद्भवतो कीं यांपैकीं पु. य. चा पक्ष कोणता? याचें सरळ उत्तर या लेखांत नसलें तरी त्यांचा पाठिंबा '२० व्या शतकाला'—म्हणजे सो. रशिया व फॅसिस्ट राष्ट्रें यांच्या (कल्पित) संयुक्त गटाला आहे असाच निष्कर्ष या लेखावरून निघतो, आणि त्याच अंकांत (व त्यापूर्वींही) सोविएत रशियाविरुद्ध सोडलेले निंदेचे व नालस्तीचे फूत्कार पाहिले म्हणजे त्यांचा पाठिंबा 'योजनाबद्ध अर्थव्यवस्थे' वर आधारलेल्या (!) व विसाव्या शतकाला अनुरूप असलेल्या (!) फॅसिझमलाच आहे याविषयीं कुणालाहि शंका राहणार नाहीं. शिवाय त्यांचे 'वैचारिक' गुरु डॉ. चिटणीस यांनीं यूरोपच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीनें विचार केला तर फॅसिस्टवाद आणि समाजवाद यांमध्यें फरक करण्याचें कारण नाहीं,' (चित्रा, ता. १२-९-४३) असा मंत्र त्यांना देऊन ठेवला आहेच!

*　　　　*　　　　*

(१९-९-४३).

— ४ —

# पुणेरी सनातन्यांच्या बावळट थापा

कांहीं दिवसांपूर्वी पुणें शहरांत एक ऐतिहासिक महत्त्वाचा वादविवाद झाला. वादाचा प्रश्न 'अफू कीं दारू ?' हा होता. 'अफू'वाल्या पक्षाचे अग्रणी डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे नांवाचे एक लब्धप्रतिष्ठित गृहस्थ होते. 'दारू'वाल्या पक्षाची धुरा खुद्द 'केसरी'चे संपादक ज. स. करंदीकर यांनीं आपल्या खांद्यावर घेतली होती.

आधींच असले इरसाल 'तात्यावादी' वक्ते, तशांतहि अफू आणि दारू सारखा रंगेल विषय, तशांतच जणूंकाय वृश्चिकदंश व्हावा त्याप्रमाणें मुसोलिनीच्या हकालपट्टीनें व सोविएत फौजेच्या यशस्वी चढाईनें पुण्यांतल्या बुरसट सनातन्यांची तारांबळ उडालेली,–इतका योग जुळून आल्यावर गायकवाड वाड्यांतल्या गणपतीपुढें कोणत्या प्रकारची धुळवड साजरी झाली असेल, याची कल्पना करणें कठीण नाहीं.

* * *

कम्युनिझम ही अफू कीं दारू यावर या वादांतील दोन्ही पक्षांचा तीव्र मतभेद असला, तरी एका मुद्याच्या बाबतींत त्यांची समान भूमिका होती, व तो म्हणजे समोरच्या श्रोत्यांच्या निर्बुद्धपणावर पूर्ण श्रद्धा ठेवावयाची, आणि कम्युनिझमविषयीं व सोविएत रशियाविषयीं वाटेल त्या खोट्यानाट्या गोष्टी सांगावयाच्या. उदाहरणार्थ, 'अफू'वाल्या पक्षाचे म्होरक्ये म्हणाले:—"१९३६ सालीं रशियाच्या 'प्रवदा' पत्रानेंच असें लिहिले आहे कीं रशियांत लष्कर हा एक वर्ग असून त्याची सत्ता सर्व समाजावर चालते." या 'प्रवदा'चा संपादक कोण म्हणून डॉ. सहस्रबुद्धे यांना कुणी विचारलें असतें तर 'इबिड साहेब!' म्हणून त्यांनीं ताबडतोब उत्तर दिलें असतें यांत शंका नाहीं. १९३६ सालीं त्या 'प्रवदा' पत्राचे लष्करी संपादक स्वतः डॉ. सहस्रबुद्धे होते ही गोष्ट तर 'केसरी'च्या साऱ्या वाचकांना ठाऊक आहेच!

रिकाम्या डोक्याचा मासला म्हणून सदर वक्त्याचें पुढील वाक्य पहा:—"जो कोणी कामगारांविरुद्ध अगर राजकारणाविरुद्ध लिहील त्याला कागदाचा कपटा देखील

मिळणार नाहीं असा रशियन सरकारचा दंडक आहे." '**राजकारणाविरुद्ध लिहिणें**' म्हणजे काय, हें कळण्यासाठीं तुम्हांला अगोदर पुण्याच्या 'संस्कृति रक्षक' मंडळाचे सभासद झालें पाहिजे!

या गृहस्थांना धर्मशास्त्रांतील पुढील अजब शोधाबद्दल 'नोबेल प्राइझ' देण्यांत यावें, अशी मागणी करण्यासाठी गायकवाड वाड्यांत लवकरच जंगी परिषद भरणार आहे. ते म्हणतात—

"व्यापार चांगला चालेना म्हणून **नेपोलियन** निर्माण झाला. तात्पर्य ज्या त्या प्रसंगीं ती व्यक्ति निर्माण होतेच. **याचाच अर्थ धर्मांतील अवतार-कल्पना**"!

*　　　　*　　　　*

याच तमाशांत ज. स. करंदीकर यांनीं 'रशियाचा आवडता रंग लाल' कां, या प्रश्नाचें उत्तर 'दारूबाजाचे डोळे तांबडे लाल असतात म्हणून' असें दिलें. वस्तुतः त्यांना पुण्यांतील सनातन्यांच्या आवडत्या पगडीच्या व जोड्याच्या रंगाचें समर्थन करावयाचें होतें, हें त्यांच्या चाणाक्ष श्रोत्यांच्या लक्षांत आल्यावांचून राहिलें नाहीं. या वादाचा समारोप करण्यासाठीं तात्यावादाचे आद्य संस्थापक हजर होते कीं नाहीं हें कळलें नाहीं, परंतु 'म्हटली तर दारू, म्हटली तर अफू' असा सुवर्णमध्य साधण्याचा ठराव करूनच सर्व श्रोतृगण आपापल्या घरीं गेला असावा.

आणि त्याच ठरावास अनुसरून '**केसरी**' च्या ता. २१ च्या अंकांत सोविएतच्या 'धर्मनिष्ठते'ची तारीफ करण्यांत आली आहे असें दिसतें. सोविएत रशियांतील 'धर्मनिष्ठ लोक या युद्धांत विशेष निकरानें आत्मबलिदान करीत आहेत' असा 'गेल्या दोन वर्षांच्या महायुद्धांत कम्युनिस्टांना अनुभव आला,' अशी 'केसरी'नें ग्वाही दिली आहे! म्हणजे वीरबालिका **झोया** ही तरुण कम्युनिस्ट संघाची सभासद नव्हती, तर हरतालिकेचें व्रत आचरणारी 'धर्मनिष्ठ' आर्यकन्या होती!

*　　　　*　　　　*

**नेपोलियन**ला परमेश्वराचा अवतार मानणाऱ्या पुण्याच्या सनातन्यांशी नागपूरचे 'पुरोगामी' **पु. य. देशपांडे** यांचा कसलाही संबंध असणें शक्य नाहीं, असें समजणाऱ्या भोळ्या लोकांना 'भवितव्य' च्या ता. १७ सप्टेंबरच्या अंकांतील 'कौटिल्या'ची विधानें वाचून बरेंच आश्चर्य वाटेल. या इसमानें हिटलरच्या 'लष्करी प्रतिभेची (म्हणजे **टॉलस्टॉयच्या यस्नाया पोल्याना** गांवावर नांगर फिरविणाऱ्या, अगणित निरपराध बालकांचे खून करणाऱ्या, नात्सी गुंडांच्या भेकड दादागिरीची) तोंडभरली स्तुति केली आहे, व **हिटलरला 'रेड नेपोलियन'** असा किताब देणाऱ्या एका बथ्थड प्रोफेसराला त्याच्या 'मार्मिक'पणाबद्दल शिफारसपत्र दिलें आहे.

सदरहु प्रोफेसराची जाहिरात करणें हा डॉ. चिटणिसांचा एक मुख्य धंदा आहे, व या धंद्यांत त्यांनीं पु. य. देशपांडे यांना ‘ सब-एजंट ’ म्हणून सामील करून घेतलें आहे असें दिसतें. ) “ व्यक्तिशः हिटलरचा अखेरीस पाडाव होणार ” ही गोष्ट दुःखाचे अश्रू ढाळीत नाइलाजास्तव कबूल करून हा ‘ कौटिल्य ’ म्हणतो:—

“ योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचें युग त्याच्या [ हिटलरच्या ] आजवरच्या प्रचंड विजयामुळेंच आकारास येऊं लागलें आहे... ...**हिटलर**चा नाश होईल, पण योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचा त्यामुळें विजयच होणार असल्यामुळें या अर्थानें, एकपरीनें, **हिटलरच** विजयी झाला असें भावी इतिहासकारांना म्हणतां येईल. ”

**हिटलर** व्यक्तिशः नष्ट झाला तरी **हिटलर**च्या तत्त्वाचा अशा रीतीनें विजय होणार, या विचारानें या इसमाला त्यांतल्या त्यांत केवढें समाधान वाटत आहे ?

* * *

असल्या लोकांनीं **स्तालिन**वर शिव्याशापांचा वर्षाव करावा यांत नवल कोणतें? **हिटलर**ची **नेपोलियन**शीं तुलना करणाऱ्या **फॅसिस्ट** प्रचारकांना **स्तालिन**नें ता. ६ नोव्हेंबर १९४१ च्या भाषणांत दिलेलें खरमरीत उत्तर पु. य. सारख्यांच्या जिव्हारीं झोंबावें हें साहजिकच आहे. **स्तालिन**नें सांगितलें:—

“ बोका आणि सिंह यांच्यांत जेवढें साम्य असतें तेवढेंच **हिटलर** आणि **नेपोलियन** यांच्यांत आहे. कारण **नेपोलियन** प्रतिगामी शक्तींविरुद्ध लढत होता, त्यानें पुरोगामी शक्तींचा आधार घेतला होता; उलटपक्षीं **हिटलर**चें सामर्थ्य प्रतिगामी शक्तींच्या पाठिंब्यावर अवलंबून आहे. तो पुरोगामी शक्तींविरुद्ध लढत आहे. ”

**हिटलरी** पक्ष म्हणजे “ मोरपिसें लावलेले कावळे !...पण कावळ्यांनीं मोरपिसांचा कसाहि साज चढविला तरी कावळे ते कावळेच ! ” हें **स्तालिन**चें वाक्य **हिटलरी** गुंडांना जितकें लागू पडतें तितकेंच त्यांच्या नागपुरी स्तुतिपाठकांनाहि लागू पडतें यांत काय संशय ?

* * *

हिटलरशाहीच्या बेशरमपणें उदो उदो करणाऱ्या सोविएत-निंदकांची ही एक तऱ्हा झाली. **ट्राटस्की**वादावर नेहरूवादाचें कलम लावून त्यांतून सोविएत-निंदेची नासकीं फळें काढणाऱ्या ‘ लोकमान्य ’कारांची तऱ्हा थोडी निराळी आहे. सोविएत युनियन व इंग्लंड-अमेरिका यांच्या समाजपद्धति भिन्न असतांहि **हिटलर**-शाहीचा नायनाट करण्यासाठीं ते आज खांद्याशी खांदा भिडवून लढत आहेत, या गोष्टींचें अभिनंदन करण्याऐवजीं त्यांच्या भिन्नतेचेंच रडगाणें कांहीं लोक सारखें गात असतात. ‘ लोकमान्य ’ कार या रडव्या मेळाव्यांत हौसेनें सामील झाले आहेत,

इतकेंच नव्हे तर सोविएत व इंग्लंड-अमेरिका यांच्या भूमिकेंतील भेदाचें एक नवें लक्षण त्यांनीं वाचकांना सादर केलें आहे. ते म्हणतातः—

" जर्मनींत प्रशियन लष्करशाहीस हातीं धरून स्तालिननें हिटलरचा पाडाव कां करूं नये, असें म्हणणारा एक पक्ष रशियांत असावा असें वाटतें. उलट हिटलर बरोबरच प्रशियन लष्करशाहीहि नेस्तनाबूद झाली पाहिजे असें रूझवेल्ट म्हणतात. "

तुम्हांला असें कां वाटतें, असा प्रश्न 'लोकमान्य'कारांना विचारल्यास ते बहुधा उत्तर देतीलः—" मी कांहीं पार्टीशिस्तीनें बांधलेला ठोकळेबाज मार्क्सवादी नव्हे. मी स्वतंत्र बुद्धीचा माणूस आहे. वाटेल तें वाटण्याचा ( आणि तरीसुद्धां स्वतःला मार्क्सवादी म्हणवून घेण्याचा ) माझा हक्कच आहे, हा हक्क मी आग्रहानें गाजवीत असल्यामुळेंच जवाहरलाल नेहरूंबरोबर मुसोलिनीलाहि 'राष्ट्रभक्त' म्हणणें मला शक्य होतें. "

* * *

स्तालिनपेक्षां रूझवेल्टचे युद्धहेतु अधिक उच्च प्रकारचे आहेत असें वर उद्धृत केलेल्या वाक्यांत दर्शविण्याचा 'लोकमान्य'कारांचा प्रयत्न त्यांना स्वतःला कितीहि 'स्वतंत्र'बुद्धीचा वाटो, पण या बुद्धीचें खरें स्वरूप कोणत्याहि सामान्य वाचकांना त्यांच्या 'लष्कर' व 'लष्करशाही' या शब्दांच्या गोंधळांत सहज दिसून येईल. जर्मन 'लष्कर' राहील असें स्तालिननें म्हटलें होतें असें सांगून त्याचा अर्थ 'लोकमान्य'कारांनीं स्तालिनला जर्मन 'लष्करशाही' कायम ठेवावयाची आहे असा केला आहे!

ही शाब्दिक हातचलाखी 'लोकमान्य'कारांनीं बुद्धिपुरःसर केली, कीं जुन्या काळांतील त्यांच्यावरील ट्रॉट्स्कीवादाच्या पगड्याचाच हा अवशेष समजावयाचा?

( २६–९–४३ )

१०५५८
ग्रंथालय
१०५९८

—५—

# राष्ट्रभक्तीची कॉंग्रेस-सोशालिस्ट व्याख्या

ऑगस्ट १९४२ नंतरच्या मोडतोडीच्या चळवळींत कोल्हापूर व त्याच्या भोंवतालचा टापू बराच गाजला होता. या कारणास्तव कोल्हापूरच्या कॉंग्रेसभक्तांनीं श्री. शेणोलीकर यांच्या संपादकत्वाखालीं नुकत्याच सुरू केलेल्या 'विकास' पत्राचें काय म्हणणें आहे हें पाहणें साहजिकच महत्त्वाचें ठरतें. गांधीजयंती संबंधीं लिहिलेल्या ता. १९ सप्टेंबरच्या अग्रलेखांत हें पत्र म्हणतें:—

"गांधीजी मुक्त असते तर बंगाल व इतर दुष्काळग्रस्त भागांच्या रक्षणार्थ धांवले असते. गांधीजी स्वतंत्र असते तर राष्ट्रभक्तीच्या नांवाखालीं जी बेबंदशाही चालली आहे...सर्रास जी अत्याचारी वृत्ति बोकाळली आहे, आणि सुरक्षितता धोक्यांत पडली आहे, ही परिस्थिति नाहींशी केली असती. हीच गोष्ट आपण आतां केली पाहिजे."

याच विचारसरणीस अनुसरून या पत्रानें "गांधी सप्ताहांतील प्रत्येक क्षण दुष्काळग्रस्तांच्या मदतींसाठीं वेंचला जाईल असें कार्यक्रम आंखा" अशी अभिनंदनीय सूचना केली आहे.

देशासाठीं ज्यांचें अंतःकरण खरोखरीं तिळतिळ तुटत आहे अशा प्रामाणिक राष्ट्रवाद्यांच्या मनोभूमिकेचें निर्मळ प्रतिबिंबच कोल्हापूरच्या कॉंग्रेसभक्तांच्या या घोषणेंत, व रत्नागिरीच्या अप्पासाहेब पटवर्धन प्रभृतींनीं शेतकऱ्यांना दिलेल्या संदेशांत, आढळून येतें.

* * *

परंतु कम्युनिस्टांची नालस्ती करणें हेंच 'राष्ट्रभक्ती' चें मुख्य लक्षण समजणाऱ्या लोकांना प्रामाणिक देशभक्तांची ही विचारसरणी कशी आवडणार? श्रीमती सरोजिनी नायडू यांनीं अन्नाच्या प्रश्नावर सर्वांना एकजूट करण्यास सांगितलें तेव्हां या लोकांनीं आजारपणामुळें सरोजिनी देवींची विचारशक्ति नष्ट झाली आहे अशी कुत्सित कारणमीमांसा मांडली. ('क्रांतिकारी,' ऑगस्ट १९४३.) ता. ९ ऑगस्टला

शांततेचा संदेश देणाऱ्या अंमळनेरच्या श्री. पुसाळकरांवर त्यांनीं पळपुटेपणाचा आरोप केला. अर्थात् रत्नागिरीच्या व कोल्हापूरच्या कॉंग्रेस पुढाऱ्यांवरहि या अजब 'राष्ट्रवाद्यां'कडून उघडपणें किंवा प्रच्छन्नपणें अशाच प्रकारची टीका झाल्यास नवल कोणतें ?

या कंपूची राष्ट्रभक्तीची व्याख्या काय आहे व कॉंग्रेसच्या उज्ज्वल परंपरेस तो कसा पूर्णपणें पारखा झाला आहे हें समजून घेण्यासाठीं 'लोकमान्य' पत्राचा ता. २८ सप्टेंबरचा अग्रलेख वाचावा. स्वतःला 'नेहरूवादी' म्हणविणारे 'लोकमान्य' कार म्हणतातः—

"**मुसोलिनीस** देशभक्त म्हणण्यास हरकत कोणती ? गेल्या महायुद्धानंतर **इटली**चा विश्वासघात झाला म्हणून तो चिडला व देशाच्या उद्धारासाठीं त्याला जो मार्ग योग्य वाटला तो त्यानें स्वीकारला."

*  *  *

केवळ जवाहरलाल नेहरूंची नव्हे तर साऱ्या कॉंग्रेसची शिकवण या बाबतींत अगदीं निराळी आहे हें सर्वांना ठाऊक आहेच. पहिल्या साम्राज्यशाही युद्धाच्या पूर्वी **मुसोलिनीनें** समाजसत्तावादाचा (राष्ट्रवादाचा नव्हे) बुरखा घेतला होता तो महायुद्ध सुरू होतांच गळून पडला, व **इंग्लंड-फ्रान्स**च्या बाजूनें **इटली**ला युद्धांत खेचण्यांत त्यानें पुढाकार घेतला. महायुद्धानंतर **इंग्लंड-फ्रान्स** यांनीं केलेल्या विश्वासघातामुळें **मुसोलिनी** त्यांच्याविरुद्ध चिडला काय? मुळींच नाहीं. तो **इटालियन** कामगारांविरुद्ध चिडला. कां ? कारण ते **इटलींत रशिया**प्रमाणें सोविएत क्रांति घडवून आणूं पाहात होते. यासाठीं १९१९ सालीं **मुसोलिनीनें फॅसिस्ट** पार्टी स्थापन केली. तो **इटालियन** भांडवलशाहीचा पाठीराखा व **इटालियन** जनतेचा शत्रु होता. त्यानें उभ्या जन्मांत देशभक्तीच्या प्रेरणेनें एकहि कृत्य केलें नाहीं. इटलींतील व इतर देशांतील जनतेच्या माना मुरगळणें हीच या भेकड मवाल्याच्या आयुष्याची इतिकर्तव्यता होती.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे 'हिंदुत्वनिष्ठ' लोक **मुसोलिनी**चे कितीहि पोवाडे गावोत, पण कॉंग्रेसनें हिंदी जनतेला या **फॅसिस्ट** दादाचा तिरस्कार करण्यासच शिकविलें आहे. पण 'लोकमान्य'कार मात्र पुनः पुनः म्हणतात कीं तो देशभक्त होता !

*  *  *

आणि त्यांच्याच विचारसरणीनें पाहिल्यास **हिटलर**ला आणि **टोजो**लाहि देशभक्त म्हणण्यास 'हरकत कोणती ?' व्हर्सायच्या तहामुळें **हिटलर** 'चिडला' आणि 'देशाच्या उद्धारासाठीं त्याला जो मार्ग योग्य वाटला तो त्यानें स्वीकारला' असेंच त्यांना म्हणावयाचें आहे काय ? तसेंच **आशियांत** जपानचें अनिर्बंध वर्चस्व स्थापन

करण्यास आंग्ल–अमेरिकनांची धोंड आड येते म्हणून टोजो ‘चिडला’ आणि त्यानें ‘देशाच्या उद्धारासाठीं’ सध्यांचें युद्ध सुरू केलें, असें म्हणणेंहि ‘लोकमान्य’कारांच्या या विचारसरणीस धरूनच होईल.

यांपैकीं हिटलरला तरी त्यांनीं अगोदरच पुढील प्रशंसापत्र देऊन ठेवलें आहे:– “मरून गेलेल्या जर्मन राष्ट्रास त्याच्या [ हिटलरच्या ] स्टॉर्म-ट्रुप्स या स्वयंसेवक संघटनेनेंच पुनरुज्जीवित केलें !” ( ‘कॉंग्रेस आणि महायुद्ध’, पान ११४ ).

स्वतःचा ‘राष्ट्रवाद’ सिद्ध करण्यासाठीं या लोकांना नुसती कम्युनिस्टांची निंदा करून भागत नाहीं, त्याचवेळीं मुसोलिनी आणि हिटलरचे गोडवे गाणेंहि आवश्यक होतें.

* * *

सोविएत लाल फौजेच्या तुफानी चढाईमुळें या कंपूचा धीरच खचून गेला आहे. हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रामाणिक देशाभिमान्याला आनंदाचें भरतें आणणाऱ्या आजकालच्या सोविएत रणांगणावरील बातम्या ऐकून ‘लोकमान्य’कारांना मात्र रडेंच कोसळत आहे. ‘स्टॅलिनचें अभिनंदन’ करण्यास ते बिलकूल तयार नाहींत. कां ? कारण “जर्मनींतल्या हिटलरशाहीचा नाश केला जात असतां हिंदुस्थानांतील चर्चिलशाहीचा अंमल दृढ केला जात आहे !”

त्यांच्या मतें स्तालिननें हिटलरशाहीचा नाश करण्याचें जरा लांबणीवर टाकावयाला पाहिजे होतें ! तसें झालें असतें तर हिंदुस्थानांतील चर्चिलशाहीचा अंमल सैल करण्याला ( आणि त्यासाठीं ‘स्टॉर्म-ट्रूप’ धर्तीची फॅसिस्ट ‘स्वयंसेवक संघटना’ करण्याला ) ‘लोकमान्य’कारांना वाव मिळाला असता !

याच विचारसरणीस अनुसरून ‘लोकमान्य’कार जपानविरुद्ध लढणाऱ्या चिनी फौजांविरुद्धहि बोटें मोडत असतील व ‘तिकडे जपानी फॅसिस्ट जसजसा मार खात आहेत तसतशी इकडे चर्चिलशाही दृढ होत आहे’ असें रडगाणें गात असतील असें समजण्यास हरकत नाहीं.

याला म्हणतात कम्युनिस्ट-निंदकांचा ‘राष्ट्रवाद !’ कॉंग्रेसनें व नेहरूंनीं शिकविलेल्या तेजस्वी देशाभिमानाशीं याचा काडीइतकाही संबंध नाहीं ही गोष्ट कुणाच्याहि सहज लक्षांत येईल.

* * *

या लोकांच्या विकृत विचारसरणीचें अंतिम मूळ जनतेच्या सामर्थ्याविषयींच्या त्यांच्या संपूर्ण अज्ञानांतच आहे. हिंदुस्थानचा प्रश्न हिंदी जनताच स्वतःच्या एकजुटीच्या जोरावर सोडवूं शकेल, हें कम्युनिस्टांचें म्हणणें या लोकांना याच कारणास्तव हास्यास्पद किंवा चीड आणणारें वाटतें. आणि म्हणून त्यांचे डोळे कधीं

टोजोकडे, कधीं हिटलरकडे, तर कधीं 'संयुक्तां'कडे लागून राहिलेले असतात. 'इटलीचें या युद्धांत जें काय व्हायचें तें होऊन गेलें', हें 'लोकमान्य' पत्राचें विधान याच मनोवृत्तीचें प्रतिबिंब आहे. **इटालियन** जनता आज **हिटलर–मुसोलिनी** विरुद्ध लढत आहे, दोस्तांच्या फौजांचें कार्य **इटालियन** जनतेच्या या लढ्याला पोषकच होत आहे, **इटलीच्या** इतिहासाचें उज्वल पान अजून पुढेंच आहे व तें जवळ येत चाललें आहे, **इटालियन** जनता आज तें पान आपल्या रक्ताच्या शाईनें लिहित आहे, या गोष्टी या लोकांना दिसूंच शकत नाहीं.

याच कारणास्तव **रशियांत** स्थापन झालेल्या 'स्वतंत्र **जर्मनी** राष्ट्रीय कमिटी'च्या बातमींत या लोकांना '**प्रशियन** लष्करशाही'च्या पुनरुज्जीवनाचें भूतच दिसतें. **हिटलरच्या** युद्धतंत्राला जबरदस्तीनें किंवा फसवणुकीनें जुंपले गेलेले **जर्मन** सैनिक सोविएतचे युद्धकैदी बनल्यावर तेथील वातावरणांत त्यांच्या डोळ्यावरील धुंदी उतरेल, व **हिटलरशाहीचा** नायनाट करण्यासाठीं आणि लोकशाहीच्या पायावर स्वतंत्र व स्वाभिमानी **जर्मनीची** पुनः स्थापना करण्यासाठीं ते आवेशानें झटण्यास तयार होतील, ही गोष्टच त्यांना अशक्य वाटते. सोविएत रणांगणावरील युद्धाच्या आरंभीच्या दिवसापासूनच **जर्मन** सैनिकांच्या मनोवृत्तींत अशा प्रकारचा पालट होण्यास सुरवात झाली, सोविएतमधील **जर्मन** युद्धकैद्यांची पहिली परिषद ऑक्टोबर १९४१ मध्येंच झाली व तेव्हांपासून सुरू झालेल्या **हिटलर**-विरोधी चळवळीचें पर्यवसान म्हणूनच जून १९४३ मध्यें 'स्वतंत्र **जर्मनी** राष्ट्रीय कमिटी' अस्तित्वांत आली, या गोष्टींची त्यांना दखलच नाहीं.

* * *

**जर्मनींत हिटलरी** लष्करशाही व **प्रशियन** लष्करशाही यांखेरीज निराळें कांहीं अस्तित्वांतच नाहीं, ही गोष्ट या बनावट 'राष्ट्रवाद्यां'ना कुणी शिकविली? **इंग्लंडच्या** परराष्ट्रीय कचेरींतील एक माजी बडे अधिकारी लॉर्ड **व्हॅन्सिटार्ट** यांनीं! (**इंग्लंड**च्या परराष्ट्रीय कचेरींतील दुसरे एक माजी अधिकारी **प्रोफेसर कार** यांच्या लिखाणावरून 'चित्रा' व 'भवितव्य'च्या संपादकांना प्रेरणा मिळत असते.) या '**व्हॅन्सिटार्टिझम**'ला उत्तर देण्यासाठींच **स्तालिननें** एकीकडे **हिटलरी** गुंड व दुसरीकडे **जर्मन** राष्ट्र व राज्य यांच्यामधील भेद स्पष्ट केला. पण 'लोकमान्य'कारांनीं हें सर्व लपवून ठेवलें आहे, 'जर्मनीची सर्व संघटित लष्करी शक्ति' यांचा अर्थ '**प्रशियन** लष्करशाही' असा केला आहे, '**प्रशियन** सेनानींशीं तह करण्यास **स्तालिन** तयार होईल' अशी या विपर्यासाच्या आधारें त्यांनीं ग्वाही दिली आहे, व तरी सुद्धां ही कांहीं 'शाब्दिक हातचलाखी' नव्हे असें त्यांचें आग्रहाचें म्हणणें आहे!

(३-१०-४३)

— ६ —

# हाडांच्या सांपळ्यांविरुद्ध सावरकरांचें युद्ध

सिल्चर ( आसाम ) येथून आलेली पुढील बातमी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली आहेः—

" बंगालच्या दक्षिण भागांतून शेंकडो भुकेकंगाल स्त्रीपुरुष व मुलें येथें आलीं आहेत व दररोज आणखी येत आहेत. हे हालते हाडांचे सांपळे घांसभर अन्नासाठीं दारोदार फिरत आहेत. यांपैकीं ९० जणांना रस्त्यांत अन्नाविणा तडफडत असतां उचलून इस्पितळांत नेण्यांत आलें व त्यांपैकीं २२ जण मरण पावले. येथें येणाऱ्या आगगाड्यांत गेल्या महिन्यामध्यें पांचसहा प्रेतें सांपडलीं. स्थानिक रामकृष्ण मिशन या भुकेकंगालांना आपल्या शक्तीप्रमाणें मदत करीत आहे. "

ही बातमी वाचून कोणत्या दगडाला पाझर फुटणार नाहीं ? बंगालची ही करुण कहाणी ऐकून प्रत्येकाच्या काळजाला घरें पडत आहेत, बंगालला या उपासमारीच्या खाईतून कसें वांचवावयाचें हा एकच विचार प्रत्येकाला भंडावून सोडत आहे, बंगालला मदत करण्यासाठीं प्रत्येकजण आपल्या प्रयत्नाची पराकाष्ठा करीत आहे.

* * *

परंतु ' वीर ' सावरकरांवर या बातमीची प्रतिक्रिया निराळीच झाली.

आसामच्या रस्त्यांतील हाडांच्या सांपळ्यांच्या रांगांत शेंडीवाले किती व दाढीवाले किती याची ते गणती करूं लागले. लगेच त्यांनीं पुढील फतवा काढलाः—

" आसाममध्यें अपूर्व संख्येंत येणाऱ्या सध्यांच्या झुंडींत मुख्यतः हजारों मुसलमानच आहेत, या रहस्यपूर्ण गोष्टीवरून या चळवळीचा उद्देश स्पष्टपणें निदर्शनास येतो. या हिंदु-विरोधी चळवळीला वेळींच परिणामकारक रीतीनें आळा न घातल्यास आसामला बहुसंख्य मुस्लिम वस्तीचा प्रांत बनविण्याची मुसलमानांची महत्वाकांक्षा लवकरच फलद्रूप होईल. "

म्हणजे आसामच्या ' हिंदु राष्ट्रा 'वर आज शत्रूची स्वारी होत आहे ! कोणत्या शत्रूची ? जपान्यांची ? छे, छे, जपान्यांशीं हेवादावा करण्याचें ' हिंदुत्वनिष्ठां 'ना काय कारण ? टोजो, हिटलर मुसोलिनी यांचें ' नाहक ' वैर पत्करण्याच्या भान-

गडींत नेहरूसारख्यांनींच पडावें, हिंदु महासभेचे मुत्सद्दी असला मूर्खपणा मुळींच करणार नाहींत.

आसामवर आज मुसलमानांची स्वारी चालू आहे असा सावरकर साऱ्या हिंदूंना इशारा देत आहेत! कोणत्या मुसलमानांची? गझनवीं महमुदाच्या कडव्या पठाणांची? छे, छे, भुकेनें देशोधडीस लागलेल्या पूर्व बंगालमधील अस्थिपंजर मुस्लिम किसानांची!

बंगालची भुकेची किंकाळी ऐकून सामान्य माणसाच्या काळजांत चर्र होतें. पण 'वीर' सावरकर मात्र 'मुसलमान आला रे आला, आसामचीं सारीं दारें खिडक्या बंद करा', अशी वीरश्रीची गर्जना करूं लागतात!

*　　　*　　　*

बंगालमधील या भुकेकंगाल जनतेला 'ऑगस्ट क्रांती'चे हिंदुस्थानांतील सरसेनापति अच्युत पटवर्धन यांनीं एक मोठा मार्मिक प्रश्न विचारला आहे. 'नाइन्थ ऑगस्ट' या बेकायदेशीर इंग्रजी पाक्षिकांत ते म्हणतातः—'बंगालच्या जनतेला काय हवें आहे? रंगूनचा तांदूळ, कीं जपान्यांचा पराभव?' जपान्यांचा पराभव केला पाहिजे असें म्हणणारांची त्यांनीं या लेखांत थट्टा केली आहे. रवीन्द्रनाथांच्या बंगालची जनता रंगूनच्या तांदळासाठीं जपान्यांपुढें लोटांगण घालण्यास तयार होईल असें त्यांचें म्हणणें आहे.

कॉंग्रेस सोशालिस्टांचा 'देशाभिमान' म्हणतात तो हाच! रवीन्द्रनाथ टागोर, चितगांवचे क्रांतिकारक, यांच्या बंगालचा या लोकांना केव्हांच विसर पडला आहे. त्यांना फक्त सुभाष बोसचा बंगालच ठाऊक आहे.

उद्यां जर पाशवी जपानी फॅसिस्ट बंगालमध्यें आले व बंगालच्या स्त्रियांना 'तुम्हांला काय पाहिजे, तांदुळ कीं तुमची अब्रू?' असें विचारूं लागले, तर अच्युत पटवर्धन त्यांना अब्रू विकून तांदुळ घेण्याचाच सल्ला देतील, हें यांवरून उघड होत नाहीं का?

*　　　*　　　*

असला उघड उघड जपानतर्फी प्रचार सामान्य जनतेला अगदीं किळसवाणा वाटतो याचा या पंचमदळ्यांना चांगलाच अनुभव आला आहे असें दिसतें. म्हणून याच अच्युत पटवर्धनांच्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या 'क्रांतिकारी' या मराठी मासिकांत जपानच्या बाबतींत निराळा सूर काढण्यांत आला आहे. हें पत्र म्हणतें:—

"जपानच्या चीनविषयक धोरणावरून जपानी सत्ता किती साम्राज्यवादी व क्रूर आहे हें सिद्ध झालेंच आहे. म्हणून आतां नवीन प्रस्थापित होणारी ब्रह्मदेशांतील व इतर सरकारें कळसूत्रींच बनणार याबद्दल मतभेद होऊं शकत नाहीं."

जपानच्या लबाडपणाविषयीं अच्युत पटवर्धनांना एवढी खात्री असूनहि 'जपान बंगालला तांदुळ देण्यास तयार आहे या बातमीवर विश्वास ठेवा,' असें हिंदी जनतेला सांगण्यास त्यांना कांहींच दिक्कत वाटत नाहीं.

तथापि कॉंग्रेसच्या तिरंगी झेंड्यासारखा पोशाक करून बंगालमध्यें उतरूं पाहणाऱ्या जपानच्या छत्रीवर पंचमदळवाल्याचें सोंग, आणि अच्युत पटवर्धनांचें हें 'जपानविरोधा'चें सोंग, ही दोन्हीं एकाच नमुन्याचीं आहेत हें थोडासा विचार केल्यास व त्यांचें इतर लिखाण पाहिल्यास सहज लक्षांत येईल. बा मॉ चें 'स्वतंत्र ब्रह्मी सरकार' खरोखरी जपानचें कळसूत्री सरकारच आहे यांत शंका नाहीं, पण मग सुभाष बाबूंचें काय ? सुभाष बोस सध्यां जपानच्या आश्रयाखालीं आहेत ही गोष्ट अच्युत पटवर्धनांनीं 'नाइन्थ ऑगस्ट' पाक्षिकांत स्वतःच कबूल केली आहे. तरीसुद्धां जपानचें कळसूत्री बाहुलें म्हणून सुभाष बोसचा धिक्कार करण्याऐवजीं अच्युत पटवर्धन प्रभृति कॉंग्रेस सोशालिस्ट त्यांचा जयजयकारच करतात ही गोष्ट खरी नाहीं का ? आणि त्यावरुन निष्कर्ष काय निघतो ?

* * *

जपानच्या स्वारीचा मार्ग या ना त्या रीतीनें सोपा करणें हेंच बोसगट व कॉंग्रेस सोशालिस्ट या दोन्ही पंचमदळी गटांचें मुख्य कार्य आहे, याचा आणखी एक पुरावा म्हणून अच्युत पटवर्धनांच्या 'नाइन्थ ऑगस्ट' पाक्षिकांतील चीनसंबंधीचा उल्लेख पहा. चीनमध्यें आज काय चाललें आहे ? हिंदुस्थानांतील सर्व देशभक्तांना ठाऊक आहे कीं चीनची जनता अत्यंत बिकट परिस्थितींतसुद्धां अद्यापि जपान्यांचा प्रतिकार करीत आहे व त्यांना खडे चारीत आहे. पण अच्युत पटवर्धनांना ही गोष्ट वाचकांपासून लपवून ठेवावीशी वाटते. त्यांनीं एका अमेरिकन वृत्तपत्राच्या आधारें चीनमधील परिस्थितीचें वर्णन देऊन तेथें 'मृत्यूची शांतता' पसरली आहे अशी थाप ठोकून दिली आहे.

टोकियोचा रेडियोसुद्धां हेंच किंकाळत असतो. चीनमध्यें जपानचें आसन स्थिर झालें आहे, चीनचा सारा प्रतिकार कोसळून पडला आहे, असें जगाला भासविण्याचा जपानी प्रचारक नेहमीं प्रयत्न करीत असतात. अच्युत पटवर्धनांचें पत्र याच पराभववादी खोट्या प्रचाराला साथ देत आहे.

कारण काय ? चीनचा पराभव आज होऊन चुकला आहे, उद्यां हिंदुस्थानांतसुद्धां जपान्यांचा विजय होण्याचें टळत नाहीं, अशी भावना आपल्या वाचकांच्या मनांत निर्माण करण्यासाठींच या पंचमदळी प्रचारकानें ही खुबीदार युक्ति योजिली आहे, हें उघड नाहीं कां ?

एका तोंडानें ' क्रांतिकारी ' मासिकांत **चीन** हाच हिंदुस्थानचा दोस्त आहे असें म्हणावयाचें, व दुसऱ्या तोंडानें 'नाइन्थ ऑगस्ट ' पाक्षिकांत **चीन जपानशी** तह करणार अशी थाप देऊन **चीनची** नालस्ती करावयाची, या अच्युत पटवर्धनांच्या दुटप्पी कारवाईचा दुसरा कोणता उद्देश असणें शक्य आहे ?

* * *

या लोकांना पंचमदळी म्हणण्यांत अतिशयोक्ति होत आहे असें कांहीं प्रामाणिक देशभक्तांना वाटतें. म्हणून ' पंचमदळ ' म्हणजे काय याची या कॉंग्रेस सोशालिस्टांनींच जी व्याख्या केली आहे तिचा विचार करणें उपयुक्त ठरेल.

दोस्तराष्ट्रांच्या फौजांनीं **हिटलरच्या** ताब्यांतील **यूरोपवर** स्वारी केल्यास त्या फौजांना **हिटलरविरुद्ध** मदत करण्यासाठीं जे लोक पुढें येतील तेच ' खरेखुरे पंचमदळी ' होत, असें अच्युत पटवर्धनांच्या ' नाइन्थ ऑगस्ट ' पाक्षिकाच्या ता. २४ सप्टेंबरच्या अंकांत ( पान ७ ) निर्लज्जपणें जाहीर करण्यांत आलें आहे !

दोस्तराष्ट्रांनीं यूरोपमध्यें दुसरी आघाडी उघडली पाहिजे ही गोष्ट हिंदी जनतेला मान्य आहे का ? कोणत्याहि प्रामाणिक देशाभिमान्याला विचारा, अद्यापि दुसरी आघाडी न उघडल्याबद्दल तो दोस्तांना दोषच देईल. पण अच्युत पटवर्धनांचें मत निराळें आहे.

दोस्तांनीं **यूरोपमध्यें** दुसरी आघाडी उघडूं नये, आणि उघडल्यास यूरोपच्या जनतेनें त्यांना मदत करूं नये, असें कुणाला वाटतें ? **हिटलरला**,—आणि अच्युत पटवर्धनांना !

**इटलीमध्यें** दोस्तफौजांच्या मदतीनें **हिटलरविरुद्ध** लढणारे **मिलान-टुरिनचे** कामगार व इतर **इटालियन** लोक हे जर ' खरेखुरे पंचमदळी ' असतील तर अच्युत पटवर्धनांना अर्थात्‌च तेजस्वी ' राष्ट्रभक्त ' म्हणावें लागेल यांत शंका नाहीं. ' लोकमान्य 'कारांनीं ' राष्ट्रभक्तसहस्रनामावळींत ' या कॉंग्रेस सोशालिस्टांच्या जोडीला **मुसोलिनीलाहि** बसवून फारच औचित्य साधलें आहे हें कुणालाहि कबूल करावें लागेल !

* * *

पंचमदळवाल्यांच्या या घाणेरड्या कारवाया कम्युनिस्टांनीं उघडकीस आणल्या म्हणजे त्यांच्या पुठ्ठ्यांतल्या कांहीं मराठी पत्रकारांची पांचावर धारण बसते, व हीं गुप्त पत्रकें कम्युनिस्टांनींच लबाडीनें प्रसिद्ध केलीं आहेत असा ते सोवळेपणानें आक्रोश करूं लागतात.

कांहीं दिवसांपूर्वीं कॉंग्रेस सोशालिस्टांच्या नेतृत्वाखालीं भरलेल्या विद्यार्थ्यांच्या परिषदेंत पंचमदळयांचीं गुप्त हँडबिलें वांटण्यांत आलीं होतीं. त्यांतील राष्ट्रद्रोही

प्रचाराचें खरें स्वरूप कम्युनिस्टांनीं विद्यार्थ्यांच्या नजरेस आणून दिलें. तेव्हांपासून 'चित्रा' वगैरे पत्रांनीं हीं हँडबिलें कम्युनिस्टांनींच काढलीं असा धादांत खोटा आरोप करण्यास सुरुवात केली आहे. ( मात्र या पंचमदळी हँडबिलांतील मजकुरावर टीका करण्याची 'चित्रा'च्या लेखकांना मुळींच जरूरी वाटली नाहीं! बरोबरच आहे! पंचमदळी धोरणाविरुद्ध त्यांनीं स्वतःच टीका करून कसें चालेल? )

हीं हँडबिलें त्या परिषदेंत वाटलींच गेलीं नाहींत असें म्हणण्याचें मात्र या थापाड्यांना सुद्धां धैर्य झालें नाहीं! मग या पंचमदळी हँडबिलांविरुद्ध परिषदेंतील एकाहि वक्त्यानें ब्र सुद्धां काढला नाहीं याचा खुलासा काय?

तसेंच पुण्या-मुंबईतल्या अभ्यासमंडळांतसुद्धां 'चित्रा'चे डॉ. चिटणीस या हँडबिलांविरुद्ध त्यांच्या भोळ्या शिष्यांना इशारा देत असतील ही गोष्ट कितपत संभवते? एकंदरींत लोटवाला शेटजींची नोकरी बजवावयाची व त्याचवेळीं राष्ट्रवादी विद्यार्थ्यांचें पुढारीपण घ्यावयाचें, या दोहोंचा मेळ घालणें बरेंच मुष्किलीचें काम आहे, यांत शंका नाहीं!

( १०-१०-४३ )

---

— ७ —

# मृत्यूच्या तांडवनृत्यामुळें अच्युत पटवर्धनांना हर्षवायु

अच्युत पटवर्धनांच्या 'क्रांतिकारी' मासिकाच्या सप्टेंबरच्या अंकांत पुढील दोन मासलेवाईक बातम्या दिल्या आहेत, व त्यांना 'क्रांतियुद्धांतील संकलित वृत्त' असा मार्मिक मथळा दिला आहे:—

"—( कोल्हापूर ) हातकणंगळे पेट्यांतील यळगुड गांवीं सोसायटीच्या ( शेतकऱ्यांच्या सहकारी पतपेढीच्या ) कागदपत्रांचा नाश करण्यांत आला."

"—मुरगुड येथें ३ व कोल्हापूर येथें १ अशीं ४ माणसें उपासमारीनें मेलीं आहेत."

कॉंग्रेस सोशालिस्टांच्या नेतृत्वाखालील 'क्रांतियुद्धां'त जे रोमांचकारी समरप्रसंग घडून येत असतात ते हे!

* * *

कोल्हापुरांतील किंवा बंगालमधील उपासमारीला क्रांतियुद्धांतील एक अभिनंदनीय व अभिमानास्पद दृश्य समजणाऱ्या या लोकांनीं कम्युनिस्टांवर 'क्रांतियुद्धाचा विचका उडविणारे देशद्रोही' असा आरोप करावा यांत नवल कोणतें? कम्युनिस्टांची निंदा करण्याचें कंकण बांधलेल्या प्रत्येक इसमाला देशांतल्या उपासमारीच्या बाबतींत हीच भूमिका घ्यावी लागते. उदाहरणार्थ, 'लोकमान्य' पत्राच्या ता. ७ ऑक्टोबरच्या अग्रलेखांत पुढील उद्गार पहा:—

"कलकत्त्यास चाललेल्या उपासमारीनें गुलामगिरीच्या जुन्या जगाचा मृत्यु होत आहे. थातुरमातुर उपायांनीं हें जुनें जग जगविण्याचा प्रयत्न व्यर्थ होय."

म्हणजे कलकत्त्यास सध्यां कोण मरत आहे? आपले देशबांधव? छे, छे, कलकत्त्यांत जुनें जग मरत आहे!

'लोकमान्य' पत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या बंगालमधील मृत्यूच्या बातम्यांना 'क्रांतियुद्धांतील समरप्रसंग' असा मथळा देण्यांत येत नाहीं तो केवळ कायद्याच्या अडचणीमुळेंच, असें यावरून समजावयाचें काय?

* * *

आणि म्हणून कलकत्त्यांतील सध्याच्या प्रसंगावर 'लोकमान्य' कारांनीं पुढील काव्य रचलें आहे:—

"युद्ध-परिस्थितीचीं आग जसजशी भडकत जाईल तसतशीं लाचलुचपत, लठ्ठ पगार व नफेबाजी यांचीं डबकीं सुकून जाऊन त्यांतलीं बेडकी व मासळ्या मरतील. परिस्थितीचा इतका भडका झाल्यावर मग जमीन तापेल, ... क्रांतीचीं वादळें होतील, ... मगच जमीन नव्यानें भिजेल व नव्या जगाची पालवी दिसूं लागेल ... संयुक्त मंत्रिमंडळ बनवून कालाचा ओघ आवरण्याचा मूर्ख प्रयत्न करूं नये."

बंगालमधील सध्यांचा कालाचा ओघ आवरण्यासाठीं, मृत्यूच्या जबड्यांतून बंगालची सुटका करण्यासाठीं, बंगालमधील साऱ्या पक्षांनीं एकजूट केल्यास तें योग्य होईल का? छे, छे, अगदीं मूर्खपणाचें होईल! 'लोकमान्य'कार म्हणतात कीं बंगालमधील सध्यांची आग अशीच भडकूं दिली पाहिजे!

ही आग आणखी भडकविण्यासाठीं जपानी बॉंबर विमानें अजून कलकत्त्याला येत नाहींत, याबद्दल डॉ. राम मनोहर लोहियांप्रमाणें 'लोकमान्य'कारांनाहि दुःख होत असेल काय ?

*　　　*　　　*

उपासमारीच्या या आगींत तेल ओतून 'क्रांतियुद्धा'ला हातभार लावणारे व 'जुन्या जगाचा मृत्यु' जवळ आणणारे ( व म्हणून 'लोकमान्य' कारांच्या व्याख्येंत बसणारे ) एक थोर 'राष्ट्रभक्त' कांहीं दिवसांपूर्वी मुंबईच्या पोलिस कोर्टात झळकले.

त्याचें नांव शेठ चतुरभाई गोवर्धनदास असें आहे.

वाळकेश्वरवरील त्यांच्या घरांत पोलिसांना ५५७ मण तांदुळ, ११५ मण गहूं, व आणखी बराचसा माल दडवून ठेवलेला आढळला.

एका माणसाला एक आठवड्याला १ पायली रेशन मिळतें. या हिशेबानें एवढें धान्य २७ हजार माणसांना १ दिवस पुरलें असतें, एक हजार माणसांना २७ दिवस पुरलें असतें.

हजार माणसांचें महिन्याचें धान्य दडवून ठेवणारा असला प्राणी मलबार हिलवर व शेठजींच्या इतर वस्तींत अपवादानेंच आढळतो, असें म्हणण्याचें धाडस कोण करूं शकेल ?

अहमदाबादमध्यें रेशनिंग सुरू करण्याला शेठ कस्तुरभाई लालभाई प्रभृति लोकांचा विरोध कां, हें यावरून सहज लक्षांत येईल.

*　　　*　　　*

हेच कस्तुरभाई प्रभृति गिरणी मालक कापड नियंत्रणाविरुद्ध इतके जळफळत आहेत यांत कांहीं आश्चर्य नाहीं. बंगालच्या उपासमारीच्या चितेंत जपानतर्फी प्रचाराची पोळी भाजून घेण्याचा पंचमदळ्यांचा प्रयत्न, आणि देशभक्तीचा बुरखा पांघरून भरमसाट नफेबाजी साधण्याचा प्रयत्न यांतील साम्य अगदीं स्पष्ट आहे.

देशावरील आजच्या प्राणांतिक संकटाच्या काळीं नफेबाज भांडवलदार व देशभक्त कामगार यांचें वर्तन कसें निरनिराळें असतें हें प्रत्येकानें नीट समजून घेतलें पाहिजे.

भांडवलदारांनीं २७० कोटी वार कापड दडवून ठेवून कापडावर युद्धपूर्व काळाच्या पांचपट भाव मिळविले.

मुंबईच्या कामगारांनीं आठवड्याच्या रजेची गटवार पद्धत स्वीकारून व अशा रीतीनें गैरसोय सोसून कापडाचें उत्पादन दरमहा ९० लक्ष वारांनीं वाढविण्यास मदत केली.

*　　　*　　　*

तरीसुद्धां वसंत लाडोबांच्या पंखाखालील ‘ धनुर्धारी ’ च्या संपादकीय लेखणीबहाद्दराला कामगारवर्गाची नालस्ती करण्यास मुळीच दिक्कत वाटत नाहीं. तो म्हणतो—

“ युद्धकाळांत कामगारवर्गाला भरपूर काम व त्याहूनहि भरपूर पगार मिळत असल्यानें तो पूर्णपणें आत्मसंतुष्ट असतो. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या उचापती करण्याच्या मनःस्थितींत तो नसतो. ”

कामगारवर्गाला सध्यां भरपूर पगार मिळतो ही पहिली थाप. ( वस्तुस्थिति काय आहे ? युद्धपूर्व काळापेक्षां जून १९४३ मध्यें राहणी खर्च १२७ टक्यांनीं वाढला, व मुंबईच्या गिरणीकामगारांना फक्त ९४ टक्केच महागाई भत्ता मिळाला. इतर कामगारांना तेवढाहि मिळत नाहीं. )

कामगारवर्गाला राष्ट्रप्रेम नाहीं ही दुसरी थाप. ( कापड दडवून ठेवणें हें राष्ट्रप्रेम, व जास्त कापड तयार करणें हा राष्ट्रद्रोह, असेंच या ‘ धनुर्धारी ’च्या लेखकांचें मत दिसतें. )

या लोकांना कम्युनिस्टांविषयींचा स्वतःचा द्वेष व्यक्त करतांना एकीकडे फॅसिस्टांची स्तुति करावी लागते व दुसरीकडे त्याच वेळीं सबंध कामगारवर्गाची बदनामीहि करावी लागते.

तथापि राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीला ‘ उचापती ’ हा शब्द योजून या लेखकानें स्वतःची मनोभूमिका अगदीं यथार्थपणें व्यक्त केली आहे यांत शंका नाहीं.

* * *

आतां ‘ देशभक्त ’ म्हणविणाऱ्या भांडवलदारांच्या ‘ उचापतीं ’चें हें उदाहरण पहा—

अहमदाबादच्या अनंत मिलमध्यें गुलाम रसुल पिरु नांवाच्या कपडा खात्यांतील कामगाराला मालकांनीं नोटिशीशिवाय काढून टाकलें. त्या कामगारानें इंडस्ट्रिअल कोर्टाकडे तक्रार केली. मालकांतर्फे कोर्टाला असें सांगण्यांत आलें कीं ता. ३० जानेवारी रोजीं गिरणींत पांचसात मिनिटें संप झाला होता. हा संप या कामगाराच्या चिथावणीमुळें झाला होता, आणि या कारणास्तव त्याला लेखी नोटीस देऊन काढून टाकण्यांत आलें.

पण या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करून कोर्टानें जो निकाल दिला त्यांत पुढील मुद्दे होतेः—ता. ३० जानुवारी रोजीं संप झालाच नव्हता. सदरहू कामगाराला कोणत्याहि स्वरूपांत नोटीस देण्यांत आली नव्हती. नोटीशीच्या पुस्तकांतून नोटीस फाडून दिल्यानंतर मार्जिनचा तुकडा राहतो, परंतु या कामगाराला जी

नोटीस देण्यांत आली म्हणून सांगण्यांत आलें आहे, तिच्या मार्जिनचा तुकडा त्या पुस्तकांत सांपडतच नाहीं.

म्हणजे कामगाराला काढून टाकल्याच्या अपराधावर पांघरूण घालण्यासाठीं या मालकांना खोटा पुरावा मांडण्यास व खोटीं विधानें करण्यास कांहींच शरम वाटली नाहीं.

देशभक्तीचें सोंग घेणाऱ्या नफेबाजांची नीतिमत्ता अशी असते.

आणि असल्या लोकांना देशद्रोही म्हटल्याबद्दल कम्युनिस्टांवर 'भवितव्य', 'चित्रा' वगैरे पत्रें नेहमीं आग पाखडीत असतात.

(१७-१०-४३)

---

८

# रोमां रोलां व मराठी साहित्यिक

---

जगद्विख्यात फ्रेंच साहित्यिक व गांधीजी आणि टागोर यांचे निकट मित्र **रोमां रोलां** यांचा **हिटलरी** नरपशूंच्या कॉन्सेन्ट्रेशन कँपमध्यें मृत्यु झाल्याची बातमी ऐकून प्रत्येक हिंदी देशभक्ताचा फॅसिस्ट-द्वेष संतापानें उफाळून येईल यांत शंका नाहीं.

कलावंतांचा प्रामाणिकपणा **रोमां रोलां** यांच्या नसानसांत मुरला असल्या-मुळें राजकारणाच्या आखाड्यांत उतरणें त्यांना अपरिहार्यच झालें. आयुष्यभर उराशीं बाळगलेले पूर्वग्रह साठी उलटल्यानंतरहि धैर्यानें झुगारून देऊन नव्या युगांतील नव्या घटनांशीं पूर्णपणें समरस होणें त्यांना मुळींच कठिण गेलें नाहीं. त्यांनीं आपला पक्ष निश्चित केला व त्यासाठीं आपली काया व लेखणी अखेरपर्यंत शिणविली.

ते जनतेचे साहित्यिक होते. जुलमानें गांजलेल्या जनतेचा सात्त्विक संताप, जुलमशाहीविरुद्ध लढणाऱ्या जनतेचा आत्मविश्वासयुक्त आवेश, जुलमकर्त्यांना जमीन-दोस्त करून विजयी झालेल्या जनतेचा तेजस्वी अभिमान, त्यांच्या लेखणींतून उतर-लेल्या अक्षराअक्षरांत प्रतिबिंबित झालेला आढळतो. राइशटॅगची आग आणि मीर-तचा खटला, सोविएत–निंदकांच्या कारवाया आणि फ्रेंच राज्यकर्त्यांचा देशद्रोह,– जें जें म्हणून दुष्ट, नीच, किळसवाणें, आढळलें त्याविरुद्ध आपल्या साहित्याचें अग्न्यस्त्र उगारण्यास त्यांनीं कधींहि कुचराई केली नाहीं. सोविएत यूनियनच्या नव-संस्कृतींत त्यांना आपल्या जिव्हाळ्याच्या ध्येयाची परिपूर्ती दिसली व मुक्तकंठानें त्यांनीं या संस्कृतीचे पवाडे गाइले. फॅसिझमच्या उदयांत त्यांना मानवजातीवरील सर्वांत मोठें संकट आढळलें, व फॅसिझमविरुद्ध लढण्यासाठीं साऱ्या जगांतील जन-तेला स्फुरण देण्याच्या कार्याला त्यांनीं एवढ्या उतारवयांतसुद्धां आपली सारी कला वाहून टाकली.

*　　　*　　　*

"मी कां लिहितों व कुणासाठीं लिहितों ?" या प्रश्नाला **रोमां रोलां** यांनीं पुढील उत्तर दिलें आहे:—

"मी कां लिहितों ? कारण न लिहिणें मला शक्यच नाहीं. कागदावर लिहिलें नाहीं तर मनांत तरी मला लिहावें लागणारच. जे गतिमान असतात अशांसाठींच मी नेहमीं लिहित असतों. मी स्वतः सतत पुढें जात असतों; कुडींत जीव असेपर्यंत माझी प्रगति कधींच थांबणार नांहीं अशी मला आशा आहे. जीवन म्हणजे गति–सरळ प्रगति ! माझ्या दृष्टीनें जीवनाचा याखेरीज दुसरा कांहीं अर्थ होऊं शकत नाहीं. म्हणूनच मानवजातीच्या प्रगतीचा रस्ता आखून देणाऱ्या जनतेला व वर्गांना –संघटित कामगारांना व त्यांच्या सोविएत यूनियनला—माझा संपूर्ण पाठिंबा आहे.

"मी कुणासाठीं लिहितों ? आगेकूच करणाऱ्या मानवजातीच्या आघाडीवरील सैनिकांसाठीं ! प्रचंड आंतरराष्ट्रीय संग्रामांतील बिनीच्या वीरांसाठीं ! हा संग्राम यशस्वी झाला म्हणजे साऱ्या सरहद्दी आणि सारे वर्गभेद वितळून जातील व संयुक्त मानवीसमाज उदयास येईल. हें उच्च ध्येय गांठण्यासाठीं हातांत निशाण घेऊन धैर्यानें पुढें सरसावणारा एकच कृतिप्रवण पक्ष आज जगभर अस्तित्वांत आहे व तो म्हणजे **कम्युनिझम.**

"माझ्या सर्व समव्यवसायिकांना, बौद्धिक क्षेत्रांतील कामगारांना, मी कळ-कळीनें विनवून सांगतों कीं आपलें स्थान कामगारांच्या शेजारीं आहे. त्यांचें स्वातंत्र्य व सामर्थ्य तेंच आपलें स्वातंत्र्य व सामर्थ्य. कामगार भाईनो, आम्ही तुमचे आहोंत. आपण एकजूट करूं या. मानवजात आज संकटांत सांपडली आहे !"

　　　*　　　*　　　*

**रोमां रोलां** हे कम्युनिझमचे, सोविएत यूनियनचे व फॅसिझमविरोधाचे 'आग्रही प्रचारक' होते. त्यांच्या कलानिष्ठेनेंच त्यांना ही भूमिका घेण्यास भाग पाडलें.

परंतु मुंबईत कांहीं दिवसांपूर्वी भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष-पदावरून प्राध्यापक **जोग** यांनीं लेखकवर्गाला निराळाच उपदेश केला. ते म्हणाले:-

" साहित्यिकांस सांगणें असें कीं कोणत्याहि पक्षाच्या, पंथाच्या किंवा तत्वज्ञाना-च्या दडपणाखालीं दबून जाऊन त्यांनीं आपलें विचार-स्वातंत्र्य गमावूं नये... त्यांनीं आग्रही प्रचारक होऊं नये. "

आजच्या समाजाच्या आणि देशाच्या परिस्थितींत साहित्यिकांनीं काय करावें, या प्रश्नाला प्रा. जोग यांनीं पुढील उत्तर दिलें:-

" साहित्यिकांना खरोखरीच कांहीं करावयाचें असेल तर त्यांनीं लेखनापेक्षां इतर कांहीं करण्यास लागावें हें बरें. "

आजची परिस्थितीच अशी आहे कीं साहित्यिकांनीं लेखन करावयाचें तर कांहीं विशिष्ट प्रश्नांच्या बाबतींत निश्चित भूमिका घेणें त्यांना टाळतांच येणार नाहीं. उदा-हरणार्थ 'लोकमान्य'कारांप्रमाणें **मुसोलिनीला** 'राष्ट्रभक्त' म्हणून व 'भवितव्य'-कारांप्रमाणें **हिटलरला** 'योजनाबद्ध अर्थव्यवस्थेच्या युगाचा प्रवर्तक' म्हणून या फॅसिस्ट सैतानांचीं स्तुतिस्तोत्रें गावयाचीं, कीं **इलिया एरनबुर्ग, शोलोकोव**, वगैरे प्रमाणें आपल्या जिवंत लेखणीनें जनतेच्या हृदयांत फॅसिझमच्या द्वेषाचा अग्नि प्रज्वलित करावयाचा; 'धनुर्धारी', 'चित्रा', वगैरेप्रमाणें सोविएतची निंदा करून स्वतःचें 'पुरोगामित्व' सिद्ध करावयाचें, कीं **रवींद्रनाथ टागोरां**प्रमाण उत्साहानें सोविएत संस्कृतीचें गुणगान करून 'सोविएत-मित्र-मंडळ' सारख्या संस्थांना सक्रिय साहाय्य करावयाचें; बंगालच्या उपासमारीला कॉंग्रेस सोशालिस्टांप्रमाणें 'क्रांतियुद्धां'-तील आशादायक दृश्य समजून त्यावर उल्हासयुक्त 'काव्यें' रचावयाचीं, कीं सरोजिनी नायडूंप्रमाणें या प्राणसंकटाच्या वेळीं जनतेला एकजुटीचा संदेश द्यावयाचा;--असल्या प्रश्नांचें असंदिग्ध उत्तर दिल्याशिवाय कोणत्याहि साहित्यिकाला आज लेखन करतां येणार नाहीं हें उघड आहे.

अशा प्रकारचें उत्तर द्यावें लागणें ही प्रा. जोगसारख्यांना मोठी आपत्ति वाटत असल्यामुळेंच त्यांनीं वरीलप्रमाणें उपदेश केला असला पाहिजे, असें समजण्यास हरकत नाहीं.

* * *

**रोमां रोलांचा** खून करणाऱ्या मानवजातीच्या वैऱ्यांविरुद्ध साऱ्या दुनियेंतील जनता संतापानें जळत आहे, परंतु अशा वेळीं अच्युत पटवर्धनांना मात्र या फॅसिस्ट राक्षसांच्या 'सामर्थ्या'चें रसभरित वर्णन करीत बसणेंच आवश्यक वाटतें.

लाल फौजेच्या विजयांमुळें हिटलरची अखेरघटका जवळ आलेली सर्वांना स्पष्टपणें दिसत आहे, पण 'नाइन्थ ऑगस्ट' या इंग्रजी पाक्षिकांत अच्युत पटवर्धन आश्वासन देतात कीं हिटलर कोसळून पडला तरी त्याचे नात्सी वीर ( हिंदुस्थानांतल्या कॉंग्रेस सोशालिस्टांप्रमाणें ? ) दऱ्याखोऱ्यांत दबा धरून बसतील, 'गनिमी टोळ्या' बनवितील, व अनेक वर्षेपर्यंत 'अँग्लो-अमेरिकनांना' हैराण करून सोडतील !

हे हिटलरी गुंड कुणाचे शत्रु आहेत ? जर्मन जनतेचे ? जागतिक जनतेचे ? अच्युत पटवर्धन म्हणतात:--छे, छे, ते अँग्लो-अमेरिकनांचेच शत्रु आहेत ! ( आणि म्हणून आपले मित्र आहेत ! )

आणि या फॅसिस्ट मारेकऱ्यांच्या टोळ्या 'गनिमी' युद्ध करीत असतांना जर्मन जनता काय करीत असणार ?

पण कॉंग्रेस सोशालिस्टांना असला प्रश्न विचारण्यांत कांहींच अर्थ नाहीं. 'जनता' 'एकजूट' वगैरे शब्द ऐकले म्हणजे त्यांना चीडच येते.

त्यांचे डोळे हिटलरकडे आणि टोजोकडे लागले आहेत. आणि म्हणून 'नाइन्थ ऑगस्ट'च्या ता. ९ ऑक्टोबरच्या अंकांत ते म्हणतात :

" सुभाषबाबूंना आम्ही देशद्रोही म्हणण्यास तयार नाहीं ... ते जपानला सामील झाले आहेत खरे, पण तें केवळ वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसाठीं नव्हे. एखादें राष्ट्र चांगलें कीं वाईट हें परिस्थितीवरून ठरवावयाचें असतें. सुभाषबाबूंना जें हवें आहे तें देणें जपानला स्वतःच्या कमकुवतपणामुळें कदाचित भाग पडेल व त्याचा स्वतःला हवा असलेला मोबदला उपटणें जपानला शक्य होणार नाहीं. "

जपानच्या मदतीनें हिंदुस्थानचें 'स्वातंत्र्य' मिळविण्याचा बहाणा करणाऱ्या सुभाषबाबूंना अच्युत पटवर्धन आशीर्वाद देत आहेत, त्याचें कार्य यशस्वी होऊं शकेल असें हिंदी जनतेला आश्वासन देत आहेत, आणि 'परिस्थिति' अशी असल्या-मुळें जपानला 'चांगलें राष्ट्र' म्हणण्यास हरकत नाहीं असें कावेबाजपणानें सूचवून ठेवीत आहेत.

आणि तरीसुद्धां आपणांला कुणी 'जपानतर्फी' असें म्हणूं नये, अशी त्यांची आग्रहाची मागणी आहे !

* * *

या कॉंग्रेस-सोशालिस्टांना आज सर्वांत जास्त कशाचें भय वाटत असेल तर तें गांधीजी प्रभृति पुढाऱ्यांच्या सुटकेचें.

गांधीजींच्या सुटकेच्या मागणीला 'भीकगर्जना' असें नांव देऊन 'लोकमान्य'-कारांनीं जो 'स्वावलंबी' क्रांतिकारकाचा उसना आवेश आणला आहे, त्यामुळें श्री. अमृलाल शेठजींना तरी बरीच मौज वाटली असेल!

तथापि त्याच लेखांत 'लोकमान्य'कारांनीं "गांधीजी व कॉंग्रेस पुढारी यांना बंधमुक्त केलें तर ते काय करतील? त्यांनीं काय करावें?" असा प्रश्न विचारून स्वतःच्या मनांतील खरी चिंता व्यक्त केली आहे.

या प्रश्नाला सरळ उत्तर द्यावयाचें त्यांनीं या लेखांत टाळलें असलें तरी गांधीजींनीं काय करूं नये याविषयीं मात्र त्यांनीं आपलें मत स्पष्टपणें मांडलें आहे. गांधीजींनीं दुसरें कांहींहि केलें तरी एक गोष्ट मात्र मुळींच करूं नये—मुस्लिम लीगशीं कधींहि समेट करूं नये! मुस्लिम लीगशीं एकजूट करावयाची म्हणजे "मुस्लिम लीगला प्रांतिक संयुक्त मंत्रिमंडळात घ्यावें लागेल", व 'लोकमान्य'कारांना ही फारच मोठी आपत्ति वाटते.

ज्या 'ऑगस्ट ठरावा'ची हिरीरीनें तरफदारी करण्याचा 'लोकमान्य'कार आव आणीत असतात, त्यांत राष्ट्रीय सरकारची मागणी करण्यांत आली आहे, व राष्ट्रीय सरकार म्हणजे केवळ कॉंग्रेसचें सरकार नव्हे तर 'देशांतील सर्व प्रमुख पक्षांचा समावेश असलेलें सरकार' असा त्यांत स्पष्ट खुलासा केला आहे, याचा 'लोकमान्य' कारांना सोइस्कर विसर पडण्याचें रहस्य काय?

*　　　*　　　*

'लोकमान्य'कारांच्या 'भीकगर्जने'च्या आरोपावरून मुंबईतील एका मराठी दैनिकानें लॉर्ड वॅव्हेल यांच्या बाबतींत ता. १५ जुलैच्या अग्रलेखांत काढलेल्या उद्गारांची आठवण होते.

वॅव्हेल यांनीं मागें पॅलेस्टाइनमध्यें असतांना तेथील **रेझीन** नांवाच्या बंडखोराची मृत्यूची शिक्षा माफ केली, त्याला तुरुंगांतून सोडून दिलें व त्याच्याकडे फॅसिझम-विरोधी सैन्य उभारण्याचें काम सोंपविलें, अशी माहिती देऊन या वृत्तपत्रानें लॉर्ड वॅव्हेल यांच्या 'धाडशी शहाणपणा'ची स्तुति केली होती, व मग पुढील प्रश्न विचारला होता :—

"येथील घातपाती बंडखोरांना बिनशर्त सोडून देऊन त्यांचा उपयोग परचक्र-निवारणाची संघटना करण्याचे कामी वेवेल हे करून घेतील काय? यांतच त्यांची कसोटी आहे... कॉंग्रेसच्या दृष्टीनें समाधानकारक तडजोडीची कसोटी कोणती असेल तर ती ही होय......फॅसिझमविरोधी लढ्याचा हा खरा मार्ग वेवेल हे अवलंबितील काय?"

लॉर्ड वॅव्हेल यांना काकुळतीनें हा प्रश्न विचारणाऱ्या त्या मराठी दैनिकावर तरी 'लोकमान्य' कार 'भीकगर्जने'चा आरोप करण्यास खास तयार होणार नाहींत, कारण त्या दैनिकाचें नांव 'लोकमान्य' हेंच आहे!

तीन महिन्यांपूर्वी 'लोकमान्य'कारांना गांधीजी प्रभृति कॉंग्रेस पुढाऱ्यांचीच नव्हे तर 'घातपाती' चळवळींत भाग घेणाऱ्या 'बंडखोरांची' सुद्धां सुटका होणें इष्ट वाटत होतें, अशी सुटका झाल्यास तिला 'समाधानकारक तडजोड' म्हणण्यास ते तयार होते, व अशी तडजोड लॉर्ड वॅव्हेल यांनी स्वतःच्या पूर्वपरंपरेस जागून घडवून आणावी अशी त्यांनीं विनंति केली होती.

मग या तीन महिन्यांच्या काळांत असें काय घडलें कीं ज्यामुळें 'लोकमान्य'-कारांना कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या सुटकेची मागणी 'भीकगर्जना' वाटूं लागली व स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत सुटकेचा प्रश्नच काढूं नये असें आग्रहानें प्रतिपादन करण्याची जरूरी भासली?

'पुढारी तुरुंगांत असलेलेच बरे' असा जो आदेश जयप्रकाश नारायण यांनीं नुकताच दिला आहे त्याच्याशीं 'लोकमान्य'कारांच्या या नव्या भूमिकेचा कांहीं संबंध असेल का?

---

— ९ —

## प्रच्छन्न हिंदुसभावाल्यांपासून सावध रहा!

मुंबई कॉर्पोरेशनमध्यें मतदारसंघांच्या नव्या विभागणीवरील चर्चेच्या वेळीं ए. पी. साबावाला नांवाच्या सभासदानें कॉंग्रेसवर यथेच्छ तोंडसुख घेण्याची संधि साधून घेतली.

या गृहस्थाच्या मतें कॉंग्रेसनें एक अघोर पाप केलें. कोणतें पाप? कॉर्पोरेशनच्या निवडणुकींत सार्वत्रिक मताधिकार देण्याचा कायदा कॉंग्रेस मंत्रिमंडळाच्या अमदानींत पास झाला हेंच तें कॉंग्रेसचें 'कृष्णकृत्य.'

मुंबईतील घरमालकांपैकीं शेंकडा १३.७ पारशी आहेत, व सार्वत्रिक मताधिकार दिल्यास एवढ्या प्रमाणांत पारशी सभासद निवडून येणार नाहींत, अशीं साबावालांची तक्रार आहे.

पण मुंबईतील सगळे पारशी घरमालकच आहेत काय?

साबावालांना पारशी जनतेसाठीं अधिक प्रतिनिधित्व नको असून पारशी भांडवलदारांसाठींच अधिक जागा हव्या आहेत, ही गोष्ट त्यांच्याच भाषणावरून स्पष्ट झाली!

हे साबावाला कोण आहेत? कांहीं वर्षांपूर्वीं मुंबईमध्यें एक फॅसिस्ट पक्ष उजळ माथ्यानें वावरत होता व त्या पक्षातर्फे कामगारांची, कम्युनिस्टांची व सोविएतची नालस्ती करणारीं हजारों पत्रकें वांटण्यांत येत असत. ए. पी. साबावाला हे त्या पक्षाचे एक अध्वर्यु होते.

आज त्यांना इतक्या उघडपणें फॅसिझमचा प्रचार करणें सोइस्कर नसलें तरी त्यांची मूळ लोकशाहीविरोधी भूमिका कायम आहे यांत शंका नाहीं.

मात्र त्यांच्या व फॅसिस्ट पक्षाच्या डोक्यावरील भार हलका करण्यासाठीं सोविएत-निंदेचा व कम्युनिस्ट–निंदेचा सारा मक्ता अलिकडे 'चित्रा' पत्रानें स्वतःकडे घेऊन टाकला आहे.

*　　　　*　　　　*

मतदारसंघ विभागणीच्या बाबतीत म्युनिसिपल कमिशनरनें मांडलेल्या रिपोर्टामध्यें मुस्लिम बहुसंख्या असलेल्या चार मतदारसंघांना प्रत्येकीं एकेक जास्त जागा द्यावी असें सुचविलें होतें.

बाकीच्या तीस मतदारसंघांत मुस्लिम वस्ती अगदीं तुरळक असल्यामुळें तेथील मुसलमानांना स्वतःचा प्रतिनिधि कॉर्पोरेशनमध्यें पाठविणें मुळींच शक्य होणार नाही, व केन्द्रित मुस्लिम वस्ती असलेल्या वॉर्डातून लोकसंख्येच्या प्रमाणानुसारच प्रतिनिधि निवडल्यास मुंबईतील एकंदर मुस्लिम लोकसंख्येच्या मानानें मुस्लिम जनतेला योग्य प्रमाणापेक्षां कमी प्रतिनिधित्व मिळेल हें उघड आहे. या कारणास्तव मुस्लिम नागरिकांना साधा न्याय देण्याच्या दृष्टीनें म्युनिसिपल कमिशनरची सूचना अगदीं योग्य होती.

तथापि दुर्दैवानें कॉर्पोरेशनमधील कॉंग्रेस-पक्षानें ही सूचना फेटाळून लावली.

मुस्लिम जनतेचा विश्वास संपादन करण्याच्या व तिला न्याय देण्याच्या कॉंग्रेसच्या उज्ज्वल परंपरेशीं मुंबई म्युनिसिपल कॉंग्रेस पक्षाचें हें धोरण कितपत सुसंगत होतें? कॉंग्रेस म्हणजे हिंदुमहासभा नव्हे, याचा मुंबईतील कॉंग्रेस-पक्षीय कॉर्पोरेटरांना विसर पडावा ही आश्चर्याची गोष्ट नव्हे का?

या बाबतींत मुंबईच्या 'क्रॉनिकल' पत्रानें कॉंग्रेसभक्तांना जो स्पष्टोक्तीचा इशारा दिला आहे तो विचार करण्यासारखा आहे.

कॉर्पोरेशनमध्यें चालू असलेली ही चर्चा कॉर्पोरेशनच्या उच्च परंपरेच्या विरुद्ध आहे असें सांगून 'क्रॉनिकल' म्हणतो:—

"सध्यांच्या अनिष्ट परिस्थितीबद्दल कॉर्पोरेशनमधील सारेच पक्ष जवाबदार आहेत. ...पारशी व मुस्लिम समाजांकडून विभक्त मतदारसंघाची मागणी मांडली जाण्याचा प्रसंगच येऊं देऊं नये, हें शहरांतील सर्व समाजांच्या हिताचा राखणदार या नात्यानें कॉंग्रेसपक्षाचें कर्तव्य होतें... मुस्लिम बहुसंख्या असलेल्या कांहीं वॉर्डांत चार जास्त जागा देण्याची ही योजना म्युनिसिपल कमिशनरनें मांडली होती ती फेटाळून लावण्यास कॉंग्रेस पक्षानें लॉ-कमिटीला संमति दिली हें योग्य झालें नाहीं."

मुस्लिम जनतेला न्याय देऊन तिचा विश्वास संपादन करण्याचा व स्थानिक क्षेत्रांत कॉंग्रेस-लीग समेट घडवून आणण्याचा सरळ मार्ग आज कॉर्पोरेशनपुढें आहे, व तो कॉ. मिरजकर यांनीं मांडलेल्या उपसूचनेंत नमूद करण्यांत आला आहे. ज्या चार मतदारसंघांत मुस्लिम लोकवस्ती केंद्रित झाली आहे तेथें प्रत्येकीं एकेक जागा जास्त देण्यांत यावी, असें या उपसूचनेचें सार आहे.

* * *

'क्रॉनिकल' सारख्या राष्ट्रीय वृत्तपत्राप्रमाणें खुद्द कित्येक कॉंग्रेसपक्षीय कॉर्पोरेटरांनाही हा मार्ग व्यक्तिशः पसंत असल्याचें ऐकिवांत आहे. त्यांनीं आपल्या पक्षाकडून हा मार्ग अधिकृतरीत्या मान्य करून घेतल्यास तें कॉंग्रेसच्या तत्त्वाला व इभ्रतीला साजेसेंच होईल यांत काय संशय?

या प्रश्नावरील चर्चेंत भाषण करतांना डॉ. व्होरा यांनीं कॉंग्रेसपक्षातर्फे असें जाहीर केलें कीं विभक्त मतदारसंघाची उपसूचना मुस्लिम लीग जर मागें घेणार असेल तर या चार जास्त जागा देण्यास कॉंग्रेसपक्षाची हरकत येणार नाहीं.

न्याय करावयाचा तर तो सशर्त कां? तुम्ही अमुक चांगली गोष्ट जर करणार असाल तरच आम्हीसुद्धां चांगली गोष्ट करूं, नाहींतर अन्याय करण्याचा हट्ट चालूच ठेवूं, अशी भूमिका घेणें कॉंग्रेसच्या थोर राष्ट्रीय व जनतानिष्ठ भूमिकेला कसें शोभतें?

सार्वत्रिक मताधिकाराच्या पद्धतीमुळें जनतेचे खरेखुरे प्रतिनिधि कॉर्पोरेशनमध्यें निवडणूक येणें शक्य झालें आहे. मुस्लिम वस्तीच्या मुख्य वॉर्डांना चार जास्त जागा दिल्यानें त्या जागांवर जे प्रतिनिधि निवडून येतील, ते सामान्य जनतेचेच प्रतिनिधि असणार असें समजण्यास कांहींच हरकत नाहीं. म्हणून मुंबईच्या म्युनिसिपल कॉंग्रेस पक्षानें संकुचित जातीय वादावर आधारलेल्या 'किफायतशीर सौदा' पटविण्याच्या

वृत्तीचा त्याग करून मुस्लिम जनतेचा विश्वास संपादन करण्यास व कॉंग्रेस-लीग एकजुटीला मदत करण्यास धडाडीनें सरसावलें पाहिजे, अशीच कोणत्याहि देशभक्तांची अपेक्षा असणार.

* * *

मात्र स्वतःला कॉंग्रेसवादीच नव्हे तर समाजसत्तावादीसुद्धां म्हणविणाऱ्या कांहीं प्रच्छन्न 'हिंदुत्वनिष्ठां'कडून या बाबतींत कॉंग्रेसचे पाय मागें खेंचण्याचा जोरानें प्रयत्न करण्यांत येईल हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे.

उदाहरणार्थ 'लोकमान्य' पत्रानें 'मुसलमानांना जास्त जागा' देण्याच्या सूचनेला निकरानें विरोध केला आहे व 'अजून म्युनिसिपालिटीच्या ज्या पोटनिवडणुकीं व्हावयाच्या आहेत त्या दृष्टीनें' ही सूचना फेटाळून लावण्यास कॉंग्रेस पक्षाला बजावलें आहे.

'लोकमान्य'कारांच्या म्हणण्याचा आशय असा कीं मुस्लिम बहुसंख्येच्या वार्डांना चार जागा जास्त देण्याला कॉंग्रेसनें संमति दिल्यास दादरचे सगळे हिंदु मतदार बिथरतील व आपलीं मतें हिंदुमहासभेच्या उमेदवाराला देऊन टाकतील; त्यांचीं मतें जर कॉंग्रेसच्या उमेदवाराला पडावयाचीं असतील तर कॉंग्रेसला स्वतःच हिंदुमहासभेची भूमिका घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं!

अशी विचारसरणी मांडण्यांत कॉंग्रेसची व दादरच्या कॉंग्रेसनिष्ठ मतदारांची आपण नालस्ती करीत आहोंत, व हिंदुमहासभेच्या प्रचाराला हातभार लावीत आहोंत, याची 'लोकमान्य'कारांना जाणीव नसेल काय?

कॉर्पोरेशनच्या सभासदांचें प्रमाण ठरवितांना भांडवलदारांचे व घरमालकांचे प्रतिनिधि किती व सामान्य लोकांचे प्रतिनिधि किती याचा विचार करण्याचें स्वतःला 'समाजवादा'चे आचार्य समजणाऱ्या 'लोकमान्य'कारांना मुळींच सुचलें नाहीं. 'मुसलमानांचे' चार प्रतिनिधि जास्त होणार व 'हिंदूंचे' चार कमी होणार, या एका विचारानेंच त्यांचें धाबें दणाणून गेलें आहे!

* * *

कॉंग्रेसच्या नांवाखालीं हिंदुमहासभावादी विचारसरणीचा प्रचार करावयाचा तर कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या धोरणाचा विपर्यास करणें ओघानें आलेंच व 'लोकमान्य'-कारांनींहि तसेंच केलें आहे.

ते म्हणतात:—

"मुस्लिम लिगचें समाधान करण्याच्या प्रयत्नांत गांधीजींसारख्या उदार महात्म्यानें हात टेकले, जिनांचा नाद सोडला व तुरुंगाचा रस्ता धरला!"

गांधजिींनीं 'जिनांचा नाद' सोडला! म्हणजे ऑगस्ट १९४२ पर्यंत गांधीजींना जिनांचा नाद होता! 'लोकमान्य'कारांचा आत्मा अजूनहि गायकवाड वाड्यांतच घुटमळत आहे हें यावरून उघड होत नाहीं काय?

साम्राज्यवादी राज्यकर्त्यांनीं एकाएकीं दडपशाहीचें सत्र आरंभून गांधीजींना उचलून नेलें व तुरुंगांत डांबून ठेवलें, असाच सर्व लोकांचा समज आहे. पण 'लोकमान्य'कार म्हणतात कीं हा समज खोटा आहे. गांधीजींनीं आपण होऊन तुरुंगांचा रस्ता धरला व तो केवळ मुस्लिम लीगच्या दुराराध्यपणाचा वैताग आल्यामुळेंच!

ता. ८ ऑगस्ट १९४२ च्या ठरावानंतर चळवळ सुरू करण्यापूर्वी व्हाइसरॉय बरोबर व जिनांबरोबर पत्रव्यवहार करण्याचा गांधीजींचा मनोदय होता, व साम्राज्यशाहीच्या आकस्मिक प्रहरामुळेंच गांधीजींच्या या कॉंग्रेस-लीग ऐक्याच्या मार्गांत विघ्न आलें, ही गोष्ट प्रत्येकाला ठाऊक आहे. तुरुंगांतहि गेल्या मे महिन्यांत गांधीजींनीं जिनाशीं पत्रव्यवहार करण्याचा प्रयत्न केला, ही गोष्टहि प्रत्येकाच्या स्मरणांत आहे. मग ही वस्तुस्थिति लपवून ठेवण्याची 'लोकमान्य'कारांना जरूरी कां भासली?

कारण हेंच कीं त्यांना जनतेची एकजूट नको आहे, त्यांना पुढाऱ्यांची सुटका नको आहे, त्यांना बंगालच्या उपासमारीवर परिणामकारक उपाययोजना नको आहे, थोडक्यांत सांगायचें म्हणजे त्यांना कॉंग्रेस परंपरेची नव्हे तर मुसोलिनीछापाची 'राष्ट्रभक्ति' हवी आहे!

(३१-१०-४३)

---

## १०

# समाजसत्तावादाच्या शत्रूंचा गुरु

सोविएत राज्याच्या २६ व्या वाढदिवसाच्या प्रसंगीं कॉ. स्तालिनला '**ऑर्डर ऑफ सुवोरोव**' हा किताब देण्यांत आल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

**फील्डमार्शल अलेक्झांदर सुवोरोव** ( जन्म १७२९, मृत्यु १८०० ) हा झारशाहीच्या काळांतील एक प्रतिभाशाली व देशाभिमानी सेनानायक होता. सामान्य शिपायांशीं मिळून मिसळून वागणें, स्वतःच्या उदाहरणानें त्यांना स्फुरण देणें, त्यांच्या स्वयंप्रेरणेस ( इनिशिएटिव्ह ) चालना देणें व त्यांना लढाईत सुजाणपणानें भाग घेण्यास प्रवृत्त करणें, हे त्याचे मुख्य गुण होते.

" प्रत्येक शिपायाला ज्या लढाईत त्यानें भाग घ्यावयाचा तिचें स्वरूप पूर्णपणें कळलें असलें पाहिजे," असें तो नेहमी म्हणत असे.

" लढाईत शत्रूचा पराभव केल्यानंतर त्याचा पाठलाग करा, त्याला मुळींच उसंत देऊं नका, त्याचा चक्काचूर होईपर्यंत त्याचा पिच्छा पुरवा," अशी **सुवोरोव**ची सर्व सैनिकांना आज्ञा होती.

" निःशस्त्र जनतेशीं कधींहि लढूं नका, लूटमार करूं नका, सामान्य नागरिकांचा पाणउतारा करूं नका; शत्रूच्या हातीं जोंपर्यंत शस्त्र आहे तोंपर्यंतच त्याला शत्रु माना, " अशी त्याची सक्त ताकीद होती.

**झारिना कॅथेराइन धी ग्रेट** हिचें **सुवोरोवशीं** कधींहि पटत नसे, पण त्याच्या कर्तबगारीची तिला जाणीव होती व म्हणून तिनें त्याला कधींहि न दुखविण्याची काळजी घेतली. १७९६ सालीं झार **पॉल** गादीवर आल्यावर त्यानें लष्करांत जर्मन पद्धत सुरू केली. सामान्य शिपाई म्हणजे डोक्याशीं कांहीं संबंध नसलेलें एक यंत्र, युद्धाचें सारें यश सेनापतींच्या चातुर्यावरच अवलंबून असतें, हें जर्मन लष्करी पद्धतीचें मुख्य तत्त्व आहे. **सुवोरोवनें** या पद्धतीला विरोध केला. झारनें त्याला बडतर्फ केलें. पण फ्रान्सविरुद्ध युद्धाचा प्रसंग आल्यावर **सुवोरोव**ला परत बोलाविणें झारला भाग पडलें. इटलींतील मोहिमेंत **सुवोरोवनें** अप्रतिम सेनानेतृत्वाचें कौशल्य दाखविलें.

*  *  *

रशियन सामान्य सैनिकावर **सुवोरोवची** अढळ श्रद्धा होती. मातृभूमीसाठीं रशियन सैनिक अमर्याद स्वार्थत्याग करण्यास तयार असतो, त्याच्या चिकाटीला सीमा नसते, असें त्याचें ठाम मत होतें. त्याची स्वतःची राहणी सामान्य सैनिका-सारखीच होती. कोरड्या भाकरीवर दिवस काढायची वेळ आली तरी तो कधीं कुरकुर करीत नसे. हिवाळ्यांत प्रत्येक शिपायाला मेंढीच्या कातड्याचे कोट मिळेपर्यंत तो स्वतः सुती कपडेच वापरी.

सोविएत रशियांतील जनतेला व लाल सेनेला **सुवोरोव, कुतुझोव, नेव्स्की,** यांसारख्या झारशाहीच्या काळांतील थोर सेनापतींचा फारच अभिमान वाटतो. १९१७ च्या क्रांतीनें झारशाहीची व भांडवलशाहीची घाण नाहींशी केली, पण रशियाची उज्ज्वल परंपरा मात्र कायम ठेवली, एवढेंच नव्हे तर तिला आणखी उजाळा आणला.

"या युद्धांत आपल्या थोर पूर्वजांच्या—**अलेक्झांदर नेवस्की,... दिमित्री पोझार्स्की, अलेक्झांदर सुवोरोव, मिखेल कुतुझोव** यांच्या—पराक्रमी प्रतिमा सतत तुमच्या डोळयासमोर राहोत व तुम्हांला स्फुरण देवोत," असा कॉ. **स्तालिननें** लाल सेनेला संदेश दिला.

'ऑर्डर ऑफ **सुवोरोव**' ही नवी वीरश्रेणी अस्तित्वांत आणण्याचा ठराव झाल्यावर 'प्रावदा' पत्रानें लिहिलें:—

" थोर रशियन सेनापति **सुवोरोव** याचा सच्छिष्य म्हणविण्यास जो लायक ठरेल, युद्धांतील यश सैनिकांच्या संख्येवर नव्हे तर कौशल्यावर अवलंबून असतें हें **सुवोरोव** प्रमाणें जो सिद्ध करून देईल, रशियन सैनिकांसारख्या अप्रतिम लढवय्यांच्या साहाय्यानें शत्रूचा निःपात करणें शक्य व आवश्यक आहे असें जो दाखवून देईल, त्यालाच हा किताब देण्यांत येईल. अत्यंत मुष्किलीची व धोक्याची कामगिरी पार पाडणारांनाच हा किताब देण्यांत येणार आहे. **सुवोरोव** या प्रतिभाशाली सेनानायकाच्या साऱ्या जीवनाचा इत्यर्थ हाच, कीं जे अडचणीचे प्रसंग मुद्दाम शोधून काढतात व त्यांतून पार पाडण्याची कसोशी करतात अशांनाच विजयश्रीचा लाभ होतो. "

* * *

दादर येथें नुकतेंच भरलेलें सोविएत प्रदर्शन पाहण्यासाठीं आलेल्या एका गृहस्थानें परत जातांना तेथील एका स्वयंसेवकाला म्हटलें:—

" समाजसत्तावादी देश कसा असतो हें इथें उत्तम रीतीनें पाहायला मिळालें. आजच्या युद्धांत लाल फौज इतक्या यशस्वी रीतीनें कशामुळें लढत आहे हें आतां

समजून आलें. तुम्हीं आम्हांला या थोर देशांत थोडक्या श्रमांत नेऊन सोडलें व आपला देश कसा व्हायला पाहिजे याची जाणीव करून दिली."

त्याच्या बरोबर आलेला दुसरा एक गृहस्थ म्हणाला:—

"माझेंहि असेंच मत आहे. मात्र एक गोष्ट मला विचित्र वाटली. इथें ट्रॉट्स्कीचें चित्र कुठेंच दिसलें नाहीं याचें कारण काय? स्तालिनची कामगिरी थोर आहे यांत शंका नाहीं, पण केवळ त्याचें व ट्रॉट्स्कीचें न पटल्यामुळें ट्रॉट्स्कीची कामगिरी विसरणें योग्य कसें होईल?"

स्वयंसेवकानें उलट विचारलें, "या प्रदर्शनांत तुम्हांला दिसलेल्या कोणत्या गोष्टीबद्दल ट्रॉट्स्कीला श्रेय द्यावें असें तुम्हांला वाटतें?"

तो गृहस्थ क्षणभर थांबलेला पाहून स्वयंसेवकानें पुढें विचारलें, "सोविएत रशियांत **समाजसत्तावादाची रचना** करण्याबद्दल ट्रॉटस्कीचें काय मत होतें हें तुम्हांला ठाऊक असेलच."

"हो, सर्व जगभर क्रांति झाल्याशिवाय सोविएत रशियांत समाजसत्तावादाची रचना करणें शक्य नाहीं असें ट्रॉट्स्कीचें म्हणणें होतें, व मुख्यतः या मुद्यावरच त्याचें स्तालिनशीं भांडण झालें."

"पण सोविएत रशिया हा समाजसत्तावादी देश बनला आहे हीच गोष्ट तुम्ही या प्रदर्शनांत पाहिली ना? समाजसत्तावादाच्या विजयामुळेंच सोविएत रशिया आज इतका प्रबळ देश झाला आहे हें तुम्हांला मान्य आहे ना? ट्रॉट्स्कीचें धोरण सोविएत रशियानें जर स्वीकारलें असतें तर आज रशिया कुठें असता? हिटलरी फॅसिस्टांनीं त्याचा केव्हांच नायनाट करून टाकला असता. आणि मग जागतिक क्रांतीऐवजीं जगभर फॅसिस्ट सत्ताच दिली असती. ट्रॉट्स्कीला नेमकें हेंच पाहिजे होतें."

यावेळीं पहिला गृहस्थ म्हणाला, "इथें जर ट्रॉट्स्कीचें चित्र लावलें असतें तर आज रशियांत जें प्रत्यक्ष घडून आलें आहे त्याला अशक्य गोष्ट म्हणणारा व त्यांत विघ्नें आणणारा व त्यासाठीं फॅसिस्टांचा हस्तक बनलेला इसम असें त्या चित्राखालीं वर्णन द्यावें लागलें असतें."

"ट्रॉट्स्की हा जुना बोल्शेविक होता ही गोष्ट तरी खरी ना?" दुसऱ्या गृहस्थानें आक्षेप घेतला.

"जुना म्हणजे केव्हांचा? नोव्हेंबर १९१७ मध्यें क्रांति झाली. त्याच्या तीनच महिने अगोदर-ऑगस्ट १९१७ मध्यें-ट्रॉट्स्की बोल्शेविक पार्टीचा सभासद झाला. त्यापूर्वी तो मेन्शेविक होता."—स्वयंसेवकानें उत्तर दिलें.

* * *

सोविएतची निंदा करणाऱ्या भाडोत्री लेखकाच्या अकलेचा मासला म्हणून 'चित्रा'च्या ता. ७ नोव्हेंबरच्या अंकांतील पुढील विधान पाहण्यासारखें आहे.

' कम्युनिस्ट रशियांत सत्ता-संपादन ही जीवित-सार्थकतेची कमाल मर्यादा आहे ' अशी थाप ठोकून देऊन व तत्त्वज्ञ संताचें सोंग आणून 'चित्रा'चा लेखक म्हणतोः—

"जनता-जनार्दनाची सेवा, जनतेच्या हितासाठीं त्याग, हा जीवित-सार्थकतेचा धोपट मार्ग आहे हें मान्य केलें पाहिजे. स्वोत्कर्षासाठीं झटणाऱ्या आणि तो संपादन करणाऱ्या माणसाला कर्तबगार म्हणून त्याचा गौरव करण्यापेक्षां जनहितासाठीं त्याग करणाऱ्या माणसाचा सन्मान झाला पाहिजे. जीवनविषयक मूल्यें बदलल्याशिवाय हें होणार नाहीं. "

कम्युनिस्ट रशियांत झोयासारख्या बालिकांचा, स्तखानोवसारख्या कामगारांचा, लीसेन्कोसारख्या शास्त्रज्ञांचा, सोविएत सरकारकडून कमालीचा गौरव करण्यांत येतो, ही गोष्ट या लेखकालाहि ठाऊक असेलच.

पण त्याच्या मतें **झोया**, **स्तखानोव**, **लीसेन्को**, हे सारे सत्ता-संपादनासाठीं हपापलेले ' लाल गुंड 'च समजले पाहिजेत !

मग ' जनहितासाठीं त्याग करणारे ' लोक कोणते ? ' चित्रा 'चा ' अग्निशर्मा ' भटजी लगेच उत्तर देईलः—' पेट्रिआर्क टिखॉन ! ' आणि ' धनुर्धारी ' त्याला पुस्ती जोडीलः—' **लिऑं ट्रॉट्स्की** ! '

आणि त्यानंतर ' जनता-जनार्दन ' म्हणजे लोटवाला शेट, आणि ' जीवित-सार्थकतेचा धोपट मार्ग ' म्हणजे या शेटजीकडून वेळोवेळीं मिळणाऱ्या आज्ञेप्रमाणें भुंकत राहणें, हें ओघानें आलेंच !

( १४-११-४३ )

---

— ११ —

# कॉंग्रेस-कम्युनिस्ट सहकार्याचे सुपरिणाम

गेल्या मंगळवारीं झालेल्या मुंबई कॉर्पोरेशनच्या पोट निवडणुकींत कॉंग्रेसचे सर्व उमेदवार अपेक्षेप्रमाणें यशस्वी झाले आहेत. हे सर्व उमेदवार आज तुरुंगांत आहेत. त्यांच्या बंदिवासामुळें कॉर्पोरेशनमधील त्यांच्या जागा रिकाम्या होऊन पोट-निवडणुकीचा प्रसंग उद्भवला होता. सरकारच्या दडपशाहीचा निषेध करण्यासाठीं, व त्याच वेळीं राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या सुटकेच्या मागणीपाठीमागें केवढें प्रचंड लोकमत आहे हें जाहीर करण्यासाठीं, या उमेदवारांनाच निवडून देणें आवश्यक होतें.

सध्यांचा पेंचप्रसंग सुटला पाहिजे व आजच्या निर्वाणीच्या परिस्थितींत देशाचें नेतृत्व करण्यासाठीं राष्ट्रीय पुढारी बाहेर आले पाहिजेत, अशी बहुसंख्य जनतेला तळमळ लागून राहिली आहे. गेल्या मंगळवारच्या पोटनिवणुकींत कॉंसेस उमेदवारांना पडलेल्या प्रत्येक मताचा अर्थ ह्राच होय.

याच कारणास्तव कम्युनिस्ट पार्टीनें कॉंग्रेसच्या उमेदवारांना बिनशर्त व संपूर्ण पाठिंबा देण्याचें प्रथम पासून स्पष्टपणें जाहीर केलें, व कॉंग्रेसला यश मिळवून देण्यासाठीं आपली सारी शक्ति खर्ची घातली.

*　　　*　　　*

गेल्या वर्षाच्या घटनांमुळें नैराश्यानें पछाडलेल्या व 'कांहींहि करणें शक्य नाहीं' असे असहाय सूर काढणाऱ्या देशभक्तांना मंगळवारच्या पोटनिवडणुकीच्या प्रसंगीं निरनिराळया मतदान-केंद्रावर आढळलेल्या दृश्यानें 'जनतेवर विश्वास ठेवा, जनतेच्या दुर्दम्य उत्साहाचा देशहितासाठीं उपयोग करून घ्या' या अमूल्य धड्याचें प्रात्यक्षिक दाखविलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

दादर शिवाजी पार्कवरील देखावा तर कोणत्याहि देशभक्ताला स्फुरण देणाराच होता. भोळ्याभावड्या बायाबापड्यांना भुलविण्याच्या आशेनें एरव्हीं आपल्या नाटकी 'लष्करी' बाण्याचा दिमाख दाखविणाऱ्या दिखाऊ 'हिंदुत्वनिष्ठ' वीरांचे बाजारबुणगें देशप्रेमी जनतेच्या प्रचंड एकजुटीच्या महासागरांत कुठल्या कुठें लुप्त होऊन गेलें होतें. योग्य घोषणांच्या आधारें प्रचार केल्यास जनतेंतल्या किती निरनिराळ्या

विभागांचें देशप्रेम जागृत करतां येतें याचा येथें कॉंग्रेसभक्तांना अनुभव आला. ख्रिश्चन पाद्र्यानें आपल्या 'मेंढरां'ना हिंदुमहासभेच्या उमेदवाराला मत देण्याचा मोक्षमंत्र देऊन ठेवला होता, व त्याविरुद्ध आपला कांहीं इलाज चालण्याची कॉंग्रेस पुढाऱ्यांना फारशी आशा वाटत नव्हती. पण माटुंग्याच्या रेल्वे वर्कशॉपमधील ख्रिश्चन कामगार कम्युनिस्ट पार्टीच्या संदेशास अनुसरून कॉंग्रेस उमेदवाराला मत देण्यासाठीं मुद्दाम वेळ काढून आले. कोहिनूर मिलमधील ख्रिस्ती कामगार मुली 'कॉं. सावंत कुठें आहेत' अशी चौकशी करीत आल्या व त्यांनीं आपलीं मतें कॉंग्रेसलाच दिलीं. कॉ. अमीर हैदर खान यांच्या व माहीमच्या 'यंग फ्रेन्डस लीग'च्या अविश्रांत खटपटीमुळें माहीम भागांतील कैक मुस्लिम मतदारांचीं मतेंहि कॉंग्रेसलाच मिळालीं. कम्युनिस्टांना 'राष्ट्रघातकी' म्हणणाऱ्या व त्यांच्यापासून दोन पावलें दूर राहण्याचा विद्यार्थ्यांना उपदेश करणाऱ्या कॉंग्रेस सोशालिस्टांनाहि या प्रसंगीं कम्युनिस्टांची टवाळी करण्याची दुर्बुद्धि सुचली नाहीं, व सुचली असती तर तेथेंच त्यांचें हंसें झालें असतें यांत शंका नाहीं.

* * *

तथापि ही कॉंग्रेस-कम्युनिस्ट एकजूट व तिच्या आधारें शक्य झालेली जनतेची प्रचंड एकजूट ज्यांना बघवली नाहीं असे कांहीं नतद्रष्ट लोक होतेच. या लोकांचें प्रतिनिधित्व मुंबईच्या वृत्तपत्रांच्या सृष्टींत आपली मक्तेदारी स्थापन करण्याची महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या दोन शेठजींच्या पदरच्या भाडोत्री लेखकांनीं पत्करलें होतें.

गेल्या महिन्यांत गिरगांव व कुंभारवाडा येथें झालेल्या पोट-निवडणुकींत कम्युनिस्टांनीं कॉंग्रेसचे उमेदवार निवडून येण्याच्या कामीं जें सहकार्य केलें होतें त्याची कुचेष्टा करण्यांत या धंदेवाईक निंदकानीं कित्येक कॉलम खर्ची घातलें. उद्देश हा कीं उरलेल्या पोट-निवडणुकींत कॉंग्रेसनें कम्युनिस्टांचें सहकार्य घेऊं नये. त्यामुळें कॉंग्रेस उमेदवार निवडून येण्यांत जर अडथळा आला तर त्याची या लोकांना कांहींच पर्वा नव्हती. कॉंग्रेसतर्फे अधिकृत रीत्या प्रसिद्ध केलेल्या निवेदनांत श्री. ईश्वरभाई पटेल यांनीं कम्युनिस्टांना त्यांच्या कळकळीच्या व परिणामकारक सहकार्याबद्दल धन्यवाद दिले होते. पण सरोजिनी नायडू व जवाहरलाल नेहरू यांपेक्षांहि आपणालाच कॉंग्रेसच्या नांवें बोलण्याचा जास्त अधिकार आहे अशी ऐट मिरविणाऱ्या पोटभरू 'हंगामी राष्ट्रवाद्यां'नीं श्री. ईश्वरभाईंच्या निवेदनाला कां महत्त्व द्यावें?

तथापि त्यांचा घाणेरडा प्रचार व गेल्या वर्षांतले अनेक दूषित पूर्वग्रह यांवर मात करून देशप्रेमाच्या समान भूमिकेवर या पोट-निवडणुकीच्या मोहिमेंत कॉंग्रेस-कम्युनिस्ट सहकार्य उत्तम रीतीनें घडून आलें. कम्युनिस्टांनीं आपल्या संघटना–

चातुर्यानें व अविश्रांत मेहनतीनें काँग्रेस कार्यकर्त्यांचा स्नेहभाव संपादन केला, व काँग्रेस कार्यकर्त्यांनी कोणत्याहि प्रकारच्या संकुचितपणाला बळी न पडतां कम्युनिस्टांशीं मनोभावानें सहकार्य केलें.

तरी सुद्धां ' जन्मभूमि ' या गुजराथी दैनिकानें आपल्या खास बातमीदाराचा रिपोर्ट म्हणून निवडणुकीच्या दोनच दिवस अगोदर असें प्रसिद्ध केलें कीं चिंचपोकळी विभागांत कॉंग्रेस-उमेदवार अशोक मेहता यांच्यासाठीं खटपट करण्याऐवजीं काँग्रेस-विरोधी उमेदवार जाधव यांनाच कम्युनिस्ट मदत करीत आहेत !

ही बातमी धादांत खोटी होती. खुद्द 'जन्मभूमी'च्या बातमीदाराला सुद्धां ती खोटी असल्याचें माहीत होतें यांत मुळींच शंका नाहीं. तथापि कम्युनिस्ट पार्टीनें या बातमीचा ताबडतोब इन्कार केला असतांहि 'जन्मभूमी'नें तो सोमवारच्या अंकांत प्रसिद्ध केला नाहीं, व मंगळवारीं संध्याकाळीं प्रसिद्ध झालेल्या अंकांतच–म्हणजे पाऊण हिस्सा मतदान संपल्यानंतर–तो प्रसिद्ध केला, व तो सुद्धां अर्धवट स्वरूपांत !

' जन्मभूमी 'च्या मालकाच्याच मराठी ' लोकमान्य ' पत्रानें तर कम्युनिस्ट पार्टीचा हा इन्कार शेवटपर्यंत प्रसिद्ध केला नाहीं. 'लोकमान्या'चे संपादक श्री. पां. वा. गाडगीळ यांनीं स्वतः पार्टीच्या प्रतिनिधीला सांगितलें कीं खोटया बातमीचा इन्कार करणारें पार्टीचें निवेदन प्रसिद्ध केल्यानें कॉंग्रेसला कांहीं मदत होणार नाहीं !

तथापि आपल्या घाणेरड्या कम्युनिस्टद्वेषाला नकली काँग्रेस-प्रेमाचा मुलामा देऊं पाहणाऱ्या या लोकांना अस्सल कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं चांगलीच थप्पड दिली. जी वॉर्ड काँग्रेस म्युनिसिपल निवडणुक कमिटीचे अध्यक्ष श्री. नागवेकर, व काँग्रेस कॉर्पोरेटर श्री. पी. के. सावंत यांनीं ताबडतोब जाहीर स्टेटमेंट काढून 'जन्मभूमी'-च्या खोडसाळ बातमीचा स्पष्टपणें इन्कार केला व कम्युनिस्टांना त्यांच्या सहकार्या-बद्दल धन्यवाद दिले.

* * *

या स्टेटमेंटमध्यें ते म्हणतातः—

" सर्व कॉंग्रेस उमेदवार यशस्वी होण्यासाठीं कम्युनिस्टांनीं प्रत्यक्ष कार्य केलें आहे व अजूनहि ते कार्य करीत आहेत, असें असतांहि ' जन्मभूमी 'सारख्या पत्रांत असली बातमी प्रसिद्ध व्हावी ही दुर्दैवाची गोष्ट होय. असल्या खोटया बातमीमुळें कॉंग्रेस उमेदवारांना धोका पोंचतोच, पण शिवाय कॉंग्रेसच्या पाठीशीं असलेल्या जनतेच्या एकजुटीलाहि धक्का बसतो, असें आमचें ठाम मत आहे. असली बातमी कॉंग्रेसच्या हितचिंतकांकडून पसरवली जाणें शक्य नाहीं अशीं आमची खात्री आहे, कारण या सर्व पोटनिवडणुकींत कम्युनिस्ट पार्टीनें बजावलेल्या मूल्यवान कामगिरीची

आम्हांला खडान खडा माहिती आहे. कम्युनिस्टांनीं केलेल्या सहकार्याच्या बाबतींत असल्या बातमीनें मोठा अन्याय झाला आहे. ''

'लोकमान्य' पत्राला श्री. नागवेकर व सावंत यांचें हें स्टेटमेंट तरी निवडणुकीच्या सकाळीं प्रसिद्ध करण्याची सुबुद्धि झाली ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होय. तथापि ती देतांना कम्युनिस्ट पार्टी विषयींचा गौरवपूर्ण उल्लेख कापण्याची 'गाडगीळी' हातचलाखी दाखविण्याचा मोह 'लोकमान्य' कारांना कांहीं आवरतां आला नाहीं ! तसेंच दुसऱ्या दिवशीं निवडणुकीचा रिपोर्ट देतांना 'लोकमान्य' पत्रानें कम्युनिस्टांच्या कार्याचा उल्लेख अजिबात टाळला. (याच्या उलट 'नवा काळ' चा रिपोर्ट पहा.) कम्युनिस्टांना कुणी विचारीत नाहीं हा स्वतःचा अजब शोध सिद्ध करण्यासाठीं लोकमान्यकार व त्यांचे जातभाई जे पोरकट उपाय योजित असतात त्याचेंच हें एक उदाहरण होय.

(२१-११-४३)

---

## — १२ —

# 'चित्रा'च्या 'राष्ट्रवादा'वर नवा प्रकाश

'वंदे मातरम्' असे शब्द उच्चारतांना हिंदी देशभक्तांना केवढा आनंद होतो! 'ऐ मातृभूमि तेरे चरणोमे शिर नमावूं' असें म्हणतांना त्याचें हृदय कसें उचंबळून येतें ! 'हिंदुस्थान हमारा' अशी घोषणा पुकारतांना त्यांना केवढा अभिमान वाटतो !

या घोषणेंत कांहीं चूक आहे अशी कल्पना सुद्धां हिंदुस्थानांतील कोणत्याहि राष्ट्रवादी विद्यार्थ्याला कधीं शिवली असेल का ?

पण या विद्यार्थ्यांना एका नवीन प्रकारच्या 'राष्ट्रवादा' ची शिकवण देण्यासाठीं अलीकडे पुढें सरसावलेल्या कांहीं शहाण्यांचें मत मात्र निराळें आहे. ते म्हणतातः—

"हिंदुस्थान ही आपली मातृभूमि आहे असें गृहीत धरून कांहीं बेत आंखणें हें देखील मूर्खपणाचें आहे...... 'हा माझा देश आहे, त्याच्या उन्नतीसाठीं मी अमुक करणार आहे' अशी आत्मवंचना करणारी कल्पना आमच्या राजकारणी पुढाऱ्यांनीं सोडून द्यायला पाहिजे." (चित्रा, ता. २१-११-४३)

हे उद्गार काढणारा गृहस्थ 'चित्रा' पत्रांतील 'पडद्यामागें' हें साप्ताहिक सदर लिहिणाऱ्या कलमबहाद्दराचा एक 'सुविद्य मित्र' असल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे, व त्याच्या वरील मतावर 'चित्रा'नें स्वतःच्या संमतीचें शिक्का मोर्तब केलें आहे.

तो 'चित्रा' चा मित्र आहे हें तर उघडच दिसतें ! पण प्रश्न उत्पन्न होतो तो हा, कीं या गृहस्थाला ही नवी 'विद्या' कुणी शिकविली ?

राममोहन राय, टागोर, दादाभाई नौरोजी, टिळक, गांधीजी, जवाहरलाल नेहरू, यांच्यांपैकीं कुणीहि शिकविली नाहीं हें उघड आहे. या सर्वांनीं हिंदुस्थान ही आपली मातृभूमि आहे असें 'गृहीत' धरण्याचा 'मूर्खपणा' केला व हिंदुस्थानच्या उन्नतीसाठीं धडपड करून 'आत्मवंचना' केली, असा त्यांच्यावर या गृहस्थाचा आरोप आहे.

अर्थात् ही विद्या या नव्या महर्षीला आकाशवाणींतूनच मिळाली असली पाहिजे, असें अनुमान काढल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ही आकाशवाणी कोणती ? 'हिंदी लोकांनो, आपल्या मातृभूमीचें रक्षण करण्याचा मूर्खपणाचा बेत आखूं नका, हिंदुस्थानची उन्नति करण्याचें कार्य परमेश्वरानें आमच्यावर सोंपविलें आहे, तुमच्यावर नव्हे !' असें हरहमेशा किंचाळणाऱ्या जपानी रेडियोचीच, यांत काय संशय ?

आईला आई म्हणण्यास तयार नसलेल्या या उफराट्या काळजाच्या पंचमदळयाला स्वतःचा मित्र म्हणविण्यांत 'चित्रा'च्या भाडोत्री लेखकांना धन्यता वाटावी यांत नवल नाहीं.

* * *

'चित्रा'चे दुसरे एक तसलेच 'सुविद्य' मित्र श्री. पां. वा. गाडगीळ यांचा एक मासलेवाईक लेख त्या पत्राच्या 'बंगाल' अंकांत प्रसिद्ध झाला आहे.

बंगालच्या दुष्काळाबद्दल निरनिराळे लोक निरनिराळीं कारणें देतात व निरनिराळ्या व्यक्तींना, गटांना व धोरणांना जबाबदार धरतात. पण श्री. गाडगीळांची विचारसरणी या सर्वांहून भिन्न आहे.

बंगालची आजची परिस्थिति पाहून श्री. गाडगीळ सर्वांत जास्त कुणावर रागावले आहेत ?

बंगालच्या जनतेवर !

'मूढ, मंद, भित्रा, निस्त्राण', असल्या शेलक्या शिव्या बंगालच्या शेतकरी वर्गाला श्री. गाडगीळांनीं या लेखांत दिल्या आहेत.

"बंगालच्या जनतेच्या ठिकाणीं संस्कृति किती आहे अथवा निदान साधी माणुसकी किती आहे याचा मी विचार करतो आहे", असें श्री. गाडगीळ या लेखाच्या प्रस्तावनेंत म्हणतात. बंगालच्या जनतेवरील आजच्या भयंकर प्रसंगांत तिला वरील शिव्या हांसडून आपण कोणत्या प्रकारची 'संस्कृति' व 'माणुसकी' व्यक्त करीत आहोंत, याचा विचार मात्र त्यांना सुचला नाहीं!

आणि बंगालची जनता अशी 'भित्री' व 'निस्त्राण' कां झाली? कारण तिचा धंदा शेतीचा आहे! श्री. गाडगीळ विद्वत्तेचा आव आणून लिहितातः—

"इतिहासाचा साधारण नेम असा दिसतो कीं शेतीच्या सुपीक क्षेत्रांत राहणारे आणि शिकार किंवा युद्ध करण्याची ज्यांच्या जीवनांस फारशी गरज पडलेली नाहीं असे लोक दुबळे, मूढ व संघटनाकर्तृत्व नसलेले असे आढळून येतात."

मार्क्सवादापासून श्री. गाडगीळ कोट्यवधि मैल दूर आहेत, यांत काय संशय?

याच लेखांत त्यांनीं आपलें इतिहासाचें अगाध ज्ञान पुढील विधानांत प्रदर्शित केलें आहेः—

"मोंगलांनीं बंगालवरचे निझामी अधिकार ब्रिटिशांना दिले व दिवाणी अधिकार मोंगल अधिकाऱ्यांकडे ठेवले."

त्यांच्या अभ्यासमंडळांतील विद्यार्थ्यांनीं थोडेंसें सावध राहावें, नाहींतर इंग्रजी तिसरींत ते खात्रीनें नापास होतील!

* * *

मुंबई कॉर्पोरेशनच्या पोटनिवडणुकींत कम्युनिस्टांनीं जिवापाड मेहनत घेतली, काँग्रेस पुढाऱ्यांनीं त्यांचें सहकार्य मनःपूर्वक स्वीकारलें, व कम्युनिस्टांच्या परिणामकारक कार्याबद्दल त्यांनीं जाहीरपणें धन्यवाद दिले, हें पाहून श्री. गाडगीळ अतिशय चिडून गेले आहेत.

ता. २८ नोव्हेंबर रोजीं दादर येथें भरलेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या सभेंत श्री. गाडगीळांचा तोल अगदींच सुटला व कम्युनिस्टांविरुद्ध त्यांनीं भरमसाट विधानें केलीं. ज्यांच्या नखाचीहि सर श्री. गाडगीळांना येणार नाहीं असें कॉ. **अमीर हैदरखान** यांच्यासारखे क्रांतिकारक कम्युनिस्ट आपल्यासमोर बसले आहेत, याचीसुद्धां अमृतलाल शेठजींची इमानेंइतबारें नोकरी बजाविणाऱ्या या काँग्रेस सोशालिस्ट वाचिवीराला शुद्ध राहिली नाहीं.

सभेंत हजर असलेल्या काँग्रेस पुढाऱ्यांनाहि श्री. गाडगीळांच्या खोडसाळपणाचा किळस वाटला. पण त्यामुळें आणखी चिडून त्यांनीं 'लोकमान्य' पत्रांत एक

शिवराळ लेख प्रसिद्ध केला आहे. कम्युनिस्टांचें सहकार्य 'अप्रामाणिकपणाचें' होतें, असा या लेखांत त्यांनीं आरोप केला आहे. कारण काय ? एक कारण म्हणजे 'मुस्लिम लीगचें समाधान करा' असा काँग्रेसपुढें कम्युनिस्ट आक्रोश करीत असतात. दुसरें कारण म्हणजे "८ ऑगस्ट १९४२ चा ठराव हा काँग्रेसच्या धोरणाचा आज पायाच आहे. तो पाया उखडूं पाहणारे कम्युनिस्ट हे काँग्रेसचे शत्रु आहेत."

* * *

काँग्रेसला हिंदुमहासभा बनवूं पाहणाऱ्या व 'कॉम्रिकलॅला मुस्लिम लीगचे पक्षपाती' म्हणणाऱ्या 'लोकमान्य' कारांनीं वरील पहिलें कारण मांडावें हें स्वाभाविकच आहे. गायकवाडवाड्याच्या परंपरेची वारसदारी अजिबात सोडण्यास ते तयार नाहींत.

आणि वरील दुसरें कारण श्री. गाडगीळांनीं मांडूं नये, तर कुणी मांडावें ? "ऑगस्टचें बंड इतिहासजमा झालें" असें 'काँग्रेस व महायुद्ध' या पुस्तकांत टाहो फोडून सांगणारे; 'यापुढें वर्तमानपत्रें बंद करा' ही ता. ८ ऑगस्टला अखेरच्या भाषणांत गांधीजींनीं दिलेली आज्ञा तंतोतंत पाळणारे, ८ ऑगस्ट १९४२ पासून आजपर्यंत प्रत्येक क्षण 'करेंगे' आणि 'मरेंगें' या दोन्ही घोषणा निष्ठापूर्वक अंमलांत आणण्यांत घालविणारे, असे जे सुप्रसिद्ध काँग्रेसभक्त श्री. पां. वा. गाडगीळ त्यांच्याखेरीज दुसऱ्या कुणाला ८ ऑगस्टच्या ठरावाविषयीं व काँग्रेसविषयीं एवढी आत्मीयता वाटणार ?

ऑल इंडिया काँग्रेस कमिटींत ८ ऑगस्टच्या ठरावांतील मुख्य भागाला—राष्ट्ररक्षणाची तळमळ, फॅसिझमला विरोध, राष्ट्रीय सरकारची मागणी, स्वयंनिर्णयाला पाठिंबा, या मुद्यांना—कम्युनिस्टांनीं अत्यंत उत्साहानें पाठिंबा दिला होता, फक्त त्यांतील लढ्याच्या धमकीलाच (जी अनुभवाअन्ती निरुपयोगी व हानिकारक ठरली आहे) विरोध केला होता, या भूमिकेबद्दल स्वतः गांधीजींनीं कम्युनिस्टांना काँग्रेसचे शत्रु म्हणण्याऐवजीं त्यांच्या प्रामाणिकपणाची व धैर्याची जाहीर वाखाणणी केली होती,—या गोष्टी 'लोकमान्य'कारांना माहीत नाहींत असें नाहीं.

मग याबाबत त्यांनीं असा खोडसाळपणाचा विपर्यास कां करावा ?

कारण उघड आहे. जनतेची एकजूट घडवून आणणारी कोणतीहि गोष्ट त्यांना नको आहे. कम्युनिस्ट-काँग्रेस सहकार्यामुळें जनतेची हिंमत व ताकत वाढलेली पाहून सर्व प्रामाणिक देशभक्तांना आनंद वाटतो खरा, पण टोजोला आनंद कां वाटावा ? काँग्रेस सोशालिस्टांना आनंद कां वाटावा ? पां. वा. गाडगीळांना आनंद कां वाटावा ?

(१२-१२-४३)

— १३ —

# हिटलरचे स्तुतिपाठक लोटवाला शेटजी

मुंबईत पिठाची गिरण चालविणाऱ्या एका शेठजीला कांहीं वर्षापूर्वी समाजसत्तावादी म्हणून मिरवण्याची लहर आली. त्यासाठीं त्यानें वर्तमानपत्रांचा पसारा थाटण्यास सुरवात केली. गांधीजींना चारदोन शिव्या देणें हेंच त्याला समाजसत्तावादी प्रचाराचें मुख्य कार्य वाटत होतें. पण लौकरच त्याला दिसून आलें कीं समाजसत्तावाद ही कांहीं श्रीमंतांच्या चैनीची गोष्ट नव्हे. मीरतचा खटला सुरू झाला. शूर शेठजी बोटींत बसले आणि थेट विलायतेस जाऊन उतरले! आणि सोइस्कर मुदतीनंतर परत आले ते स्तालिन, सोविएत रशिया व प्रत्येक देशांतील कम्युनिस्ट, यांची शक्य तेवढी नालस्ती करण्याचें कंकण हातांत बांधूनच!

तत्त्वहीन भाडोत्री लेखकांचा संच जमा करण्यास त्यांना फारसा वेळ लागला नाहीं. शेठजींच्या आज्ञेप्रमाणें नवीं नवीं वर्तमानपत्रें निघूं लागलीं. या पत्रांचें मुख्य कार्य समाजसत्तावादाचें विडंबन करणें, रशियाची बदनामी करणें, कम्युनिस्टांना शिव्या देणें, व जनतेच्या चळवळींत येन केन प्रकारेण फूट पाडणें हेंच होतें.

पण शेठजींचें समाधान झालें नाहीं. आपण हाताशीं धरलेल्या लेखकांच्या लिखाणांचा कांहींच परिणाम होत नाहीं असें त्यांना कळून आलें. कम्युनिस्ट पार्टीचें सामर्थ्य वाढत आहे, सोविएत रशियाविषयीं हिंदी जनतेला जास्त जास्त आपुलकी व आदर वाटत आहे, ही गोष्ट त्यांना प्रत्यक्ष डोळ्यांनीं दिसून आली. शेवटीं त्यांनीं एक निर्वाणीचा निर्णय घेतला, व तो म्हणजे—स्वतःच लेख लिहावयाचे!

'चित्रा' पत्रांत आतां खुद्द लोटवाला शेठजींच्या सहीचे लेख प्रसिद्ध होऊं लागले आहेत!

श्री. रणछोडदास लोटवालांनीं स्वतःच्या हातानें दळलेल्या पिठाचे पुढील कांहीं नमुने पहा.

लोटवालाशेट म्हणतातः—

"जर्मनींत अशा प्रकारची भांडवलशाही नाहीं. तेथें एकवर्गीय राजसत्ता नसून बहुवर्गीय आहे. भावार्थ हाच कीं तेथील सत्ता भांडवलदारांच्या हातांत किंवा साम्यवादी पक्षाच्या हातांत नसून श्रमजीवी लोकांच्याच हातांत आहे."

" जर्मनींत तर खाजगी पेढ्यांना किंवा उद्योगधंदेवाल्यांना सरकारी परवाने घेऊन आंतरराष्ट्रीय व्यापार करतां येतो. म्हणूनच जर्मन आर्थिक पद्धतीस_ समाजवादी पद्धति म्हणण्यांत येतें."

सोविएत रशियांतील सत्ता 'कम्युनिस्ट ब्युरॉक्रसी'च्या हातीं आहे हा स्वतःचा आवडता सिद्धांत वाचकांच्या गळीं उतरविण्यासाठीं या शेठजींना आज हिटलरी जर्मनींत श्रमजीवी लोकांच्या हातीं सत्ता आहे अशी थाप ठोकल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें.

'भावार्थ हाच कीं' लोटवाला शेठ **हिटलर**शाहीचे स्तुतिपाठक बनले आहेत, सोविएतच्या पुढारीपणाखालीं **हिटलर**विरुद्ध चाललेल्या युद्धांत हिंदी जनतेला **हिटलर**विषयीं सहानुभूति वाटावी अशी त्यांची इच्छा आहे, स्वतःच्या पदरीं बाळगलेल्या पगारी टोळक्याकडून त्यांना हेंच कार्य साधून घ्यावयाचें आहे.

*        *        *

कावेबाजपणानें **हिटलर**शाहीचा पुरस्कार करण्यांत सर्वांत जास्त नैपुण्य मिळविलेला कंपू कोणता असेल तर तो **ट्रॉट्स्की**वाद्यांचा होय. अमेरिकेंतला **मॅक्स ईस्टमन** नांवाचा इसम या कंपूचा एक अध्वर्यु आहे. लोटवाला शेठजींना या इरसाल पंचमदळयाची प्रत्यक्ष मदत घेणें आज भाग पडलें आहे.

**मॅक्स ईस्टमन**च्या एका गलिच्छ लेखाचा अनुवाद मराठी वर्तमानपत्रांना [ जाहिरातींच्या दरानें ? ] वांटण्यांत आला असून 'चित्रा' प्रभृति तीन साप्ताहिकांचे रकानेच्या रकाने त्या लेखानें भरून काढण्यांत येत आहेत.

**मॅक्स ईस्टमननें** या लेखांत सोविएत रशियाविरुद्ध अमेरिकेंतल्या बड्या भांडवलदारांना धोक्याचा इषारा दिला आहे. " आज तुम्ही रशियाशीं दोस्ती करीत आहांत खरे, पण सावध राहा. जगत्क्रांति घडवून आणण्याचें कार्य **स्तालिननें** सोडून दिलेलें नाहीं. तुमच्या सहकार्यामुळें रशियाचा विजय होईल आणि मग **स्तालिन** आणि बोल्शेविझम तुमच्या बोकांडीं बसतील. तुमची सुंदर भांडवलदारी लोकशाही नष्ट होऊन अमेरिकेंत लाल बावटयाचें राज्य होईल. "—हाच **मॅक्स ईस्टमननें** अमेरिकन भांडवलदारांना उद्देशून लिहिलेल्या या लेखाचा सारांश आहे.

**ट्रॉट्स्की**वादाचे प्रचारक **स्तालिन**विरुद्ध मुख्यतः कोणता आरोप करीत असतात ? " **स्तालिननें** जगत्क्रांतीचें ध्येय सोडून दिलें व फक्त रशियाची सत्ता वाढविण्याकडे सारें लक्ष दिलें", हाच. पण हेच **ट्रॉटस्की**वादी आज अमेरिकन भांडवलदारांना '**स्तालिन**प्रणीत जगत्क्रांती' विरुद्ध इषारा देऊं लागले आहेत !

*        *        *

लोटवालाशेठजींचीं 'चित्रा' प्रभृति पत्रें अजूनसुद्धां प्रचार करीत असतात कीं स्तालिन व सोविएत सरकार दिवसेंदिवस आंग्ल-अमेरिकन भांडवलदारांच्या आहारीं जात आहेत. 'चित्रा'च्या ज्या अंकांत मॅक्स ईस्टमनचा लेख प्रसिद्ध झाला आहे त्याच अंकांत दुसरीकडे 'नारद'नें भरकटलेल्या मजकुरांत रशियन क्रांतीच्या 'मृत्यू' विषयीं नक्राश्रु ढाळण्यांत आले आहेत. एकाच वेळीं दोन परस्पर-विसंगत युक्तिवादांचा पुरस्कार करण्याची पाळी या तत्त्वहीन भाडोत्री लेखकांवर आज आली आहे, व त्यावरून आज त्यांची किती तारांबळ उडाली आहे हें स्पष्ट होतें.

सर्वच फॅसिस्ट प्रचारकांवर आज हा प्रसंग गुदरला आहे. सोईप्रमाणें ते आज दोन्ही युक्तिवाद मांडीत असतात.

—एकीकडे ते सांगतात कीं सोविएतच्या विजयांचा फायदा आंग्ल-अमेरिकन साम्राज्यशाहीलाच मिळणार आहे व म्हणून कोणत्याही देशांतल्या जनतेनें या विजयाबद्दल आनंद मानूं नये व हे विजय मिळविण्याला हातभार लावूं नये !

—दुसरीकडे ते सांगतात कीं सोविएतच्या विजयांमुळें जगभर बोल्शेविझम पसरणार आहे, स्तालिनची हुकुमशाही स्थापन होणार आहे, व म्हणून कुणींहि या विजयांची परिपूर्ति होण्याला मदत करूं नये !

पहिल्या युक्तिवादाचा उद्देश जनतेंत पराभववादाची वृत्ति पसरविणें हा आहे. दुसऱ्या युक्तिवादाचा उद्देश जनतेची नजरबंदी करून सर्व प्रतिगाम्यांची एकजूट घडवून आणणें हा आहे. दोन्हींचा उद्देश हिटलरशाहीच्या पराभवांत मोडता घालणें, जागतिक जनतेच्या एकजुटीला खो घालणें, हाच आहे.

हिटलरला हेंच हवें आहे. मॅक्स ईस्टमन प्रभृति ट्रॉट्स्कीवाद्यांचा उद्देश हिटलरला हातभार लावणें हाच आहे. हिटलरशाहीविरुद्ध जगांतील जनतेची व सरकारांची झालेली एकजूट त्यांच्या डोळ्यांत सलत आहे. या एकजुटींत विघ्न आणण्यासाठींच हिटलरच्या या दोस्तांची ही धडपड चालू आहे. आणि त्यासाठींच त्यांचे हिंदुस्थानांतील साथीदार त्यांच्या प्रचाराची जाहिरात करीत आहेत.

हे लोक हिंदुस्थानांतील व साऱ्या जगांतील जनतेचे दुष्मन आहेत यांत तिळमात्र शंका नाही.

*　　　　*　　　　*

याचेंच एक उदाहरण म्हणून 'भवितव्य' पत्राच्या ताज्या अंकांत प्रसिद्ध झालेला हॅन्सन बाल्डविन नांवाच्या अमेरिकन ट्रॉट्स्कीवाद्याचा चीनसंबंधींचा लेख पाहा.

हा गृहस्थ म्हणतो:—

“आपण ज्या अर्थानें देश हा शब्द वापरतों त्या अर्थानें चीन हा देश नाहीं, तर भौगोलिकदृष्ट्याच केवळ तो देश आहे.”

या म्हणण्याचा काय अर्थ होतो ?

चीन हा देश नाहीं, केवळ भौगौलिक प्रदेश आहे! अर्थात चीनचे लोक स्वदेशाचें रक्षण करीत नसून कुठल्यातरी जमिनीच्या तुकड्यासाठीं लढत आहेत! आणि जपानी फॅसिस्टांनीं चीन देशाला गुलाम बनविण्याचा नव्हे, तर भूगोलाचा एक टापू मिळविण्याचाच प्रयत्न चालविला आहे!

टोजोचा प्रचारक याहून दुसरें काय सांगूं शकेल ?

आणि असल्या घाणेरड्या प्रचाराला ‘भवितव्य’कार हौसेनें साथ देत आहेत!

विशेष गोष्ट अशी कीं चीन-जपान युद्ध सुरू झाल्यानंतर राष्ट्रसंघापुढें जेव्हां हा प्रश्न आला तेव्हां जपानच्या प्रतिनिधींनीं ‘चीन हा देशच नव्हे’ असा युक्तिवाद स्वतःच्या दरवडेखोरीचें समर्थन करण्यासाठीं मांडला होता. हॅन्सन बाल्डविननें व ‘भवितव्य’कारांनीं त्याचीच पोपटपंची केली आहे!

हाच लेखक पुढें म्हणतो :—

“चीनमधील जो जो विभाग जिंकण्याच्या योग्यतेचा आहे, तो तो एकूण एक विभाग आज जपाननें जिंकला आहे. जो चीनचा भाग आक्रमणापासून वांचला आहे, तो जिंकण्याच्या योग्यतेचा नाहीं म्हणून जपाननें जिंकला नाहीं.”

सांगण्याचा मतलब काय ? चीन–जपान युद्ध संपलें आहे, जपानचा विजय होऊन चुकला आहे. अमेरिकेनें जपानशीं चढाई चालू ठेवण्याचा नाद सोडून द्यावा,–हाच!

आणि असला लेख मुद्दाम प्रसिद्ध करण्यांत ‘भवितव्य’कारांचा कोणता उद्देश असणार ?

जपान फार प्रबळ आहे, त्याच्याशीं लढण्याची कुणाची ताकत नाहीं, हिंदी जनतेनें जपानविरुद्ध राष्ट्ररक्षणाचा प्रयत्न करूं नये, हिंदुस्थाननें आपली मान जपानी कसायांच्या हातीं सरळ देऊन टाकावी,–हा मुद्दा वाचकांच्या गळीं उतरविणें, हाच नाहींतर दुसरा कोणता ?

(१९–१२–४३)

# ११

# सोव्हिएत युनियनचें नवें राष्ट्रगीत

सोविएत रशियाविरुद्ध खोटानाटा प्रचार करणें हा ज्यांचा पोटाचा धंदा होऊन बसला आहे अशा भाडोत्री लेखकांचें खरें स्वरूप सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार लो यांनीं आपल्या 'रशियन स्केचबुक' मध्यें मार्मिक रीतीनें उघड करून दाखविलें आहे. त्यांनीं काढलेल्या व्यंगचित्रांत एका भांडवलदारी पत्राचा 'खास बातमीदार' सोविएत रशियामध्यें एका मुलाला लाकडी पिंपावर बसून काठीनें आवाज करतांना पाहतो आणि लगेच तो वहींत लिहून घेतोः– "आज सकाळीं मॉस्को शहरांत धूमधडाक्यांच्या गोळीबारासारखा मोठा आवाज ऐकूं आला. आणखी एक हजार लोकांचें शिरकाण करण्यांत आलें असावें असा अंदाज आहे!" हाच बातमीदार पुढें नदीकांठीं जातो व तेथें लोक कपडे काढून नदींत पोहण्यासाठीं उतरत असलेले दिसतात. बातमीदाराची 'खास तार' ताबडतोब तयार होतेः–"रशियांत कपड्यांची फारच टंचाई आहे. नग्नावस्थेंत असलेल्या लोकांच्या रांगाच्या रांगा नदीकांठीं लागून राहिल्या आहेत!" पुढें रस्त्यांत त्याला एक लहानसा खिळा सांपडतो. मग काय विचारतां? जगांतल्या साऱ्या भांडवलदारांना उत्साह देणारा 'खास रिपोर्ट' तयार झालाच—

"सोविएत रशियांतील प्रत्येक शहराच्या गल्लोगल्लीं मोडक्या यंत्रांच्या तुकड्यांचे ढीग पडले आहेत. पंचवार्षिक योजनेचा संपूर्ण बोजवारा उडाला यांत तिळमात्र शंका नाहीं!"

* * *

लोनें वर्णिलेला हा लेखक 'धनुर्धारी', 'चित्रा' वगैरे पत्रांच्या वाचकांना अगदीं ओळखीचा वाटेल. या पत्रांना स्वतःचा खास बातमीदार रशियांत पाठविण्यास परवडत नाहीं खरें, पण इंग्रजी वर्तमानपत्रांत व पुस्तकांत रशियाविरुद्ध जो जो प्रचार आढळेल तो तो नेमका हुडकून काढून त्यावर आपलें भाष्य देण्यांत रकानेच्या रकाने खर्ची घालावयाचे, हा या पत्रांचा धंदाच होऊन बसला आहे. त्रिराष्ट्र परिषद तेहरानला झाली एवढ्यावरून एका अमेरिकन लेखकाच्या बडबडीच्या आधारें या पत्रांनीं रशिया पूर्वेकडील प्रदेशांत दादागिरी माजविणार अशीं किंकाळी ठोकली!

कांहीं महिन्यांपूर्वी लंडनच्या एका पत्रानें रशियांत सह–शिक्षणाऐवजीं मुलांमुलींच्या वेगळ्या शाळा होणार अशी बातमी छापली व तिच्या आधारें मराठी वृत्तपत्रसृष्टींतील या सोविएत निंदकांनीं रशियानें नाझी–पद्धतीच्या प्रतिगामी समाजरचनेचें ध्येय स्वीकारलें आहे असा कंठरव करण्यास सुरवात केली.

सोविएत यूनियनचें अधिकृत राष्ट्रगीत म्हणून एक नवें गाणें तयार करण्यांत आलें आहे व तें येत्या मार्चपासून म्हटलें जाणार आहे, या मॉस्कोहून आलेल्या बातमीलासुद्धां या लोकांनीं असेंच *विपर्यस्त स्वरूप दिल्यास नवल कोठलें ?*

*                    *                    *

सोविएत यूनियनच्या या नव्या राष्ट्रगीताचा इंग्रजी अनुवाद वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाला आहे. त्याचा मराठी अर्थ पुढीलप्रमाणें आहे:—

“ थोर रशियानें स्वतंत्र लोकराज्यांचा अमर व शाश्वत संघ स्थापन केला आहे. निरनिराळ्या राष्ट्रांच्या जनतेनें स्वेच्छेनें निर्माण केलेला हा अभेद्य व बलिष्ठ सोविएत राष्ट्रसंघ चिरायु होवो !

“ निरनिराळ्या राष्ट्रांच्या जनतेच्या सुखी जीवनाचा भक्कम बालेकिल्ला असलेल्या आमच्या स्वतंत्र पितृभूमीचा जयजयकार असो !

“ सोविएत झेंडा हा निरनिराळ्या राष्ट्रांच्या जनतेचा झेंडा आहे. या झेंड्याखालीं आम्हीं एकामागून एक विजय मिळवत जाऊं !

“ स्वातंत्र्याच्या सूर्यानें आमच्या दिशा उजळल्या. थोर लेनिननें आम्हांला प्रकाश दाखविला. स्तालिननें आम्हांला लोकनिष्ठेचें शिक्षण दिलें व श्रम करण्याचें आणि महान कामगिरी पार पाडण्याचें स्फुरण दिलें.

“ समरांगणावरील लढायांत आम्ही आपल्या सेनेची घडण केली. दगलबाज स्वारीवाल्यांना आम्हीं खास हांकून लावणार ! अनेक पिढ्यांचें भवितव्य आम्ही रणभूमीवर निश्चित करीत आहोंत. आम्हीं आपल्या देशाला यशःश्री मिळवून देणार ! ”

*                    *                    *

हें नवें गाणें वाचून ज्याच्या हृदयाला कांटे बोचूं लागतील असा कोणताहि करंटा प्राणी हिंदुस्थानांत असूं शकेल काय ? पण ट्रॉट्स्कीवाद्यांच्या प्रचारानें भुरळ पडलेल्या व राष्ट्रीय घडामोडींप्रमाणेंच आंतरराष्ट्रीय घटनांच्या बाबतींतहि नैराश्यवादाचें साप्ताहिक रडगाणें गाणाऱ्या एका ‘ आंतरराष्ट्रीय तज्ज्ञा ’नें सोविएतच्या या नव्या राष्ट्रगीताची बातमी वाचून आपल्याला ‘ धक्का बसला ’ असें प्रसिद्ध केलें आहे ! वास्तविक धक्का बसावयाला हवा होता लोकशाहीच्या विरोधकांना ! सोविएत राष्ट्रकुटुंबाचे तुकडे पाडूं इच्छिणाऱ्या साम्राज्यवादी गुंडांना ! सोविएत जनतेच्या

पराक्रमामुळें ज्यांच्या आशांचें थडगें बनलें आहे अशा सर्व जनता-शत्रूंना! सोवि-एत भूमींतून जीव मुठींत घेऊन पळ काढणाऱ्या नात्सी दरवडेखोरांना! सोविएतचें नवें राष्ट्रगीत या लोकांच्या कानांत झोंबावें हें साहजिकच आहे, पण आमच्या हिंदी स्वातंत्र्यभक्तांना हें गाणें ऐकून धक्का कां बसावा?

ट्रॉट्स्कीवादाचें मराठी मुखपत्र ' धनुर्धारी ' यानें तर हें गीत म्हणजे 'लेनिन-वादाचें व सोविएत रशियाच्या परंपरेचें विडंबन ' होय, त्यांत आंतरराष्ट्रीयत्वाचा चुकूनहि उल्लेख नाहीं, वगैरे भरमसाट विधानें ठोकून दिलीं आहेत!

लेनिनवाद व आंतरराष्ट्रीयत्व यांच्याविषयीं ' धनुर्धारी 'च्या लेखकाला आलेला पुळका भोंदूपणाचा आहे हें कुणालाहि सहज समजूं शकेल. अलीकडे हा लेखक स्वतःला ' राष्ट्रवादी ' म्हणवूं लागला आहे, तेव्हां वस्तुतः राष्ट्रवादाच्या भूमिके-वरून सोविएतच्या या नव्या गीताची त्यानें चर्चा केली असती तर तें सुसंगत तरी दिसलें असतें. पण या तत्त्वहीन ट्रॉट्स्कीवाद्याला राष्ट्रवाद, आंतरराष्ट्रीयत्व, देशप्रेम, समाजवाद या सर्वांचेंच वावडें आहे.

*　　　　*　　　　*

सोविएत युनियन म्हणजे केवळ रशिया नसून समान दर्जाच्या पायावर आधार-लेलें व गुण्यागोविंदानें एकत्र नांदणारें अनेक स्वतंत्र राष्ट्रांचें आनंदी कुटुंब आहे. खऱ्याखुऱ्या आंतरराष्ट्रीयत्वाच्या ध्येयाचें मूर्त प्रतीक म्हणून सोविएत यूनियनचे मुक्त कंठानें पोवाडे गाण्यांत रवींद्रनाथ टागोरांनाहि धन्यता वाटली. नव्या सोविएत राष्ट्र-गीताच्या पहिल्याच कडव्यांत सोविएत देशाच्या या मुख्य वैशिष्ट्याचा अभिमानानें उल्लेख केला आहे. पण हिटलरचे पगारी हस्तक बनून सोविएत यूनियनमध्यें पंचम-दळी कारवाया करण्याचा निष्फळ प्रयत्न करणाऱ्या ट्रॉटस्कीवाद्यांना व त्यांच्या हिंदु स्थानांतील बटूंना ही गोष्ट कशी दिसणार?

वास्तविक या लोकांना सोविएत यूनियनचें अस्तित्व व वाढतें यश हेंच 'लेनिन वादाचें विडंबन' वाटतें, कारण त्यांचा लेनिनवाद मार्क्स-लेनिनचा लेनिनवाद नसून ट्रॉट्स्कीवाद होय. या लोकांनीं व त्यांच्या गुरूंनीं क्रांतिपूर्व काळांत व क्रांती-नंतरच्या काळांतहि खुद्द लेनिनची बदनामी करण्याची एकसुद्धां संधि वांया दवडली नाहीं. १९१७च्या नोव्हेंबर-क्रांतीनंतर दोन महिन्यांनीं लेनिनच्या धोरणास अनुसरून सोविएत सरकारनें कैसरच्या जर्मनीशीं तह केला तेव्हां हेच लोक 'जर्मन क्रांतीचा विश्वासघात झाला! आंतरराष्ट्रीय क्रांतीचा खून झाला!' अशी आरोळी मारीत होते. वास्तविक त्यांना जर्मन क्रांतीविषयीं किंवा आंतरराष्ट्रीय क्रांतीविषयीं मुळींच प्रेम नव्हतें, त्यांच्या डोळ्यांपुढें एकच उद्देश होता व तो म्हणजे आंतरराष्ट्रीय कामगार-वर्गानें रशियांत मिळविलेल्या प्रचंड विजयावर बोळा कसा फिरवावयाचा हाच!

म्हणूनच सोविएत यूनियन हा समाजसत्तावादी देश आहे ही गोष्ट ते मुद्दाम लपवून ठेवतात, नोव्हेंबर १९१७ च्या क्रांतीची ही कामगिरी जनतेच्या डोळ्यांआड करूं पाहतात, व तिच्याहून जास्त व्यापक व थोर अशी जी क्रांति घडवून आणण्यांत सोविएत जनता आज पुढाकार घेत आहे तिच्याविषयीं एक शब्दहि न सांगण्याची ते काळजी घेतात.

*　　　*　　　*

सोविएतनें नवें राष्ट्रगीत मान्य करतांना जो खुलासा केला आहे तो पाहून खरें पाहतां कुणाच्याहि मनांत कसलीहि शंका राहण्याचें कारण नाहीं. आतांपर्यंत सोविएत देशाचें निराळें असें राष्ट्रगीत नव्हतें. क्रांतिकारक कामगार चळवळीचें सुप्रसिद्ध 'आंतरराष्ट्रीय गीत' हेंच इतर भांडवलदारी देशांप्रमाणें झारशाही रशियाच्या कामगारांचें मुख्य गाणें होतें, व क्रांतींत विजय मिळविल्यानंतरहि हेंच गाणें सोविएतच्या कामगारांनीं चालू ठेविलें. खरें पाहतां "उठा जागा, भूके बन्दी। उठा गरिब गांजले," असा रणनिनाद सोविएत जनतेला उद्देशून पुकारण्याचें आज कांहींच कारण राहिलेलें नाहीं. आज सोविएत देशांत–'भूके बन्दी' व 'गरीब गांजले' कुणी उरले नाहींत. आज सोविएत देश हा स्वतंत्र श्रमजीवि जनतेचा संपन्न व सुखी देश आहे. १९३६ ची नवी सोविएत राज्यघटना सोविएत समाजांत घडून आलेल्या या क्रांतिकारक स्थित्यंतराच्या आधारेंच तयार करण्यांत आली होती. याच दृष्टीनें सोविएत देशाचें नवें राष्ट्रगीत तयार करणेंहि आवश्यक होतें. सोविएत जनतेनें पितृभूमीच्या रक्षणासाठीं चालविलेल्या आजच्या घनघोर फॅसिस्टविरोधी युद्धाच्या धगधगींत मुशींत या तेजःपुंज नव्या राष्ट्रगीताची घडण व्हावी यांत नवल कसलें? आपल्या पितृभूमीसाठीं निकरानें लढतांना सोविएत जनता साऱ्या दुनियेंतील जनतेच्या मुख्य शत्रूचा–फॅसिझमचा–नायनाट करीत आहे व त्याच वेळीं प्रत्येक देशांतील जनतेला स्वतःच्या मायभूमीचें रक्षण करण्याचा यशस्वी मार्ग दाखवीत आहे. आणि त्याचप्रमाणें सोविएतचें हें नवें राष्ट्रगीत फ्रेंच जनतेच्या सुप्रसिद्ध 'मार्सेलेस' गीताप्रमाणेंच साऱ्या जगांतील जनतेला स्फुरण देईल.

*　　　*　　　*

सोविएतच्या जनता–कोमिसार–मंडळानें हें नवें राष्ट्रगीत मान्य करतांना असें म्हटलें आहे कीं "सोविएत समाज पद्धतीच्या विजयांमुळें आमच्या देशांत जें मूलभूत परिवर्तन घडून आलें आहे, त्याचें प्रतिबिंब सध्यांच्या गीतांतील शब्दरचनेंत आढळत नाहीं, व सोविएत राज्यसत्तेचें समाजसत्तावादी अंतरंग तिच्यांत व्यक्त होत नाहीं; या कारणास्तव सोविएत समाज पद्धतीचें मर्म व अंतरंग व्यक्त करणारें नवें गीत मान्य करण्यांत येत आहे."

त्याच वेळीं आंतरराष्ट्रीय प्रसंगीं जुनें 'आंतरराष्ट्रीय गीत' रशियांत म्हणण्यांत येईलच, असा खुलासाहि प्रसिद्ध झाला आहे. रशियानें आंतरराष्ट्रीय गीत 'सोडून दिलें' हा प्रचार किती खोडसाळपणाचा आहे हें यावरून दिसून येईल. पॅरिस कम्युनचा सभासद व मार्क्सचा शिष्य **यूजेन पॉतिए** यानें या आंतरराष्ट्रीय गीताला जन्म दिला; आंतरराष्ट्रीय कामगार चळवळीनें गेलीं ४४ वर्षें आपलें गीत म्हणून अभिमानानें स्वीकारलें; न्यूयॉर्क, लंडन, बर्लिन, मॉस्को, मुंबई, कलकत्ता, शांघाय, टोकियो, वगैरे साऱ्या दुनियेंतले एकूण एक कामगार या गाण्याच्या सुरावर आपला क्रांतिकारक मोर्चा वर्षानुवर्ष पुढें नेत आहेत; जगाच्या तसूभर भागांतहि जोंपर्यंत जुलूम व अन्याय जिवंत आहे तोंपर्यंत हें गीत कामगारवर्गाला व साऱ्या दलित जनतेला स्फुरण देईल व त्यानंतरच्याहि अनेक पिढया कृतज्ञतेनें या गीताचे सूर आळवतील.

(२-१-४४)

---

## — १५ —

# अनंत काणेकरांच्या बाष्कळ बढाया

हिंदुस्थानांत सध्यां चालू असलेल्या 'ऑगस्ट क्रांती' चें पहिलें रणशिंग कुणी फुंकलें ? महात्मा गांधींनीं ? जयप्रकाश नारायण प्रभृति कॉंग्रेस सोशालिस्टांनीं ?

छे, छे, असला भलता गैरसमज करून घेऊं नका ! "या लोकक्रांतीच्या तत्त्वज्ञानाचा पाठपुरावा ८ ऑगस्ट १९४२ च्या दोन अडीच वर्षें आधींपासून आम्ही करीत आहोंत," ही विनयमूर्ति क्रांतिकारक श्री. अनंत काणेकर यांनीं परवां पुण्याला केलेली घोषणा ऐकल्यानंतर तरी तुमच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला पाहिजे. चले–जाव, मोड–तोड, बत्तीफोड, वगैरे कार्यक्रमाच्या मागील क्रांतिकारक तत्त्वज्ञान कोणतें आहे ? श्री. काणेकर म्हणतातः अहो तें तत्त्वज्ञान मीं मार्च १९४०

मध्येंच सांगून टाकले आहे! 'आशा' पत्राची फाइल चाळा म्हणजे समजेल तुम्हांला तें!

उद्धटपणाचें संरक्षक कवच पांघरलें म्हणजे भेकड कर्तव्यशून्यता आणि निर्लज्ज थापबाजी सहज झांकली जाईल, असें या गृहस्थांनीं स्वतःचें मत करून घेतलेलें दिसतें!

*　　　*　　　*

"सत्याची आवड... इत्यादि प्रेरणांतच मानवाचें मानव्य आहे" असें श्री. काणेकर कबूल करतात, आणि स्वतःच्या 'मानव्या' विषयीं कुणाला शंका राहूं नये म्हणून लगेच ते ऑगस्ट क्रांतीचे 'हिरीरीनें' प्रचार करणारे म्हणून स्वतःला सर्टिफिकेट देऊन टाकतात!

वास्तविक कोणतीहि गोष्ट 'हिरीरीनें' करणें हा या गृहस्थांचा मनोधर्मच नव्हे, हें त्यांची थोडी तरी माहिती असलेल्या प्रत्येकाला ठाऊकच आहे. म्युनिसिपालिटीच्या हेल्थ खात्याच्या जाहिरातीसुद्धां त्यांना 'हिरीरीनें' लिहितां आल्या नाहींत! ता. ८ ऑगस्टनंतरच्या काळांत त्यांनीं विद्यार्थ्यांना 'बेमुदत संप' करून 'क्रांती' चा वणवा पेटविण्याची स्फूर्ति देण्यासाठीं स्वतःची साहित्यिक 'बंदूक' वापरल्याचें कुणाला आठवतें काय? त्या 'प्रलयानला' च्या काळीं ते प्राध्यापकाच्या खुर्चीवरून 'हिरीरीनें' कोणत्या लोकक्रांतीचें 'उद्गान' करीत होते?

*　　　*　　　*

तारुण्याच्या पहिल्या भरांत 'चांदराती' आणि 'वल्लभेचीं चुंबनें', यांविषयीं गुलगुल गाणीं रचण्यांत रममाण झालेल्या रंगेल काणेकरांना कांहीं वर्षांनीं आपल्या उनाड आयुष्याचा वीट आला. 'पुष्ट प्रियेचा कर' रागानें झिडकारून ते 'यंत्रशक्तीच्या घरघरीं' विषयीं कवनें रचूं लागले. असल्या 'रुक्ष, कर्कश, रांगड्या' विषयांचीं बंधनें स्वतःच्या प्रतिभेला तूं घेऊं नकोस, असा त्यांच्या पोक्त मित्रांनीं त्यांना सल्ला दिला, पण तो त्यांनीं आवेशानें झुगारून दिला. 'साम्याची उषा' उगवल्यानंतर लोक आपणांला काय म्हणतील, याची त्यांना काळजी लागून राहिली होती.

पण शेवटीं हें क्षणभंगुर स्मशानवैराग्यच ठरलें. क्रांतीचा उद्गाता क्रांतीच्या सैनिकाइतकाच शूर, धाडसी, निरलस, तत्त्वनिष्ठ व त्यागी असावा लागतो, हें त्यांना दिसून आलें. हे गुण त्यांच्या अंगीं नव्हते, आणि नव्यानें बाणून घेण्याची त्यांची तयारी नव्हती. चांदराती तर टाकून दिल्या, आणि क्रांतिगीतें तर जमत नाहींत, अशी त्यांची केविलवाणी स्थिति झाली.

मग त्यांच्या वाचनांत "चाळिशीनंतर प्रत्येक माणूस बदमाश असतो" हें सुभाषित आलें. काणेकरांनीं विचार केला:–"चाळिशीनंतरच कां? चाळिशीअगोदर

माणसाला बदमाश कां होतां येऊं नये?" तरुणांना आपलें 'पुरोगामित्व' सिद्ध करण्यास या सुभाषिताच्या वृद्ध लेखकानें आव्हानच केलें आहे, असें काणेकरांच्या मनानें घेतलें. त्यांनीं हें आव्हान अगदीं 'हिरीरीनें' स्वीकारलें!

* * *

श्री. काणेकर १९३७ सालीं या नव्या अर्थानें पूर्ण 'पुरोगामी' झाले नव्हते. म्हणून त्यावेळीं रशियांतील परिस्थिति स्वतःच्या डोळ्यांनीं पाहून पुढील उद्गार काढणें त्यांना शक्य झालें:—

"माझी मला लाज वाटली. या साध्याभोळ्या अडाणी रशियन लोकांची युरोपांतल्या इतर लोकांशीं तुलना करून त्यांच्या गबाळेपणाबद्दल, त्यांच्या मागासलेल्या स्थितीबद्दल त्यांना हंसणारा आणि त्यांच्यावर चिडणारा किती मूर्ख मी! हजार–पंधराशें वर्षें एका अत्यंत क्रूर मध्ययुगीन राक्षसी सत्तेच्या टांचेखालीं एकसारखें चिरडलें गेलेलें हें राष्ट्र अवघ्या वीस वर्षांपूर्वीं स्वतंत्र झालें आहे. शतकानुशतकें अज्ञानांत आणि दारिद्र्यांत रुतलेल्या या लोकांना राजसत्तेनें हजारों वर्षांत केलेलीं पातकें धुवून काढून आपल्या राष्ट्राची पुनर्घटना करावयाची आहे...इतक्या चिमण्या अवधींत आम्हां हिंदी लोकांसारख्याच गरीब व मागासलेल्या या लोकांनीं केवढें प्रचंड कार्य केलें आहे! एके काळीं अत्यंत मागासलेल्या या लोकांच्या शिरावर इतिहासांतला एक अद्वितीय आणि अजस्र सामाजिक प्रयोग करण्याची जबाबदारी येऊन पडली आहे आणि किती दुर्दम्य उत्साहानें ती ते पार पाडीत आहेत!"

"सोशालिस्ट राष्ट्रांतलीं वृत्तपत्रें इतर राष्ट्रांतल्या वृत्तपत्रांपेक्षां किती वेगळीं असतात! जाहिरात एकहि दिसत नाहीं. आमच्या वर्तमानपत्रांत कुणी कुणाचा खून केला आणि कुणी कुणाची बायको पळविली या महत्त्वाच्या बातम्या! तेंच आज 'मॉस्को डेली न्यूज'कडे पहा. आजचा नुसता 'मॉस्को डेली न्यूज' पाहिला तरी रशियन राष्ट्राच्या नसानसांतून नवचैतन्य कसें उसळतें आहे याचें प्रत्यंतर येतें."

* * *

लेनिनच्या मृत्यूनंतर तेरा वर्षांनीं श्री. काणेकरांनीं रशियाला भेट दिली व त्या वेळच्या परिस्थितीचें वरीलप्रमाणें वर्णन केलें.

आणि आज हेच काणेकर म्हणतात:—

"लेनिनसारखे ध्येयशील, मानवताप्रेमी क्रांतीचे नेते जिवंत होते तोंपर्यंत असली क्रांति कांहीं लोकहित साधूं शकली, पण त्यांच्यामागून तिचें नेतृत्व 'सत्तातुराणां न भयं न लज्जा' अशा तत्त्वशून्य, सत्त्वशून्य, ध्येयशून्य सत्तालंपटाच्या हातीं गेल्याबरोबर त्या क्रांतीची काय लाजिरवाणी उत्क्रांति झाली आहे आणि अजूनहि आपल्या डोळ्यांसमोर होत आहे, तें सांगण्याची आवश्यकता नाहीं."

आणि 'बनेल' पणांत काणेकरांनीं किती प्रावीण्य मिळविलें आहे, हेंहि सांगण्याची कांहीं आवश्यकता नाहीं !

'सत्तालंपट' स्तालिनवर तर काणेकरांचा रोष आहेच, पण 'ध्येयशील' लेनिनविषयींहि त्यांना फारसा आदर वाटत नाहीं. या लेनिननें तरी काय साधलें ? "कांहीं लोकहित" साधलें ! लोकक्रांतीचे उद्गाते काणेकर यांनीं आतांपर्यंत जें लोकहित साधलें आहे त्या मानानें लेनिननें साधलेलें लोकहित अगदींच क्षुल्लक समजलें पाहिजे !

'कांहीं' ! एकच 'स्फोटक' शब्द ! काणेकरांच्या साहित्यिक 'बंदुकीं'तून सुटलेली एकच गोळी ! पण तिनें 'साम्राज्यांचा' नाहीं तरी 'साम्राज्यशाहीची डावी तटबंदी' उभारणाऱ्या लेनिनचा मात्र पुरा मुडदा पाडला !

आणि हें 'कांहीं' लोकहित साधण्यासाठींसुद्धां लेनिननें सशस्त्र क्रांतीचें अपवित्र साधन वापरण्याचें पाप केलें व ही 'साधनांची अशुचिता' लेनिनच्या साध्यांतहि उतरली, असा सत्त्वशील सवाई महात्मा अनंत काणेकरांचा आरोप आहे.

* * *

काणेकरांच्या भोंदू साम्राज्यशाहीविरोधाचें खरें स्वरूप समजावून घेऊं इच्छिणारांनीं त्यांच्या लेखणींतून उतरलेला व ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसनें प्रसिद्ध केलेला 'अमेरिका' नांवाचा ग्रंथराज चाळून पहावा.

१९४२ सालीं (म्हणजे काणेकर भारतांतील सध्यांच्या 'लोकक्रांतीचे उद्गाते' बनल्यानंतर दोन वर्षांनीं) लिहिलेल्या या पुस्तकांत अमेरिकेला अनुलक्षून ते 'हिरीरीनें' लिहितातः—

"हें नवजवान बलशाही राष्ट्र चालू महायुद्धांत लोकसत्तावादी राष्ट्रांच्या बाजूनें गट्टीराष्ट्रांविरुद्ध उभें राहिलेलें पाहून जगांतील सर्व लोकसत्ताप्रेमी जनतेला नवीन हुरूप वाटल्याशिवाय राहणार नाहीं."

परंतु लोकसत्तावादी राष्ट्रांच्या गोटांत रशियाला उभा राहिलेला पाहून व फॅसिस्टांविरुद्ध लाल सेनेला मिळत असलेला अपूर्व विजय पाहून मात्र या गृहस्थांना आज 'नवीन हुरूप' येण्याऐवजीं पोटांत कळ आल्यासारखेंच होत आहे, व "साम्राज्यशाहीच्या गळ्याला रशियानें कडकडून मिठी मारली आहे" असा अमेरिका-इंग्लंडची मदत घेतल्याबद्दल त्यांनीं रशियावर आरोप केला आहे !

साम्राज्यशाहीच्या डाव्या तटबंदी'वर आपल्या कुजक्या लेखणीचा हल्ला चढविणाऱ्या या वीराला प्रेसिडेंट रूझवेल्टची स्तुति करणें हा लोकक्रांतीच्या उद्गानाचाच एक भाग वाटतो. चर्चिलच्या छातींतील कफाविषयीं काणेकरांनीं स्वतःच्या कल्पनेंतून-निर्माण केलेलीं बनावट रशियन पत्रकें कुणाच्या पहाण्यांत नाहींत, पण रूझवेल्टच्या

अधू पायाच्या शुश्रूषेविषयीं अनंत काणेकरांनीं अत्यंत आस्थेनें दिलेली तपशीलवार माहिती मात्र सर्वांना त्यांच्या 'अमेरिका' या चोवीसपानी चोपड्यांत पहावयाला मिळेल. काणेकर 'हिरीरीनें' लिहितातः--

"एका अपघातांत सांपडल्यामुळें त्यांचे दोन्ही पाय अधू झाले. पण जॉर्जिया येथील उष्ण पाण्याच्या झऱ्यांत नियमितपणें सात वर्षे पोहण्याचा व्यायाम घेऊन त्यांनीं आपले पाय पूर्वस्थितीला आणले ...... आपला न्यू डीलचा कार्यक्रम भांडवलदारांच्या विरोधाला न जुमानतां रूझवेल्ट यांनीं अंमलांत आणला ... ...अमेरिकन जनतेनें परंपरेचीहि पर्वा न करतां त्यांना तिसऱ्यांदा अध्यक्ष म्हणून निवडून दिलें. त्यानंतरचें त्यांचे महान् कार्य आपल्या डोळ्यांसमोर प्रत्यक्षच दिसत आहे."

आणि या अमेरिकन साम्राज्यशाहीच्या गळ्यांत मिठी मारून स्टालिन साम्राज्यशाहीचा संरक्षक बनला आहे, असा हेच काणेकर आरोप करतात!

* * *

"काणेकरांनीं केलेला निःशस्त्र प्रतिकाराचा पुरस्कार हा केवळ 'साहित्यिक' स्वरूपाचा आहे हें उघड आहे, व 'विडंबन-काव्य' नांवाच्या साहित्यप्रकारांतच त्याची गणना करण्यास कांहीं हरकत नाहीं! फार तर कॉंग्रेस-मंत्रिमंडळानें केलेल्या एका कायद्याच्या बाबतींत ते मधून मधून 'सविनय कायदेभंग' करतील, पण म्हणून आजच्या सरकारला कर न देणें, सरकारी जाहिराती आपल्या वर्तमानपत्रांत न छापणें, सरकारी प्रचाराबद्दल भरपूर मोबदला मिळण्याची हातीं आलेली संधि वायां दवडणें, वगैरे प्रकारचा सत्याग्रहाचा व बहिष्काराचा कार्यक्रम त्यांना स्वतः अंमलांत आणण्याचें कांहींच कारण नाहीं. या विरुद्ध आक्षेप घेणारांची तोंडें "केव्हां केव्हां दोन वेळ जेवणेंच महत्कार्य होऊन बसतें," असा सिद्धांत जाहीर करून त्यांनीं अगोदरच बंद करून टाकलीं आहेत!

तथापि काणेकरांसारख्या तत्त्वहीन बाष्कळ प्रचारकांचा उपयोग करून घेण्याची पाळी हिंदुस्थानांतील ज्या गुंडांच्या गटावर आज येऊन पडली आहे, त्या कॉंग्रेस-सोशालिस्ट पार्टीच्या डावपेचांचें कावेबाज स्वरूप मात्र प्रत्येकानें ध्यानांत घेतलें पाहिजे. 'क्रांती'च्या नांवाखालीं मोडतोडीची संघटना करून या गटानें देशाच्या संरक्षणक्षमतेवर व जनतेच्या मनोधैर्यावर उघड-उघड हल्ला चढवून पाहिला; देशप्रेमी जनतेच्या सात्त्विक संतापाचा फायदा घेऊन हें कार्य आपणांला सहज साधतां येईल अशी त्यांची अपेक्षा होती. पण या बाबतींत त्याची निराशा झाली. मोडतोडीच्या कार्यक्रमाचें जनताविरोधी स्वरूप अनुभवानें लोकांना पटूं लागलें. शाळा-कॉलेजांचे बेमुदत संप, धान्य-दुकानांवर हल्ले, आगगाड्या उलथून पाडणें, वगैरे कार्यक्रमाकडे आतां जनतेचा कोणताच विभाग सहानुभूतीनें पहात नाहीं. म्हणून

या देशद्रोही गटानें ‘सत्याग्रहा’चा सोज्वळ बुरखा पांघरण्याचें आतां ठरविलें आहे. त्यांच्या या नाटकी वेषांतरामुळें कैक भाबडे पण प्रामाणिक कॉंग्रेसभक्त फसत आहेत व त्यांच्या जाळ्यांत ओढले जात आहेत. आणि याच जाळ्यांत मोडतोड-विरोधी युवकांनाहि अडकविण्यासाठीं त्यानें अनंत काणेकरांसारख्यांना हाताशीं धरण्याचा निर्बुद्ध उपाय योजिला आहे.

(१६-१-४४)

---

# –१६–

# पंजाबचा शेतकरी व सोविएत ताजिकिस्तान

पंधरा वर्षांपूर्वी मीरत कटाच्या खटल्यांतील साम्राज्यवादी सरकारचे बॅरिस्टर **लॅंगफर्ड जेम्स** यांनीं सोविएत सरकारच्या ‘लाल साम्राज्यवादा’वर पोरकट प्रवचन झोडून आपल्या अकलेचें प्रदर्शन केलें होतें.

जपानी साम्राज्यशाहीला आपला देश विकूं पाहणाऱ्या कॉंग्रेस सोशालिस्ट पक्षाचे बॅरिस्टर **मिनू मसानी** यांनीं आज त्याच ‘लाल साम्राज्यवादा’च्या शिळ्या कढीला ऊत आणण्याचा बावळट प्रयत्न केला आहे.

लॅंगफर्ड जेम्स व मिनू मसानी या दोघांच्याहि श्रोत्यांचें स्वरूप सारखेंच होतें. एकाचें भाषण मीरतचा मॅजिस्ट्रेट तल्लीनतेनें ऐकत होता, तर दुसऱ्यापुढें मद्रासच्या रोटरी क्लबचे ढेरपोटे भांडवलदार बसले होते.

* * *

साम्राज्यशाही-विरोधाचें कातडें पांघरून व अशा रीतीनें देशांतील जनतेला फसवून कावेबाजपणानें जपान्यांना मदत करणाऱ्या पंचमदळ्यांनीं ‘साम्राज्यवादा’ची एक नवी व्याख्या शोधून काढलेली दिसते.

साम्राज्यवाद व भांडवलशाही यांचा निकट संबंध आहे, हें आज राजकारणाची थोडीशी तरी माहिती असलेल्या प्रत्येकाला ठाऊक झालें आहे. भांडवलशाहींतूनच साम्राज्यवाद निर्माण होतो, साम्राज्यशाही म्हणजे मक्तेदारी भांडवलशाही, आपल्या हातांत अफाट भांडवल केन्द्रित करणाऱ्या मूठभर मक्तेदारी गटांची सत्ता म्हणजे साम्राज्यशाही, असें लेनिननें दुनियेला शिकवलें. साम्राज्यशाहीचें जोखड झुगारून देण्यासाठीं धडपडणाऱ्या हिंदी जनतेला लेनिनच्या या शिकवणुकीनें स्वतःच्या शत्रूचें खरें स्वरूप व आपलें स्वातंत्र्याचें ध्येय गांठण्याचा अचूक मार्ग स्पष्ट करून दाखविला.

पण मिनू मसानींना साम्राज्यशाहीची ही व्याख्या मान्य नाहीं ! आजच्या रशियांत पुनः भांडवलशाही स्थापन झाली आहे या ट्रॉट्स्कीवाद्यांच्या निर्बुद्ध प्रचाराची कॉंग्रेस सोशालिस्टांनीं आतांपर्यंत पुष्कल पोपटपंची करून पाहिली, पण तिचा कांहींच उपयोग होत नाहीं असें त्यांना अनुभवानें कळून चुकलें आहे. म्हणूनच ‘ रशिया भांडवलशाहीकडे परत झुकत नाहीं ’ असें कबूल करणें मिनू मसानींना आज भाग पडलें आहे. तरीसुद्धां भांडवलशाही नसलेला हा सोविएत देश ‘साम्राज्यवादी’ मात्र झाला आहे, असें मिनू मसानी बिनदिक्कतपणानें सांगत आहेत !

जपानी साम्राज्यशाहीचें समर्थन करण्याची कॉंग्रेस सोशालिस्टांना आजकाल जी गरज भासत आहे तिच्यामुळेंच ‘साम्राज्यवादा’ची नवी व्याख्या करण्याचा मिनू मसानींनी हा चोरटा प्रयत्न केला असेल का ?

* * *

या कॉंग्रेस सोशालिस्टांना स्वतःचे हास्यास्पद सिद्धांत मांडतांना थोडें तरी खोटें बोलल्यावाचून राहवत नाहीं.

“ पोलंडसारखे देश व बाल्टिक राष्ट्रें हा आमचा अंतर्गत प्रश्न आहे ” असें विधान स्तालिनच्या तोंडी घालून मसानींनीं त्याच्या आधारें स्तालिनला चर्चिलच्या जोडीला बसवलें आहे !

वस्तुस्थिति काय आहे ? “ पोलंडसारखे देश ” हे शब्द स्तालिननें किंवा कोणत्याहि सोविएत प्रतिनिधीनें या बाबतींत कधींच उच्चारले नव्हते. अलीकडे उत्पन्न झालेला ‘पोलंडचा प्रश्न’ पोलंडच्या जुन्या ( १९३९ पूर्वीच्या ) सरहद्दी पलीकडे लाल सेना पुढें सरसावल्यामुळें उत्पन्न झाला आहे. पण अजून लाल सेना सोविएतची सरहद्द ओलांडून गेलेली नाहीं, पोलंडची खरीखुरी सरहद्द ओलांडून गेलेली नाहीं. अजून लाल सेना सोविएत युक्रेन व सोविएत श्वेतरशियांत आहे, पश्चिम युक्रेन व पश्चिम श्वेतरशिया हे सोविएत युनियनमध्येंच आहेत. त्यांचा प्रश्न हा सोविएत युनियनचा ‘अंतर्गत प्रश्न’ जर नव्हे, तर तो काय ? लंडनला पळून

गेलेल्या पोलंडच्या जमीनदार भांडवलदारांचा आणि त्यांच्या पाठीराख्या अँग्लो-अमेरिकन प्रतिगाम्यांचा प्रश्न समजावयाचा काय ?

सोविएत श्वेतरशिया, सोविएत युक्रेन, सोविएत लिथुएनिया वगैरे सोविएत राष्ट्रसंघांत स्वेच्छेनें सामील झालेल्या कामगार-शेतकरी राज्यांचा प्रश्न हा सोविएत सरकारचा 'अंतर्गत' प्रश्न समजतां कामा नये, असें **मिनू मसानींना** कां वाटतें याची सहज कल्पना करतां येण्यासारखी आहे. बंगालचा प्रश्न हा हिंदुस्थानचा 'अंतर्गत' प्रश्न नसून जपानच्या आश्रयानें राहिलेल्या देशद्रोही सुभाष बोसचा व त्याच्या पाठीराख्या **टोजो**चा प्रश्न आहे, ही कल्पना हिंदी लोकांच्या गळीं उतरविण्याची कॉंग्रेस सोशालिस्टांची धूर्त धडपड सगळ्यांच्या परिचयाचीच आहे.

पश्चिम युक्रेनच्या व पश्चिम श्वेतरशियाच्या जनतेनें पोलंडच्या साम्राज्यांतच राहिलें पाहिजे, असा **मिनू मसानींचा** आग्रह आहे ! याला म्हणतात कॉंग्रेस सोशालिस्टांचा 'सोशालिझम', आणि 'साम्राज्यशाहीविरोध' !

* * *

लाल सेना पुढें सरसावूं लागल्याबरोबर हा कंपू 'लाल साम्राज्यवादा'च्या निर्बुद्ध आरोळ्या ठोकूं लागला आहे. फॅसिस्ट जोखडापासून यूरप मुक्त होऊं लागलेला पाहून या कंपूचें धाबें दणाणून गेलें आहे, पण त्याला सोविएत यूनियनवर साम्राज्यवादाचा आरोप करण्यासाठीं फिनलंड-पोलंडच्या प्रश्नांची वाट कां पहावी लागते ? सोविएत यूनियन हें शेंकडों राष्ट्रांचें अफाट संघराज्य आहे हें सर्वांनाच ठाऊक आहे. **चर्चिल** ज्याप्रमाणें हिंदुस्थानवर राज्य करीत आहे त्याचप्रमाणें **स्तालिन** ताजिकिस्तानवर राज्य करीत आहेत, असें या कॉंग्रेस सोशालिस्टांना यापूर्वीच म्हणण्यास कोणती हरकत होती ? कझाकिस्तान, उझबेकिस्तान, जॉर्जिया, हे रशियाच्या 'लाल साम्राज्यांत' मोडणारे वसाहत देश आहेत, असा शंख करण्यास या थापाड्यांना कोणता प्रत्यवाय होता ?

एकच प्रत्यवाय होता. सोवियत युनियनमध्यें सामील झालेल्या सर्व राष्ट्रगटांना संपूर्ण स्वातंत्र्य व समान दर्जा आहे, ही गोष्ट आज जगजाहीर आहे. कोणत्याहि परतंत्र राष्ट्रांतील जनतेपासून ती लपविणें शक्य नाहीं. पंजाब-काश्मीरचा शेतकरी आज आपल्या शेजारच्या सोविएत ताजिकिस्तानच्या शेतकऱ्याची कींव करीत नाहीं, आपल्यासारखाच साम्राज्यशाहीखालीं भरडला जाणारा म्हणून त्याच्याविषयीं सहानुभूति दर्शवीत नाहीं. पंजाब-काश्मीरच्या व साऱ्या हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांना शेजारचा सोविएत ताजिकिस्तान म्हणजे स्वतःच्या उज्ज्वल भवितव्याचें स्फूर्तिदायक चित्रच वाटतें. रवींद्रनाथ टागोरांनीं सोविएत यूनियनमधील सर्व राष्ट्रगटांच्या या

स्वातंत्र्याची, समानतेची, व समृद्धीची उत्साहानें स्तुति केली आहे. स्तालिनची चर्चिलशीं तुलना करण्यांत अडचण आहे ती हीच !

" रशियाला योग्य तो जबाब " देण्यास या नकली 'सोशालिस्टा' नें रोटरी क्लबच्या ऐषआरामी भांडवलदारांना आर्जवून विनविलें.

आणि हा जबाब कोणता ?

'महात्मा गांधींचें अहिंसावादी तंत्र' अंमलांत आणा ! आणि गांधीजींची 'संपत्तीच्या विश्वस्ताची कल्पना' मान्य करा !—हाच.

साऱ्या श्रमिकांचा संपत्तीचे 'विश्वस्त' बनण्यास रोटरी क्लबचे बँकवाले सभासद एका पायावर तयार होतील यांत बिलकुल शंका नाहीं !

आणि 'अहिंसावादी तंत्र' कोणतें ?

मिनू मसानींनीं आपल्या तात्पुरत्या 'राजकीय संन्यासां' तून बाहेर पडण्यासाठीं ( आणि मुंबईच्या मेयरच्या खुर्चीवर टुणकन उडी मारण्यासाठीं ) पुण्याच्या आगाखान पॅलेसवर केलेलें 'कूच' सर्वांना माहीत आहे खरें, पण स्वतः मसानींनाहि त्याचें फारसें महत्व वाटत नाहीं हेंहि तितकेंच उघड आहे. नाहींतर त्यांनीं त्याची आतांपावेतों कैक वेळा पुनरावृत्ति केली असती.

जपाननें कलकत्त्यावर बॉंबफेक करण्यास उशीर लावला म्हणून तक्रार करणारे कॉंग्रेस सोशालिस्ट अलीकडे गांधीजींच्या पेक्षांहि जास्त उत्साहानें 'अहिंसे'चा व 'सत्याग्रहा'चा पाठपुरावा करूं लागले आहेत. मसानींचा अहिंसेच्या तंत्राचा पुरस्कार याच डावांतला एक भाग समजावयाचा नाहीं तर काय ?

( २०-१-४४ )

# — १७ —

# पाहुण्यांचा उर्मटपणा व घरधन्यांचें भांडण

राष्ट्रीय पुढारी तुरुंगांत असल्यामुळें व राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यासाठीं सर्वपक्षीय एकजूट घडवून आणण्याचें कार्य अजून पार पाडलें नसल्यामुळें बेजबाबदार नोकरशाहीला वाटेल तसा धुडगूस घालण्यास कसा वाव मिळाला आहे, यावर परवां मुंबईंत भरलेल्या नागरिक-स्वातंत्र्य परिषदेंत प्रख्यात कायदेपंडितांनीं विदारक प्रकाश पाडला.

साडेचार वर्षांपूर्वीं युद्ध सुरू झालें तेव्हां हिंदुस्थानांत उत्पन्न झालेली ' आणी-बाणीची परिस्थिति ' इंग्लंडपेक्षां जास्त गंभीर खास नव्हती. परंतु येथील बेजबाब-दार सरकारनें ' डिफेन्स ऑफ इंडिया ' वटहुकुमानें जे अधिकार आपल्या हातीं घेतले ते इंग्लंडमधील पार्लमेंटला जबाबदार असलेल्या सरकारनें पार्लमेंटच्या काय-द्यानें मिळविलेल्या अधिकारापेक्षां किती तरी जास्त व्यापक होते. युद्धाचें केवळ निमित्त करून प्रांतांतील लोकानुवर्ती मंत्रिमंडळांची सत्ता संपुष्टांत आणावयाची, हाच या डावाचा उद्देश असल्याचा कुणाला संशय आल्यास नवल नाहीं. एकीकडे जन-तेला जबाबदार असलेल्या मंत्रिमंडळांचे अधिकार मर्यादित केले, तर दुसरीकडे प्रांतांतील व जिल्ह्यांतील, एवढेंच नव्हे तर खेड्यांपाड्यांतील छोट्या बड्या नोकर-शहांच्या हातीं डिफेन्स ऑफ इंडिया रूल्सअन्वयें भरमसाट अधिकारांचें कोलीत देण्यांत आलें.

या अधिकारांचा उपयोग युद्ध जिंकण्याच्या कामीं करण्याऐवजीं जनतेवर निरर्थक हुकुमशाही लादण्याच्या कामींच कसा करण्यांत आला, याचें मुंबई हायकोर्टाचे माजी न्यायाधीश श्री. ठाकोर यांनीं केलेलें वर्णन ऐकून कुणालाहि चीड येणें साहजिक आहे.

* * *

अहमदाबाद म्युनिसिपालिटीचा कारभार उत्तम रीतीनें चालत असल्याचें स्वतः सरकारनेंच कबूल केलें होतें. परंतु एकाएकीं ही म्युनिसिपालिटी सरकारनें 'सस्पेंड' केली. ऑगस्ट १९४२ नंतरच्या काळांत अहमदाबाद येथें जी गडबड झाली तिचें कारण कॉंग्रेसनें अगोदर ठरविलेला कार्यक्रम हें नसून नोकरशाहीनें स्थानिक जन-तेच्या हक्कांवर केलेला अकारण प्रहार व त्यामुळें झालेला जनतेचा प्रक्षोभ हेंच होय,

असें श्री. ठाकूर यांनीं ठासून सांगितलें. अशाच प्रकारें सुरत येथें सुद्धां म्युनिसिपालिटींतील लोकनियुक्त सभासदांना आपलें काम बजावण्यांत अडथळा करण्याच्या 'खास उद्देशानेंच' (डिझायनेड्ली) डिफेन्स ऑफ इंडिया रूलसचा बेजबाबदारपणें उपयोग करण्यांत आला, असा श्री. ठाकोर यांचा आरोप आहे.

या धोरणाचा खालच्या अधिकारी वर्गावर नैतिक दृष्ट्या किती किळसवाणा परिणाम झाला आहे, याची श्री. ठाकोर यांनीं उदाहरणें दिलीं. अक्षर-शत्रू लोकांना व अनैतिक गुन्ह्याबद्दल शिक्षा झालेल्यांना पंच म्हणून बोलावण्यांत आपण कांहीं गैर करीत आहोंत असें पोलिस अधिकाऱ्यांना मुळींच वाटत नाही. अशा परिस्थितींत कोणत्याहि साध्या पोलिसाचासुद्धां आपण सर्वसत्ताधीश आहोंत असा ग्रह झाल्यास नवल कोणतें? कोणत्याहि कारणामुळें एकाद्या पोलिसाची तुमच्यावर इतराजी झाल्यास तो तुम्हांला वाटेल तसा छळूं शकेल, त्याला कसलाच विधिनिषेध नाहीं, असें श्री. ठाकोर यांनीं आजच्या वटहुकुमशाहीच्या राजवटीचें वर्णन केलें.

* * *

फेडरल कोर्टाच्या निर्णयामुळें डिफेन्स ऑफ इंडिया रूल नं. २६ बेकायदेशीर ठरल्यावर तो पुनः कायदेशीर करणारा वटहुकूम सरकारनें काढला, एवढेंच नव्हे तर त्याच्यापेक्षांहि जास्त प्रतिगामी व जाचक स्वरूपाचा नवा वटहुकूम (१९४४चा वटहुकूम नं. ३) जारी केला. चौकशीविना डांबून ठेवण्यासाठीं अटक करण्याचा अधिकार पोलिस-पाटलापर्यंतच्या अगदीं खालच्या अधिकाऱ्यालाहि या वटहुकुमान्वयें देण्यांत आला आहे. या उलट इंग्लंडमधील कायदा पहा. तेथें सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या खास हुकुमाशिवाय कुणालाहि अटक करतां येत नाहीं, व सेक्रेटरी ऑफ स्टेटवर सुद्धां अटकेचीं कारणें सांगण्याचें बंधन आहे, इतकेंच नव्हे तर हीं कारणेंसुद्धां मर्यादित करण्यांत आलीं आहेत. हिंदुस्थानांतल्या आजच्या कायद्याप्रमाणें 'कारणें' (ग्राउंड्स) देण्यांत यावीं असें असलें तरी 'तपशीलवार माहिती' (फॅक्ट्स) देण्यांत येणार नाहींत, अशी नोकरशाहीनें आपल्या अजब डोक्यांतून शक्कल काढली आहे! गुन्ह्याची 'माहिती' दिल्याशिवाय अटकेचें 'कारण' कसें काय देतां येईल, असा श्री. भोपटकर यांनीं आपल्या भाषणांत सवाल टाकला.

श्री. नरीमन यांनीं नोकरशाहीच्या विक्षिप्त कारभाराचीं अनेक मासलेवाईक उदाहरणें दिलीं. अलीकडे मुंबईच्या कांहीं मॅजिस्ट्रेटांनीं पोलिस अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार वर्तनाविरुद्ध ताशेरे झाडल्याचे प्रकार घडून आले आहेत. पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध टीका करावयाची असल्यास ती उघड कोर्टांत करूं नका, माझ्याकडे त्यासंबंधीं पत्र पाठवा, असें पोलिस कमिशनरनें मॅजिस्ट्रेटांना आतां सर्क्यूलर काढलें आहे! जिल्ह्यांतील मॅजिस्ट्रेटांचा मिंधेपणा चवाठ्यावर आणतांना श्री. नरिमन

यांनीं सांगितलें कीं कायद्याचें ज्ञानच काय, पण साधें शिक्षणहि नसलेल्या एखाद्या दारूच्या व्यापाऱ्याला फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेटचे अधिकार देण्यांत येतात ! हिंदुस्थानांत नुसत्या हुकुमशहांच्याच नव्हे, तर अडाणी हुकुमशहांच्या हातीं कारभार आहे, असे श्री. नरीमन यांनीं उद्‌गार काढले.

* * *

श्री. पंड्या यांनीं या राजवटीचें पुढीलप्रमाणें रूपकात्मक वर्णन केलें--एखाद्या गृहस्थाच्या घरांत पाहुणा येतो. त्याचा हितचिंतक असल्याचा तो बहाणा करतो. गृहस्थाचा सारा कारभार तो स्वतःच्या हातीं घेतो. मग तो त्या गृहस्थाला कोंडून ठेवतो, त्याला मारहाण करतो, त्याचें तोंड दाबून ठेवतो, त्याला ओरडूं देत नाहीं. मी सध्यां महत्त्वाच्या कामांत गुंतलों असल्यामुळें तुझ्या तक्रारीकडे लक्ष देण्यास मला सध्यां फुरसत नाहीं, काम संपल्यावर पाहूं, असें याउपर हा 'पाहुणा' मानभावीपणानें उत्तर देतो.

या रूपकावरूनच प्रश्न उपस्थित होतो तो असाः—या 'पाहुण्या'ला असला उर्मटपणा करणें कशामुळें शक्य होत आहे ? त्यावर उपाय कोणता ?

गृहस्थाच्या घरांतल्या दोन भावांना एकजूट करण्याची बुद्धि होत नाहीं म्हणूनच हा पाहुणा बोकाळला, हें उघड आहे. वडील भाऊ म्हणतो, 'मी धाकट्या भावाला आतांपर्यंत पुष्कळ आर्जविलें, पण तो ऐकतच नाहीं. आतां मी त्याच्या पायां पडणार नाहीं.' धाकटा भाऊ म्हणतो, 'मला या घरांतच निराळा संसार थाटावयाचा आहे, वडिल भावाबरोबर राहून मला जरूर तें स्वातंत्र्य मिळणार नाहीं. निराळा संसार करून आम्हीं दोघे गुण्यागोविंदानें या घरांत नांदूं. त्याच्याबरोबर संयुक्त कुटुंबांत राहण्याची सक्ति कां ? मला विभक्त संसाराची जोपर्यंत परवानगी नाहीं तोंपर्यंत वडील भावाच्या हालांचा मी विचार करणार नाहीं.'

दोघांनाहि 'पाहुणा' नको आहे. दोघांनाहि दाराशीं टपून बसलेला चोर दिसत आहे. दोघांचीं पोरेंबाळें भुकेनें मरत आहेत.

'पाहुण्या'चा आणि चोराचाही प्रश्न कसा सोडवावयाचा हें दोघांनाहि सीरिया व लेबानन मधील मुस्लिम व ख्रिस्ती जनतेनें दाखवून दिलें आहे.

(६-२-४४)

— १८ —

# नागपूरच्या 'कान्होबा'चें आचरट तर्कशास्त्र

यंदांच्या नाट्य-महोत्सवांत मामा वरेरकरांच्या ' सत्तेचे गुलाम ' या नाटकाचा प्रयोग कुठें होणार असेल तर त्यांतील कान्होबाची भूमिका नागपूरचे पु. य. देशपांडे यांना जरूर द्यावी. या भूमिकेसाठीं त्यांनीं जोरानें तयारी चालविली आहे, हें 'सोविएत रशिया व हिंदुस्थान' या विषयावरील त्यांच्या लेखमालेवरून स्पष्ट होतें.

' सोविएत रशिया साम्राज्यशाहीची डावी तटबंदी बनला आहे ' या स्वतःच्या ' नव्या ' ( खरोखरी ट्रॉट्स्कीवादापासून उसन्या घेतलेल्या जुन्यापुराण्या ) सिद्धांताचें समर्थन करण्यासाठीं त्यांनीं पुढील ' कारणां 'ची यादी मांडली आहे:—

(१) रशियाचा हुकुमशहा **स्तालिन** ' जगत्क्रांतीशीं बेइमान ' झाला आहे, कारण त्यानें १९४३ सालीं थर्ड इंटरनॅशनलचें विसर्जन केलें. ' थर्ड इंटरनॅशनलचें ध्येय व धोरण प्रामाणिकपणें साम्राज्यविरोधी व जागतिक क्रांतीचें ' होतें.

पण हा अजब युक्तिवाद ऐकतांच लोक काय म्हणतील हें पु. य. देशपांडे यांना ठाऊक आहे. थर्ड इंटरनॅशनलच्या मार्गदर्शकत्वाखालीं आज जगांतील सर्व देशांच्या कम्युनिस्ट पार्ट्या परिपक्व दशेला येऊन पोंचल्या आहेत, आपापल्या देशांतील जनतेची एकजूट करून क्रांतीच्या मार्गानें तिला पुढें नेण्यास त्या समर्थ झाल्या आहेत. मग यांत ' जगत्क्रांतीशीं बेइमानी ' ती काय झाली ?

नागपुरी कान्होबा एक कोलांटी उडी मारून उत्तर देतातः—

(२) थर्ड इंटरनॅशनलच्या आंतरराष्ट्रीयवादाला व जगत्क्रांतीला १९२४ सालापासूनच ' मूठमाती ' मिळाली आहे, कारण तेव्हांपासून **स्तालिननें** रशियांत समाजसत्तावाद अस्तित्वांत आणण्याचा कार्यक्रम आंखला व हें धोरण थर्ड इंटरनॅशनलच्या गळीं बांधलें. त्या काळापासून ' थर्ड इंटरनॅशनल व सोविएत सरकार यांची अविभाज्य युति ' झाली. ' एका देशांत समाजसत्तावाद ' स्थापन करणें म्हणजे ' राष्ट्रवाद ' होय ! राष्ट्रवादी **स्तालिन** व थर्ड इंटरनॅशनल ' मानवी स्वातंत्र्याचे महान शत्रु ' समजले पाहिजेत !

*　　*　　*

पण लोक कसले वस्ताद ! ते म्हणतातः—

जगाच्या एकषष्ठांश भागांत समाजसत्तावादाची यशस्वी स्थापना झालेली पाहून प्रत्येक देशांतील जनतेला स्फुरण चढत आहे, तिचा आत्मविश्वास दृढ होत आहे, तिला विजयाचा मार्ग स्पष्ट दिसत आहे. सोविएत क्रांतीचें हें आंतरराष्ट्रीय महत्त्व झांकून ठेवण्याची लबाडी कां करतां ?

पु. य. देशपांडे डोके खाजवितात, आणि आपल्या पोंतडींतून पुढील 'युक्तिवादा' ची नवी मात्रा काढतातः—

( ३ ) अहो, सोविएत क्रांति कधींच आंतरराष्ट्रवादी नव्हती. **लेनिन**च्या वेळींसुद्धां नव्हती. ती राष्ट्रीय क्रांतीच होती. 'तिचें जनकत्व जितकें **लेनिन**कडे तितकेंच जर्मन लष्करशाहीकडे होतें.' '**लेनिन**ची भाषा व हेतु विशुद्ध आंतरराष्ट्रवादी होते खरे, पण ध्येयवादी भाषा व पवित्र हेतु म्हणजे वस्तुस्थिति नव्हे'!

कान्होबा एवढ्यावरच थांबत नाहींत. ते पुढें सांगतातः—

( ४ ) सोविएत रशियाला सामाज्यशाहीची डावी तटबंदी बनविल्याबद्दल **लेनि-नलाच** दोषी ठरविलें पाहिजे, कारण '**लेनिननें** सोविएत क्रांतीला पौरस्त्य देशांतील साम्राज्यशाहीविरोधी संघर्षाच्या अग्रेसर आघाडीचें स्वरूप दिलें असतें तर कदाचित आज सोविएत रशियावर जागतिक साम्रज्यशाहीची डावी तटबंदी होऊन बसण्याचा जो लाजिरवाणा प्रसंग गुदरला आहे तो टळला असता. **लेनिन** किंवा इतर कुणीहि हें करूं शकला नाहीं'!

पण **लेनिननें** झारशाही साम्राज्यांतील 'पौरस्त्य' देशांना—साऱ्या उत्तर व मध्य आशियाला—सोविएत क्रांतीच्या झेंड्याखालीं आणलें, त्यांना राष्ट्रीय स्वातंत्र्याचा व समाजसत्तावादाचा अचूक मार्ग दाखविला, हें सर्वांनाच ठाऊक आहे. चिनी राष्ट्रिय क्रांतीची जोपासना सोविएत रशियांतलि क्रांतीनें केली, सोविएत हाच आपला एकमेव दोस्त होय, अशी शिकवण डॉ. **सुन्यत्सेन** यांनीं साऱ्या चिनी जनतेला दिली, पं. जवाहरलाल नेहरू मॉस्कोला जाऊन आल्यानंतरच त्यांना राष्ट्रीय कॉंग्रेसपुढें संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय ठेवण्याची प्रेरणा मिळाली, हा सारा इतिहास प्रत्येकाला ठाऊक आहे. म्हणून याच लेखमालेंत पु. य. कान्होबांना पुनः दोन कोलांट्या मारणें जरूर झाल्यास नवल कोणतें ?

* * *

'पौरस्त्य' देशासंबंधींचें आपलें विधान आपणांवरच उलटणार या जाणिवेनें त्यांनीं त्याच दमांत पुढील विदूषकी कोटी करून टाकली आहे:—

( ५ ) पौरस्त्य लोकांचें राहूं द्या, पण एवढें तर खरें ना कीं **लेनिन-स्तालि-नच्या** जगत्क्रांतींत पाश्चिमात्य कामगारांचाहि समावेश होतो ? झालें तर ! ज्या क्रांतींत पाश्चिमात्य कामगार येतात ती खरी जगत्क्रांतीच नव्हे ! पाश्चिमात्य देशां-

तील सारे कामगार आंतरराष्ट्रवादाचे शत्रु आहेत. तेच साम्राज्यशाहीची खरी डावी तटबंदी आहेत. बिचारा **लेनिन** व सोविएत रशिया 'या पाश्चिमात्य कामगारांच्या जाळ्यांत अडकला'! पाश्चिमात्य कामगारांची 'जीवन-परिस्थिति' दिवसें-दिवस 'सुधारत' आहे. इंग्लंड, फ्रान्स, व जर्मनीचे राज्यकर्ते 'केवळ भांडवलदारांचेच नव्हे तर कामगारांचेहि हितसंरक्षक' बनले आहेत! म्हणून हे कामगार 'प्रतिगामी' समजले पाहिजेत!

**लेनिन**च्या सुप्रसिद्ध सिद्धांताचा बेमालूम विपर्यास करण्यांत या बिनबुडाच्या लेखणीवीरानें कशी हातचलाखी दाखविली आहे पहा! साम्राज्यवादी देशांतील कामगारवर्गाच्या एका लहानशा विभागाला वसाहतींच्या लुटींतील तुकड्यांची लाच मिळाल्यामुळें तेथील कामगारचळवळींत भांडवलदारतर्फी सुधारणावादाचा जन्म झाला, व दिवसेंदिवस जास्त जास्त हाल सोसाव्या लागणाऱ्या बहुसंख्य कामगारांची त्यामुळें दिशाभूल झाली, असें **लेनिन**नें दाखवून दिलें आहे. पण आपण **लेनिन**-पेक्षांहि जास्त प्रतिभासंपन्न आहोंत असें 'सिद्ध' करण्यासाठीं पु. य. देशपांडे पाश्चिमात्य देशांतील साऱ्याच कामगारांना 'प्रतिगामी' ठरवितात! **अॅमरी**च्या हकालपट्टीची मागणी करणाऱ्या बर्मिंगहॅमच्या कामगारांनासुद्धां! मुसोलिनीला पळून जाण्यास लावणाऱ्या मिलान-तुरिनच्या कामगारांनासुद्धां! अर्थात् त्याच वेळीं **चेंबर्लेन**, **दलादिये**, **हिटलर** यांच्या सरकारांना 'भांडवलदारांप्रमाणेंच कामगारांचेंहि हितसंरक्षण' करणारे म्हणून सर्टिफिकेट देण्यास पु. य. देशपांडे यांना कांहींहि शरम वाटूं नये हें साहजिकच आहे.

*　　　　*　　　　*

आणि हे सगळे वार फुसके ठरणार हें माहीत असल्यामुळें ते आपल्या भात्यांतील पुढील अखेरचा बाण काढतातः--

(६) आंतरराष्ट्रवाद हेंच मुळीं 'स्वप्नरंजन' आहे! खरी चूक मार्क्सनेंच केली. 'जगांतील कामगारांनो, एक व्हा' ही घोषणा 'इतिहासानेंच अर्थशून्य' करून टाकली आहे! ज्या अर्थशास्त्रीय सिद्धांताच्या आधारें मार्क्सनें ही घोषणा पुकारली तो सिद्धांतच चुकीचा होता.

मग बरोबर घोषणा कोणती? 'जगांतील सर्व आचरटांनो, लोटवाला शेटजींच्या झेंड्याखालीं एक व्हा', हीच! आणि या घोषणेमागील 'अर्थशास्त्र' कोणतें हें काय सांगायला पाहिजे?

पु. य. नीं सगळें सांगून टाकलें. **स्तालिन** लबाड, **थर्ड इंटरनॅशनल** बरोबर! **थर्ड इंटरनॅशनल** राष्ट्रवादी, **लेनिन**च खरा आंतरराष्ट्रवादी! **लेनिन**सुद्धां पौरस्त्य जनतेच्या बाबतींत बेपर्वा! **लेनिन** भोळा, प्रतिगामी पाश्चिमात्य कामगारांनीं त्याला

वनविलें! आंतरराष्ट्रवादच चूक, मार्क्सला अर्थशास्त्र कळलें नाहीं! कान्होबाचें तर्कशास्त्र पुरें करण्यासाठीं एकच गोष्ट सांगावयाची राहिली—मार्क्स, लेनिन नांवाचे कुणी होऊनच गेले नाहींत! रशिया नांवाचा देशच जगांत नाहीं!

"सोविएत शासनप्रथेचा अखंड विरोध हाच मानवी प्रगतीचा एकमेव मार्ग आहे," हा हिटलरचा सिद्धांत या नागपुरी कान्होबाच्या वकिलीनंतर तरी प्रत्येकाला पटेल, अशी शेवटची आशा फॅसिझमचे पुरस्कर्ते उराशी बाळगून बसले आहेत!

* * *

एक थाप पचविण्यासाठीं दुसरी थाप ठोकून देण्याचें हें तंत्र स्वीकारणें या तत्त्वहीन भाडोत्री प्रचारकांना आजकाल अपरिहार्यच झालें आहे.

जगत्क्रांति, आंतरराष्ट्रीयवाद, साम्यवाद, मानवी प्रगति, यांपैकीं एकाहि गोष्टीशीं या लोकांचा काडीइतकाहि संबंध नाहीं. मानवजातीच्या इतिहासांत ज्याला तुलना नाहीं असा प्राणांतिक स्वातंत्र्य-लढा आज दुनियेच्या रणक्षेत्रांत चालू आहे, अखिल मानवजातीचे कट्टर वैरी असलेल्या फॅसिस्टांचा या लढ्यांत संपूर्ण पराभव व नायनाट होण्याचीं स्पष्ट चिन्हें आज दिसूं लागलीं आहेत, देशोदेशींची जनता प्रतिगाम्यांवर मात करून आपलें भवितव्य आपल्या हातीं घेण्यासाठीं पुढें सरसावते आहे, सर्व जगभर स्वातंत्र्याच्या व अनिरुद्ध प्रगतीच्या नव्या मनूचा अरुणोदय होण्याची वेळ जवळ येऊन ठेपली आहे,—आणि हें सर्व पाहून पु. य. देशपांडे प्रभृति करंट्यांचा जीव घाबरून गेला आहे! मानवी प्रगतीच्या शत्रूंना या सर्व गोष्टी कशा आवडाव्या?

एके काळीं असल्या गोष्टींमुळें पु. य. देशपांडे यांच्या लेखणीला स्फूर्ति मिळत असे. पण 'विशाल जीवन', आणि दिसेल त्या मालकापुढें नोकरीची याचना, या दोहोंचा मेळ घालण्याची अशक्यता त्यांना कळून चुकली. सोविएतची व जगांत जें जें पुरोगामी असेल त्याची कुटाळकी केल्यानें 'नॅशनल वॉर फ्रंट'च्या जाहिराती मिळण्याची खात्री होते, राष्ट्रविरोधी धनिकांचा अखंड पाठिंबा मिळूं शकतो, व स्थानिक काँग्रेसभक्त आपणांला काय किंमत देतात याची चिंता न करणें शक्य होतें, असा त्यांना अनुभव आला. आणि मग त्यांनीं फॅसिस्ट प्रचाराच्या कोलमंडणाऱ्या तटबंदीला आपल्या पोकळ लेखणीचा टेंकू देण्याचा कायमचा निश्चय करून टाकला!

(१३-२-४४)

— ११ —

# 'जगत्क्रांतीची अग्रेसर आघाडी'

हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य कसें मिळेल याची महात्मा गांधींना तळमळ लागून राहिलेली आहे; आजच्या जागतिक स्वातंत्र्याच्या प्राणांतिक युद्धांत हिंदुस्थानला आपली फॅसिस्टविरोधी भूमिका कशी पार पाडतां येईल या विचारानें पं. जवाहरलाल नेहरूंना बेचैन केलें आहे; पण या दोघांपेक्षांहि स्वतःला जास्त कट्टर 'राष्ट्रवादी' समजणारे नागपूरचे पु. य. देशपांडे, मुंबईचे डॉ. चिटणीस, व डंकन रोडचे लोटवाला शेटजी यांची महत्त्वाकांक्षा मात्र त्याहूनहि फार मोठी आहे.

हिंदुस्थानला 'जगत्क्रांतीची अग्रेसर आघाडी' बनविण्याचा त्यांनी निश्चय करून टाकला आहे !

काम फार सोपें आहे. 'जगत्क्रांति' म्हणजे काय? जगत्क्रांति म्हणजे 'सोविएत शासनप्रथेचा अखंड विरोध'! ही 'जगत्क्रांति' घडवूं पाहणारा चेंबर्लेन चकला, हिटलर हरला, पण म्हणून काय झालें ? पु. य देशपांडे तर आहेत ना ?

* * *

पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं या गृहस्थाला 'क्रांतिकारक' म्हणून ('नॅशनल वॉर फ्रंट' खेरीज) कुणीच किंमत देत नाहीं. कॉंग्रेसच्या नांवावर आपली बेगडी 'जगत्क्रांति' विकण्याचा प्रयत्न करून पाहणें त्याला नाइलाजास्तव भाग पडत आहे. आणि म्हणून मसालेदार चिवडेवाल्याच्या तंत्राचा उपयोग करून पु. य. देशपांडे म्हणतातः—

"स्तालिनप्रणीत सोविएत शासनप्रथेचा...अखंड विरोध हाच मानवी प्रगतीचा एकमेव मार्ग आहे. या मार्गावर कॉंग्रेसच्या तेजस्वी नेतृत्वाखालीं हिंदी जनतेनें ... कितीतरी पुढें पाऊल टाकलें आहे." (भवितव्य, ता. २१-१-४४)

कॉंग्रेसनें सोविएत शासनप्रथेला केव्हां विरोध केला ? 'सोविएत शासनसंस्थेचें पूर्ण विसर्जन होईपावेतों मानवी स्वातंत्र्याला डोकें वर काढतां येणें दुरापास्त झालें आहे,' या पु. य. देशपांडे यांच्या किळसवाण्या सिद्धांताला कॉंग्रेसच्या कोणत्या ठरावांत व कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या कोणत्या भाषणांत पाठिंबा मिळतो ?

खरी गोष्ट अशी आहे कीं, सोविएतचा उदो करणारे टागोर, नेहरू, सरोजिनी नायडू वगैरे लोक 'जगत्क्रांती'च्या मार्गातले कांटे आहेत हेंच पु. य. देशपांडे

यांना सांगावयाचें आहे. सोविएत राज्याविषयीं सहानुभूति बाळगणारी काँग्रेस 'जगत्क्रांती'ची विरोधक आहे हेंच त्यांना म्हणावयाचें आहे. आणि हें खुबीदार रीतीनें सांगण्यासाठींच त्यांनीं 'सोविएत रशिया व हिंदुस्थान' ही लेखमाला लिहिली आहे.

*　　　*　　　*

'काँग्रेसची ऑगस्ट घोषणा' ही 'जगत्क्रांतीचीच घोषणा' झाली आहे असें पु. य. म्हणतात.

त्यांच्याच विचारसरणीप्रमाणें पाहतां या ऑगस्ट घोषणेंत सोविएत शासन-संस्थेचा अखंड विरोध व सोविएत राज्याच्या विसर्जनाची मागणी हे मुख्य मुद्दे असले पाहिजेत.

पण वस्तुस्थिति काय आहे? सोविएत रशियांत जर्मन फौजांना त्यावेळीं मिळ-णाऱ्या तात्पुरत्या विजयांबद्दल त्या ठरावांत अत्यंत चिंता व्यक्त करण्यांत आली आहे व रशियन जनतेनें आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठीं चालविलेल्या शौर्ययुक्त लढ्याचा कृतज्ञतापूर्वक गौरव करण्यांत आला आहे. 'जगत्क्रांती'च्या बाबतींत पु. य. देशपांडे यांचें जें मत आहे तेंच जर काँग्रेसचें असतें तर या ऑगस्ट ठरावांत काँग्रेसनें **हिटलर**च्या हातून होत असलेल्या 'सोविएत शासनसंस्थेच्या विसर्जनाचें' उत्साहानें स्वागतच केलें असतें. काँग्रेसनें तसें न करतां नेमकें उलट केलें. कां? कारण काँग्रेस फॅसिस्टविरोधी आहे, आणि फॅसिस्टांचा नायनाट करण्यासाठीं अद्वितीय त्याग व पराक्रम करणाऱ्या सोविएतविषयीं तिला आपुलकी वाटणें साह-जिक आहे. 'योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचा प्रणेता' म्हणून **हिटलर**ला शाबासकी देणाऱ्या पु. य. देशपांडे सारख्याशीं काँग्रेसचें कधींच जुळणें शक्य नाहीं.

*　　　*　　　*

थोड्याच दिवसापूर्वी स्वतः पु. य. देशपांडे यांची जगत्क्रांतीविषयींची कल्पना अगदीं निराळी होती. मे १९४२ मध्यें त्यांनीं पुढील उद्गार काढले होतेः—

"या महायुद्धाला क्रांति आणि प्रतिक्रांति, प्रगति आणि अधोगति, या परस्पर विरुद्ध सामाजिक शक्तीमधील जागतिक संघर्षाचें विराट स्वरूप आलें आहे. सोव्हि-यट संघाच्या खांद्याला खांदा लावून जागतिक फॅसिझमच्या पूर्ण विध्वंसासाठीं सर्वस्व पणाला लावणें, हाच या मे-दिनाचा दिव्य संदेश आहे!"

पण तो 'दिव्य' संदेश आतां पु. य. स्वतः विसरून गेले आहेत. कामगार-वर्गाची आंतरराष्ट्रीय एकजूट हेंच आतां थोतांड समजणाऱ्या पु. य. ना कसला आला आहे 'मे-दिन', आणि त्याचा 'दिव्य' संदेश? त्यांचा ताजा संदेश

'सोविएतचा नायनाट करा' हा आहे. बर्लिनचा रेडियो, इंग्लंड-अमेरिकेंतील प्रतिगामी साम्राज्यवाद्यांचीं पत्रें, यांचाहि संदेश हाच आहे.

आणि या फॅसिस्ट प्रचाराला नव्या तऱ्हेनें हातभार लावण्यासाठींच पु. य. नीं 'अग्रेसर आघाडी 'ची टूम काढली आहे. स्वस्त लोकरंजनाच्या शिळ्या तंत्राचाच हा एक भाग आहे, हें कुणाच्याही लक्ष्यांत येईल. आपला देश जगत्क्रांतींत भाग तर घेतच आहे, पण त्याखेरीज तो या क्रांतीत इतर सर्व देशांच्या पुढें आहे, अशी खुशामतीची भाषा वापरतांच लोक खुलतील, आणि सहज आपल्या जाळ्यांत सांपडतील अशी पु. य. ना आशा वाटते. इसापनीतींतील कावळ्याच्या व कोल्ह्याच्या गोष्टीची पुनरावृत्ति होण्यावर त्यांनीं भिस्त ठेवली आहे.

*  *  *

पण हिंदुस्थानांतले लोक त्या कावळ्यासारखे भोळे का आहेत? सोविएतची नालस्ती करण्यासाठींच व फॅसिस्टांच्या जाळ्यांत आपणांला अडकवण्यासाठींच या कोल्ह्यानें आपणांला हरभऱ्याच्या झाडावर चढविण्याचा हा प्रयोग चालविला आहे, हें हिंदी जनतेच्या सहज लक्ष्यांत येईल.

फॅसिस्टांशीं न लढतां 'जगत्क्रांति' घडवून आणा, असें हा कोल्हा म्हणतो! फॅसिस्टांविरुद्ध अतुल शौर्यानें लढणाऱ्या व त्यांचा नायनाट करणाऱ्या सोविएत राज्याचें विसर्जन करा, असें हा कोल्हा 'जगत्क्रांती'चें नांव घेत निर्लज्जपणें सांगतो! हिंदुस्थानदेश फॅसिस्ट प्रतिक्रांतीची पिछाडीची तटबंदी बनावा, हाच खरोखरी त्याचा उद्देश आहे यांत काय संशय?

आणि त्याच्या तंत्रांत नाविन्यहि कांहीं नाहीं. 'जगत्क्रांती'चा मंत्र मुखानें जपत सोविएत राज्याच्या पाठींत दगलबाज सुरा खुपसू पाहणारा **ट्रॉट्स्की** एकदां होऊन गेला. पु. य. देशपांडे प्रभृति लोक त्या **ट्रॉटस्कीचे** वारसदार व **हिटलर-टोजोचे** सोयरे आहेत. टागोर-नेहरूंच्या हिंदुस्थानशीं त्यांचा काडीइतका संबंध नाहीं.

(२०-२-४४)

---

~ २० ~

# मुंबईचे मेयर, कीं टाटाचे नोकर ?

**मिनू मसानी** मुंबईचे मेयर आहेत. कॉंग्रेस म्युनिसिपल पक्षांत त्यांच्या व्यतिरिक्त दुसरा पारशी सभासद नव्हता, म्हणून डॉ. गिल्डर यांच्या रिकाम्या जागेवर त्यांचीं वर्णी लागली. पण **मिनू मसानी हे टाटाचे** लठ्ठ पगारदार नोकरही आहेत. त्यांच्या 'कॉंग्रेस सोशालिस्ट' भूमिकेला ही नोकरी अगदीं साजेशीच आहे यांत शंका नाहीं. पण ही नोकरी इमानें इतबारें बजावतांना त्यांनीं परवां व्ही. जे. टी. इन्स्टिटयूटमध्यें टाटा–बिर्ला आर्थिक योजनेची जी रसभरित तरफदारी केली ती पाहून मुंबईच्या बऱ्याच नागरिकांना शिसारी आली असली पाहिजे. 'बॉम्बे सेंटिनल' पत्रांत एका नागरिकांचे यासंबंधीं पत्र प्रसिद्ध झालें असून त्यांत तो म्हणतोः–

"फिरोजशहा मेहतांच्या उच्च गादीवर विराजमान झालेला मुंबईचा मेयर आपल्या मालकाच्या कांहीं आर्थिक कल्पनांची जाहिरात करीत बसतो हें दृश्य पाहून मुंबईला धक्काच बसेल, आणि काय ही नागरिकत्वाची विटंबना असे उद्गार तिच्या तोंडून निघतील."

* * *

**मसानींच्या** सोविएतविरोधी फूत्कारांचा किळस येऊन मुंबईच्या 'नूतन गुजरात' या कॉंग्रेसपक्षीय दैनिकानें त्यांना 'मानसिक विकृति' झाली असल्याचें रोखठोकपणें सांगून टाकलें आहे. "ब्राह्मणी वटले त्यारे तरकने जाय" या अर्थपूर्ण गुजराती म्हणीची आठवण देऊन या पत्रानें माजी सोशालिस्ट **मसानी** माजी सोशालिस्ट **हिटलर, मुसोलिनी, मॉस्ले,** वगैरेंच्या मार्गानें जाणार अशी शंका व्यक्त केली आहे.

मसानींना खरोखरच 'मानसिक विकृति' झाली असेल तर ती त्यांना ठाण्याच्या इस्पितळांत पाठवून सुधारण्यासारखी खास नाहीं. **झोयाचें** प्रेत कैक आठवडे फांशीच्या खांबावर लटकत ठेवणाऱ्या व त्यावर बलात्कार करणाऱ्या नात्सी गुंडांची मानसिक विकृति, आणि लाल सेनेच्या विजयी मोर्च्यांमुळें अंगाचा तिळपापड होणाऱ्या मसानींची मानसिक विकृति, या दोहोंचें मूळ एकच आहे. पिळणुकीच्या व जुलुम-

शाहीच्या हजारों वर्षांच्या अंधकारांतून दुनिया मुक्त होत असलेली पाहून या दिवा-भीतांच्या तोंडचें पाणी पळालें आहे, त्यांत सारा विवेक नष्ट झाला आहे.

* * *

जनतेचा मोर्चा थोपवून धरण्यासाठीं मसानींनीं कांहीं दिवस समाजसत्तावादाचा कावेबाज बुरखा घेऊन पाहिला. कॉंग्रेस सोशालिस्ट पार्टी जपानी फॅसिझमची बटीक होण्याच्या अवस्थेपर्यंत येऊन पोहोंचली आहे एवढी खात्री करून घेतल्यानंतर मसानींनीं आपल्या अवतारकार्याचा एक भाग तडीस गेला असें समजून त्या पार्टीचा राजीनामा दिला, व राजकारणाच्या संन्यासाची तात्पुरती बतावणी केली. योग्य वेळ येतांच हें ' इंटर्व्हल ' संपल्याचें जाहीर करून त्यांनीं आपल्या तमाशाच्या नव्या अंकाला आतां उत्साहानें सुरुवात केली आहे.

खरे सोशालिस्ट कोण, या प्रश्नाला मिनू मसानी आतांपर्यंत ' नेति, नेति ', अशा स्वरूपाचें उत्तर देत असत. स्तालिन सोशालिस्ट नव्हे, तो हुकुमशहा आहे! नेहरू सोशालिस्ट नव्हेत, ते रशियाची स्तुति करतात आणि जपानचा धिःक्कार करतात! पण जगांतील खरे सोशालिस्ट म्हणून स्वतःकडे आणि ( जयप्रकाश नारायणांचा ' डळमळीतपणा ' निर्धारानें हाणून पाडल्यानंतर) जयप्रकाश प्रभृति कॉंग्रेससोशालिस्टांकडेच त्यांना बोट दाखवावें लागत असे. त्यामुळें अर्थात् फारच थोड्यांचें समाधान होण्यासारखें होतें. पण आतां मसानींना ही आपत्ति नाहींशी झाल्यासारखी वाटत आहे. खरे सोशालिस्ट तुम्हांला पाहावयाचे असतील तर लंडनवासी पोलंडच्या मंत्रिमंडळाकडे नजर वळवा, असें मसानींनीं परवां व्ही. जे. टी. इन्स्टिटयूटमधील भाषणांत मुंबईच्या विद्यार्थ्यांना विजयी मुद्रेनें सांगून टाकलें.

* * *

जयप्रकाश नारायण यांना पंचमदळी म्हणणें आणि लंडनवासी पोलिस सरकारला फॅसिस्ट म्हणणें या दोन्ही गोष्टी सारख्याच आहेत व त्या कम्युनिस्टच करूं जाणेत, असें जाहीर करून स्वतः मसानींनीच जयप्रकाश नारायणांचें खरें स्वरूप आपल्या तोंडांनीं उघडें करून दाखविलें आहे हें बरें झालें. मसानींनीं जयप्रकाश नारायण व लंडनवासी पोलिश सरकार यांना एकाच माळेंत गोंवून व दोघांची सारखीच किंमत करून फारच औचित्य साधलें आहे यांत शंका नाहीं.

या पोलिश सरकारची स्तुति हिंदी लोकांना रुचावी म्हणून मसानींनीं त्याच्या-विषयीं अशी माहिती दिली कीं या सरकारांत तीन सोशालिस्ट आहेत, दोन खिश्चन लेबर पार्टीचे मंत्री आहेत, आणि स्वतः मुख्य प्रधान तर शेतकरी पक्षाचे आहेत! मॅकडोनाल्ड, ॲटली, वगैरेंचीं नांवें मुंबईच्या विद्यार्थ्यांनीं कधी ऐकलींच नसतील असा ही माहिती देताना मसानींचा समज असावा. युद्धपूर्वकाळापासून आजपावेंतों

हिटलरशीं निकटचे धागेदोरे असलेल्या प्रतिगामी जमीनदारांचें हें सरकार आहे, ही गोष्ट टाटाच्या या 'सोशालिस्ट' जाहिरात-एजंटानें निर्लज्जपणें लपवून ठेवली. श्वेत-रशियाचा व युक्रेनचा पश्चिम टापू आणि लिथुअनियाची राजधानी विल्नो वीस वर्षें-पर्यंत आपल्या टांचेखालीं ठेवणाऱ्या व अजूनहि ठेवूं पाहणाऱ्या साम्राज्यवाद्यांचें हें सरकार आहे, हिटलरचा हल्ला होतांच हें सरकार भेकडपणानें पळून गेलें व पोलंडच्या जनतेनें हिटलरशीं जी शौर्याची झुंज केली ती या सरकारला न जुमानतांच केली, ही गोष्ट मसानींनीं खुशाल लपवून ठेवली.

परवां येथील प्रोग्रेसिव्ह ग्रूपपुढें भाषण करतांना पोलंडच्या चीनमधील वकिलातीचे एक अधिकारी मि. किट्टे यांनासुद्धां पोलिश सरकारच्या भूमिकेचें समर्थन करण्याचें धैर्य झालें नाहीं. पोलंडनें हिटलरला केलेल्या प्रतिकाराविषयीं बोलतांना त्यांनीं पोलिश जनतेचाच गौरवपूर्ण उल्लेख केला, पोलिश सरकारला एका शब्दानेंहि धन्यवाद देण्याचें त्यांनीं टाळलें. पण मसानी मात्र या पोलिश सरकारची वकिली करण्यासाठीं धर्मवीराच्या उत्साहानें पुढें सरसावले आहेत.

हजारों कामगार-शेतकऱ्यांना तुरुंगांत डांबून ठेवणाऱ्या आणि हिटलरच्या प्रचाराची इमानें इतबारें पोपटपंची करणाऱ्या 'शेतकरी पक्षाच्या' पोलिश मुख्य प्रधानाला पाठिंबा द्या, आणि पश्चिम श्वेतरशियांतील व पश्चिम युक्रेनमधील शेत-कऱ्यांना पोलिश जमीदारांच्या जोखडापासून मुक्त करणाऱ्या सोविएत सरकारला विरोध करा, असें मसानी आर्जवून सांगत आहेत. टाटा कंपनी, अॅमरी कंपू, पोलंडचे जमीनदार, आणि हिटलर-गोबेल्स-सारेजण मसानींना या कामगिरी-बद्दल सप्रेम धन्यवाद देतील.

* * *

हिंदुस्थानला ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या कचाट्यांतून मुक्त करण्याचा बहाणा करणारे मिनू मसानी पश्चिम श्वेतरशियाला व पश्चिम युक्रेनला जर्मन व पोलिश फॅसिस्टांच्या तावडींतून मुक्त झालेला पाहून मात्र अत्यंत दुःखित झाले आहेत, आणि आपलें सोंग तात्पुरतें विसरून जाऊन ते पोलिश सरकारच्या ब्रिटिश साम्राज्य-वादी पाठीराख्यांच्या सुरांत आपला सूर उत्साहानें मिळवीत आहेत.

सोविएत घटनेंतील नव्या फेरबदलाविरुद्ध ब्रिटिश प्रतिगामी साम्राज्यवाद्यांचे आक्षेप जगापुढें मांडण्याचें कार्य स्वतः मसानींनींच आपल्या शिरावर कां घ्यावें, हें यावरून कुणालाहि सहज कळून येईल. फिनलंडचें प्रतिनिधित्व कॉ. कुसिनिन करीत असेल तर हिंदुस्थानचें प्रतिनिधित्व सर रामस्वामी मुदलियार यांनीं करण्यास हरकत कोणती, असा ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचा सवाल आहे. हा निर्लज्ज सवाल स्तालिनला विचारण्याचें त्यांना स्वतःला धैर्य होत नाहीं, कारण स्तालिनचें उत्तर

काय येणार हें त्यांना ठाऊक आहे. म्हणून हा सवाल विचारण्याची कामगिरी त्यांनीं मसानींवर सोंपविली व मसानींनीं ती आनंदानें पत्करली! व्ही. जे. टी. इन्स्टिटयूट-मध्यें केलेल्या भाषणांत मसानींनीं हा सवाल सारी लाजलज्जा गुंडाळून सभेपुढें मांडला.

सारें आयुष्य ज्यांनीं क्रांतीला वाहिलें व त्यासाठीं अनंत कष्ट सोसले, तुरुंगवास भोगला व फॅसिस्टांच्या फांसावर लटकण्याचीहि पर्वा केली नाहीं, त्या **कुसिसिन** व **दिमित्रोव** सारख्या कम्युनिस्ट कामगारांची मुदलियार सारख्याशीं तुलना करण्याचा किळसवाणा आचरटपणा मसानींसारखे टाटासेवक कॉंग्रेस सोशालिस्टच करूं जाणेत!

जगांतील सर्व प्रतिगाम्यांच्या विरुद्ध प्रत्येक देशांतील जनतेनें चालविलेल्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत मसानीसारख्यांची सहानुभूति प्रतिगाम्यांनाच आहे हें यावरून उघड होतें. मात्र हें त्यांच्या वैयक्तिक 'मानसिक विकृती'चें लक्षण नसून प्रतिगाम्यांच्या जुन्या दुनियेच्याच असाध्य रोगाचें लक्षण आहे. जनतेचा विजयी मोर्चा या जुन्या दुनियेबरोबर तिच्या या उरल्यासुरल्या कुजक्या आधारस्तंभांचाहि चक्काचूर करून टाकल्याशिवाय राहणार नाहीं.

(२७-२-४४)

---

## २१

# रुक्मिणी-स्वयंवरांत 'नवा काळ'ला न दिसलेला कृष्ण

कॉमन्स सभेंत चर्चिलनें केलेल्या भाषणावरील पंचमदळाचा अभिप्राय इंग्लंडमधील इंडिपेंडंट लेबर पार्टीचे **मॅकगव्हर्न** यांच्या उद्गारांत व्यक्त झाला आहे. **चर्चिल स्तालिनचे** पोपट बनले आहेत असें या ट्रॉट्स्कीवाद्यानें सांगून टाकलें! इथल्या ट्रॉट्स्कीवादी 'धनुर्धारी' पत्रानेंहि अर्थात् याच मताची री ओढली आहे. **चर्चिलला स्तालिनचा** पोपट किंवा कळसूत्री बाहुलें कां म्हणावयाचें? कारण **चर्चि-**

लनें पोलंड, युगोस्लाव्हिया, वगैरेंच्या बाबतींत त्या देशांतील प्रतिगाम्यांना व त्यांच्या ब्रिटिश पाठराख्यांना आश्रय देण्याचें सोडून दिलें व सोविएतच्या दृष्टिकोनाला पाठिंबा दिला! पंचमदळी ट्रॉटस्कीवाद्यांना हें चर्चिलचें भयंकर पाप वाटलें. चर्चिलनें जर पोलंडमधील प्रतिगामी फॅसिस्टधार्जिण्या गटाला व युगोस्लाव्हियाच्या फॅसिस्ट मिखाइलोविचला उचलून धरण्याचें चालू ठेवलें असतें, तर या ब्रिटन व हिंदुस्थानमधील ट्रॉटस्कीवाद्यांनीं चर्चिलचें अभिनंदनच केलें असतें. पण सोविएत यूनियनच्या लाल सेनेचा विजयी मोर्चा व यूरोपमधील जनतेचा प्रतिगाम्यांविरुद्ध यशस्वी उठाव ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचीं प्रतिगामी कारस्थानें व सुखस्वप्नें धुळीस मिळवीत आहे, ही गोष्ट पाहून या जनता-शत्रूंना आनंद कां व्हावा!

* * *

हिंदुस्थानांतील बहुतेक देशभक्तांवर चर्चिलच्या भाषणाचा याच्या नेमका उलटा परिणाम झाला. लाल सेनेच्या पराक्रमाचा व त्यागाचा फायदा घेऊन यूरोप आपल्या मुठींत ठेवावयाचा, हा ब्रिटिश प्रतिगामी साम्राज्यवाद्यांचा डाव यापुढें अशक्य होत जात असल्याचा स्पष्ट पुरावा चर्चिलच्या या भाषणांत हिंदी देशभक्तांना दिसत आहे व स्वतःच्या देशाच्या भवितव्याच्या दृष्टीनें त्यांना हें सुचिन्हच वाटत आहे. तथापि यालाहि कांहीं अपवाद आहेतच. कांहीं देशभक्तांना नैराश्यानें इतकें घेरून टाकलें आहे कीं जगांत कांहीं चांगलें होणें शक्य आहे यावर त्यांचा विश्वासच बसत नाहीं. स्वतःच्या देशांतील परिस्थितीविषयीं अगतिकपणाची भूमिका घेण्यांत धन्यता मानून, ते याच भूमिकेवरून जगांतील सर्व घडामोडींकडे पाहात असतात. पराजयवादाच्या काळ्या चष्म्यांतून जगाकडे पाहतांना त्यांना एक प्रकारचें समाधान होत असतें; कारण स्वतःच्या निष्क्रिय राजकारणाचें समर्थन त्यांना या अंधकारमय दुनियेंत आढळतें.

‘ नवा काळ ’चा ता. १ मार्चचा अग्रलेख या दूषित-मनोवृत्तीचें एक मासलेवाईक उदाहरण आहे. स्तालिनचा पोपट झाल्याबद्दल चर्चिलला दोष देणारी पंचमदळी ओरड ‘ नवाकाळ’ला अर्थात् मान्य नाहीं. चर्चिलच्या भाषणांत ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या पिछेहाटीचा पुरावा दिसला असता तर ‘ नवाकाळ ’ला आनंदच झाला असता असें धरून चालण्यास हरकत नाहीं; पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं या गांधीवादी देशाभिमानी पत्राला चर्चिलचें हें भाषण ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या विजयाचेंच द्योतक वाटत आहे!

* * *

पोलंडच्या प्रश्नाबाबत रशियाला सहानुभूति दाखवून पूर्व यूरोपमध्यें चर्चिलनें रशियाला मोकळें रान कां दिलें, तसेंच पोलंडला रशियाची कर्झन लाइनची मागणी

साफ धुडकावून लावण्याचें धैर्य कसें झालें, असे दोन प्रश्न उपस्थित करून ‘ नवा काळ’नें त्याचें उत्तर पुढीलप्रमाणें दिलें आहे:—

“ पूर्व यूरोपांत रशियाला मोकळें रान एक प्रकारें देऊन पश्चिम आणि मध्य यूरोपांत इंग्लंडच्या अग्रपूजेचा मार्ग मि. चर्चिल यांनीं निष्कंटक केला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं……

“ इंग्लंडच्या तोंडाकडे पहात पोलंड विरोधाचा सूर वाढवत आहे हें लक्ष्यांत घेतलें तर पूर्व यूरोप विरुद्ध रशिया या वादांत मध्यस्थाची भूमिका इंग्लंडकडे येणार अशीं लक्षणें दिसत आहेत… …

“ मध्य किंवा पश्चिम–यूरोपांत निर्विवाद अग्रपूजा आणि यूरोपांत मध्यस्थ या नात्याचा चंचुप्रवेश या गोष्टी दोस्तांनीं युद्ध जिंकल्यानंतर इंग्लंडकडे सांप्रतच्या धोरणामुळें चालत आल्यास त्यांत नवल कसलें ? ”

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आमच्या डोक्यावर बसलेले ब्रिटिश साम्राज्य-वादी यूरपमध्येंहि प्रबळ होऊं पाहात आहेत ! आमच्या देशाचें भवितव्य जितकें काळेकुट्ट आहे तितकेंच यूरपचेंहि आहे ! आणि आमच्यावर अगोदरच एवढी शिर-जोरी गाजविणाऱ्या या साम्राज्यवाद्यांच्या हातीं सारा यूरप आल्यावर तर आमची अगतिकता अधिकच वाढणार यांत ‘ नवल कसलें ’ ? अशा परिस्थितींत आम्ही कितीहि धडपड केली तरी तिचा काय उपयोग ?

आपल्या ’ विषाद योगा’चें समर्थन करण्यासाठीं अर्जुनानें कृष्णापुढें मांडलेल्या ‘ बिनतोड ’ युक्तिवादाचीच ही नवी आवृत्ति आहे.

* * *

‘ नवाकाळ ’कारांच्या ‘ व्यामोहा ’चें मूळ त्यांच्या याच लेखांत स्पष्टपणें नजरेस पडतें. त्यांच्या मतें यूरोपच्या ‘ अग्रपूजेसाठीं ’ सध्यां तीन उमेदवार पुढें आले आहेत. यांपैकीं एक उमेदवार जर्मनी पुरी आपटी खाणार याविषयीं आतां शंका उरली नाहीं. उरलेले दोन उमेदवार कोणते ? इंग्लंड व रशिया हेच ! पण **स्तालिन**नें यूरपची अग्रपूजा आपणांला नको म्हणून नुकतेंच जाहीर केलें आहे, शिवाय पूर्वेकडे सैबिरियांत त्याला ‘ व्यापक वाव ’ आहे, आणि तिसरी गोष्ट म्हणजे पोलंडच्या वादांत रशियाविषयीं सहानुभूति दाखवून **चर्चिलनें स्तालिनला** उपकृत करून ठेवलें आहे ! म्हणून पश्चिम व मध्य यूरपमध्यें इंग्लंडची प्रत्यक्ष अग्रपूजा व पूर्व यूरपमध्यें सुद्धां मध्यस्थीच्या द्वारें इंग्लंडची अप्रत्यक्ष अग्रपूजा मान्य करण्यास **स्तालिन**ची हरकत नाहीं !

पण एक साधी गोष्ट ‘ नवाकाळ ’कार अजिबात विसरले, यूरपच्या रुक्मिणी-स्वयंवरांतला कृष्णच त्यांना दिसला नाहीं ! यूरपच्या अग्रपूजेचा खरा हक्कदार कोण

आहे ? यूरपची जनताच. ही जनता पोलंडमध्यें, फ्रान्समध्यें, युगोस्लावियामध्यें, इट-लीमध्यें, बाल्कन टापूंत, साऱ्या यूरपभर डोकें वर काढीत आहे. दर दिवसागणिक तिचें पाऊल एकसारखें पुढें पडत आहे. तिला दडपून टाकण्यासाठीं सर्व प्रकारच्या प्रतिगाम्यांनीं चालविलेली धडपड निष्फळ ठरत आहे. जिथें बदोग्लियोसारखे प्रति-गामी अजून टिकून आहेत तिथें त्यांच्या पायाखालची भुसभुशीत जमीन जनता–आंदो-लनाच्या महापुरांत वाहून चालली आहे व त्यांच्या अधःपाताचा क्षण जवळ येऊन ठेपत आहे. यूरपच्या स्वयंवरांतील या विजयोन्मुख उमेदवाराची ‘ नवाकाळ ’ला आठवणच राहिली नाहीं ! ‘ स्वयंवर मोडलें, आमचाच विजय झाला ’ अशी बढाई पाहिजे तर यूरपचे प्रतिगामी खुशाल मारोत, पण ‘ नवाकाळ ’कारांनींहि त्याच भ्रमाला बळी पडावें हें आश्चर्य नाहीं का ?

*　　　　*　　　　*

सोविएतला यूरोपच्या अग्रपूजेचा मान नको आहे, ही स्तालिनची घोषणा अगदीं सत्य आहे. पण तिचा अर्थ काय ? दोस्तराष्ट्रांतील प्रतिगाम्यांच्या हातीं यूरपची मान देण्यास आपली हरकत नाहीं हेंच स्तालिनला सांगावयाचें होतें काय ? मुळींच नाहीं. प्रत्येक देशांतील जनतेला आपलें भवितव्य आपल्या इच्छेप्रमाणें ठरविण्यास संपूर्ण स्वातंत्र्य असावें; हें सोविएत युद्धनीतीचें मुख्य सूत्र आहे. सोविएत यूनियनच्या मूल-भूत राजकीय सिद्धांत-प्रणालींतूनच या सूत्राचा जन्म झाला आहे व सोविएतच्या गेल्या २३ वर्षांच्या परंपरेशी तें पूर्णपणें सुसंगत आहे. पोलंड, यूगोस्लाविया, वगैरेंच्या बाबतींत सोविएतनें घेतलेली भूमिका या सूत्राला अनुसरूनच आहे. यूरोपच्या व साऱ्या जगाच्या अग्रपूजेचा मान जनतेला मिळाला पाहिजे, हेंच स्तालिनचें म्हणणें आहे. ही घोषणा कितपत अंमलांत येऊं शकेल असा प्रश्न विचारणाऱ्या संशयात्म्यांना चर्चिलचें भाषण हें उत्तर आहे. यूरोपचें काय करावयाचें, हें ठरविण्याचें सामर्थ्य आतां प्रतिगाम्यांच्या हातीं राहिलें नसून जनतेच्या मोर्च्यापुढें प्रतिगाम्यांची एक-सारखी पीछेहाट होत जाणार, हा चर्चिलच्या भाषणाचा खरा अर्थ आहे. पोलंडच्या प्रतिगामी सरकारची पोलंडमध्येंच इतकी नाचक्की झाली आहे कीं त्याच्या पाठीमागें पोलिश जनतेचा एक लहानसा विभागहि उभा राहावयास तयार नाहीं; असल्या दिवाळखोरांना हाताशी धरून ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना कोणताहि डाव साधतां येणार नाहीं हें उघड आहे, व चर्चिलला याची पुरेपुर जाणीव झाली आहे हेंच त्याच्या भाषणावरून दिसून येतें.

*　　　　*　　　　*

जनतेच्या सामर्थ्यावर आधारलेली सोविएतची ही राजनीति ‘ नवाकाळ ’ सारख्यांच्या लक्ष्यांत येऊं नये याचें कारण काय ? रशियाला ‘ निम्मा पोलंड ’

पाहिजे, असा आरोप करणें व नंतर तो 'केवळ सुरक्षिततेच्याच दृष्टीनें' पाहिजे असें सांगून त्या आरोपाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न करणें 'नवाकाळ'ला कां जरूर वाटतें? हा खरोखरी 'निम्मा पोलंड' नसून 'निम्मा युक्रेन व श्वेतरशिया' आहे या साध्या गोष्टीचा त्याला विसर कां पडावा? १९३९ अखेरीस हा पश्चिम यूक्रेन व पश्चिम श्वेतरशियाचा भाग सोविएतनें परत ताब्यांत घेतला तेव्हां पं. जवाहरलाल नेहरूंसारख्यांनीं आपला हर्ष जाहीरपणें व्यक्त केला, मग ही आपल्या देशभक्तांची परंपरा 'नवाकाळ'नें आज नजरेआड कां करावी?

कारण एकच आहे. आपल्या देशाला आजच्या भयंकर प्रसंगांतून सोडविण्याचें सामर्थ्य आपल्या जनतेंत आहे, हें 'नवाकाळ'च्या मनोवृत्तीच्या देशभक्तांना आज नैराश्याच्या भरांत दिसेनासें झालें आहे. मग यूरपची जनतासुद्धां त्यांच्या हिशेबांत नसावी यांत नवल कोणतें? आपल्या प्रतिपक्ष्याच्या सामर्थ्याविषयीं यामुळेंच त्यांनीं अवास्तव कल्पना करून घेतली आहे. जर आपल्या राष्ट्रीय चळवळीच्या उज्ज्वल परंपरेला जागून ते आपल्या जनतेची एकजूट घडवून आणण्याच्या व तिचें पूर्ण सामर्थ्य उपयोगी आणण्याच्या उद्योगास लागतील, तरच देशांतील व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील घडामोडींविषयींचा त्यांचा नैराश्यवादी व्यामोह नाहींसा होईल, त्यांचा आत्मविश्वास वाढेल, व यूरपच्या जनतेबरोबर हिंदी जनतेच्याहि स्वातंत्र्याचा दिवस जवळ आणण्यास त्यांच्या हातून खरीखुरी मदत होईल.

(५-२-४४)

— २२ —

# डॉ. जयकर व सोविएत रशिया

सोविएत देश व बाकीच्या जगांतील जनता यांच्या दरम्यान साम्राज्यवाद्यांच्या लबाड प्रचारानें उभी केलेली दूषित पूर्वग्रहांची भिंत सध्यांच्या महायुद्धांत अजिबात कोसळून पडली आहे. दुनियेला गिळूं पाहणाऱ्या हिटलरी राक्षसांचें निर्दालन करण्यास आत्मविश्वासानें पुढें सरसावलेला व या कार्यांत आश्चर्यकारक यश मिळविणारा

हा देश आहे तरी कसा, त्याच्या सामर्थ्याचें रहस्य काय, असा प्रश्न जो तो विचारीत आहे व त्याचें खरें उत्तर दडवून ठेवणें आतां कुणालाहि शक्य राहिलें नाहीं.

हिंदुस्थानांतील विचारवंत याला अपवाद कसे ठरणार? सोविएतची मुक्तकंठानें स्तुति करणाऱ्या टागोर, नेहरू, वगैरेंच्या जोडीला आतां नामदार डॉ. जयकर अभिमानानें येऊन उभे राहिले आहेत हें साहजिकच म्हटलें पाहिजे. श्री. के. एस्. हिर्लेकर यांनीं संपादित केलेल्या ' सोविएत रशिया—धी सीक्रेट ऑफ हर सक्सेसेस ' नांवाच्या ग्रंथाला डॉ. जयकर यांनीं मार्मिक प्रस्तावना लिहिली असून गेल्या पंचवीस वर्षांतील सोविएत जनतेच्या सर्वांगीण प्रगतीविषयीं त्यांनीं अत्यंत उत्साहयुक्त प्रशंसोद्गार काढले आहेत.

आजचा हिंदुस्थान व झारशाहीच्या काळांतील रशिया यांचा तोंडवळा दारिद्र्य, अज्ञान, हालअपेष्टा, पिळणूक, वगैरेंच्या बाबतींत कसा सारखा होता हें सांगून डॉ. जयकरांनीं शेती, उद्योगधंदे, विविध राष्ट्रगटांचा समान दर्जा व स्नेहभाव, सांस्कृतिक जीवन, वगैरे बाबतींत सोविएत क्रांतीनंतरच्या काळांत रशियामध्यें निर्माण झालेल्या नव्या दुनियेकडे वाचकांचें लक्ष वेधलें आहे. इतर देशाकडून किंचित्हि बौद्धिक किंवा आर्थिक साहाय्य न घेतां रशियाच्या जनतेनें स्वतः पद्धतशीर योजना आंखून ही प्रगति साध्य केली या मुद्द्यावर त्यांनीं विशेष जोर दिला आहे.

सोविएत रशियापासून हिंदुस्थाननें घ्यावयाचा सर्वांत महत्वाचा धडा कोणता? डॉ. जयकर म्हणतात—

" हिंदुस्थानच्या दृष्टीनें पाहतां रशियाच्या राज्यघटनेचें सर्वांत महत्त्वाचें वैशिष्ठ्य म्हणजे ह्या देशांत १६ घटक-राज्यें आहेत व यांपैकीं प्रत्येक घटक-राज्य अनेक निरनिराळ्या राष्ट्रगटांच्या स्वायत्त घटकांचा संघ आहे हेंच होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या सर्व राष्ट्रगटांची एकी करण्याचा जो प्रयोग करण्यांत आला तो अगदीं असामान्य आहे. एके काळीं हे राष्ट्रगट आपापसांत भांडत असत, पण आतां त्यांचें वैमनस्य नष्ट होऊन गेलें आहे. आतां ते स्नेहभावानें एकत्र नांदत आहेत व ... रशियाचे नागरीक म्हणविण्यांत त्यांना अभिमान वाटत आहे. प्रत्येक घटक-राज्याला सोविएत यूनियनमधून विभक्त होण्याचें स्वातंत्र्य आहे, पण कुणीहि विभक्त होण्याचें मनांत आणलें नाहीं. जातीजातींतील व राष्ट्राराष्ट्रांतील वैर नाहींसें करण्यांत आलें आहे व जातीजातींत द्वेष व पंक्तिप्रपंचाची भावना पसरवूं पाहण्याचा गुन्हा करणाऱ्या इसमास कायद्यानें जबर शिक्षा ठोठावण्यांत येते. "

स्वयंनिर्णय म्हणजे चिरफाड व दुही नव्हे, स्वयंनिर्णय हेंच भक्कम एकजुटीचें प्रभावी साधन आहे, या सोविएत यूनियननें प्रत्यक्ष उदाहरणानें घालून दिलेल्या

धड्याकडे हिंदी पुढाऱ्यांचें जास्त जास्त लक्ष जाऊं लागलें आहे हें आपल्या देशाच्या भवितव्याच्या दृष्टीनें अत्यंत आशादायक चिन्ह समजलें पाहिजे.

* * *

'देशद्रोह्यांचे चाळे' या मथळ्याखालीं 'चित्रा' पत्राच्या ता. १२ मार्चच्या अंकांत दिलेल्या यादीनें मुंबई-नागपूरच्या लोटवाला-सेवक कंपूच्या स्वरूपावर चांगलाच प्रकाश पाडला आहे. 'चित्रा'च्या या लेखकाच्या मतें कम्युनिस्टांनीं केलेल्या पुढील तीन गोष्टी 'देशद्रोही' समजल्या पाहिजेत. कम्युनिस्टांनीं बंगाल-संबंधीं प्रदर्शन भरविलें हें त्यांचें पहिलें देशद्रोही कृत्य! 'भवितव्य'कार पु. य. देशपांडे यांनीं कान्होबाच्या आचरट तर्कशास्त्राच्या आधारें सोविएतविरुद्ध गलिच्छ लेखमाला लिहिली व टागोर नेहरूसारख्यांना व कॉंग्रेसला सोविएतविरोधी भूमिका न घेतल्याबद्दल क्रांतीचे शत्रु ठरविलें, त्यांचा कम्युनिस्टांनीं 'लाल दूर्बिणींतून' योग्य तो समाचार घेतला हें त्यांचें दुसरें देशद्रोहीं कृत्य! दादर येथील मुंबई महिला परिषदेच्या अधिवेशनांत कम्युनिस्ट प्रतिनिधीनें राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या सुटकेची मागणी करणारा ठराव मांडला व कम्युनिस्ट नसलेल्या स्त्रियांच्या प्रचंड बहुमताचा पाठिंबा त्या ठरावाला मिळविला हें त्यांचें तिसरें देशद्रोहीं कृत्य!

या कंपूला खरोखरीं काय हवें आहे हें यावरून स्पष्ट होतें. बंगालला मदत करण्याची चळवळ कुणीही करूं नये, बंगालला उपाशी मरूं द्यावें, बंगालचा प्रसंग इतर प्रांतांवर येण्याचा जो संभव आहे त्याविरुद्ध इशारा देऊं नये व उपाययोजना करूं नये, असेंच या कंपूला वाटत असलें पाहिजे. जितकी उपासमार जास्त तितकी क्रांति जवळ येणार, हा कॉंग्रेस सोशालिस्ट सिद्धांतच या कंपूच्या विचारसरणीचा पाया आहे.

सोविएतविरोधी प्रचाराचें कंकण हातीं बांधलेल्या जगांतील सर्व प्रतिगामी साम्राज्यवाद्यांना हिंदुस्थाननें पाठिंबा द्यावा, **गोबेल्स** व पु. य. देशपांडे यांच्या-सारख्या सोविएत-निंदकांना 'पुरोगामी' म्हणून हिंदी जनतेनें गौरवावें व टागोर, सरोजिनी नायडू, यांना सोविएतची स्तुति करणारे म्हणून 'प्रतिगामी' ठरवावें, अशी या कंपूची इच्छा आहे.

साम्राज्यवादी प्रचाराच्या आगींत हिंदी जनतेचा बळी देण्यास हा कंपू हपापला आहे. पुढारी तुरुंगांत राहिले पाहिजेत, कारण त्यामुळें 'जनतेला' पुढें येण्यास वाव मिळतो, असा या कंपूचा विक्षिप्त सिद्धांत आहे. मात्र हा विक्षिप्तपणा अगदीं हेतु-पुरस्सर आहे यांत शंका नाहीं. पुढारी सुटल्यास जनता जोमानें पुढें सरसावेल, आणि मग या कंपूची व त्याच्या पाठीराख्या प्रतिगाम्यांची वाताहत होईल, ही गोष्ट पुरेपुर माहीत असल्यामुळेंच त्याला या सिद्धांताचा शोध लावणें आवश्यक झालें.

असल्या लोकांना कोणत्या गोष्टींपासून आनंद होत असतो ?

अच्युत पटवर्धनांच्या ‘ नाइन्थ ऑगस्ट ’ पत्रांत त्याचें स्पष्ट उत्तर सांपडतें.

ता. १४ डिसेंबर रोजीं कलकत्त्यावर झालेल्या बॉंबहल्ल्याची व त्यामुळें झालेल्या प्राणहानीची या पत्रांत रसभरित बातमी देण्यांत आली आहे. कामगारांचीं घरें उद्ध्वस्त झालीं, कामावर असलेले कांहीं कारकून ठार झाले, या गोष्टींचा या बातमींत प्रामुख्यानें उल्लेख करण्यांत आला आहे. आणि “ जपाननें पूर्व हिंदुस्थानांत केलेल्या कामगिरीची ही बातमी देण्यास आम्हांला अत्यंत आनंद होतो ” अशी या बातमीला अच्युत पटवर्धनांनीं पुस्ती जोडून ठेवली आहे !

आपल्या निरपराधी देशबांधवांचे खून पडलेले पाहून बीभत्सपणानें नाचूं लागणाऱ्या व खुनी जपान्यांना धन्यवाद देणाऱ्या या उफराट्या काळजाच्या लोकांना कम्युनिस्टांचें वर उल्लेखलेलें कार्य देशद्रोहाचें वाटावें यांत नवल कसलें ?

( १९-३-४४ )

---

— २३ —

# बंगालचा दुष्काळ व मराठी साहित्य

टाटा-बिर्लांच्या आर्थिक योजनेसंबंधीं ‘ लोकयुद्ध ’ पत्रांत आलेला कॉ. बी. टी. रणदिवे यांचा लेख कांहींशा विस्तारासह इंग्लिश पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यांत आला असून त्याची पांच हजार प्रतींची आवृत्ति एकदोन आठवड्यांच्या अवधींत संपत आली आहे. ‘ लोकयुद्धा ’च्या वाचकांना व बंगाल प्रदर्शन पाहणारांना परिचित असलेले कॉ. चित्तप्रसाद यांनीं काढलेल्या १३ व्यंगचित्रांची व चित्रमय तक्त्यांची जोड मिळाल्यामुळें या पुस्तकाची आकर्षकता व उपयुक्तता फारच वाढली आहे.

सोप्या भाषेंत शास्त्रशुद्ध विवेचन करणाऱ्या कॉ. रणदिवे यांच्या लेखणीला कॉ. चित्तप्रसाद यांनीं आपल्या मर्मग्राही कुंचलीच्या रेषांनीं किती परिणामकारक साथ दिली आहे हें पुस्तकाच्या शेवटच्या एका चित्रावरूनसुद्धां कुणाच्याहि लक्षांत येईल.

या चित्रांत आमचे बडे उद्योगपति आरामशीर खुर्च्यांवर बसून आर्थिक योजनेचा आराखडा तयार करीत असलेले दाखविले आहेत. " व्यवहारी माणसांना साजेशी योजना तयार करूया " असें ते एकमेकांना सांगत आहेत. पण पोकळ आंकडेबाजीची कसरत करण्यापलिकडे त्यांच्या हातून कांहीं होणार नाहीं हें उघड आहे, आणि त्यांच्या या अपेशाचें रहस्य शेजारच्या टोपलीकडे पाहिलें म्हणजे चटकन लक्षांत येतें. जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखालील नॅशनल प्लॅनिंग कमिटीनें तयार केलेले सारे रिपोर्ट या ' व्यवहारज्ञ ' उद्योगपतींनीं या टोपलींत फेंकून दिले आहेत! कॉ. रणदिवे त्यांना स्पष्ट इशारा देतातः—राष्ट्रीय नियोजनाच्या मूलभूत तत्त्वांकडे तुम्हीं डोळेझांक केली म्हणूनच असल्या पोकळ योजनेखेरीज तुमच्या डोक्यांतून जास्त चांगलें कांहीं निघूं शकलें नाहीं. नॅशनल प्लॅनिंग कमिटीकडे पाठ फिरविण्याऐवजीं फिरून तिच्याकडे तोंड वळवा, आणि तिनें आंखून दिलेल्या धोरणास अनुसरून खरीखुरी राष्ट्रीय योजना तयार करा. अशी खरीखुरी योजनाच देशांतील जनतेला उत्साहित करूं शकेल आणि तुमच्यासारख्या हिंदी उद्योगपतींच्या इभ्रतीलाहि साजेशी ठरेल.

येथील ' नवशक्ति ' पत्रानें कॉ. रणदिवे यांच्या या पुस्तकाचें उत्साहानें स्वागत केलें आहे व त्यांतील विवेचनाच्या आधारें तीन संपादकीय लेख लिहून पुस्तकाचा निष्कर्ष आपल्या वाचकांपुढें मांडला आहे. ' नवशक्ति 'कार म्हणतातः—

" सदरील पुस्तिकेंतील विवेचन भाई रणदिवे यांनीं अत्यंत सुबोध आणि तर्कशुद्ध केलें असून इंग्रजी जाणणाऱ्या सामान्य वाचकांना हा विषय फार सहज समजेल असें या विवेचनाचें स्वरूप आहे ... या अत्यंत महत्त्वाच्या विषयाचें सुबोध विवेचन करण्याबद्दल भाई बी. टी. रणदिवे निःसंशय अभिनंदनाला पात्र आहेत. त्यांनीं मराठींत व सर्वच देशी भाषांतून या पुस्तिकेचें सुबोध भाषांतर करवून प्रकाशित केल्यास प्रचार व लोकशिक्षण या दृष्टींनीं तें कार्य बहुमोलाचें ठरेल. "

* * *

**टॉलस्टॉय, रोमां रोलां**, टागोर, सरोजिनी नायडू इत्यादि जगद्वंद्य साहित्यिकांच्या उज्ज्वल परंपरेकडे पाठ फिरवून कांहीं महिन्यांपूर्वीं मुंबईच्या मराठी साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष प्रा. जोग यांनीं ललितवाङ्मयाच्या सामाजिक प्रभावीपणाची थट्टा केली होती व ' आग्रही प्रचारक बनूं नका ' असा ललित-लेखकांना उपदेश केला होता.

कम्युनिझमचा बागुलबोवा उभा करून त्याच्या साहाय्यानें साहित्यक्षेत्रांत प्रतिगामी प्रवृत्तींची मोट बांधण्यासाठीं चिटणीस-पाध्ये कंपूनें एक अखिल भारतीय लेखक परिषद भरविण्याची खटपट सुरू केली आहे. या परिषदेपुढें ठेवण्यासाठीं डॉ.

चिटणीसांनीं तयार केलेल्या जाहीरनाम्यांत कला व प्रचार यांच्या परस्परसंबंधींच्या बाबतींत प्रा. जोग यांच्या प्रतिगामी विचारसरणीचाच अनुवाद करण्यांत आला आहे. या अजब जाहीरनाम्यांतील पुढील नमुनेदार विधान पहा:—

" कलेचें आवाहन हें व्यक्तिगत असल्यामुळें तें आग्रही नसतें ... मतप्रचार हा व्यक्तीच्या निर्णयस्वातंत्र्यावरच नेमका घाला घालीत असल्यामुळें अशा प्रचाराचें पर्यवसान अखेरीस समाजावर जबरदस्ती करण्यांत व मानवमनाला ठोकळेबाज बनविण्यांतच होतें. "

जपानी साम्राज्यशाहीचा भाट **नोगुची** यानेंहि कविवर्य रवीन्द्रनाथ टागोर यांना हेंच सांगितलें होतें.

बडोदें येथें नुकत्याच भरलेल्या वाङ्मयपरिषदेच्या अध्यक्षस्थानावरून आचार्य अत्रे यांनीं प्रा. जोगांच्या अशास्त्रीय विचारसरणीचें परिणामकारक रीतीनें खंडन केलें. ललितलेखनाचें कार्य प्रा. जोग म्हणतात त्याप्रमाणें वाचकांचें रंजन करणें हें नाहीं, ललितवाङ्मय हें " समाजाच्या जीवनकलहांतलें एक प्रभावी शस्त्र ' आहे, हा मुद्दा सप्रमाण सिद्ध करून श्री. अत्रे पुढें म्हणतात:—

" ललितलेखकानें आपलें कार्य ' आग्रह न धरतां ' आणि ' अभिनिवेश न बाळगतां ' करावें हें जोगांचें म्हणणेंहि सर्वस्वीं भ्रामक आहे...सर्कशींतला विदूषक जसा असतो तसा जोगांच्या मतें ललितलेखक आहे ! विदूषक चार उड्या मारून प्रेक्षकांचें मनोरंजन करीत नाहीं का ? तो कशाचाच आग्रह धरत नाहीं ! किंवा दुसऱ्या कोणाचाहि गणवेष तो अंगावर धारण करीत नाहीं. केवळ मनोरंजकतेचाच गणवेष अंगावर चढवून तो आपलें ' विचारस्वातंत्र्य ' कायम राखीत असतो ! ...

" ललितलेखकाला आयुष्याचा अन्वयार्थ लावून दाखवावयाचा आहे ही त्याची शास्त्रीय भूमिका एकदां मान्य केली, म्हणजे जीविताकडे पाहण्याचा त्याचा स्वतःचा असा दृष्टिकोन असावयालाच पाहिजे हें मानणें क्रमप्राप्तच होतें. या वैयक्तिक दृष्टीकोणाबद्दल लेखकानें अभिनिवेश धरावयाचा नाहीं हें म्हणणें कसें योग्य होईल ?... प्रत्येक ललितलेखकाला वैचारिकेची किंवा तत्त्वज्ञानाची आज आवश्यकता भासूं लागलेली आहे ... ललितकृतीचें पुरोगामित्व ठरवितांना तिच्यांतली विचारसरणी लक्षांत घेण्यांत येऊं नये हें जोगांचें म्हणणें सर्वस्वीं चूक आहे ! "

* * *

" किर्लोस्कर ' मासिकाच्या मार्चच्या अंकांत प्रसिद्ध झालेली ' सस्यश्यामला ' ही लघुकथा चिटणीस, पाध्ये-कंपूला ' आग्रही मतप्रचार ' व म्हणून ' समाजावर जबरदस्ती ' खुशाल वाटो, व ' अभिनिवेश ' न बाळगण्याचा इशारा विसरल्याबद्दल तिच्या लेखकाला प्रा. जोग खुशाल दोष देवोत; परंतु प्रत्येक सहृदय हिंदी माण-

साला आपल्या भोंवतालच्या आजच्या वास्तवतेचें जें अत्यंत जिव्हाळ्याचें अंग वाटतें त्याचें यथार्थ आकलन करून, या कथेच्या द्वारें त्याचें खरेंखुरें कलात्मक व म्हणून प्रामाणिक व हृदयाचा ठाव घेणारें चित्रण केल्याबद्दल, सर्वसामान्य मराठी वाचक श्री. र. बा. दिघे यांना धन्यवादच देतील.

बंगालच्या दुष्काळाचें मराठी साहित्यांत कोणतें प्रतिबिंब उठलें आहे? या प्रश्नाचें उत्तर देणें म्हणजेच मराठी साहित्याच्या आजच्या शोचनीय स्थितीचें एक भीषण लक्षण समजावून घेणें होय. आपल्या पस्तीस लाख देशबांधवांचे प्राण हिरावून नेणारें हें मृत्यूचें तांडवनृत्य एकाहि मराठी ललितलेखकाला हालवूं शकलें नाहीं, असें इतिहासांत नमूद केलें गेल्यास त्याच्यावर कुणाचा विश्वास तरी बसेल का? पण कठोर इतिहासाला हीच साक्ष द्यावी लागेल हें उघड आहे. मात्र त्याच वेळीं कामगार शाहीर कॉ. अण्णाभाऊ साठे यांचाहि अभिमानपूर्वक उल्लेख करण्यास इतिहास विसरणार नाहीं. बंगालचा स्फूर्तिदायक पोवाडा रचून या कम्युनिस्ट कामगारानें मराठी साहित्याची लाज राखली. ग्रामीण जीवनाचें आत्मीयतेनें चित्रण करणारे सुप्रसिद्ध तरुण कथालेखक श्री. दिघे यांनींहि ' सस्यश्यामला ' ही कथा लिहून मराठी साहित्याची बहुमोल सेवा केली आहे.

" कालीमातेचा बंगाल काळी कोठडी व काळा आजार यांकरितां प्रसिद्ध आहे. चालू जमान्यांत तो काळ्या बाजाराकरितां प्रसिद्ध झाला. " हा काळा बाजार धूर्त सट्टेबाजांनीं कसा निर्माण केला व त्यांच्या साहाय्यानें बंकिमचंद्राच्या सस्यश्यामला वंगभूमींत यमाजी भास्करानें या बाजारांत आपली पेढी कशी उघडली, याचें हृदयस्पर्शी चित्र हरितग्रामच्या एका शेतकरी कुटुंबाच्या जीवनकथेच्या द्वारें श्री. दिघे यांनीं मांडलें आहे. या कथेंतील ' **श्यामार मा** ' तर वाचकांच्या स्मरणांत चिरकाल राहील. निर्घृण सांठेबाजांच्या हातून पांच मण भात अमान पिकासाठीं कसोशीनें वांचवून तिनें बंगालला पुनः सस्यश्यामला करण्याचा मार्ग दाखवून दिला.

श्री. दिघे हे कम्युनिस्ट नाहींत. त्यांच्या प्रामाणिक कलानिष्ठेनें त्यांना बंगालकडे पाहण्यास भाग पाडलें, तिनेंच त्यांना वास्तवतेचें यथार्थ आकलन करण्यास साहाय्य केलें, तिनेंच त्यांच्या ललितलेखणीला प्रचाराचें प्रभावी साधन होणारी सुंदर कलाकृति निर्माण करण्याचें स्फुरण दिलें.

त्यांच्या या कृतींत व्यक्त झालेली प्रवृत्ति मराठी साहित्यांत बळावत जाणें कॉ. डांगे यांनीं पुरोगामी साहित्य-परिषदेच्या अध्यक्षीय भाषणांत उल्लेखलेल्या ' मराठी साहित्यांतील पेंचप्रसंगाचें ' निवारण करण्यासाठीं अत्यंत आवश्यक आहे.

( १२-३-४४ )

---

— २४ —

# मिनू मसानींचा 'फेरविचार'

मोडतोडीचा कार्यक्रम हा काँग्रेसचा कार्यक्रम नव्हे, ही गोष्ट गांधींजींनीं व्हाइसरॉयला पाठविलेल्या पत्रांत स्पष्टपणें जाहीर केली होती, व त्यानंतर कैक प्रमुख काँग्रेस पुढाऱ्यांनींसुद्धां आपल्या जाहीर निवेदनांत हेंच पुनः पुनः बजावून सांगितलें आहे. काँग्रेसनेंच मोडतोडीची चळवळ सुरू करण्याची आज्ञा दिली आहे असा जनतेचा समज करून देणें पंचमदळाला कशामुळें शक्य झालें? तुरुंगांतून नुकतेच सुटून आलेले मध्यवर्ती असेंब्लीचे काँग्रेसपक्षीय सभासद श्री. अविनाशलिंगम् चेट्टियार यांनीं यावर महत्त्वाचा प्रकाश पाडला आहे.

फिनॅन्स बिलावरील कपातीच्या सूचनेला पाठिंबा देतांना श्री. चेट्टिआर म्हणाले—

"मोडतोडीची चळवळ काँग्रेसनें सुरू केली या आरोपाचा मी ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचा सभासद या नात्यानें इन्कार करतों. ही चळवळ कशी सुरू झाली? मि. ॲमरी यांनीं ता. ९ ऑगस्ट १९४२ रोजीं केलेल्या भाषणाची हकीगत मी तुरुंगांत ऐकली. काँग्रेसनें मोडतोडीचा कार्यक्रम आंखला आहे असें मि. ॲमरींनीं या भाषणांत सांगितलें व त्या कार्यक्रमाची तपशीलवार माहितीहि दिली, आणि त्याचमुळें पुष्कळ काँग्रेसवादी लोकांना मोडतोडीचा हा कार्यक्रमच काँग्रेसचा अधिकृत कार्यक्रम असल्याचें वाटलें, असें मला कळलें आहे."

लोकांचा हा गैरसमज कायम राहण्यासाठीं काँग्रेस सोशालिस्टांनीं किती कसोसीनें धडपड केली हें सर्वांना माहीत आहेच!

संतापाच्या भरांत देशभक्तांना काँग्रेसच्या मूलभूत तत्त्वांचाहि विसर पडला, काँग्रेसच्या नांवानें सांगण्यांत येणाऱ्या भलभलत्या गोष्टींवरहि विश्वास ठेवण्यास ते तयार झाले, आणि याचा फायदा घेऊन त्यांची फसगत करण्यास देशद्रोह्यांना संधि मिळाली, याचा श्री. चेट्टियार यांनीं हा ताजा पुरावा दिला आहे.

* * *

मि. **मिनू मसानी** यांनीं आपल्या दोन व्याख्यानांना थोडासा साजशृंगार चढवून 'समाजसत्तावादाचा फेरविचार' (सोशालिझम रिकन्सिडर्ड) या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. समाजसत्तावादाचा बुरखा काँग्रेस सोशालिस्टांनीं पांघरल्यानें इतःपर कुणाचीहि फसवणूक होणें शक्य नाहीं, याची कबुलीच मि. मसानींनीं या पुस्त-

कांत दिली आहे. हा बुरखा जाहीरपणें टाकून देण्यासाठींच त्यांनीं हें पुस्तक लिहिलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु त्याच वेळीं त्यांना गांधीवादाचा नवा बुरखा धारण करून जनतेच्या डोळ्यांत धूळ फेंकण्याचें कार्य चालू ठेवतां येईल अशी भाबडी आशा वाटते.

या पुस्तकांत मसानींनीं सोविएत रशियावर केलेल्या आरोपांचें पुढील एक वेंचक उदाहरण पहा:—

मसानी म्हणतात—रशियामध्यें स्तखानोविस्ट कामगाराला १६०० रुबल मिळतात, पण स्तखानोविस्ट नसलेल्या कामगाराला फक्त ४००–५०० रुबल मिळतात. काय ही विषमता ! केवढा हा अन्याय ! हाच जर समाजसत्तावाद असेल तर आम्हांला तो मुळींच नको !

एक साधी गोष्ट मसानींनीं अजिबात झांकून ठेवली व ती म्हणजे स्तखानोविस्ट कामगार चौपट जास्त उत्पादन करतो व म्हणूनच त्याला चौपट जास्त पगार मिळतो. श्रमाप्रमाणें पगार हें समाजसत्तावादाचें तत्त्व मसानींना कधींच ठाऊक नव्हतें काय ? आणि आतां ‘ फेरविचार ’ केल्यानंतर या तत्त्वाचा शोध लागला, तेव्हां तें त्यांना अन्यायाचें कां वाटतें ?

त्याचें कारण त्यांनीं याच पुस्तकांत मांडलेल्या ‘ ट्रस्टीशिप ’च्या सिद्धांतांत आढळतें. समाजसत्तावादावर तोड म्हणून मसानींनीं हा सिद्धांत मांडला आहे. कांहींहि श्रम न करतां मालकाला ‘ ट्रस्टी ’ म्हणून कामगाराच्या पगाराच्या बारापट उत्पन्न मिळावें अशी मसानींची इच्छा आहे ! ही विषमता नव्हे, हा अन्याय नव्हे, पण कामगारानें जास्त श्रम करून जास्त मोबदला मिळवावा हा मात्र मसानींच्या दृष्टीनें अन्याय होतो.

दुसरी एक साधी गोष्ट मसानी विसरले ती ही कीं रशियांतील बहुतेक कारखान्यांत आज स्तखानोविस्ट कामगारांचें प्रमाण शेंकडा ९० हून जास्त आहे.

आणखी मसानींनीं लपवून ठेवलेली मुख्य गोष्ट म्हणजे सोविएत रशियांतील कामगार आइतखाऊ भांडवलदारांसाठीं नव्हे तर स्वतःसाठींच उत्पादन करीत असतात.

स्तखानोविस्टांविषयींच्या मसानींच्या रागाचें खरें कारण पाहावयाचें असल्यास त्यांच्या या पुस्तकाचें पहिलेंच वाक्य वाचा. “ दर दिवसागणिक रशियाच्या लष्करी प्रगतीच्या बातम्या येत आहेत, ” हेंच तें वाक्य होय. रशियाच्या या रणांगणावरील यशानें मसानींना चिंताग्रस्त केलें व हें पुस्तक लिहिण्याची स्फूर्ति दिली. स्तखानोविस्ट कामगारांनीं स्वदेशरक्षणासाठीं उत्पादन वाढविण्याच्या कामीं केलेल्या अचाट पराक्रमांना रणांगणावरील लाल सेनेच्या यशाचें बरेंचसें श्रेय आहे यांत शंका नाहीं. मग मसानींनीं या स्तखानोविस्टांवर चिडूं नये तर काय करावें ?

मार्क्सवादाचें ' खंडन ' करण्यासाठीं **मसानींनीं** जुनीपुराणी क्लृप्तिच योजिली आहे व ती म्हणजे प्रथम मार्क्सवादाचे सिद्धांत विपर्यस्त स्वरूपांत मांडणें व मग ते चुकीचे असल्याचें 'सिद्ध' करणें !

**मसानी** म्हणतात कीं मालमत्ता राष्ट्रीय मालकीची झाल्यास ' आपोआपच ' वर्गविहीन समाज अस्तित्वांत येईल असा मार्क्सवादाचा सिद्धांत आहे व तो चुकीचा आहे. मालमत्ता राष्ट्रीय मालकीची करणें व मालमत्तेचें ' केंद्रीकरण ' होणें, या दोन्ही गोष्टी **मसानींना** एकच वाटतात. पण हिंदुस्थानांतील रेल्वेची सध्यांची सरकारी मालकी समाजसत्तावादाचेंच एक लक्षण आहे, असें **मसानींना** कोणत्या मार्क्सवाद्यानें सांगितलें होतें ? बड्या भांडवलदारांच्या हातीं ( व विशिष्ट परिस्थितींत त्यांच्या राजसत्तेच्या हातीं ) मालमत्तेचें केन्द्रीकरण होऊन जनतेच्या दारिद्र्याची व पिळणूकीची परमावधि होते व मग क्रांतीच्या मार्गानें ( आपोआप नव्हे ) जनतेच्या पायांतील भांडवलशाहीच्या शृंखला तुटून पडतात, ही **मार्क्सची** सुप्रसिद्ध घोषणा **मसानींना** माहीत नाहीं असें नाहीं. पण त्यांना खाजगी भांडवलदारांच्या हातीं केन्द्रित झालेली मालमत्ता कायम ठेवावयाची आहे, ( रशियांतील ' कुलकां'ची मालमत्ता काढून घेतल्याबद्दल त्यांनीं आपला जळफळाट उघडपणें व्यक्त केला आहेच ), व म्हणून समाजसत्तावादाकडे आशेनें व विश्वासानें वळणाऱ्या आजच्या कोट्यावधि दलित जनतेला हे टाटासेवक आतां ' समाजसत्तावादाचा फेरविचार ' करण्यास सांगत आहेत.

पण यासाठीं त्यांना स्वतःला मात्र फारसा ' विचार ' करण्याची व डोक्याला शीण देण्याची जरूरी भासली नाहीं. **मॅक्स ईस्टमन** या अमेरिकन लेखकाचें ' स्टॅलिन्स रशिया ' नांवाचें भिकार चोपडें **मसानींनीं** बाजारांत विकत घेतलें. त्या पुस्तकाच्या दोन भागांपैकीं दुसऱ्या भागाचा ' सोशालिझम रीकन्सिडर्ड ' हा मथळा जशाच्या तसा उचलून घेऊन स्वतःच्या पुस्तकासाठीं वापरला, व त्या तत्त्वभ्रष्ट सोविएत-निंदकाच्या नासक्या कोटिक्रमांनाच फोडणी देऊन या पुस्तकाच्या रूपानें हिंदी वाचकांच्या हातीं ' ताजा माल ' तयार करून दिला.

**मसानींचे** सहकारी प्रो. दांतवाला यांच्या ' गांधीवादाचा फेरविचार ' नांवाच्या पुस्तकाची जाहिरात लागली आहे. समाजसत्तावादाचा इतके दिवस घेतलेला बुरखा फेंकून देणें कॉंग्रेस सोशालिस्टांना सोविएतच्या विजयांमुळें आज जसें आवश्यक झालें आहे, त्याचप्रमाणें गांधीवादाचा नवा बुरखा फेंकून देणेंहि उद्यां गांधीजीप्रभृति कॉंग्रेस पुढारी बाहेर आल्यानंतर त्यांना भाग पडेल यांत शंका नाहीं. पुढाऱ्यांच्या सुटकेला त्यांचा इतका विरोध आहे याचें कारण हेंच होय.

( २-४-४४ )

— २५ —

# सावरकरांना घरचा अहेर

आपली बाजू अगदींच लंगडी असेल व तिचें समर्थन करण्यासाठीं कोणतीच खात्रीलायक प्रमाणें देतां येत नसतील तर प्रतिपक्षाला भरपूर शिव्या द्या म्हणजे झालें, हा सुप्रसिद्ध उपदेश अंमलांत आणण्याची मराठींतील कित्येक बिनबुडाच्या लेखकांना अलिकडच्या काळांत फारच गरज भासूं लागली आहे. ऑगस्ट १९४२ पासून देशांत दडपशाहीचें थैमान सुरू झाल्यानंतर या लोकांनीं कम्युनिस्टांवर ते देशभक्तांना पोलिसांच्या स्वाधीन करण्याच्या कामीं मदत करीत आहेत असा घाणेरडा आरोप करण्यास सुरवात केली. अर्थात् त्याचा कोणताहि पुरावा देण्याची त्यांना मुळींच आवश्यकता वाटली नाहीं, व त्याचें कारणहि उघड आहे. मुळांतच गोष्ट खोटी, तर तिचा पुरावा कुठून आणणार ? कम्युनिस्टांच्या सह्याचीं म्हणून कांहीं बनावट पत्रें प्रसिद्ध करण्याचाहि या लोकांनीं प्रयत्न करून पाहिला, पण त्याचा काडीइतकाहि उपयोग झाला नाहीं. कम्युनिस्टांनीं स्वातंत्र्यासाठीं आरंभापासून अनंत हालअपेष्टा भोगून बजावलेली कामगिरी, देशावरील आजच्या अपूर्व संकटाच्या काळांत त्यांनीं मांडलेलें व निष्ठापूर्वक अंमलांत आणलेलें लोकहिताचें धोरण, चितगांव शस्त्रागार खटल्यांतील राजबंदी व गदर पार्टीसारख्या जुन्या क्रांतिकारक पक्षाचे वयोवृद्ध पुढारी यांना कम्युनिस्ट पार्टींत दाखल होण्यांत वाटणारा अभिमान, कम्युनिस्ट पार्टीचा जयजयकार करीत फांसावर चढणाऱ्या कय्यूरच्या तरुण शेतकऱ्यांचें बलिदान,––या सर्व गोष्टी नजरेसमोर असतां देशांतील जनता कम्युनिस्टांची निंदा करणाऱ्या तत्त्वहीन प्रचारकांना भीक घालील हें शक्यच नव्हतें. कॉ. पी. सी. जोशी यांच्या नांवावर बाष्कळ कोट्या करणाऱ्या लोकांची लायकी कुणालाहि सहज समजण्यासारखी होती.

पां. वा. गाडगीळ, चिटणीस--पाध्ये कंपू, वगैरेंच्या गलिच्छ थापबाजीला साथ देऊन सवंग लोकप्रियता मिळवितां येईल तर पहावें, म्हणून कांहीं ललित-लेखकांनींहि प्रयत्न सुरू केला. ऑल–इंडिया रेडियोवर सरकारी प्रचाराची भाडोत्री जाहिरातबाजी करणारे श्री. मर्ढेकर यांनीं ‘ तांबडी माती ’ या कादंबरींत आपल्याच जातीचा एक तत्त्वहीन नायक तयार करून व त्याला ‘ कम्युनिस्ट ’ असें खोटें लेबल लावून

आपल्या ' वाङ्मयीन महात्मते 'चें ओंगळ प्रदर्शन केलें. मराठी साहित्यावर असले अत्याचार करण्यांत आपण मागें राहतां कामा नये असा विचार करून श्री. माडखोलकर या ' प्रथितयश ' साहित्यिकांनींहि ' प्रमद्वरा ' या कादंबरींत ' ऑगस्ट-क्रांती 'च्या काळाची कथा देण्याच्या निमित्तानें कम्युनिस्टांचें विकृत चित्र रंगविलें आहे.

सामान्य देशभक्तांवर असल्या आचरट प्रचाराचा काय परिणाम होतो हें ' नवाकाळ 'नें या कादंबरीचें समालोचन करतांना काढलेल्या पुढील उद्गारांवरून कळून येईल:—

" स्वामीजींच्या ठावठिकाणाची माहिती पोलिसांना कम्युनिस्ट भाईकडून मिळते असें दाखवून कम्युनिस्टांबद्दल लेखकानें जें सूचित केलें आहे तें हीनच नव्हे तर हिडिस ठरण्यासारखें आहे. मतभेद असणें आणि मार्ग भिन्न असणें या गोष्टी राजकारणांत अपरिहार्य आहेत, पण त्या मार्गभिन्नत्वाच्या व मतभिन्नत्वाच्या पोटीं असले सर्वसाधारण स्वरूपाचे आरोप जन्माला येणें हें शास्त्रीय व असाक्षात्कारी विचारसरणीला शोभणारें नाहीं. "

* * *

मध्यवर्ती असेंब्लींत नोकरशाहीच्या बेजबाबदार कारभाराचा निषेध करण्यासाठीं सर्व लोकपक्षांनीं एकजूट केलेली पाहून देशांत आशेचें व उत्साहाचें वातावरण निर्माण झालें आहे. ' वीर ' सावरकरांनाहि असेंब्लींतील घटनेनें आनंदित केलें आहे, मात्र त्यांच्या आनंदाचें कारण ही एकजूट नसून निराळेंच आहे. कौन्सिलांतील ' गाद्यागिरद्यांच्या रणक्षेत्रां 'चा हेटाळणीनें उल्लेख करणारे व कंटाळवाण्या जाहीरपत्रकांच्या रूपानें किती तरी ' खर्ड्यांच्या लढाया ' मारणारे हे अजब गृहस्थ साऱ्या हिंदूंना (व विशेषतः ब्रिटिश नोकरशाहीला) आपल्या ताज्या निवेदनांत सांगतातः–

" कॉंग्रेस व मुस्लीम लीग पक्षाच्या स्वार्थी संगनमताला हिंदु संघटनावादी बळी पडले नाहींत हें पाहून मला समाधान वाटतें. "

असेंब्लींत सरकारच्या बाजूनें मत देणाऱ्या नऊ गणंगांना सावरकरांनीं धन्यवाद दिले आहेत. या देशद्रोह्यांनीं नोकरशाहीशीं संगनमत केलें हें सावरकरांना अभिनंदनीय वाटत आहे.

कॉंग्रेस व लीग यांच्या एकजुटीला सावरकर ' स्वार्थी संगनमत ' कां म्हणतात ? कारण ही नोकरशाहीविरुद्ध एकजूट होती. कारण ही जनतेच्या हिताची एकजूट होती. लीगशीं सहकार्य करण्याला सावरकरांचा संपूर्ण विरोध आहे असें समजण्याचें कारण नाहीं, मात्र लीगशीं एकी करावयाची तर ती एका अटीवरच करतां येईल असा त्यांचा आग्रह आहे. कोणती अट ? लीगमधील प्रतिगा-

म्यांशींच एकी करा, जनतेच्या मानेवर सुरी फिरविण्यासाठींच एकी करा, हीच ती अट होय. हिंदु-मुस्लिम साठेबाजांची एकजूट सावरकरांना पसंत आहे, नोकरशाहीची राजवट कायम ठेवणारी हिंदु-मुस्लिम देशद्रोह्यांची एकजूट त्यांना मान्य आहे, पण देशावरील आजच्या संकटाचें निवारण करणारी, राष्ट्रीय सरकार अस्तित्वांत आणणारी, लोकहिताची व नोकरशाहीविरोधी एकजूट मात्र त्यांना नको आहे.

सावरकरांची ही गलिच्छ भूमिका एकंदर हिंदूंनांच काय, पण हिंदुमहासभेंतील त्यांच्या अनुयायांनाहि किळसवाणी वाटते. असेंब्लींत फिनॅन्स बिलाच्या बाजूनें मत देणाऱ्या सावरकरी ' हिंदुत्व-वीरां 'च्या पराक्रमाविषयीं लिहितांना ' केसरी 'ला सुद्धां "हें कृत्य तात्त्विक व शुद्ध राष्ट्रीय भूमिकेवरून कोणासहि भूषणावह वाटणार नाहीं" असे उद्गार काढणें आवश्यक झालें. ' केसरी 'च्या मतें वीर सावरकरांची भूमिका कोणती आहे, हें यावरून सहज कळण्यासारखें आहे. सावरकरांनीं ज्याला ' स्वार्थी संगनमत ' म्हटलें, त्याविषयीं ' केसरी म्हणतो:—

" असेंब्लींतील सर्व लोकनियुक्त पक्ष सरकारच्या निषेधाच्या कार्यापुरते तरी एक झालें हे अभिनंदनीय झालें व हेंच राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीस उपकारक व्हावें अशा अपेक्षेस कारणीभूत होईल. "

मुंबईतील हिंदुमहासभावादी पत्र ' प्रभात ' यानेंहि असेंब्लींतील मतदानाची बातमी येतांच नोकरशाहीलंपट नवरत्नांचा निषेध केला, व मागाहून सावरकरांचा फतवा प्रसिद्ध झाल्यानंतरहि त्याला आपलें मत बदलावेंसें वाटलें नाहीं. काँग्रेसला विरोध करण्यासाठीं सरकारी गोटांत शिरणाऱ्या या गृहस्थांचें कृत्य ' दुसऱ्याला अपशकून करण्यासाठीं स्वतःचें नाक कापून घेण्यासारखें ' होतें, कारण तें हिंदूंच्या हितालाहि विरोधी होतें, असें या पत्रानें स्वच्छ सांगून टाकलें आहे. स्वतःचें नाक कापून घेण्यांत ' समाधान ' मानणारे सावरकरी वीर जनतेच्या कोणत्याहि विभागापासून हजारों मैल कसे दुरावले आहेत, हें यावरून स्पष्ट होईल.

* * *

असेंब्लींतील कॉंग्रेस-लीग एकजुटीचें महत्त्व लोकमताचें एक प्रचंड निदर्शन एवढ्यापुरतेंच मर्यादित नसून या एकजुटीचीं गोड फळें जनतेला प्रत्यक्ष चाखावयासहि मिळत आहेत. रेल्वेचे दर वाढविण्याचा बेत सरकारला सोडून द्यावा लागला, हा या एकजुटीचाच विजय समजला पाहिजे. या एकजुटीचा पाया दिवसेंदिवस विस्तृत व भक्कम होत गेल्यावांचून राहणार नाहीं, याचें चिन्ह दिल्ली येथें कॉंग्रेस पक्षातर्फे श्री. भुलाभाई देसाई यानीं दिलेल्या चहा-पार्टींत नजरेस पडलें. या प्रसंगीं लीगचे सभासद आनंदानें हजर होते व तेथें जो देखावा दिसला तो पाहून

' आकाशांतल्या देवतांनाहि आनंद झाला असता ' असें उत्साहभरित वर्णन 'बॉंबे क्रॉनिकल 'च्या खास बातमीदारानें केलें आहे. हा बातमीदार पुढें म्हणतो—

'' कॉंग्रेसचे व लीगचे पुढारी एकत्र बसले, एकाच सुरांत बोलले, व राजकीय पेंचप्रसंग सोडविण्याची इच्छा त्यांनीं सारख्याच आतुरतेनें व्यक्त केली. अलिकडच्या काळांतला असला हा पहिलाच प्रसंग होय. ''

'' यापुढें काय ? '' असा सवाल टाकून हा बातमीदार त्याचें पुढीलप्रमाणें उत्तर देतोः—

'' एक मार्ग म्हणजे स्वस्थ बसावयाचें व सरकारवर काय परिणाम होतो याची वाट पहावयाची. दुसरा मार्ग म्हणजे जेलच्या बाहेर असलेल्या कॉंग्रेस सभासदांनीं व लीग सभासदांनीं समेट करावयाचा व या समेटाच्या आधारें सत्तासंक्रमणाची मागणी करावयाची. ''

कॉंग्रेसनें लीगशीं एकजूट करणें म्हणजे प्रतिगामी शक्तींशीं एकी करणेंच होय असें म्हणणाऱ्या व त्याच्या आधारें कॉंग्रेस-लीग एकीला विरोध करणाऱ्या लोकांची असेंब्लींतील या घटनेमुळें तारांबळ उडाली आहे. अशा लोकांमध्यें अग्रगण्य असलेल्या ' लोकमान्य ' कारांनाहि कॉंग्रेस-लीग एकजूट घडून येणें स्वातंत्र्याच्या दृष्टीनें इष्ट असल्याचें आज कबूल करावें लागत आहे. ता. ३१ मार्चच्या अग्रलेखांत ' लोकमान्य ' म्हणतोः—

'' मध्य असेंब्लींत बजेट फेंटाळलें गेलें या निमित्तानें एक मोठी रोमांचकारी घटना घडून आली. ती घटना बेगडी नसून खरीखुरी व जिव्हाळ्याची असेल तर हिंदी स्वातंत्र्य लढ्यांत ती खरोखर क्रांतिकारक ठरेल. बजेट हाणून पाडण्याचें कामीं कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांची ही एकजूट घडून आली ही ती घटना होय. ''

या विधानांतील जरतरच्या भाषेकडे क्षणभर दुर्लक्ष करून कॉंग्रेस-लीग एकीच्या स्वागताच्या मुद्याचा विचार केला तर ' कॉंग्रेस-लीग एकी म्हणजे प्रतिगाम्यांशीं एकी व कॉंग्रेसचा अधःपात ' या कॉंग्रेस-सोशालिस्ट भूमिकेचा त्याग करण्यास ' लोकमान्य 'कार तयार झाले आहेत असें दिसतें, व हें सुचिन्हच समजलें पाहिजे. तथापि ' मुस्लिम लीगची दानत ' अजून सुधारली नाहीं असा इशारा मात्र या लेखांत त्यांनीं देऊन ठेवला आहे व ' जर-तर 'चा प्रयोग करून कॉंग्रेस-लीग एकीच्या भक्कमपणाविषयीं व भवितव्याविषयीं त्यांनीं आपल्या आतांपर्यंतच्या भूमिकेस अनुसरून संशय व्यक्त केला आहे. पण हा संशय किती निराधार आहे हें ' लोकमान्य ' पत्रांतच त्याच्या दिल्लीच्या बातमीदाराकडून आलेल्या मजकुरावरून दिसून येईल.

लीगचे सरचिटणीस यामिनखान यांनीं सौ. नायडू प्रभृतींना दिलेल्या चहा-पार्टीचा या बातमीदारानें ता. २९च्या तारेंत उल्लेख केला आहे व ता. ४ एप्रिलच्या तारेंत तो म्हणतोः—

" असेंब्लींतील गोटाचें असें मत आहे कीं या निर्णयाला ( म्हणजे रेल्वे दर वाढविण्याची योजना रद्द करण्याच्या सरकारी निर्णयाला ) असेंब्लींतील कॉंग्रेस-मुस्लिम लीग पक्षाची एकजूट बऱ्याच अंशानें कारणीभूत आहे व ती एकजूट पुढेंहि राहिली पाहिजे."

महाराष्ट्रांतील विचारवंतांचें हेंच मत आहे याचें एक उदाहरण ' भरारी ' या पत्राच्या पुढील संपादकीय उद्गारांत आढळतें:—

" सरकारी धोरणाचा निषेध करण्यांत, जनतेचीं दुःखें व त्यांच्या अंतःकरणांतील उद्वेग असेंब्लीच्या वेशीवर टांगण्यांत, मुस्लिम लीग, कॉंग्रेस व इतर पक्ष यांनीं जी एकजूट केली, ती पुढेंहि तशीच चालू ठेवून, सध्यांचा पेंचप्रसंग सोडविण्याच्या बाबतींत ते कंबरा कसतील काय ? " ( ' भरारी ', ता. १८-३-४४ )

संशयात्म्याच्या भूमिकेवरून रडगाणें गात बसण्याऐवजीं व त्यायोगें कॉंग्रेस-लीग एकीच्या मार्गांत विघ्नें आणण्याऐवजीं या एकजुटीचा पाया भक्कम करण्याला वातावरण दिवसेंदिवस जास्त अनुकूल करण्याच्या कामीं ' लोकमान्य 'कार जर हातभार लावतील, तर तें जास्त लोकहिताचें नाहीं का होणार ?

(९-४-४४)

— २६ —

# ' कम्युनिस्ट ' रामशास्त्री

[library stamp]

मुंबईतील नाट्य-महोत्सवाच्या प्रसंगीं 'भाऊबंदकी' नाटकाचा प्रयोग झाला, त्या वेळीं शेवटच्या प्रवेशांत बारभाईंच्या दरबारामध्यें रामशास्त्र्यांनीं एकजुटीच्या आवश्य-कतेविषयीं केलेलें भाषण ऐकून माझ्या शेजारीं बसलेल्या एका प्रेक्षकाच्या तोंडून 'अरे, हा तर कम्युनिस्ट दिसतो!' असे उद्गार सहजगत्या बाहेर पडले.

रामशास्त्री कम्युनिस्ट नव्हते, श्री. काकासाहेब खाडिलकर कम्युनिस्ट नाहींत, आणि ' भाऊबंदकी ' नाटक लिहिलें गेलें त्या वेळीं कम्युनिझमचें नांवसुद्धां हिंदु-स्थानांत कुणाला ठाऊक नव्हतें, हें सांगावयास नकोच. परकीयांना आपल्या देशांत घुसवूं पहाणाऱ्या घरभेद्यांविरुद्ध रामशास्त्र्यांना इषारा द्यावयाचा होता. स्वातंत्र्यप्राप्ती-साठीं तळमळणाऱ्या आपल्या देशबांधवांच्या मनांत आपल्या गत इतिहासाची आठ-वण खाडिलकरांना पुनः जागृत करावयाची होती. एकजूट ही स्वातंत्र्यवादी जन-तेची घोषणा आहे, ती आपल्या राष्ट्रीय चळवळीची एक मूलभूत घोषणा आहे.

कांहीं देशभक्तांना या साध्या गोष्टीचा आज विसर पडावा, एकजूट ही त्यांना केवळ कम्युनिस्ट घोषणा वाटावी, या घोषणेची थट्टा करण्यास त्यांनीं प्रवृत्त व्हावें, हें कशाचें लक्षण? आजच्या परिस्थितींत नैराश्यानें त्यांना इतकें आंधळे बनविलें आहे, कीं आपल्या राष्ट्रीय चळवळीच्या परंपरेविषयींच त्यांना परकेपणा वाटूं लागला आहे!

वरील प्रेक्षकाप्रमाणेंच कांहीं दिवसांपूर्वीं एका मराठी साहित्यिकानें कम्युनिस्टांना असेंच अबोधितपणानें धन्यवाद दिले होते. हा कम्युनिस्ट पक्ष अगदीं अजब प्रका-रचा पक्ष आहे, याचा कार्यक्रम काय तर म्हणे दुसऱ्या दोन पक्षांची एकी करा-यची, असे योग्य हावभावासह उद्गार काढून त्यानें मुंबईच्या उत्सवांतील ' वेड्यांचा बाजार ' नाटकांत काम करण्याची आपली पात्रता पुण्याच्या सभेंत सिद्ध केली. आपण कम्युनिस्टांची टिंगल करीत आहोंत असा त्याचा प्रामाणिक समज होता, स्वतःच्या ' विनोदबुद्धी 'चा त्याला भारी अभिमान आहे, आणि म्हणूनच स्वतःचें संकुचित पक्षहित साधणें हाच कोणत्याहि पक्षाचा कार्यक्रम असला पाहिजे असें

सुचवितांना, आणि एकजुटीचा उपहास करतांना, त्याला यांत कांहीं गैर असेल अशी कल्पना सुद्धां शिवली नाहीं !

* * *

मराठी रंगभूमीचें दुसरें शतक आतां सुरू होत आहे. या दुसऱ्या शतकांत रंगभूमीचें तेज वाढत जाणार कीं लोप पावणार, हें मुख्यत: एकाच गोष्टीवर अवलंबून आहे. मराठी रंगभूमीला जिवंत रहावयाचें असेल व समृद्ध व्हावयाचें असेल तर तिनें जनताभिमुख बनलें पाहिजे, जनतेचे जिव्हाळ्याचे प्रश्न तिनें हाताळले पाहिजेत, जनतेचें जीवन तिनें प्रतिबिंबित केलें पाहिजे. मुंबईच्या उत्सवांत जे 'आधुनिक' प्रयोग झाले त्यावरून तरी ही जाणीव फारशी रुजली असल्याचें म्हणतां येत नाहीं. चर्नीरोडवरील मंडपांत हा उत्सव चालू असतांना तिकडे परळला कामगारवस्तींच्या निरनिराळ्या मोहोल्ल्यांत जिवंत रंगभूमि कशी असते याचें प्रात्यक्षिक बंगालच्या 'पीपल्स रिलीफ कमिटी'तर्फे दौऱ्यावर निघालेल्या कलापथकाकडून देण्यांत येत होतें. 'बॉंबे क्रॉनिकल'च्या रविवारच्या अंकांत कलाविषयक टिपणें लिहिणारे श्री. डी. जी. व्यास यांनीं या बंगाल कला-पथकाच्या 'बंगालची हांक' या कार्यक्रमाविषयीं पुढील उद्गार काढले आहेत:—

"मुंबईमध्यें प्रचलित असलेल्या नाट्यप्रयोगांच्या अगदीं उलट प्रकारचा व म्हणून उत्साहवर्धक असा हा कार्यक्रम होता. त्यांतील नाटिका, नृत्यें व गीतें सहेतुक कलेचे नमुने होते. आजच्या युगाच्या विशिष्ट भावना त्यांत प्रतिबिंबित झाल्या होत्या. आजकालचे कांहीं अत्यंत जिव्हाळ्याचे प्रश्न त्यांत कलेच्या दृष्टीनें हाताळण्यांत आले होते. भव्य सजावट व वेषभूषा यांना छाट देण्यांत आली होती व अगदीं साधें तंत्र वापरण्यांत आलें होतें, तरीसुद्धां शब्द व अभिनय सरळ हृदयाचा ठाव घेणारे व अत्यंत प्रभावी होते. ... असले साधे कार्यक्रम लोकमत जिंकण्यांत परिणामकारक ठरावे याचें इंगित काय ? या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण नाहीं. हा कार्यक्रम करून दाखविणारे कलावंत निश्चित मतें असलेले व सखोल राजकीय निष्ठा असलेले लोक आहेत. देशाभिमान, स्वातंत्र्य, एकजूट, आर्थिक उत्कर्ष, यांचा संदेश पसरविण्याच्या उदात्त ध्येयाला त्यांनीं स्वत:ला वाहून घेतलें आहे."

* * *

'चित्रा'च्या डॉ. चिटणीसांनीं विद्यार्थ्यांना कम्युनिझमपासून वचावण्यासाठीं (आणि लोटवालाशाहीच्या छत्राखालीं आणण्यासाठीं) गेलीं दोन वर्षें जंग जंग पछाडलें, कम्युनिस्टांची नालस्ती करण्यास उपयोगी पडणाऱ्या कांहीं पोटभरू 'विद्यार्थ्यां'ना लोटवाला शेटजींचा आश्रय मिळवून दिला, पण शेवटीं सारेंच मुसळ केरांत ! "अनेक हुषार व कार्यनिष्णात विद्यार्थी कार्यकर्ते कम्युनिस्टांच्या विचारसरणींत

मुरलेले आहेत ... त्यांचा अद्याप असा ग्रह आहे कीं ... कम्युनिस्ट विचारसरणी बरोबर आहे ... त्यांच्या मनांत राष्ट्रवाद व कम्युनिझम यांचा विचित्र मेळ झालेला आहे "—असें 'चित्रा'च्या ताज्या अंकामध्यें स्वतःच्या सहीनें लिहिलेल्या लेखांत रडगाणें गाण्याची आज डॉ. चिटणीसांवर पाळी आली आहे. 'डायलेक्टिस'वर त्यांनीं लिहिलेले सारे अग्रलेख वायां गेले. मार्क्सवाद, लेनिन, स्तालिन, यांची बदनामी करण्यासाठीं युरोपियन व अमेरिकन ट्रॉट्स्कीवाद्यांच्या ग्रंथांचे आधार देऊन त्यांनीं आपल्या 'विद्वत्ते'चें प्रदर्शन करून पाहिलें, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

विद्यार्थ्यांनीं आपली विचारसरणी 'निश्चित व स्पष्ट' केली पाहिजे, असें डॉ. चिटणीस कळवळून सांगत आहेत. स्वतः चिटणीसांची विचारसरणी किती 'निश्चित व स्पष्ट' आहे हें याच लेखांत त्यांनीं गांधीवादाविषयीं केलेल्या विधानावरून दिसून येईल.

"संपूर्ण स्वातंत्र्यप्राप्तीच्या दृष्टीनें गांधीवादाव्यतिरिक्त दुसरा कार्यक्षम व परिणामकारक असा कार्यक्रम असूं शकेल असें मला तरी वाटत नाहीं," असें डॉ. चिटणीसांनीं या लेखांत नमूद केलें आहे. व आपण गांधीवादाकडे 'झुकूं' लागल्याचें जाहीर केलें आहे.

पण याच लेखांत दुसरीकडे हेच डॉ. चिटणीस म्हणतात:—

"याखेरीज दुसरे विद्यार्थी आहेत. तेहि बुद्धिमान् आणि कार्यनिष्णात आहेत ... पण ते गांधीप्रणीत राष्ट्रवादाकडे झुकूं लागले आहेत, पण राष्ट्रवादाची जीर्ण आणि पुरातन विचारसरणीशीं सांगड घालतां येणें शक्य नाहीं हें त्यांनीं ओळखलें पाहिजे."

( १ ) गांधीवाद 'जीर्ण व पुरातन' आहे व त्याच्याशीं राष्ट्रवादाची सांगड घालूं नये, आणि ( २ ) गांधीवाद स्वातंत्र्यप्राप्तीच्या दृष्टीनें सर्वांत जास्त 'कार्यक्षम व परिणामकारक' आहे,—हीं दोन्ही एकाच डॉ. चिटणीसांचीं मतें आहेत! 'निश्चितपणा' व 'स्पष्टपणा' म्हणतात तो हाच.

डॉ. चिटणीस केव्हां कुणीकडे 'झुकूं' लागतील तें कुणालाच सांगतां येणार नाहीं. त्याचें एक ( राजकीय ) कारण त्यांचा संधिसाधुपणा होय. दुसरें ( भौतिक ) कारण त्यांच्या परिचयांतल्या लोकांना ठाऊकच आहे व तें येथें मुद्दाम नमूद करण्याची जरुरी नाहीं.

(७–५–४४)

---

— २७ —

# गरिबांचे मारेकरी कोण ?

आचार्य अत्रे यांच्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या ‘ नवयुग ’ साप्ताहिकांतील बहुतेक राजकीय लिखाण ‘ प्रभाकर पाध्ये ’ छापाचें असतें, व स्वतः श्री. अत्रे यांना त्याच्यावर प्रसिद्धीपूर्वी किंवा प्रसिद्धीनंतरहि ओझरतीसुद्धां नजर टाकण्यास वेळ मिळत नसावा असा कुणाला संशय आल्यास तो खोटा ठरण्याचा फारसा संभव नाहीं. तथापि या पत्राच्या ताज्या अंकांतील ‘ एकवीस महिन्यांतील स्थित्यंतरें ’ या लेखांत व्यक्त केलेले कांहीं विचार पाध्ये–चिटणीस कंपूच्या व कॉंग्रेस सोशालिस्टांच्या नेहमींच्या प्रचाराशीं अगदीं विसंगत आहेत. हिंदुस्थानांतील अन्नसंकटाबद्दल मुख्यतः साठेबाज व नफेबाज जबाबदार आहेत, ही गोष्ट या कंपूला मुळींच मान्य नाहीं; एवढेंच नव्हे तर ही गोष्ट स्पष्टपणें मांडल्याबद्दल कम्युनिस्टांवर हा कंपू नेहमीं आग पाखडीत असतो, आणि कम्युनिस्ट नसलेल्या एखाद्या देशभक्तानें हीच गोष्ट मांडली तर तो ‘ कम्युनिस्टांच्या आहारीं गेला ’ अशी आरोळी हा कंपू न चुकतां करीत असतो. हा कांगावा किती लबाडीचा आहे हें लक्षांत घेण्याची संधि ‘ नवयुग ’च्या वाचकांना वर उल्लेख केलेल्या लेखानें दिली, ही आनंदाची गोष्ट होय.

गांधीजींच्या अटकेपासून सुटकेपर्यंतच्या २१ महिन्यांचा आढावा घेतांना या लेखांत पुढील उद्गार काढण्यांत आले आहेतः—

“ आमच्यांतील कांहीं धनपिपासु लोक या दुष्काळाच्या मुळाशीं आहेत, हें गांधींना आपण कोणत्या तोंडानें सांगावें ? पण ही गोष्ट लपवून तरी देशाचें काय कल्याण होणार ? गांधीजींपुढें या धनिकांच्या ‘ काळ्या बाजाराची ’ कैफियत आपण धिटाईनें मांडलीच पाहिजे......याच लखपतींनीं मालाच्या किंमती हिमालयायेवढ्या प्रचंडरूपी वाढवून ठेवल्या ! याच लोकांनीं माल लपवून ठेवला. अन् म्हणून गरिबांचे हेच खरे मारेकरी आहेत. हें गौप्यगोपन कुणीतरी निर्भीडपणें महात्माजींपुढें करावयास नको कां ? ”

* * *

ही सत्य परिस्थिति गांधीजींपुढें मांडण्याचें कार्य सच्चे देशभक्त पार पाडतील यांत शंका नाहीं, व स्वतः गांधीजी स्वतंत्रपणें देशांतील परिस्थितीचें निरीक्षण

करीत असतांना त्यांच्या नजरेंतून ही गोष्ट सुटणें शक्य नाहीं हेंहि उघड आहे. परंतु ही वस्तुस्थिति गांधीजींना कळविण्यास कॉंग्रेस सोशालिस्ट पक्षाचे व इतर टोजो-छाप 'क्रांतिकारक' मात्र मुळींच तयार होणार नाहींत हेंहि तितकेंच खरें नाहीं का? किंबहुना हें सत्यचित्र गांधीजींपासून लपवून ठेवण्याचाच ते कसोशीनें प्रयत्न करतील. तसें केल्यानें 'देशाचें कल्याण' होणार नसलें तरी टोजो व सुभाष बोसचें कल्याण होणार आहे ना? झालें तर!

नगर जिल्ह्यांत या पंचमदळ्यांनीं वांटलेल्या ताज्या पत्रकांत याचा स्पष्ट पुरावा मिळतो. या पत्रकावर श्री. अच्युत पटवर्धन यांचा फोटो छापला आहे व पत्रकाला 'आझाद हिंद सरकार अहमदनगर जिल्हा गॅझेट' असें अगडबंब नांव दिलें आहे. "मारुतीला साक्ष ठेवून शपथ घ्या कीं, आधीं स्वतःचें पाहीन, मग गांवाला धान्य देईन व उरलेंच तर सरकारला," असा या पत्रकांत नगरच्या शेतकऱ्यांना उपदेश केला आहे!

आधीं स्वतःचें पहा, मग गांवाचें, असा उपदेश करणारा अजब 'देशभक्त' नगरच्या शेतकऱ्यांना यापूर्वीं कधींहि भेटला नव्हता. तसा उपदेश करणारे लोक कुणीच नव्हते असें नाहीं, पण त्यांना कुणीसुद्धां देशभक्त म्हणून ओळखत नव्हतें. स्वार्थासाठीं देशबांधवांची—आपल्या गांवकऱ्यांचीसुद्धां—उपासमार करण्यास तयार व्हा, असा आज सल्ला देणाऱ्या उफराट्या काळजाच्या लोकांना नगरचा शेतकरी तिरस्कारानें लाथाडील यांत बिलकुल शंका नाहीं. अच्युत पटवर्धनांनीं आपल्या जपानी 'मारुती'पुढें—टोजोपुढें—हिंदुस्थानांत दुष्काळ माजविण्याची शपथ घेतली आहे हें खरें, आपल्या बायकोच्या बाळंतपणाचा खर्च मुलाकडून त्यांच्या मोठेपणीं सव्याज वसूल करून घेणारे जातिवंत नफेबाज नगर जिल्ह्यांत गांवोगांवीं आहेत हेंहि खरें,—पण म्हणून राष्ट्रकार्यासाठीं कोणताहि त्याग करण्यास कधींहि मागेंपुढें न पहाण्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या नगरच्या देशाभिमानी शेतकऱ्यानें सुद्धां या करंट्यांचें अनुकरण कां करावें? तो तसें कधींहि करील का? मुळींच करणार नाहीं. नगर जिल्ह्यांतील कॉंग्रेसभक्त शेतकरी श्री. वेडू पाटील यांचें या अंकांत दुसरीकडे प्रसिद्ध झालेलें पत्रक याचा स्पष्ट पुरावाच होय.

*　　　*　　　*

ब्रह्मदेशांतील सध्यांच्या जपानी राजवटीचें खरें स्वरूप दाखविणारा श्री. थाईन पे यांचा लेख 'लोकयुद्ध' पत्राच्या ता. ७ मे च्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. ब्रिटिश राजवटींतले इरसाल राजनिष्ठ लोकच आज जपानी राजवटीचे आधारस्तंभ कसे बनले आहेत, हें त्या लेखांत पुराव्यानिशीं स्पष्ट केलें आहे. असल्या देशद्रोह्यांची तरफदारी करणारे कुणी असूं शकतील काय? आहेत, मूठभर कां होईना

पण असले लोकसुद्धां आपल्या देशांत आहेत. ' भवितव्य ' पत्रांत साप्ताहिक टिपणें लिहिणारा ' कौटिल्य ' हा या जातीचाच आहे. श्री. **थाइन पे** यांच्या लेखावर टीका करतांना तो म्हणतोः—

" जे लोक आज जपानच्या वर्चस्वाखालीं नामधारी स्वतंत्र ब्रह्मदेशाचा राज्यकारभार चालवीत आहेत ते सर्वच पोटार्थी होते, म्हणूनच जपानी आक्रमण होण्यापूर्वी ब्रिटिशनिष्ठा दाखवीत होते, असें समजणें अत्यंत चुकीचें होईल."

हे लोक खरोखरी फॅसिस्टविरोधी होते आणि म्हणूनच ते पूर्वीच्या काळांत लठ्ठ पगारावर ब्रिटिश राजवटीची सेवा करीत होते, असें या ' कौटिल्यां 'चें म्हणणें आहे !

**थाइन पे** यांचा लेख प्रसिद्ध करणें म्हणजे ' पंचमदळी प्रचार ' करणें होय असें हा 'कौटिल्य' निर्लज्जपणानें सांगतो, व त्याच्या टीकेला ' धनुर्धारी ' व ' नवयुग ' या पत्रांच्या ट्रॉट्स्कीवादी लेखकांनीं उत्साहानें साथ दिली आहे. " हिंदुस्थानांतील व्हाइसरॉयचें कार्यकारी मंडळ व इतर हुद्यावर असलेले मोठमोठे अधिकारी यांच्या राजनिष्ठेविषयीं त्यांच्या गोऱ्या धन्यांच्या मनांत संशय उत्पन्न करण्याचा परिणाम अशा लिखाणानें घडून येत नाहीं काय ? " असा त्यांनीं सवाल टाकला आहे, आणि असा परिणाम करणारा लेख छापल्याबद्दल ते ' लोकयुद्ध ' पत्रावर चिडले आहेत. ' पंचमदळी प्रचार ' म्हणजे काय ? कोणताही सामान्य देशभक्त सांगेल कीं ' पंचमदळी प्रचार म्हणजे फॅसिस्ट स्वारीवाल्यांना मदत करणारा प्रचार. पण ' भवितव्य ' वगैरे पत्रांच्या लेखकांना ही व्याख्या मान्य नाहीं. ब्रिटिश काय किंवा जपानी काय, कोणत्याहि परकीय सत्तेच्या जुलुमशाहीला हातभार लावणाऱ्या स्वार्थांध राष्ट्रद्रोह्याचें खरें स्वरूप उघड करून दाखविणें, यालाच हे लेखक ' पंचमदळी प्रचार ' समजतात !

( ४-६-४४ )

— २८ —

# टॉटनहॅमची पोपटपंची

पं. जवाहरलाल नेहरू प्रभृतींच्या बरोबर नगरच्या तुरुंगांत असलेले कॉंग्रेस वर्किंग कमिटीचे सभासद व गांधीजींच्या ' यंग इंडिया ' पत्राचे माजी संपादक डॉ. सय्यद महमूद यांचें ' लोकयुद्धा 'च्या मागील अंकांत प्रसिद्ध झालेलें पत्र पाहून कॉंग्रेस-सोशालिस्ट, फॉर्वर्ड ब्लॉक, वगैरे पंचमदळी गट व त्यांचे जपानी धनी अगदीं चिडून गेले आहेत.

स्वतः जपान्यांना या पत्राविषयीं काय वाटतें हें सिंगापूर रेडियोनें घाईघाईनें पण स्पष्ट शब्दांत जाहीर करून टाकलें आहेच, आणि ज्यांनीं तो ऐकला नसेल त्यांनीं ' लोकमान्य ' पत्राच्या गेल्या रविवारच्या अंकांतील अग्रलेख वाचावा. जपान्यांची व त्यांच्या हिंदुस्थानांतील हस्तकांची मनोभूमिका त्या लेखांत हुबेहूब प्रतिबिंबित झाली आहे.

* * *

डॉ. महमूद यांच्या पत्रांत व्यक्त करण्यांत आलेल्या विचारांवर सरळ हल्ला करण्याचें धाडस ' लोकमान्य ' कारांना झालें नाहीं. त्यांनीं तसें केलें असतें तर कॉंग्रेसची विचारसरणी व कॉंग्रेसच्या नांवाचा उपयोग करूं पाहणाऱ्या पंचमदळ्यांची विचारसरणी यांत केवढें जमीन-अस्मानांचें अंतर आहे हें अगदींच स्पष्टपणें उघडकीस आलें असतें. म्हणून त्यांनीं या पत्रावर आडून हल्ला करण्याचा कावेबाज प्रयत्न केला आहे.

' लोकमान्य ' कार म्हणतातः--

" डॉ. महंमूद यांनीं ८ ऑगस्टच्या ठरावासंबंधानें समर्थनात्मक असा पत्रांत लिहिलेला मजकूर कापला गेला नसेल काय?... सरकारनें कापून काढलेल्या मजकुरांतला हा उताराच तेवढा देणें म्हणजे पत्र बनावट करणें होय. "

आणि ह्या पत्राचा 'बनावटपणा' लवकरच चवाठ्यावर येऊन " कम्युनिस्टांचें थोबाड फुटेल " अशी ' सभ्यते 'च्या जपानी नियमांत पारंगत असलेल्या 'लोकमान्य ' कारांनीं ग्वाही दिली आहे!

* * *

‘ लोकयुद्ध ’ पत्र म्हणजे ‘ विविध वृत्त ’ नव्हे. ‘ लोकयुद्धां ’त प्रसिद्ध झालेल्या पत्राचा ‘ बनावटपणा ’ चवाठ्यावर येण्याऐवजीं ‘ लोकमान्य ’कारांच्या राजकीय विचारसरणीचा ‘ अस्सल ’ उगमच या प्रकारामुळें चवाठ्यावर येण्याचा जास्त संभव आहे.

पहिली गोष्ट येथें असंदिग्धपणें जाहीर करण्यास हरकत नाहीं व ती ही कीं ‘ लोकयुद्ध ’ पत्रांत डॉ. महंमूद यांच्या पत्रांतील एकूणएक राजकीय मजकूर जशाचा तसा छापण्यांत आला आहे. ह्या राजकीय मजकुराखेरीज केवळ खासगी व घरगुती स्वरूपाचा जो मजकूर त्या पत्रांत होता तेवढाच ‘ लोकयुद्धा ’मध्यें तें पत्र छापतांना वगळला आहे. डॉ. महंमूद यांच्या लेखणींतून उतरलेलें राजकीय मजकुराचें एक अक्षरसुद्धां ‘ लोकयुद्धा ’नें वगळलेलें नाहीं. आणखी कांहीं राजकीय मजकूर असता तर ‘ लोकयुद्धा ’नें तो जरूर प्रसिद्ध केला असता. दडपादडपी व बनवाबनवी करण्याच्या कारवाया ‘ लोकमान्य ’कारांना प्रिय असलेल्या कॉंग्रेस सोशालिस्टांच्या गोटांत होत असतात, कम्युनिस्टांच्या कचेरींत नव्हे.

*    *    *

डॉ. महमूद यांचें पत्र छापतांना ‘ लोकयुद्धा ’नें कोणत्याहि प्रकारची बनवाबनवी केलेली नाहीं, त्यांत ‘ कापाकापी ’चा व दडपादडपीचा प्रश्नच येत नाहीं, डॉ. महंमूद यांना तें पत्र लिहितांना राजकीय बाबतींत जे विचार व्यक्त करावयाचे होते ते संपूर्णपणें व त्यांच्याच शब्दांत ‘ लोकयुद्ध ’ पत्रांत छापले आहेत—याविषयीं अनेक थोर कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं मूळ पत्र प्रत्यक्ष पाहून खात्री करून घेतली आहे. ‘ लोकमान्य ’कारांना याविषयीं जर प्रामाणिकपणें संशय असता तर त्यांना स्वतः तें पत्र डोळ्यांनीं पाहून आपल्या संशयाचा खरेखोटेपणा ठरविणें मुळींच अशक्य नव्हतें. या पत्रावर पत्रप्रसिद्धीपूर्वींच लेख लिहिण्याची त्यांनीं ‘ लोकयुद्धा ’च्या संपादकांकडे परवानगी मागितली व ती त्यांना ताबडतोब देण्यांत आली. तशीच त्यांनीं मूळ पत्र पाहण्याची परवानगी मागितली असती तर त्यांना ती मिळाली नसती असें नाहीं. ‘ लोकयुद्ध ’ कचेरींत ते स्वतः अनेकदां आलेले आहेत, तेव्हां कम्युनिस्टांकडे कसें जावें म्हणून लाज वाटण्याचाही प्रश्न नव्हता. प्रश्न होता फक्त प्रामाणिकपणाचा ! त्यांचा संशय प्रामाणिकपणाचा असता तर त्यांनीं त्याचा खरेखोटेपणा पडताळून पाहिला असता. पण तो संशयच लबाडीचा होता. डॉ. महंमूद यांचें लोकयुद्धांत प्रसिद्ध झालेलें पत्र अस्सल असल्याची स्वतः ‘ लोकमान्य ’ कारांना पूर्ण खात्री आहे. त्यांचा खरा आक्षेप पत्राच्या बनावटपणाविरुद्ध नसून पत्रांतील राजकीय विचाराविरुद्ध आहे ! कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या सभासदानें जपान्यांविरुद्ध राष्ट्ररक्षण

करण्याच्या बाबतींत एवढी कळकळ दाखवावी ही गोष्ट जपानी रेडिओप्रमाणें 'लोक-मान्य 'कारांनाहि अतिशय झोंबली आहे.

अजूनहि प्रमुख काँग्रेस पुढाऱ्यांकडे जाऊन या पत्राच्या खरेखोटेपणाविषयीं चौकशी करणें 'लोकमान्य 'कारांना (त्यांच्यांत प्रामाणिकपणाचा थोडासा तरी अंश शिल्लक असेल तर) अशक्य नाहीं. पण त्यांनीं एवढी खटपट करणें व चौकशींत सिद्ध झालेलें सत्य जाहीरपणें कबूल करणें काँग्रेस सोशालिस्ट पक्षाला व टोजोला रुचणार नाहीं, व म्हणून असल्या भानगडींत 'लोकमान्य 'कार पडतील असा फारसा संभव नाहीं.

* * *

डॉ. महमूद यांचें पत्र छापून 'लोकयुद्ध' पत्रानें काँग्रेस पुढाऱ्यांच्या धोरणा-बाबत 'गैरसमज' माजविला आहे, असें 'लोकमान्य 'कार म्हणतात. डॉ. महमूद यांच्या पत्रांतील विचारसरणीलाच त्यांचा विरोध आहे, ह्याची ही अप्रत्यक्ष कबू-लीच होय.

डॉ. महमूद म्हणतात:—"या (जपानच्या) स्वारीनें आम्हांला बेचैन करून टाकलें आहे."

'लोकमान्य 'कारांचें म्हणणें असें दिसतें कीं काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सभास-दाच्या तोंडीं असें वाक्य घालणें म्हणजे "काँग्रेस पुढाऱ्यांच्या धोरणाबाबत गैर-समज माजविणें" होय! 'लोकमान्य 'कारांच्या मते या जपानी स्वारीनें नगर किल्ल्यांतलि काँग्रेस पुढाऱ्यांना 'बेचैन' करण्याऐवजीं उत्साहितच केलें असलें पाहिजे! 'लोकमान्य 'कारांचें मत ॲमेरी व टॉटनहॅमच्या मताशीं तंतोतंत जुळतें.

डॉ. महमूद म्हणतात:–"या विरुद्ध (जपानी स्वारीविरुद्ध) देशामध्यें खरा-खुरा उत्साह निर्माण केला पाहिजे, या बाबतींत सरकारविषयीं वाटणारा संताप व चीड आपण आपल्या कर्तव्याआड येऊं देतां कामा नये."

'लोकमान्य 'कारांचें म्हणणें असें दिसतें कीं नगर तुरुंगांतील काँग्रेस पुढाऱ्यांच्या तोंडीं असें वाक्य घालणें म्हणजे काँग्रेस पुढाऱ्यांच्या धोरणाच्या बाबतींत 'गैरसमज' माजविणें होय! मग डॉ. महमूद, जवाहरलाल, प्रभृ-तींच्या तोंडून 'लोकमान्य 'कार कोणच्या घोषणेची अपेक्षा करतात? "जपानी स्वारीच्या बाबतींत निश्चिन्तपणा ठेवा, सरकारविषयीं संतापानें बेफाम होऊन स्वतःचें देशरक्षणाचें कर्तव्य विसरून जा," असा ह्या थोर पुढाऱ्यांकडून संदेश मिळ-ण्याची 'लोकमान्य' कारांना आशा वाटते काय? काँग्रेस पुढाऱ्यांचें मत असें आहे, असें अमेरी–मॅक्सवेल–टॉटनहॅम कंपूच आतांपर्यंत ओरडत होता. कलकत्त्यावर जपान्यांनीं ऑगस्ट १९४२ मध्येंच बॉंबफेक कां केली नाहीं, अशी तक्रार राम मनोहर

लोहिया यांनीं केली आहे खरी; पण नेहरू प्रभृति कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या विचारसरणीशीं असल्या देशद्रोही मताचा काडीइतकाहि संबंध नाहीं हें सर्वांना ठाऊक नाहीं का?

* * *

डॉ. महमूद यांच्या पत्राविषयीं कॉंग्रेस सोशालिस्टांची व टोजोची प्रतिक्रिया ही आहे. देशभक्तांना या पत्राविषयीं काय वाटतें हें 'बॉम्बे क्रॉनिकल'च्या पुढील संपादकीय उद्गारांवरून समजून येईल:—

" बिहारमधील माजी कॉंग्रेस मंत्री डॉ. महमूद यांनीं आपल्या मुलाला लिहिलेल्या पत्राचें जनतेनें स्वागत केलें तें अगदीं साहजिकच आहे. जपानी स्वारीच्या बाबतींत कॉंग्रेसची भूमिका काय आहे याचा त्या पत्रांत अगदीं स्पष्ट खुलासा केला आहे. दणदणीत व असंदिग्ध शब्दांत हें पत्र म्हणतें कीं 'त्याविरुद्ध (जपानी स्वारीविरुद्ध) देशांत खराखुरा उत्साह निर्माण करून देशाचें मनोधैर्य टिकवून धरलें पाहिजे, या बाबतींत सरकारविषयीं वाटणारा संताप व चीड आपण आपल्या कर्तव्याआड येऊं देतां कामा नये.' कॉंग्रेसची भूमिका याहून वेगळी असणें शक्यच नाहीं. कॉंग्रेसचे शत्रू ह्याच्या उलट प्रचार करतात खरे, पण त्याचें कारण त्यांना स्वतःचे हेतु साधावयासाठीं कॉंग्रेसची बदनामी करावयाची आहे हेंच होय."

(१५-६-४४)

---

## २९

# शत्रु कोणते व मित्र कोणते?

गांधीजींच्या संमतीनें राजाजींनीं मांडलेली कॉंग्रेस-लीग एकीची योजना, व गेल्डरला दिलेल्या मुलाखतींत गांधीजींनीं मांडलेली राजकीय समेटाची योजना, ह्या दोहोंना महाराष्ट्रांतील कॉंग्रेसवादी पत्रांनीं साहजिकपणेंच पाठिंबा दिला आहे. उलटपक्षीं हिंदु महासभावादी व इतर कॉंग्रेसविरोधी पत्रें ह्या दोन्ही बाबतींत गांधीजींवर शिव्यांची लाखोली वाहण्यास शिमग्याच्या उत्साहानें पुढें सरसावलीं आहेत. त्याच-

वेळीं कॉंग्रेस सोशालिस्टांशीं संबंध असलेलीं पत्रेंहि गांधीजींच्या भूमिकेचा कावेबाज-पणानें विपर्यास करण्याचा शक्य तितका प्रयत्न करून पाहात आहेत.

गेल्डरच्या मुलाखतींत गांधीजींनीं मांडलेलें मत म्हणजे 'महात्माजींचें नेतृत्व स्थितिशील नसून गतिमान आहे' ह्याचा पुरावाच होय, अशा शब्दांत 'नवा काळ' नें त्याचें अभिनंदन केलें आहे. राजाजींच्या कॉंग्रेस-लीग एकीच्या योजनेचें उत्साहानें स्वागत करतांना हें पत्र म्हणतें:—

"हा मसुदा हिंदुस्थानच्या इतिहासांत संस्मरणीय ठरेल, स्वातंत्र्याच्या मार्गांतील हा महत्त्वाचा टप्पा आहे."

'जीनांनीं स्वातंत्र्याचा मार्ग अडविलेला नाहीं' ह्या गांधीजींच्या उद्गारांचेंहि 'नवाकाळ' नें स्वागत केलें आहे. राजाजींचा मसुदा जिनांना पेंचांत टाकणारा आहे, तो स्वीकारला तरी जिनांची फजिती होईल व न स्वीकारला तरी तेंच होईल, असा जो खोडसाळ प्रचार सध्यां कांहीं जण करीत आहेत त्याला विरोध दर्शवून 'नवा काळ' नें पुढील उद्गार काढले आहेत:—

"राजाजी-गांधीजींना स्वातंत्र्याच्या आघाडीवर जिना व लीग यांना आणावयाचें आहे, ... स्वातंत्र्यसूर्यास आवाहन करणारे बॅ. जिना या योजनेच्या स्वीकारानें उदयास येतील."

रत्नागिरीचें 'बलवंत' पत्र म्हणतें:—

"'फोडा आणि झोडा' या भेदनीतीपासून सुटका, स्वातंत्र्याची स्थापना, व स्वयंनिर्णयाचा हक्क, या लोकशाहींतील मूलभूत कल्पनाच राजाजींच्या तडजोडीच्या मुळाशीं आहेत."

* * *

तथापि राजकीय पेंचप्रसंगाच्या ग्रहणांतून देशाची मुक्तता करण्यासाठीं व एकजुटीच्या आणि राष्ट्रीय सरकारच्या मार्गानें देशाला पुढें नेण्यासाठीं गांधीजींनीं केलेला हा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रयत्न पाहून स्वातंत्र्य-विरोधकांचें धाबें दणाणून जावें, यांत नवल कोणतें?

हिंदुमहासभावाल्यांना अलीकडच्या काळांत बरीच आशा लागली होती कीं मि. जिना व मुस्लिम लीग यांच्यावर बेतालपणें टीका करून आपण कॉंग्रेसवाल्यांनाहि आपल्या जाळ्यांत ओढूं शकूं व देशांतील फाटाफूट वाढविण्याचें आपलें साम्राज्यशाहीधार्जिणें धोरण आपण कॉंग्रेसवाल्यांच्याहि गळीं उतरवूं शकूं. गांधीजींच्या ताज्या घोषणांमुळें हिंदु-महासभावाल्या वीरांच्या सर्व आशा रसातळास गेल्या आहेत, व म्हणून त्यांचा राग अनावर झाला आहे.

राजकीय समेटाच्या बाबतींत गांधीजींनीं केलेल्या सूचना म्हणजे गांधीजींची ‘ घसरगुंडी ’ होय, असें ‘ केसरी ’ पत्राचें म्हणणें आहे. आपण सद्य:स्थितींत कॉंग्रेसला सत्याग्रह चालू ठेवण्याला सांगूं इच्छित नाहीं असें गांधीजींनीं जाहीर केलें आहे, ही तर ‘ केसरी ’च्या मतें ‘ सर्वांहून वाईट गोष्ट ’ होय ! पुण्याच्या ‘ काळ ’ पत्रानें व मुंबईच्या ‘ प्रभात ’नेंहि ‘ गांधीजींनीं गुडघे टेकले,’ ‘ शिस्तशीर माघार ’ घेतली, असे उद्गार काढले आहेत व ‘ काळ ’नें तर ‘ म्हातारा चळला ’ असें लिहून हिंदुसभावादी सभ्यपणाचा मासला दाखवून दिला आहे.

गांधीजींपेक्षां व कॉंग्रेसपेक्षां हिंदु-सभावाद्यांचा साम्राज्यशाहीविरोध जास्त जाज्वल्य आहे व ब्रिटिश सत्तेविरुद्ध सत्याग्रहाच्या चळवळीचें जूं आतांपर्यंत ह्या हिंदुसभावाद्यांनींच वाहिलें आहे, असा ह्या टीकेवरून एरव्हीं कुणाचाहि ग्रह झाला असता. परंतु ह्या टीकाकारांचे आतांपर्यंतचे पराक्रम नोकऱ्या मिळविण्याच्या क्षेत्रा-बाहेर फारसे नसल्याचें सर्वांना ठाऊक आहे, व म्हणून त्यांच्या ह्या उसन्या आवे-शानें कुणीहि फसणार नाहीं हें उघड होय.

* * *

खरोखरी त्यांना काय पाहिजे, हें ‘ काळ ’ पत्राच्या पुढील विधानावरून स्पष्ट-पणें कळून येईलः—

“ गांधीजी स्वस्थ बसते व पुढचें पाऊल टाकण्याची जबाबदारी त्यांनीं सर-कारवरच टाकली असती तर तेंच अधिक हिताचें ठरणें संभवनीय होतें. ”

ह्याचा अर्थ असा कीं राजकीय क्षेत्रांतील पुढाकार ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या हातीं असावा, जनतेच्या पुढाऱ्यांनीं स्वस्थ बसावें ! हिंदु-सभावाद्यांच्या जनता-विरोधी धोरणाचें सूत्र हें आहे !

गांधीजी-राजाजींच्या कॉंग्रेस-लीग एकीच्या योजनेवरील त्यांच्या टीकेचें रहस्यसुद्धां त्यांच्या ह्या साम्राज्यशाही-धार्जिण्या भूमिकेंतच आहे. कॉंग्रेस-लीग एकीला त्यांचा विरोध आहे, ह्याचें कारण एवढेंच कीं ह्या एकीच्या योगें साध्य होणारें राष्ट्रीय सरकार व संपूर्ण स्वातंत्र्य त्यांना नको आहे. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या चौकटींतील ‘ अखंड ’ हिंदुस्थानची घोषणा पुकारणाऱ्या व्हाइसरॉयला हिंदु-महासभेचा ‘ सन्मान्य सभासद ’ करून घेण्यास हे लोक एका पायावर तयार आहेत. अर्थात् गांधीजींच्या संमतीनें राजाजींनीं मांडलेल्या मसुद्याला ‘ केसरी ’नें ‘ मातृभूमीच्या मूर्तीची वाटणी करण्याचें कारस्थान ’ असें नांव देऊन त्याला विरोध करण्यास सर्व ‘ हिंदु ’ समाजाला एक होण्याची हांक मारावी ह्यांत नवल कोणतें ? ॲमरीला ज्या कारणासाठीं कॉंग्रेस-लीग एकी नको आहे त्याच कारणासाठीं हिंदु-महासभावाद्यांनाहि ती नको आहे.

 * * *

साम्राज्यशाहीच्या ताटाखालचीं मांजरें बनलेले गट गांधीजींच्या आजच्या प्रयत्नांवर टीका करतांना नकली जहालपणाचा हास्यास्पद बुरखा कसा घेऊं पाहातात, हें रॉयिस्टांच्या ' संग्राम ' पत्रावरूनहि दिसून येईल. ' तिरस्करणीय शरणागति ' असें गांधीजींच्या सूचनांचें ह्या पत्रानें वर्णन केलें आहे, आणि ' गांधीजींचें चारित्र्य हिणकस ठरलें आहे ' असा शेरा मारून ह्या पत्रानें तेरा हजारांच्या मलिद्यांतील आपल्या वांट्याचा हक्कहि शाबीत केला आहे. राष्ट्रीय सरकारला रॉयपक्षाचा विरोध आहे; कारण काय तर त्यामुळें ' धनिकांचें सरकार ' स्थापन होईल ! ब्रिटिश भांडवलाच्या पकडींतून देशाला सोडविणारें व देशाच्या औद्योगिक प्रगतीचा मार्ग खुला करणारें राष्ट्रीय सरकार ह्या रॉयपक्षाला अनिष्ट वाटावें हें साहजिकच होय. राष्ट्रीय सरकार अनिष्ट मानण्याच्या बाबतींत ' चित्रा ' पत्रहि रॉयिस्टांशीं सहमत आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्यास ' योजनाबद्ध अर्थव्यवस्था ' अस्तित्वांत येईल ( म्हणजे अन्नप्रश्न वगैरे बाबतींत पद्धतशीर उपाय योजण्यांत येतील ) व ही गोष्ट ' चित्रा 'ला अनर्थावह वाटते ! ( ' चित्रा, ' अग्रलेख, १६-७-४४ )

संधिसाधुपणानें कॉंग्रेसवादाचा तात्पुरता बुरखा घेणाऱ्या कांहीं पत्रांचें खरें स्वरूपहि गांधीजींच्या घोषणांमुळें उघड झालें आहे. उदाहरणार्थ पुण्याच्या 'सकाळ' पत्रानें गांधीजी-राजाजींच्या योजनेला ' दुहीचा मसुदा ' असें नांव देऊन व राजाजींवर किळसवाणे आरोप करून उघड हिंदुसभावादी पत्रांनाहि लाजविलें आहे. गांधीजींच्या उपवासांत त्यांना ' एकाकी ' गांठून, व ' मृत्युपत्रावर सही घेऊन मोकळें व्हावें अशा तऱ्हेचा चलाखी वकिली व्यवहार ' करून, राजाजींनीं ' महात्माजींच्या गळ्यांत घोरपड बांधली ' अशी ह्या पत्रानें राजाजींवर कुत्सित टीका केली आहे व पर्यायानें गांधीजींवर नादानपणाचा आरोप केला आहे. असल्या टीकेला स्वतः गांधीजींनीं स्पष्ट उत्तर देऊन टाकलें आहेच.

* * *

कॉंग्रेस सोशालिस्टांच्या धोरणाचा कावेबाजपणानें निरनिराळ्या स्वरूपांत पुरस्कार करणाऱ्या ' लोकमान्य ' पत्रानें राजाजींच्या व गांधीजींच्या भूमिकेला एकीकडे औपचारिक स्वरूपाचा पाठिंबा दिला आहे खरा, पण त्याच वेळीं ' ह्यांत नवीन कांहींच नाहीं, आम्हीं तरी हेंच म्हणत होतों ' असे पोरकटपणाचे सूर काढण्यांत ' लोकमान्य 'कार धन्यता मानून घेत आहेत, व कॉंग्रेस-लीग एकीची आणि पेंचप्रसंग निवारणाची अशक्यता ' सिद्ध ' करण्यावर मुख्य भर देणें त्यांना आपलें पवित्र कर्तव्य वाटत आहे ! राजाजींच्या योजनेचा उद्देश कॉंग्रेस-लीग एकी हा नसून ' जिनांच्या मुळावर घाव ' घालणें हा आहे, व गांधीजींच्या प्रयत्नांचा उद्देश व

परिणाम पेंचप्रसंग सोडविणें हा नसून फक्त 'अमेरिकन लोकमताला चालना देणें' हाच आहे, असलीं विक्षिप्त मतें 'लोकमान्या' खेरीज दुसरीकडे कुठें वाचायला मिळणार? ह्या विक्षिप्तपणांत पद्धतशीरपणाचा मुळींच अंश नाहीं असें मात्र म्हणतां येत नाहीं. 'पेंच-प्रसंग चालू राहिला पाहिजे' ही 'लोकमान्य' कारांची (व कॉंग्रेस सोशालिस्टांची) पूर्वीपासूनची भूमिका आहे, पेंचप्रसंगावरील रामबाण उपाय असलेली कॉंग्रेस-लीग एकजूट त्यांना विषाप्रमाणें वाटते, अन्न परिस्थितीच्या आधारें 'ऑगस्ट क्रांती'ची 'संघटित' द्वितीयावृत्ति सुरू करण्याची आशा त्यांनीं उराशीं बाळगली आहे,— व म्हणूनच गांधीजींच्या खऱ्या भूमिकेभोंवतीं धुक्याचें वातावरण निर्माण करण्याचा त्यांनीं प्रयत्न करावा हें क्रमप्राप्तच होय.

शत्रु कोण व मित्र कोण हें स्पष्टपणें समजून घेण्यास कॉंग्रेसभक्तांना गांधीजींच्या घोषणेनें उत्तम संधि प्राप्त करून दिली आहे यांत शंका नाहीं.

(३०–७-४४)

---

३०

# ऑगस्ट बंड व गांधीजी

पुढील दोन उतारे वाचा, आणि ते कुणाच्या लेखांतून घेतले आहेत तें आठवण करून सांगाः—

(१) "ऑगस्ट १९४२ नंतर झालेल्या बंडाच्या जबाबदारींतून गांधी व वर्किंग कमिटी सुटूं शकत नाहींत. 'मी तुरुंगांत गेलों तर अहिंसा पाळली जाणें अशक्य आहे' असें गांधी बोलले होते. येती चळवळ ही नुसती तुरुंगाची चळवळ होणार नाहीं असें तेच बोलले होते... ८ ऑगस्ट १९४२ चें वातावरण धडकत असतां वल्लभभाई, शंकरराव देव, मश्रूवाला व स्वतः गांधी या सर्वांच्या प्रतिपादनाचा सूर काय होता हें पाहिलें तर पुढें जें सर्व घडलें त्याची जबाबदारी कशी वांटावी हें ठरविणें अवघड होत नाहीं."

( २ ) "गांधींच्या 'हरिजन'मधील लेखांनीं निर्माण केलेलें वातावरण, वर्किंग कमिटीच्या सभासदांनीं मुंबईला व तत्पूर्वी केलेलीं भाषणें...हा सर्व पुरावा लक्षांत घेतल्यास [८ ऑगस्ट १९४२ नंतरच्या] सामुदायिक उठावांबद्दल कुणाला जबाबदार धरलें पाहिजे ह्या प्रश्नाचें एकच उत्तर देतां येईल. गांधींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय काँग्रेसला जबाबदार धरलें पाहिजे— हेंच तें उत्तर होय."

ह्यांपैकीं एक उतारा 'टॉटनहॅमचें चोपडें' म्हणून प्रसिद्ध असलेल्या गलिच्छ पुस्तकांतला आहे. दुसरा उतारा 'लोकमान्य'पत्राच्या ता. ३०-७-४४ च्या अग्रलेखांतला आहे.

पण ह्यांपैकीं **टॉटनहॅम** कोणता आणि 'लोकमान्य'कार कोणते, हें ह्या उताऱ्यांकडे पाहून कुणाला सांगतां येईल काय ?

*　　　*　　　*

मुंबईच्या 'नवशक्ति' पत्राचे संपादक श्री. का. म. ताम्हणकर हे असले तरी त्याचे मालक श्री. सदानंद हे आहेत. गांधी-राजाजी योजना व **गेल्डर** मुलाखत प्रसिद्ध झाल्यावर ह्या सदानंद महाशयांनीं आपण बडे राजकीय पुढारी आहोंत अशा आविर्भावानें गांधीजींकडे पत्र पाठवून आपला निषेध व्यक्त केला व 'फ्री प्रेस' पत्राच्या द्वारें अत्यंत किळसवाणी निंदेची मोहीम सुरू केली. गांधीजींनीं त्यांना थोडक्यांत उत्तर दिलें. "असले धंदे करून आतांपर्यंत तुम्हीं बरीच माया जमविली, तेवढ्यावरच समाधान माना आणि ह्यापुढें कांहीं तरी प्रामाणिक धंदा सुरू करा," असा गांधीजींनीं दिलेल्या उत्तराचा आशय होता.

पण जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं. श्री. सदानंदांना खराखुरा प्रामाणिक धंदा सुरू करणें अशक्यच आहे असें दिसतें. 'फ्री प्रेस' पत्रातर्फे त्यांनीं आपला जुना उद्योगच चालू ठेवला आहे, आणि 'नवशक्ति' पत्राचाहि ते तोच उपयोग करीत आहेत.

ता. २-८-४४ च्या अग्रलेखांत 'नवशक्ति'नें मि. जिना व लीग ह्यांच्या बाबतींत वापरलेली असभ्य भाषा श्री. सदानंदांच्या धंद्याला अगदीं साजेशी आहे ह्यांत शंका नाहीं, व त्यांनीं ह्या धंद्यांत आणखीहि कांहीं माणसें तरबेज करण्याचें काम हातीं घेतलें आहे हें त्यावरून स्पष्ट होतें.

'नवशक्ति' नें ह्या लेखांत मि. जिनांना 'रावणशहा', 'उलट्या कवटीचा पागल' 'मदोन्मत्त टोणगा' अशीं शेलकीं विशेषणें दिलीं आहेत, इतकेंच नव्हे तर लीग कौन्सिलच्या सभासदांना 'निर्बुद्ध दाढीवाले बोकड' म्हटलें आहे.

आणि हें केव्हां ? तर गांधीजी व जिना यांची भेट ठरली आहे अशा वेळीं ! कॉंग्रेस-लीग समेटाच्या द्वारें हिंदुस्थानांतील राष्ट्रीय एकजूट घडून येण्याचा समय जवळ येऊन ठेपला आहे अशा वेळीं !

मुस्लिम पुढाऱ्यांविषयीं असले घाणेरडे उद्गार काढून जातीय तेढ माजविण्याचा हा प्रयत्न श्री. सदानंद व त्यांचे हस्तक ह्यांनीं कां सुरू केला आहे ?

' बुभुक्षितः किं न करोति पापम् ' ह्यांतच ह्या प्रश्नाचें उत्तर सांपडेल.

*  *  *

कांहीं दिवसांपूर्वीं ऑल-इंडिया रेडियोच्या मुंबई स्टेशनवर श्री. मर्ढेकर यांची ' तांबडी माती ' ही कादंबरी नाट्यरूपानें श्रोत्यांना सादर करण्यांत आली. कम्युनिस्टांवर खोटे आरोप करून त्यांची नालस्ती करणें, हें या कादंबरीचें वैशिष्ट्य आहे. तिच्यांत रंगवलेला कम्युनिस्ट पुढारी सरकारी युद्ध-प्रचार खात्यांत नोकरी पत्करतो व एका बाईवर बलात्कार करतो ! सरकारी नोकर ह्या नात्यानें युद्ध-प्रचार करणाऱ्यांमध्यें स्वतः श्री. मर्ढेकर हे आहेत हें सर्वांना माहीत आहे, कारण ते ऑ. इं. रेडियोच्या मुंबई स्टेशनचे असिस्टंट डायरेक्टर आहेत. अर्थात ' तांबडी माती ' कादंबरींतील ' कुमार ' ह्या कम्युनिस्ट पात्राच्या द्वारें आत्मचरित्रच निवेदन करण्याचा श्री. मर्ढेकर यांचा हेतु असावा, असें कुणाला वाटल्यास तें साहजिक ठरेल.

स्वतःच्या मनोभूमिकेशींच जास्त साम्य असलेल्या ह्या ' कुमार ' ला ' कम्युनिस्ट ' म्हणून वाचकापुढें उभें करण्यांत श्री. मर्ढेकर यांनीं बरेंच धाडस दाखविलें आहे. आणि हें धाडस पचलें अशा समजुतीनें ते याहूनहि मोठें धाडस करून दाखविण्यास अलिकडे पुढें सरसावले. आपले मित्र श्री. अनंत काणेकर ह्यांच्याकडून त्यांनीं त्या कादंबरीचें नाट्यवेषांत रूपांतर करून घेतलें व बॉंबे स्टेशनवरील आपल्या अधिकाराच्या साहाय्यानें तें रेडियोवरून लोकांना ऐकविलें. युद्धाची थट्टा करणारा कार्यक्रम ऑल इंडिया रेडियोवरून लोकांना श्री. मर्ढेकर यांच्या कृपेनें प्रथमच ऐकावयास मिळाला.

' बॉंबे क्रॉनिकल 'च्या रविवारच्या अंकांतील ' लास्ट पेज ' ह्या सदरांत ह्या प्रकरणाचा बोभाटा झाल्यापासून श्री. मर्ढेकर व श्री. काणेकर ह्या दोघांचीहि बरीच धांदल उडाली आहे असें दिसतें. श्री. मर्ढेकर हे आपली नोकरी कायम ठेवण्यासाठीं जरूर ते उपाय योजून स्वतःची ' वाङ्मयीन महात्मता ' सिद्ध करतील अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. पण यदाकदाचित् मर्ढेकरांवर भलता प्रसंग आला तर आपलें काय होणार, ह्या विचारानें श्री. अनंत काणेकर मात्र बेचैन झाले असावेत. त्यांनीं घाईघाईनें ' क्रॉनिकल ' ला पत्र पाठवून आपला ' खुलासा ' प्रसिद्ध

केला आहे. " माझा त्यांत कांहीं अपराध नाहीं, माझें काम फक्त रूपांतरकाराचें होतें व तेवढेंच मी केलें, त्या पुस्तकांतल्या मतांशीं माझा कांहींहि संबंध नाहीं," —हाच त्यांच्या ' खुलाशा ' चा सारांश आहे !

पैसे मिळाले कीं श्री. काणेकर कोणतेंहि वाङ्मय तयार करून देण्यास तयार असतात, याविषयीं ह्या खुलाशानंतर तरी कुणालाहि शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

( ६-८-४४ )

---

## — ३१ —

# पाकिस्तान-विरोधाची केरसुणी

पाकिस्तानला व कॉंग्रेस-लीग एकीला विरोध करणाऱ्या हिंदुमहासभावाल्यांचें खरें स्वरूप काय आहे ? महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष दे. भ. काकासाहेब गाडगीळ यांनीं या प्रश्नाचें मार्मिक उत्तर देऊन सावरकर-श्यामप्रसाद कंपूचा दंभस्फोट केला आहे. मुंबईतील ब्राह्मणसभेच्या गणपतीवर अंड्यांचा अभिषेक करून आपली ' हिंदुत्वनिष्ठा ' सिद्ध करणाऱ्या राघोबादादाच्या वंशजांसंबंधीं श्री. काकासाहेब गाडगीळ लिहितातः—

" त्यांचा पाकिस्तान-विरोध हा वस्तुतः, जर हिंदुस्थानला हिंदु-मुस्लिम ऐक्य होऊन स्वातंत्र्य मिळालें तर तें बहुजनसमाजाला मिळणार असल्यानें त्याला विरोध आहे. वर्णव्यवस्था ईश्वरनिर्मित मानणारे, संस्थानें पूर्वजांचीं स्मारकें समजणारे, कर्तृत्वापेक्षां जन्मावर विश्वास टाकणारे, हे बहुजनसमाजाचे शत्रु आहेत. तथापि यांच्या या केरसुणीनें समुद्र परतविण्याच्या प्रयत्नाला यश येणार नाहीं."

* * *

उघडपणें हिंदुसभेच्या नांवाखालीं कॉंग्रेस-लीग समेटाला खो घालूं पाहणाऱ्या या घरभेद्यांना कांहीं प्रच्छन्न हिंदुसभावाले उत्साहानें साथ देत आहेत, व त्यांत ' लोकमान्य 'कारांची प्रामुख्यानें गणना केली पाहिजे. हिंदु-मुसलमानांतील सध्यांचा

बेबनाव काँग्रेस–लीग समेटाच्या द्वारें नाहींसा करून राष्ट्रीय एकजूट अस्तित्वांत आणणें, व अशा रीतीनें राष्ट्रीय सरकारचा मार्ग मोकळा करणें, ही गोष्ट 'लोकमान्य' कारांना मुळींच महत्त्वाची वाटत नाहीं. किंबहुना विशिष्ट परिस्थितींत आपल्या देशांत हिंदु–मुसलमानांमध्यें यादवी माजणें 'लोकमान्य'कारांना अभिनंदनीयच वाटतें. 'लोकयुद्धा'च्या गेल्या अंकांत कॉ. पी. सी. जोशी यांच्या लेखामध्यें गांधी–जीना वाटाघाटी यशस्वी होण्याच्या दृष्टीनें ज्या विधायक सूचना केल्या आहेत, त्यांना अनुलक्षून 'लोकमान्य'कार हिंदुत्वनिष्ठांच्याच हिरीरीनें व स्वतःला साजेशा बेजबाबदारपणानें खुशाल जाहीर करतात कीं "या सूचना मान्य करण्यापेक्षां हिंदुस्थान यादवीलाहि तयार होईल !" ('लोकमान्य,' अग्रलेख, ता. २२–८–४४).

गांधी–जीना वाटाघाटींत जर काँग्रेस–लीग समेट घडून आला नाहीं व हिंदुस्थानांत यादवी माजली तर 'लोकमान्य'कारांचें काय बिघडणार आहे ? या यादवीमुळें पेंचप्रसंग व परकीय सत्ता चालू राहील खरी, पण पेंचप्रसंग चालू राहिलाच पाहिजे हें तर क्रांतिशास्त्राचे नवे महर्षि होऊं घातलेल्या 'लोकमान्य'कारांचें मुख्य सूत्र आहे.

* * *

गांधीजी-राजाजींनीं तयार केलेल्या काँग्रेस-लीग समेटाला 'लोकमान्य' पत्रानें दिलेला पाठिंबा केवळ औपचारिक स्वरूपाचा व नामधारी कसा आहे हें ह्या पूर्वीं आम्हीं दाखवून दिलें आहेच. जिनांची व लीगची फजिती करण्याची एक युक्ति या दृष्टीनेंच या मसुद्याकडे 'लोकमान्य' कार पाहात असतात, व आपल्या वाचकांनींहि हाच विकृत दृष्टिकोन स्वीकारावा अशी त्यांची सारखी धडपड चालू आहे. आणि म्हणूनच या मसुद्यांतील प्रत्येक कानामात्रा आणि स्वल्पविराम-अर्धविराम म्हणजे वज्रलेखच होय अशी वाचकांची समजूत करून देण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. राजाजींचा मसुदा म्हणजे "जातीय ऐक्याच्या वाटाघाटींचा **आधार**" होय, हें गेल्या बुधवारीं भरलेल्या मुंबईच्या काँग्रेसवाद्यांच्या सभेचें अधिकृत मत 'लोकमान्य'-कारांना मान्य नाहीं, व या मसुद्यांत जरूर ते फेरफार करण्याची आपली तयारी स्वतः गांधीजींनीं जाहीर केली आहे तीसुद्धां 'लोकमान्य' कारांना थापच वाटते. समेट घडवून आणणें हें मुख्य कार्य आहे, व समेटाच्या वाटाघाटी सुरू करण्याचा पाया म्हणूनच राजाजी-मसुद्याकडे पाहिलें पाहिजे, या गोष्टीला त्यांचा निकराचा विरोध आहे.

आणि म्हणूनच या मसुद्याच्या आधारें विधायक सूचना मांडणारा व समेटाच्या मार्गांतील खांचखळगे दाखवून ते ओलांडण्याचा परिणामकारक मार्ग दाखविणारा कॉ. पी. सी. जोशी यांचा लेख वाचून 'लोकमान्य'कारांचें पित्त खवळलें.

ह्या मसुद्याच्या आधारें जिनांना जमीनदोस्त करण्याचें कार्य जर साधणार नसेल, या मसुद्याच्या आधारें समेटाच्या वाटाघाटी यशस्वी रीतीनें चालवून कॉंग्रेस-लीग एकजूट जर घडून येणार असेल, तर ह्या मसुद्याचा उपयोग तरी काय, अशी 'लोकमान्य' कारांची गलिच्छ विचारसरणी आहे.

राजाजी—मसुदा म्हणजे हिंदुमहासभावाद्यांचा मसुदा नव्हे. 'लोकमान्य'कार या मसुद्याचें जें विडंबन मांडीत असतात त्याचा कॉ. पी. सी. जोशी यांच्या लेखामुळें 'खून' झाला आहे, ही गोष्ट अर्थातच कबूल केली पाहिजे. पण राजाजी-मसुदा हा जर वाटाघाटीचा पाया असेल, तर ह्या पायावर समेटाची भक्कम इमारत उभी करण्याचा सविस्तर आराखडाच कॉ. जोशी यांनीं मांडला आहे हें कुणाच्याहि लक्ष्यांत येईल.

* * *

समेटाच्या दिशेनें एकेक पाऊल पुढें टाकण्याची कम्युनिस्टांकडून करण्यांत येणारी प्रत्येक सूचना म्हणजे जिनांना—व 'पर्यायानें' साम्राज्यशाहीला—शरण जाण्याचीच सूचना होय, असा 'लोकमान्य'कार नेहमीं आक्रोश करीत असतात. त्यांना वस्तुतः कॉंग्रेस-लीग समेटच नको आहे व या बाबतींत त्यांचा व उघड हिंदु-महासभावाल्यांचा दृष्टिकोण अगदीं सारखा आहे. 'लोकमान्या' चा अग्रलेख वाचक दुसऱ्या दिवशींच विसरून जातात या (बहुतांशीं खऱ्या असलेल्या) गोष्टीवर विसंबून 'लोकमान्य' कार उलट्या सुलट्या युक्तिवादाच्या कोलांट्या उड्या मारीत असतात, पण त्यांच्या विचारसरणींतील मुख्य सूत्र चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत येणें मुळींच कठीण नाहीं. उदाहरणार्थ, गांधीजी जेव्हां सुटले तेव्हां देशांतील सर्व जनतेप्रमाणेंच कम्युनिस्टांनाहि आतां कॉंग्रेस-लीग समेटाच्या व राष्ट्रीय एकजुटीच्या मार्गांत साम्राज्यशाहीनें उभी केलेली मुख्य अडचण नाहींशी झाली म्हणून आनंद झाला. पण 'लोकमान्य' पत्रानें मात्र ता. १७ मेच्या अग्रलेखांत जाहीर केलें कीं "गांधी-जीना समेटाचें पाणी कम्युनिस्टांच्या तोंडास जें सुटलें आहे तें अविचारमूलक आहे."

त्यानंतर गांधीजींनीं सुटका झाल्यापासून पेंचप्रसंगाविरुद्ध व एकजुटीसाठीं चालविलेल्या प्रयत्नांच्या बातमीमुळें 'लोकमान्य' कारांच्या तोंडचें पाणीच पळालें. याच वेळीं समेटाची पहिली पायरी म्हणून गांधी-जीना भेट झाली पाहिजे अशी कम्युनिस्टांनीं सूचना केली, व देशाच्या कोनाकोपऱ्यांतून तिचे उत्साहयुक्त पडसाद उठले. 'लोकमान्य'कार आणखीच चिडून गेले. ता. २३ मेच्या अग्रलेखांत त्यांनीं पुढीलप्रमाणें तारे तोडले:—

' गांधींनीं जीनांना भेटण्यासंबंधानें कम्युनिस्टांनीं जी सूचना केली आहे ती पाहिली म्हणजे गांधी आणि कॉंग्रेस यांच्या स्वाभिमानाची होळी करण्याचें कम्युनिस्टांचें सनातनी राजकारण आतां नीचपणाच्या कळसास पोंचलें आहे असें वाटतें... गांधींनीं जीनांची भेट घेण्यांत कांहीं फायदा नाहीं. "

स्वतः गांधीजींनीं ह्या बेगडी क्रांतिकारकाचा हा देशद्रोही सल्ला ऐकला नाहीं, हें सर्वांना ठाऊक आहेच. गांधीजी आतां जीनांची भेट घेण्यासाठीं येत आहेत याचा अर्थ ते स्वतःच्या व कॉंग्रेसच्या ' स्वाभिमानाची होळी ' करीत आहेत हाच होय, ही ' लोकमान्य ' पत्राची भूमिका त्याचे वाचक कसे विसरूं शकतील ?

* * *

गांधीजी-राजाजी मसुदा प्रसिद्ध झाल्यानंतर व गांधी-जीना भेट ठरल्यानंतर संधिसाधु ' लोकमान्य 'कारांना या भूमिकेचा स्पष्ट पुनरुच्चार करणें अर्थातच अशक्य झालें. पण ही भेट यशस्वी होणें व समेट घडून येणें शक्य नाहीं, असा सूर आळविण्यास मात्र तेव्हांपासून त्यांनीं जोरानें सुरवात केली. वस्तुतः त्यांना ' समेट इष्ट नाहीं' हेंच सांगावयाचें आहे हें निर्विवाद होय. गांधी-जीना भेट अयशस्वी होणें हेंच त्यांना इष्ट वाटतें व ती अयशस्वी होण्यासाठीं ( व दे. भ. काकासाहेब गाडगीळांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, आपल्या कॉंग्रेस सोशालिस्ट 'केरसुणी'नें एकजुटीच्या 'समुद्राची भरती थोपवून धरण्यासाठीं' ) ते आपल्याकडून होईल तेवढा प्रयत्न करून पाहात आहेत. समेटाच्या अनिष्टतेसंबंधीं त्यांनीं लाजत लाजत काढलेले पुढील उद्गार पहाः—

" आजचे गांधींचे समेटाचे प्रयत्न मुळींच वाईट नाहींत. ते फसले तरी बिघडत नाहीं." ( ' लोकमान्य ', अग्रलेख, ता. ३० जून )

बिघडण्याचें काय कारण ? बिघडलें तर समेट यशस्वी झाल्यानेंच बिघडेल ! ॲमरीला विचारा, सावरकरांना विचारा, जयप्रकाश नारायणांना विचारा, ते ' लोकमान्य 'कारांच्या या म्हणण्यालाच पाठिंबा देतील यांत शंका नाहीं.

आणि म्हणूनच मुसलमानांना आपल्या वसतिस्थानांत स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा हक्क असावा ही लीगनें मांडलेली ( व राजाजी मसुद्यांत मान्य केलेली ) मागणी म्हणजे " एकाद्या गुंडानें दुसऱ्याच्या सुंदर मुलीस पळवून नेणें " होय, असें 'लोकमान्य'कार निर्लज्जपणें सांगत आहेत. त्यांचा हा ' फटकळ ' (वस्तुतः ग्राम्य) दृष्टांत पाहून ' लोकमान्या 'च्या प्रत्येक वाचकाला हा हिंदुसभेच्या ' प्रभात ' किंवा ' अग्रणी ' पत्राचा तर अंक नव्हे ना, अशी क्षणभर शंका आली असल्यास त्यांत नवल नाहीं.

* * *

इतक्या थराला गेलेल्या इसमानें कम्युनिस्ट पार्टीच्या मुख्य पुढाऱ्याला 'भेकड' म्हणावें, हें क्रमप्राप्तच होय. या 'शूर' लेखकाचें स्वतः गांधीजींविषयीं व इतर कॉंग्रेस पुढाऱ्यांविषयीं काय मत आहे, याची या ठिकाणीं आठवण करून दिली म्हणजे पुरे.

गांधीजी हे पक्षपाती व भोंदू आहेत, व त्यांचे अनुयायी सुखलोलुप व खादाड आहेत, असें त्याचें मत आहे. उदाहरणार्थ पुढील उतारा पहा:—

"गांधीवाद्यांनीं 'तुरुंगांत' पळ काढला.... गांधींची मौज अशी आहे कीं त्यांच्या भोंवतालच्या उजव्या गटांतल्या लोकांनीं सत्य अहिंसेचा बाजार मांडून आपापले दर्जे व फराळाचे डबे संभाळले तर त्यांचा गांधी धिक्कार करीत नाहींत... कोळसा उगाळावा तितका काळा!" ('लोकमान्य,' अग्रलेख, ता. ३०-७-४४).

कॉंग्रेसमधील मुसलमानांविषयीं तरी या लेखकाचें चांगलें मत आहे काय? 'लोकमान्य'कारांना फक्त जिनांचा व लीगचाच राग येतो, 'प्रभात'काराप्रमाणें सर्व मुसलमानांविरुद्ध त्यांचा दांत नाहीं, असा उगाच गैरसमज करून घेणाऱ्या लोकांनीं 'लोकमान्य'कारांचे पुढील उद्गार लक्षांत ठेवावेत:—

"आजचे राष्ट्रीय मुसलमान निरुपयोगी आहेत, इतकेंच नव्हे तर मुस्लिम राष्ट्रवादाचें वाईट उदाहरण आहेत."

मुसोलिनीला 'राष्ट्रभक्त' म्हणणारा व हिटलरला 'जर्मन राष्ट्राला पुनरुज्जीवित करणारा' म्हणून प्रशस्तिपत्र देणारा लेखक हाच होय!

(२७-८-४४)

— ३२ —

# विद्यार्थ्यांना फसविण्याचा प्रयत्न

गेल्या आठवड्यांत भरलेल्या मुंबई विद्यार्थी-परिषदेचें उद्‌घाटन करतांना दे. भ. बाळासाहेब खेर यांनीं पुढील उद्गार काढले:—

" आपल्यांतील कांहीं लोक गांधीजींच्या भूमिकेचा विपर्यास करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तावडतोब राष्ट्रीय सरकार स्थापन केलें पाहिजे अशी गांधीजींनीं जी मागणी केली आहे, तिचा अर्थ हे लोक असा करतात कीं गांधीजींनीं स्वातंत्र्याच्या प्रश्नावर तडजोड केली आहे आणि स्वातंत्र्याचें ध्येय सोडून दिलें आहे. "

गांधीजींवर असली टीका करणाऱ्यांपासून सावध राहण्याचा श्री. खेर ह्यांनीं विद्यार्थ्यांना इषारा दिला, व गांधीजींनीं चालविलेल्या प्रयत्नांना पाठिंबा देणें विद्यार्थ्यांचें कर्तव्य आहे असें त्यांनीं बजावलें.

श्री. खेर यांनीं कोणत्या टीकाकारांना अनुलक्षून हे उद्गार काढले हें समजून घ्यावयाचें असल्यास ' हिंद–प्रजा ' साप्ताहिकाचे अलिकडील अंक चाळून पहावे.

* * *

या पत्रांत गांधीजींच्या राष्ट्रीय सरकारच्या मागणीवर पुढीलप्रमाणें टीका करण्यांत आली आहे:—

" गांधीजींचा सध्यांचा तत्त्वभ्रष्टपणा ( ॲपॉस्टसी ) फारच गंभीर स्वरूपाचा आहे ... गांधीजींच्या व्यक्तित्वाविषयीं व अपरिमित देशसेवेविषयीं आम्हांला अत्यंत आदर वाटत असला तरी ते आज जें करीत आहेत तें आम्हांला अपमानास्पद शरणागतीप्रमाणेंच वाटतें; असली भूमिका घेण्याला मान्यता देण्यापेक्षां राष्ट्र या नात्यानें आमचा नायनाट होणेंच पत्करलें. " ( हिंद–प्रजा, ५–८–४४ )

' हिंद–प्रजा ' साप्ताहिकांत प्रश्नोत्तरांचें एक सदर असतें व त्यांत एका प्रश्नाला या पत्राचें अधिकृत उत्तर म्हणून वरील मत व्यक्त करण्यांत आलें आहे.

केवळ नजरचुकीमुळें किंवा तात्पुरत्या वेडाच्या लहरीमुळें ' हिंद–प्रजे 'च्या संपादकांनीं गांधीजींवर वरील टीका छापली असें समजण्याचें मुळींच कारण नाहीं. याचा पुरावा या पत्राच्या इतर अंकांतसुद्धां याच सदरांत व इतर लेखांत आढळतो.

ता. १२–८–४४ च्या अंकांत एका प्रश्नाचें उत्तर देतांना हें पत्र म्हणतें:—

" गांधीजींना आज जें राष्ट्रीय सरकार हवें आहे त्याच्या हातीं युद्धकाळांत खरीखुरी सत्ता मुळींच असणार नाहीं... गांधीजींनीं खरोखरीं राष्ट्रीय सरकारची किंमत शून्याइतकी (नॉन्–एंटिटी) खालीं आणली आहे. आम्हांला हुद्याच्या नोकऱ्या पाहिजेत, व सरकार आम्हांला राष्ट्रीय मंत्रिमंडळ असें नांव देण्याची मेहरबानी करणार असेल तर रिक्रूटिंग हपीसराची भूमिका पत्करण्यास आम्हीं तयार आहोंत, असें ते प्रामाणिकपणानें रोखठोक कां सांगत नाहींत ? "

गांधीजींवर अप्रामाणिकपणाचा व ब्रिटिश सरकारचे रिक्रूटिंग हपीसर बनल्याचा आरोप करणाऱ्या या पत्राची 'राष्ट्रवादी विद्यार्थ्यांचें मुखपत्र' म्हणून जाहिरात करण्यांत येत असते ! कॉंग्रेस–सोशालिस्टांच्या व लोटवाला–कंपूच्या मार्गदर्शनाखालीं चाललेल्या या पत्राचा कॉंग्रेसच्या राष्ट्रवादाशीं काडीइतकाहि संबंध नाहीं हें उघड आहे. श्री. बाळासाहेब खेर यांना मुंबईच्या विद्यार्थ्यांपुढें भाषण करतांना असल्या टीकाकारांची हजिरी घेणें साहजिकपणेंच आवश्यक वाटलें.

* * *

'केनेडी ब्रिज' विद्यार्थी-संघाचे जनरल सेक्रेटरी श्री. प्रभाकर कुंटे हे ह्या 'हिंद–प्रजा' साप्ताहिकांत नेहमीं लेख लिहीत असतात, व त्यांच्या सहीनें प्रसिद्ध झालेल्या लिखाणांतहि गांधीजींवर वरीलप्रमाणेंच टीका आहे, इतकेंच नव्हे तर सर्व राष्ट्रवादी विद्यार्थ्यांचें असेंच मत असल्याची त्यांनीं ग्वाही दिली आहे ! ता. २९-७-४४ च्या अंकांत श्री. कुंटे म्हणतात:—

" ह्या (गांधीजींच्या) योजनेविषयीं राष्ट्रवादी विद्यार्थ्यांना काय वाटतें हें कळणें फार कठीण असलें तरी एवढें मात्र निश्चितपणें सांगतां येईल की गांधीजींची ही 'घसरगुंडी' [क्लाइम्–डाउन] आहे असेंच त्यांना वाटतें. "

राष्ट्रवादी विद्यार्थ्यांची अशा रीतीनें बदनामी करण्याची कारवाई उघड उघडपणें चालू ठेवणें श्री. कुंटे यांना श्री. बाळासाहेब खेरांच्या इशाऱ्यानंतर आतां शक्य होणार नाहीं. परवांच्या परिषदेंत राष्ट्रवादी विद्यार्थ्यांचा जमाव समोरासमोर दिसल्यावर श्री. कुंटे यांना 'गांधीजींची घसरगुंडी', 'गांधीजींची अपमानास्पद शरणागति' वगैरे बाष्कळ घोषणा आपल्या ठरावांत नमूद करण्याचें मुळींच धैर्य झालें नाहीं.

राष्ट्रवादी विद्यार्थ्यांची विचारसरणी व 'हिंद–प्रजा' पत्राची विचारसरणी यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे, याचा पुढील पुरावा पहा. गेल्या रविवारच्या विद्यार्थी-परिषदेनें 'गांधीजींच्या नेतृत्वावर अढळ श्रद्धा' व्यक्त करणारा ठराव पास केला. उलटपक्षीं 'हिंद–प्रजा' पत्र म्हणतें:—

" सध्यां गांधीजींच्या नेतृत्वाखालीं कॉंग्रेस हिंदी स्वातंत्र्याच्या शत्रूंशीं तडजोड करण्यास तयार झाली आहे असें दिसतें; पण आम्हांला ठाऊक आहे कीं गांधीजी म्हणजे कॉंग्रेस नव्हे. "

* * *

राष्ट्रीय सरकारच्या प्रश्नाप्रमाणेंच काँग्रेस-लीग एकी, राष्ट्रीय पुढाऱ्यांची सुटका, वगैरे प्रश्नांवरहि 'हिंद-प्रजा' पत्राचा व कुंटे-साक्रीकर गटाचा दृष्टिकोन सर्वसामान्य राष्ट्रवादी विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनाहून अगदीं भिन्न आहे.

श्री. बाळासाहेब खेर यांच्या सल्ल्यास अनुसरून गेल्या आठवड्यांतील विद्यार्थी-परिषदेनें गांधी-जिना भेटीचें स्वागत केलें. पण 'हिंद-प्रजा' पत्राची या बाबतींत काय भूमिका आहे? ता. १२-८-४४च्या अंकांत प्रश्नोत्तराच्या सदरामध्यें या पत्रानें विद्यार्थ्यांना पुढील शिकवणूक दिली होती:—

"काँग्रेस-लीग एकीविषयीं आज या वाटाघाटी सुरू झाल्या आहेत यावरूनच असें दिसून येतें कीं ह्या एकीसाठीं आज इतकें उत्सुक झालेल्या लोकांचा काँग्रेसच्या भवितव्यावर खरोखरी विश्वासच नाहीं, किंबहुना हिंदुस्थानच्या भवितव्यावरहि त्यांचा विश्वास नाहीं ... ...

"लीगसारख्या जातीय संस्थेशीं कोणतीहि वाटाघाट केल्यास काँग्रेसच्या राष्ट्रीय स्वरूपाला कमीपणा येण्याचा संभव आहे. ... ..."

त्याच अंकांत डॉ. चिटणीस म्हणतात:—"या (गांधी-जिना) भेटीची गरज तरी काय हें मला कळत नाहीं."

'हिंद-प्रजा' पत्राच्या ता. ५-८-४४ च्या अंकांत 'इंडियन स्टूडन्ट्स काँग्रेस' संस्थेचा जाहिरनामा प्रसिद्ध झाला आहे, त्यांत राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या सुटकेच्या प्रश्नावर पुढील कलम घातलें आहे:--

"पुढाऱ्यांची सुटका नव्हे, तर हिंदुस्थानची सुटका:-- ... देशापुढील खराखुरा प्रश्न पुढाऱ्यांची सुटका हा नसून हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हा आहे...... "

याउलट गांधीजींच्या सूचनेवरून मुंबईच्या परिषदेनें मान्य केलेल्या दहा कलमी कार्यक्रमाचा ठराव पहा. यापैकीं आठवें कलम 'काँग्रेस पुढाऱ्यांच्या मुक्ततेसाठीं चळवळ करावी' असें आहे.

गांधीजींनीं विद्यार्थ्यांना आपल्या कार्यक्रमांत पुढाऱ्यांच्या सुटकेच्या चळवळीचा समावेश करण्याचा आग्रह कां केला? कारण आजचा पेंचप्रसंग सोडविण्यासाठीं, संकटाचें निवारण करण्यासाठीं, व स्वातंत्र्याचा मोर्चा पुढें नेण्यासाठीं, नेहरू प्रभृति पुढारी आज बाहेर मोकळे असणें अत्यंत आवश्यक आहे, याची गांधीजींना पूर्ण जाणीव आहे, पण 'गांधीजी म्हणजे काँग्रेस नव्हे' असें म्हणणाऱ्या व गांधीजींवर तत्त्व-भ्रष्टपणाचा आरोप करणाऱ्या काँग्रेस-सोशालिस्ट पिसाटांना गांधीजींचें हें मत कसें आवडणार?

(१०-९-४४)

वा. म. ... शाखा

राष्ट्रीय सरकारच्या प्रश्नाप्रमाणेंच काँग्रेस–लीग एकी, राष्ट्रीय पुढाऱ्यांची सुटका, वगैरे प्रश्नांवरहि ' हिंद–प्रजा ' पत्राचा व कुंटे–साक्रीकर गटाचा दृष्टिकोन सर्वसामान्य राष्ट्रवादी विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनाहून अगदीं भिन्न आहे.

श्री. बाळासाहेब खेर यांच्या सल्ल्यास अनुसरून गेल्या आठवड्यांतील विद्यार्थी-परिषदेनें गांधी–जिना भेटीचें स्वागत केलें. पण ' हिंद–प्रजा ' पत्राची या बाबतींत काय भूमिका आहे? ता. १२–८–४४च्या अंकांत प्रश्नोत्तराच्या सदरामध्यें या पत्रानें विद्यार्थ्यांना पुढील शिकवणूक दिली होती:—

" काँग्रेस–लीग एकीविषयीं आज या वाटाघाटी सुरू झाल्या आहेत यावरूनच असें दिसून येतें कीं ह्या एकीसाठीं आज इतकें उत्सुक झालेल्या लोकांचा काँग्रेसच्या भवितव्यावर खरोखरी विश्वासच नाहीं, किंबहुना हिंदुस्थानच्या भवितव्यावरहि त्यांचा विश्वास नाहीं ... ...

" लीगसारख्या जातीय संस्थेशीं कोणतीहि वाटाघाट केल्यास काँग्रेसच्या राष्ट्रीय स्वरूपाला कमीपणा येण्याचा संभव आहे. ... ... "

त्याच अंकांत डॉ. चिटणीस म्हणतात:—" या ( गांधी–जिना ) भेटीची गरज तरी काय हें मला कळत नाहीं."

' हिंद–प्रजा ' पत्राच्या ता. ५–८–४४ च्या अंकांत 'इंडियन स्टूडन्ट्स काँग्रेस' संस्थेचा जाहिरनामा प्रसिद्ध झाला आहे, त्यांत राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या सुटकेच्या प्रश्ना-वर पुढील कलम घातलें आहे:––

"पुढाऱ्यांची सुटका नव्हे, तर हिंदुस्थानची सुटका:–– ... देशापुढील खराखुरा प्रश्न पुढाऱ्यांची सुटका हा नसून हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हा आहे...... "

याउलट गांधीजींच्या सूचनेवरून मुंबईच्या परिषदेनें मान्य केलेल्या दहा कलमी कार्यक्रमाचा ठराव पहा. यापैकीं आठवें कलम ' काँग्रेस पुढाऱ्यांच्या मुक्तते-साठीं चळवळ करावी ' असें आहे.

गांधीजींनीं विद्यार्थ्यांना आपल्या कार्यक्रमांत पुढाऱ्यांच्या सुटकेच्या चळवळीचा समावेश करण्याचा आग्रह कां केला? कारण आजचा पेंचप्रसंग सोडविण्यासाठीं, संक-टाचें निवारण करण्यासाठीं, व स्वातंत्र्याचा मोर्चा पुढें नेण्यासाठीं, नेहरू प्रभृति पुढारी आज बाहेर मोकळे असणें अत्यंत आवश्यक आहे, याची गांधीजींना पूर्ण जाणीव आहे, पण ' गांधीजी म्हणजे काँग्रेस नव्हे ' असें म्हणणाऱ्या व गांधीजींवर तत्त्व-भ्रष्टपणाचा आरोप करणाऱ्या काँग्रेस-सोशालिस्ट पिसाटांना गांधीजींचें हें मत कसें आवडणार?

( १०–९–४४ )

REFBK-0006488